**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ. शी. / मु. शी.** : मंत्र्यांचा परिचय

श्री. छगन भुजबळ (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, डॉ. पतंगराव श्रीपतराव कदम यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. जयंत राजाराम पाटील यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. मनोहरराव राजूसिंग नाईक यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. विनय विलासराव कोरे यांचा मंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. सिध्दाराम सातलिंगअप्पा म्हेत्रे यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

सभापती महोदय, श्री. जयप्रकाश रावसाहेब दांडेगावकर यांचा राज्यमंत्री म्हणून मी आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/KGS/MMP

नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत

**सभापती** : माझ्याकडे नियम 289 अन्वये दोन प्रस्ताव आलेले आहेत. प्रश्नोत्तराचा तास तहकूब करुन प्रस्तावात जी अत्यंत महत्वाची बाब नमूद केलेली आहे त्या विषयावर तातडीने चर्चा घ्यावी या अनुषंगाने असणारे हे प्रस्ताव आहेत. नियमाप्रमाणे आपल्या आजच्या कामकाजामध्ये त्यांनी नमूद केलेला जो विषय आहे त्या पध्दतीचा विषय नाही. पण एक विशेष बाब म्हणून, सन्माननीय सदस्यांनी नमूद केलेला जो विषय आहे त्यामध्ये "ज्या अर्थी दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी अतिरेक्यांनी मुंबई येथील छत्रपती शिवाजी टर्मिनस, ताज व ऑबेरॉय हॉटेल, इतर पंचतारांकित हॉटेल्स, कुलाब्यातील नरीमन हाऊस, लिओपोर्ड कॅफे तसेच माझगाव, विलेपार्ले येथील टॅक्सीमध्ये केलेल्या आत्मघातकी हल्ल्यात सुमारे 195 जण मृत्यूमुखी पडून 350 च्या वर जखमी होणे, दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख, सह पोलीस आयुक्त, अतिरिक्त पोलीस आयुक्त व इतर धडाकेबाज अधिकाऱ्यांसह 18 पोलिसांना आलेले वीरमरण" अशा पध्दतीचा हा प्रस्ताव आहे. जरी नियमाप्रमाणे नियम 289 अन्वये आजच्या कामकाजामध्ये हा विषय नसला तरी अपवाद म्हणून मी माननीय विरोधी पक्ष नेते आणि अन्य सन्माननीय सदस्य तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी या ठिकाणी नियम 289 अन्वये जे प्रस्ताव दिलेले आहेत ते मी मान्य करण्याचे ठरविले आहे. पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी दिलेला आहे.

दुसरा प्रस्ताव माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, श्री. नितीन गडकरी, डॉ. दीपक सावंत, श्री. विनोद तावडे,डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. मधुकर चव्हाण, श्री. संजय केळकर, श्री. परशुराम उपरकर, श्री. प्रकाश शेंडगे, ॲड.अनिल परब व श्री. पाशा पटेल यांनी दिलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/ श्री.बरवडनंतर 11:05

**सभापती**.....

प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयावर चर्चा करण्यात यावी अशी पहिली विनंती सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी केली आहे. एक अपवाद म्हणून मी नियम 289 खाली चर्चा स्वीकारत आहे. याचा अर्थ आज प्रश्नोत्तराचा तास होणार नाही. ही चर्चा नियम 93 अन्वये घ्यावी की नियम 97 अन्वये घ्यावी हे विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य सांगतील. त्याबाबत मला किंवा सभागृहालाही काही अडचण नाही. ज्यावेळी नियम 93 अन्वये चर्चा स्वीकारली जाते त्यावेळी दोन तास चर्चा केली जाते. अशाप्रकारच्या परिस्थितीमध्ये प्रश्नोत्तराचा तास तहकूब करण्यापुरता नियम 289 मर्यादित आहे. नियम 289 नुसार प्रश्नोत्तराचा तास तहकूब केल्यानंतर एखाद्या विषयावर अल्पकालीन चर्चा करता येते किंवा नियम 93 नुसार चर्चा करता येते. अल्पकालीन चर्चेसाठी 3 तासाचा वेळ असतो. नियम 93 नुसार 2 तास चर्चा करता येते. परंतु आजच्या विषयाचे गांभीर्य पाहता आज 2 तासांची मर्यादाही देखील न ठेवण्याचा निर्णय मी घेतलेला आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण या विषयावर नियम 289 अन्वये चर्चा सुरु करण्याचे मान्य केलेले आहे, त्याबद्दल मी आपले आभार मानतो. हा नियमाबद्दलचा प्रश्न नाही. गेल्या 10 वर्षामध्ये घडलेली एक मोठी, वेगळी घटना आहे, परकीय देशाने आपल्या राज्यावर केलेले हे आक्रमण आहे. म्हणून या विषयाची गंभीरता बघून या सदनातील ज्या सन्माननीय सदस्यांना या विषयावर आपले मत मांडावयाचे असेल त्यांना बोलू द्यावे. मग ते सत्तारुढ पक्षाचे सन्माननीय सदस्य असोत की विरोधी पक्षातील असोत. सगळयांना हा विषय मांडण्यासाठी जेवढा वेळ लागेल तेवढा द्यावा. हा विषय इतका मोठा असल्यामुळे त्याला वेळेची मर्यादा घालता येत नाही. याबाबत सर्वंकष चर्चा झाली पाहिजे, चर्चेअंती शासनाकडून सविस्तरपणे उत्तर मिळाले पाहिजे. महाराष्ट्रातील जनतेकरिता आणि सभागृहाकरिता ते आवश्यक आहे. तेव्हा याकरिता वेळेची मर्यादा न ठेवता चर्चा झाली पाहिजे. अर्थात आम्ही सर्वजण वेळेचे भान ठेवून आमचे विचार मांडू. परंतु याबाबत सगळे महत्वाचे पैलू सभागृहासमोर आले पाहिजेत. अनेकांच्या मनामध्ये ब-याच गोष्टी आहेत, केवळ विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांच्या मनात आहेत असे नाही तर सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या मनामध्येही आहेत.हे सर्व गृहित धरुन आपण या चर्चेसाठी कोणता नियम लावावयाचे ते ठरवून चर्चेला सुरुवात करावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

2...



NTK/ KGS/ MMP/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मांडलेल्या सूचनेला विरोध करण्याचे काहीच कारण नाही. कारण दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना आपापले मुद्दे माते मांडावयाचे आहेत. या चर्चेसाठी 2 किंवा 3 तासांची मर्यादा घातली नाही तरीही वेळेचे भान ठेवून ही चर्चा संपविली पाहिजे. या चर्चेच्या वेळी सगळयांना आपली मते मांडण्याची संधी आपण द्यावी असे माझे स्वत:चे मत आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी असे म्हटले की, सर्व सन्माननीय सदस्यांना आपापली मते मांडण्याची संधी मिळाली पाहिजे. हा सल्ला देत असताना किंवा आपले म्हणणे मांडत असताना गेल्या 10 वर्षामध्ये देशात झालेल्या आतंकवादाच्या प्रवासाचा त्यांनी उल्लेख केला आहे. त्यामुळे या प्रस्तावावरील चर्चा मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यासंबंधी मर्यादित न ठेवता या विषयामध्ये यापूर्वी महाराष्ट्रामध्ये जे काही प्रकार झाले आहेत, ज्यामुळे महाराष्ट्र दुखावला गेला आहे, त्याबाबतचा विषयही या प्रस्तावात समाविष्ट करावा अशी मी विनंती करतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हा विषय केवळ मुंबईवर अतिरेक्यांकडून झालेल्या हल्ल्यापुरता मर्यादित आहे. सन्माननीय सदस्यांनी आता जो काही उल्लेख केला आहे त्याबाबत त्यांनी आपल्याकडे वेगळा प्रस्ताव देणे आवश्यक होते, माझी त्यांना विनंती आहे की, या विषयाचा त्यांनी पालापाचोळा करु नये.

श्री.जितेंद्र आव्हाड : आतंकवाद या विषयावर मला बोलण्यासाठी आपण संधी द्याल त्यावेळी मी आतंकवादाचे विविध पैलू सांगेन. मी सन्माननीय श्री.आडवाणी यांनी केलेल्या भाषणाचे उदाहरण नमूद करु इच्छितो. त्यांनी सांगितले होते की, आतंकवादाला धर्म नाही.....

श्री.नितीन गडकरी : आपण या विषयावर वेगळी सूचना का दिली नाही ?

श्री.जितेंद्र आव्हाड : आपण दिलेल्या प्रस्तावाबाबत सन्माननीय सभापती वेगळा मार्ग काढण्याचा निर्णय घेत आहेत. त्यावेळी आम्ही माननीय सभापतींना काही सांगू इच्छितो. आपली सूचना त्यांनी मान्य केलेली आहे. परंतु या विषयाचे महत्व ओळखून सध्याच्या नियमाला बगल देऊन ही चर्चा स्वीकारत आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्ही या विषयाची व्याप्ती ओळखून नियमानुसार सूचना दिलेली नाही. सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी कोणत्याही प्रकारची लेखी सूचना आपणाकडे दिलेली नाही आणि ती दिलेली असेल तर त्याबाबत आम्हाला काही म्हणावयाचे नाही. त्यांनी लेखी सूचना दिलेली नसली तरी त्यांनी या विषयावर जरुर बोलावे. तेव्हा आम्ही दिलेली सूचना आपण स्वीकारावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : मी तशाच प्रकारची विनंती माननीय सभापती महोदयांना करीत आहे. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या हिताच्या दृष्टीने लोकांच्या मनातील एखाद्या विषयासंबंधीचा प्रक्षोभ आणि त्या विषयातील विविध कंगोरे लक्षात घेऊन तो विषय जर माननीय सभापतींनी स्वीकारला तर त्यामुळे नियमामध्ये बदल होतो अशातला भाग नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गट नेत्यांच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे हा विषय अतिशय गंभीर आणि मुंबईपुरता मर्यादित आहे. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था हा वेगळा विषय होऊ शकतो. मुंबईमध्ये 26 नोव्हेंबर 2008 रोजी धडलेल्या घटनेसंबंधी आम्ही स्पेसिफिक सूचना दिलेली आहे आणि त्याच्या मर्यादेत राहून ही चर्चा याठिकाणी झाली पाहिजे अशी आमची मागणी आहे. काल गट नेत्यांच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे 289 अन्वयेचा प्रस्ताव विरोधी पक्षातर्फे आणला गेला तरी सत्ताधारी पक्षाला बोलू देण्याची परवानगी आम्ही दिलेली आहे. हा संपूर्ण राज्याचा प्रश्न आहे. राज्यावर आलेले हे संकट आहे म्हणून यासंबंधी चर्चा करण्याची परवानगी देत असताना कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नाची चर्चा या विषयाला धरुन करणे अपेक्षित नाही. जेव्हा एखादा मर्यादित विषय चर्चेला दिला जातो त्यावेळी त्या मर्यादित विषयावरच चर्चा झाली पाहिजे. या विषयावर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळाली पाहिजे अशी आमची मागणी आहे. आमचा काल पासून हाच आग्रह आहे की या विषयावर स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून चर्चा झाली पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्र आणि देश एका गंभीर समस्येला तोंड देत असताना या विधिमंडळाच्या अधिवेशनामध्ये त्यावर संयुक्तपणे एकात्मता आणि राष्ट्रीयत्व सांगणारी चर्चा व्हावी असे आपण आपल्या दालनामध्ये आम्हाला बोलावून सांगितले. त्या संदर्भात काही निर्बंध असले पाहिजेत हेही आपण आम्हाला सांगितले, त्याबद्दल मी आपणाला धन्यवाद देतो. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या म्हणण्याप्रमाणे महाराष्ट्रातील कायदा

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( श्री. दिवाकर रावते..)

आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात मतमतांतरे असतीलही आणि ते मी नाकारीत नाही. शासनाच्या उणीवासंबंधी, शासनाच्या उदासीनतेमुळे निर्माण झालेल्या परिस्थिती विषयी विरोधी पक्षाला आपला प्रस्ताव आणण्याची संधी असते आणि तशा प्रकारचा प्रस्ताव विरोधी पक्षाने दिलेला आहे. तेव्हा विरोधी पक्षाने जो प्रस्ताव दिलेला आहे त्यावर चर्चा होत असताना जे शहीद झालेले आहेत त्यांचा अवमान होईल अशा प्रकारचा कोणताही विषय या ठिकाणी उपस्थित होता कामा नये. नाही तर देशाकरिता लढणा-यांविषयी राजकारण्यांच्या मनात काही नाही अशा प्रकारचा संदेश जाईल. तेव्हा हा जो मर्यादित विषय दिलेला आहे त्यावरच चर्चा व्हावी अशी माझी आपणास विनंती आहे. कायदा आणि सुव्यस्थेच्या आणि तत्सम अन्य विषयाच्या संदर्भात विविध आयुधांमार्फत येथे चर्चा करता येईल. मात्र आजच्या या चर्चेचे गांभीर्य जाता कामा नये. चर्चेच्या ओघामध्ये एखाद्या वेगळया विषयाला स्पर्श केला जातोय असे जरी आपल्या लक्षात आले तरी आपण आम्हाला ताबडतोब थांबवावे. तेव्हा राष्ट्रहिताच्या दृष्टीने या विषयावर चर्चा व्हावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, नियमाप्रमाणे नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावामध्ये सुधारणा करण्याची तरतूद नाही. त्यामुळे मी दिलेल्या प्रस्तावामध्ये कोणतीही सुधारणा करु नये अशी माझी आपणास विनंती आहे.

...नंतर श्री.गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.शिगम 11:15

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री जितेंद्र आव्हाड, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, जयंत प्र.पाटील यांनी या ठिकाणी मुंबईतील घटनेच्या बाबतीत विचार मांडले आहेत. माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी म.वि.प.289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. हा अत्यंत गंभीर आणि महत्वाचा विषयासंबंधीचा प्रस्ताव आहे. एक अपवादात्मक बाब म्हणून काल या विषयाच्या अनुषंगाने विधानसभेचे अध्यक्ष, मी तसेच विरोधी पक्ष नेते, माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री यांची एक संयुक्त बैठक काल घेतली होती. लोकसभेमध्ये राष्ट्रीय एकात्मता रहावी म्हणून या विषयाच्या अनुषंगाने अतिशय उत्कृष्ट पध्दतीची चर्चा झाली व त्यामुळे एक अतिशय चांगले उदाहरण आपल्या समोर निर्माण झाले आहे. हा विषय राष्ट्रीय एकतेचा असल्यामुळे या विषयाच्या बाबतीत सभागृहात चर्चा होत असताना सर्व सन्माननीय सदस्यांनी काही निकष पाळावेत अशी माझी इच्छा आहे. या विषयाच्या बाबतीत उच्चस्तराची चर्चा व्हावी अशी अपेक्षा आहे. सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या मनात राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या संबंधीचे काही प्रश्न निर्माण झाले आहेत, त्या प्रश्नांवर चर्चा उपस्थित करावयाची असेल तर त्यांना योग्य वेळी निश्चितपणे संधी उपलब्ध करुन देईन. आज विरोधी पक्षाने प्रस्ताव दिलेला आहे, त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मर्यादित स्वरुपात चर्चा व्हावी अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबई शहरावर दहशतवादी हल्ला झाला त्या अनुषंगानेच सन्माननीय सदस्यांनी आपापले विचार व्यक्त करावेत. सेन्सुअर मोशन हा नियम 93 खाली येऊ शकतो. त्या मोशनसाठी वेळेची मर्यादा घालून दिलेली असते. परंतु काल संयुक्त बैठक झाली त्यात ठरल्याप्रमाणे विरोधी पक्षाकडून हा मोशन देण्यात आलेला असला तरी या चर्चेला वेळेची मर्यादा शिथील करण्यात आलेली असून त्यावर मतदान घेतले जाणार नाही. विरोधी पक्षाने हा सेन्सुअर मोशन दिलेला असला तर संकेताप्रमाणे अशा प्रस्तावावर सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलता येत नाही. परंतु अपवादात्मक बाब म्हणून तो संकेत बाजूला सारुन सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना देखील या प्रस्तावावर बोलण्याची संधी दिली जाणार आहे. काल संयुक्त बैठक झाली त्या बैठकीस मी, माननीय अध्यक्ष, माननीय मुख्यमंत्री,उप मुख्यमंत्री, विरोधी पक्ष नेते, गट प्रमुख, विरोधी पक्षाचे व सत्ताधारी पक्षाचे काही सदस्य उपस्थित होते, सर्वांनी चर्चा करुन या विषयासंबंधी निर्णय घेतलेला आहे. कालच्या संयुक्त बैठकीत ज्या प्रमाणे कामकाज ठरले त्या

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

प्रमाणे या प्रस्तावावरील चर्चेला आपण सुरुवात करणार आहोत. सदरहू चर्चा सुरु होण्यापूर्वी माननीय वित्त व नियोजन मंत्र्यांना काही कागदपत्रे सभागृहासमोर ठेवावयाची आहेत. ती ठेवण्यास मी परवानगी देत आहे. सदर कागदपत्रे सभागृहात सादर झाल्यानंतर विरोधी पक्षाकडून आलेल्या प्रस्तावावरील चर्चेस सुरुवात करण्यात येईल.

-------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.शिगम 11:15

**पृ.शी./मु.शी.**: अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे

श्री. अजित पवार ( जलसंपदा मंत्री ) : सभापती महोदय, सन 2008 चा अध्यादेश क्रमांक 8- महाराष्ट्र आकस्मिकता निधी ( दुसरी सुधारणा ) अध्यादेश मी आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----------

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2008-2009 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे.

श्री. अजित पवार ( जलसंपदा मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008-2009 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2008-2009 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**सभापती** : सन 2008-2009 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर झाले आहे. विवरणपत्राच्या प्रती सन्माननीय सदस्यांना राखून ठेवण्यात आलेल्या टपाल खणात वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

--------------

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: सन 2000-2001 व 2001-2002 करिता खर्चाचे अतिरिक्त विवरणपत्र सादर करणे.

श्री. अजित पवार ( जलसंपदा मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2000-2001 व 2001-2002 करिता खर्चाचे अतिरिक्त विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2000-2001 व 2001-2002 च्या खर्चाच्या अतिरिक्त विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**सभापती** : सन 2000-2001 व 2001-2002 मधील खर्चाचे अतिरिक्त विवरणपत्र सादर झाले आहे. विवरणपत्राच्या प्रती सन्माननीय सदस्यांना राखून ठेवण्यात आलेल्या टपाल खणात वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

-----------

यानंतर श्री. भोगले...

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : आजच्या उर्वरित कामकाजातील लक्षवेधी सूचना मी राखून ठेवीत असून त्या पुढे चर्चेला घेण्याचे मी ठरविले आहे. नियम 93 अन्वयेच्या सूचना मी आज विचारात घेणार नसून आज ज्या नियम 93 अन्वयेच्या सूचना प्राप्त झालेल्या आहेत त्या संदर्भात उद्या जरुर विचार केला जाईल. एकूण आजच्या चर्चेचे महत्व लक्षात घेता माझी सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, चर्चेसाठी कितीही वेळ लागला तरी चर्चा आज पूर्ण केली जावी आणि चर्चेवरील मंत्रीमहोदयांचे उत्तर उद्या सकाळी होईल असा निर्णय घेऊ या. या अनुषंगाने माझी सभागृहाला विनंती आहे की, आज चर्चेसाठी कितीही वेळ बसावे लागले तरी हरकत नसावी, परंतु ही चर्चा आज पूर्ण करण्यात यावी आणि उद्या सकाळी 10.00 वाजता सभागृहाची बैठक सुरु होऊन प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर सन्माननीय गृहमंत्री सभागृहात आल्यानंतर चर्चेवरील उत्तराचे भाषण होईल.

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, माझी एवढीच विनंती आहे की, चर्चेला वेळ ठरवून द्यावी. ज्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत ते बोलतील. परंतु वेळ निश्चित केली तर ते योग्य होईल असे मला वाटते.

**सभापती** : मी वेळ ठरवून दिली आहे, आजच्या चर्चेचे महत्व डोळयासमोर ठेवून कितीही वेळ लागला तरी आज चर्चा पूर्ण करण्यात येईल. सन्माननीय विरोधी पक्षनेते व सन्माननीय सभागृहाचे नेते यांना माझी विनंती आहे की, सर्व सन्माननीय सदस्यांना या चर्चेमध्ये आपले विचार मांडण्याची संधी मिळण्याकरीता वेळेचे नियोजन कसे करावयाचे हे त्यांनी ठरवावे.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ 11:20

**पृ.शी./मु.शी.**: सभापती तालिका नामनिर्देशित करणे

**सभापती** : मी महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 8(1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करीत आहे :-

(1) श्री.उल्हास पवार

(2) श्री.भास्कर जाधव

(3) श्री.रामनाथ मोते

(4) ॲड.अनिल परब

--------------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबई शहरातील विविध ठिकाणी अतिरेक्यांनी केलेला भीषण सशस्त्र हल्ला

**मु.शी.**: दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबई शहरातील विविध ठिकाणी अतिरेक्यांनी केलेला भीषण सशस्त्र हल्ला याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, प्रकाश शेंडगे, पाशा पटेल, दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री अरविंद सावंत, परशुराम उपरकर, ॲड.अनिल परब व श्री.जयंत प्र.पाटील यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, प्रकाश शेंडगे, पाशा पटेल, दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री अरविंद सावंत, परशुराम उपरकर, ॲड.अनिल परब व श्री.जयंत प्र.पाटील यांनी दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबई शहरातील विविध ठिकाणी दहशतवाद्यांनी केलेला भीषण सशस्त्र हल्ला या विषयावर नियम 93 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे व मी त्यास अनुमती दिली आहे. माननीय सदस्यांनी प्रस्ताव मांडावा.

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माझ ा प्रस्ताव मांडतो.

ज्याअर्थी, दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी अतिरेक्यांनी मुंबई येथील छत्रपती शिवाजी टर्मिनस, ताज व ओबेरॉय-ट्रायडेंट ही पंचतारांकित हॉटेल्स, कुलाब्यातील नरिमन हाऊस व लिओपोल्ड कॅफे तसेच माझगांव व विलेपार्ले येथील टॅक्सीमध्ये केलेल्या आत्मघातकी हल्ल्यात सुमारे 195 जण मृत्युमुखी पडून 350 पेक्षा अधिक जखमी होऊन दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख, सहपोलीस आयुक्त, अतिरिक्त पोलीस आयुक्त व इतर धडाकेबाज अधिकाऱ्यांसह 18 पोलिसांना आलेले वीरमरण, आणि

ज्याअर्थी, ओबेरॉय-ट्रायडेंट आणि नरिमन हाऊस येथील अनेक देशी तसेच विदेशी निरपराध नागरिकांना, पर्यटकांना तब्बल 61 तास वेठीस धरुन त्यांची क्रूर हत्या करणे, आणि,

ज्याअर्थी, या हल्ल्यात एके-47, एके-56, पिस्तूल्स, रॉकेट लॉंचर, हॅण्ड ग्रेनेड व आर.डी.एक्स. यासारख्या अत्याधुनिक संहारक शस्त्रास्त्रांचा वापर करण्यात येणे, आणि,

..4..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

ज्याअर्थी, सदर हल्ल्यात मुंबई शहराचे करोडो रुपयांच्या मालमत्तेचे झालेले नुकसान, आणि,

ज्याअर्थी, सदर दहशतवादी समुद्रमार्गे मुंबईमध्ये शिरले असल्याचे प्राथमिक तपासात उघडकीस येणे, आणि,

ज्याअर्थी, मागील 10 वर्षापासून राज्यात झालेले बॉम्बस्फोट व त्या तपासाच्या कामात झालेले दुर्लक्ष तसेच याप्रकरणी मुंबई शहरावर अतिरेक्यांचा सागरी मार्गाने हल्ला होणार असल्याची पूर्वसूचना आय.बी., रॉ या केंद्र शासनाच्या गुप्तचर विभागाने केंद्राला व महाराष्ट्र शासनाला देऊनही याकडे शासन व पोलिसांचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, आणि,

ज्याअर्थी, सदर अतिरेकी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्य जनतेचा शासनावरील उडालेला विश्वास व शासनाप्रती व्यक्त होणारी संतापाची भावना, आणि,

ज्याअर्थी, अजूनही अतिरेकी हल्ला होण्याची जनतेच्या मनात निर्माण झालेली भीती व असुरक्षिततेची भावना,

त्याअर्थी, या अतिशय गंभीर व तातडीच्या विषयाबाबत चर्चा करण्यासाठी सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेवून चर्चा करण्यात यावी.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये या विषयावर सर्वांना आपल्या मनामध्ये असलेल्या भावना व्यक्त करण्याची संधी दिली, त्याकरीता वेळप्रसंगी चर्चा पूर्ण होईपर्यंत सभागृहाची बैठक सुरु ठेवण्यास अनुमती देऊन या विषयावर सखोल चर्चा झाली पाहिजे अशी भूमिका घेतली त्याबद्दल मी सभागृहाच्या वतीने आपले आभार मानतो आणि आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, बुधवार, दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी रात्रौ 9.30 च्या सुमारास कुलाब्याजवळील नरिमन हाऊस, ताज व ओबेरॉय या पंचतारांकित हॉटेल्समध्ये दहशतवाद्यांनी जो सशस्त्र भीषण हल्ला केला, या हल्ल्यामध्ये 183 लोक ठार झाले व 300 पेक्षा अधिक लोक जखमी झाले. छत्रपती शिवाजी टर्मिनसमध्ये अंधाधुंद गोळीबार झाला. खरे म्हणजे सुरुवातीला असे वाटले की, हे गँगवार आहे. काही लक्षात येत नव्हते, काय सुरु आहे? सगळीकडे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. परंतु अर्ध्या तासानंतर लक्षात आले की, हल्ला करणारे हे आतंकवादी

..5..



श्री.नितीन गडकरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत.  या अनपेक्षित झालेल्या हल्ल्यामध्ये महाराष्ट्राचा ज्यांनी लौकिक वाढविला असे शूर वीर हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळसकर हे पोलीस दलातील तीन मोठे अधिकारी त्याचबरोबर 14 पोलीस कर्मचारी शहीद झाले.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .. .. ..

हा संपूर्ण काळ आमच्या जीवनातील काळाकुट्ट काळ होता. या आतंकवाद्यांशी लढत असताना त्यांनी जे शौर्य दाखविले त्याबद्दल या अधिकाऱ्यांना मी अभिवादन करतो आणि त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो. तसेच कारण नसताना ज्या निरपराध जनतेची हत्या झाली त्यांच्याबद्दलही दु:ख व्यक्त करतो. या सभागृहाने अनेक प्रकारच्या चर्चा बघितलेल्या आहेत. स्वाभाविकपणे लोकशाहीत सत्तारुढ आणि विरोधी पक्ष म्हटल्यानंतर सत्तारुढ पक्षाने आपली बाजू मांडायची आणि विरोधी पक्षाने त्यावर प्रतिहल्ला करावयाचा असतो ही प्रथा नवीन नाही. पण आज या सभागृहामध्ये मात्र आजची चर्चा होत असताना आतंकवाद्यांनी केलेला हल्ला असे जे युध्द आहे ते म्हणजे पाकिस्तानने आपल्या देशाच्या विरुध्द सुरु केलेले छुपे युध्द आहे असेच म्हणावे लागत आहे. जे पाकिस्तानी स्पॉन्सर्ड आतंकवादी आपल्या देशात घुसले आणि निरपराध लोकांची हत्या करीत आहेत त्यांच्याशी आपल्या देशाला सामना करावयाचा आहे, सरकारला सामना करावयाचा आहे. म्हणून पहिल्यांदाच सभागृहात मी स्पष्टपणे असे सांगू इच्छितो की, या आतंकवाद्यांशी लढत असताना शासनाने जी कठोर भूमिका घ्यायची आहे किंवा याबाबत शासन जी कारवाई करणार आहे त्या कृतीला आमचा सक्रीय पाठिंबा आहे. देशाच्या मागे आम्ही आहोत याबाबतीत शासनाने कठोरपणे मुकाबला करावयाचा आहे, प्रखरतेने निर्णय घेतला पाहिजे, ही आमची भावना आहे. म्हणून या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे राजकारण न आणता या विषयाला केवळ या घटनेपुरते मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न या प्रस्तावाच्या निमित्ताने आम्ही केला आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात अनेक वेगवेगळे प्रश्न व आयुधे असतात, अशा निरनिराळ्या मार्गांनी त्यावर चर्चा करता येईल. त्यात आपल्याला काय म्हणावयाचे आहे ते म्हणा, अशा प्रकारे चर्चा होतील, वादविवाद होतील कारण लोकशाहीचे मंदिर त्यासाठीच आहे. परंतु हे सर्वोच्च सभागृह आहे आणि या सभागृहाच्या भिंतींनी अनेक गुणात्मक चर्चा ऐकल्या आहेत तशी चर्चा जरुर करावी पण यामागचे जे स्पिरीट आहे त्यामुळे माझी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, हे स्पिरीट जरुर कायम ठेवावे. त्याबरोबरच यासंदर्भात सरकार म्हणून ज्या त्रुटी राहिल्या आहेत त्या नजरेला आणून त्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने विचार मांडण्याची देखील आवश्यकता आहे. म्हणून या ज्या त्रुटी असतील त्या

.....2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .. .. ..

देखील स्वाभाविकपणे या चर्चेच्या निमित्ताने मांडण्याचा जो प्रयत्न आहे त्यामागे ही भावना आहे. भूतकाळातील ज्या ठेचा लागलेल्या आहेत त्यातून वर्तमानकाळात शहाणे होऊन भविष्यातील धोरण नीटपणे आखले पाहिजे, त्याकरिता काही गोष्टींचा विचार करण्याची गरज आहे.

महोदय, आपल्या देशात आतंकवादी कारवाया व्हायला हा देश तसा नवीन नाही. ऑक्टोबर, 2005 मध्ये नवी दिल्लीत 3 बॉम्बस्फोट झाले होते, त्यात 62 ठार, वाराणसी मंदिर आणि रेल्वे स्थानकात सन 2006 मध्ये स्फोट झाले त्यात 20 ठार, मुंबईच्या लोकलमध्ये सन 2006-07 मध्ये स्फोट झाले होते त्यात बरेच लोक गेले, मालेगावमधील स्फोटात 30 ठार व 100 जखमी, समझोता एक्स्प्रेसमध्ये झालेल्या स्फोटात 66 ठार, हैद्राबाद येथील मक्का मशिदीत जो स्फोट झाला त्यात 11 ठार, हैद्राबाद येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात 30 ठार व 60 जखमी, अजमेर शरीक दर्ग्यात झालेल्या स्फोटात 2 ठार, रामपूर येथे केंद्रिय राखीव पोलीस दलाच्या जवानांवर झालेल्या हल्ल्यातही काही जवान ठार झाले होते.

यानंतर श्री. जुन्नरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

राजस्थानमधील जयपूर येथे 13 मे, 2008 रोजी झालेल्या बॉम्बस्फोटात 68 ठार, बंगलोर येथे झालेल्या कमी ताकदीच्या बॉम्बस्फोटात 1 ठार, अहमदाबाद येथे दोन तासाच्या अवधीत 20 बॉम्बस्फोटामध्ये 27 ठार, 13 सप्टेंबर, 2008 रोजी नवी दिल्ली येथील झालेल्या 6 बॉम्बस्फोटात 26 ठार, तर 27 सप्टेंबर, 2008 रोजी नवी दिल्लीतील मेहरोली या गजबजलेल्या बाजारपेठेत झालेल्या क्रुड बॉम्बस्फोटात 3 ठार, गुजरात राज्यातील मोडासा येथील मसजीदीजवळ झालेल्या बॉम्बस्फोटात 1 ठार 21 जखमी, मालेगावमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटात 5 ठार, 21 ऑक्टोबर, 2008 रोजी मनीपूर येथील पोलीस कमांडो कार्यालयात झालेल्या बॉम्बस्फोटात 17 ठार, आसाम येथे झालेल्या 18 बॉम्बस्फोटात 77 ठार आणि आता मुंबईतील ताज हॉटेल, ओबेरॉय हॉटेल आणि सीएसटी स्थानकावर अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यामध्ये व बॉम्बस्फोटात 183 ठार व 300 च्या वर लोक जखमी झाले.

सभापती महोदय, बॉम्बस्फोटाचा सिलसिला सुरुच आहे. मी एवढयाकरिता या सर्व घटना सांगितल्या आहेत की, या घटना काही अकस्मात घडलेल्या नाहीत. पाकिस्तानचे भारताविरुध्दचे हे एक प्रकारचे छुपे युध्दच आहे. हिंदुस्थानी लष्कराबरोबर आपल्या लष्कराचा निभाव लागणे शक्य नाही हे जेव्हा पाकिस्तानच्या लक्षात आले त्यामुळे त्यांनी हिंदुस्तानला जर कमजोर करण्यासाठी खोट्या नोटा छापण्याचे रॅकेट तयार करणे, अफू-गांजा व चरस पाठवणे, आयएसआय असेल लष्कर ए तोयबा तसेच अल् कायदाची मदत घेऊन हिंदूस्थानमध्ये आतंकवादी कसे पाठविता येतील आणि त्याचा उपयोग करुन हिंदुस्तानची एकता, अखंडता व सार्वभौमत्व कसे उद्ध्वस्त करता येईल यासाठी त्यांनी वेल प्लॅन्ड क्रिमिनल क्रॉस्परन्सी स्पॉन्सर्ड बाय दि गर्व्हमेंट असा हा सर्व प्रकार आहे. ज्यावेळेस ही घटना घडली त्याच्या काही वेळानंतर मी पाकिस्तानी टी.व्ही. बघत होतो. मुंबईमध्ये जी घटना घडली त्या वृत्ताच्या संदर्भात त्या ठिकाणी वेगळयाच चर्चा सुरु होत्या. त्या चर्चा पाहून मला धक्काच बसला. त्या चर्चेचा उहापोह मी या ठिकाणी करु इच्छित नाही. या घडलेल्या वाईट घटनेत चांगली एक घटना घडली व ती म्हणजे गिरगाव चौपाटीवर आमच्या शूर पोलिसांनी एका दहशतवाद्याला जिवंत पकडले. दहशतवाद्याच्या हातात स्टेनगन असतांनाही

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ..

तुकाराम ओबंळे व त्याच्या सहकार्यानी या घटनेच्या वेळी जे शौर्य दाखवले ते वाखाणण्याजोगे आहे. दहशतवाद्यांच्या हल्यामधील एका दहशतवाद्याला जिवंत पकडणे ही फार मोठी घटणा आहे. या एका घटनेमुळे इंटरनॅशनल समुदायाला आपल्याला हे सांगता येईल की, या हल्ल्याचा जन्म कोठे झालेला आहे, त्याचे आई-बाप कोण आहेत, हा आतंकवादी कोठे राहतो, कोठे शिकला ही सर्व गोष्ट आपण जगाला सांगू शकतो. या घटनेच्या पाठीमागे कोण आहे हे आपल्याला या जिवंत पकडलेल्या दहशवाद्यामुळे संपूर्ण जगाला सांगता येईल. या दहशतवाद्यांच्या डेड बॉडीज पाकिस्तानने परत घ्याव्यात म्हणून पाकिस्तानच्या उच्चायुक्तांना पत्र लिहिले गेले परंतु पाकिस्तान सरकार म्हणाले की, आमचा या दहशतवाद्यांशी काही संबंध नाही. त्यांनी या पत्राला केराची टोपली दाखवली. त्यांच्या नागरीकांच्या डेड बॉडीज घेण्यास सुध्दा पाकिस्तान सरकार तयार नाही. आमच्या माननीय पंतप्रधांनांनी पाकिस्तानच्या आयएसआयच्या डायरेक्टरांना आवाहन केले की, "तुम्ही येथे या आणि चौकशी करा." सभापती महोदय, हे ऐकून मला वाईट वाटले. खरे म्हणजेच ज्या चोराने चोरी केली त्या चोरालाच चौकशी करण्यास सांगणे असा हा प्रकार आहे. अजून सुध्दा चोरांच्या उलटया बोंबा तिकडे सुरुच आहे. परंतु या वेळी अमेरिका, पाश्चात्य देश, इंटरनॅशनल कम्युनिटी, ब्रिटीश पंतप्रधानानी दिल्लीत केलेले स्टेटमेंट असेल, फ्रांस, जर्मनी असे सर्व देश आज भारताच्या मागे खंबीरपणे उभे आहेत. आपल्या जवळ आतंकवाद्याच्या संदर्भात जे सज्जड पुरावे उपलब्ध आहेत त्यामुळेच सर्व देश आज आपल्या मागे उभे आहेत. निरपराध लोकांचे बळी घेण्यामध्ये कोण पापी आहेत, हा रस्ता कोणाच्या घरापर्यंत जातो ते सिध्द करणारे सगळे सुत्र या घटनेमध्ये आपल्याला सापडलेले आहेत. आपल्या देशाला आतंकवाद हा काही नवीन नाही. आतंकवादी हल्ल्याच्या संदर्भात केंद्रसरकारने आपल्याला वेळोवेळी सूचना दिल्या होत्या व अशा अशा प्रकारच्या घटना घडण्याची शक्यता आहे असे सांगितले होते. केंद्रीय गृहराज्य मंत्री श्री. प्रकाश जयस्वाल यांनी मुंबईतील दहशतवादी हल्ल्यानंतर असे जाहीर विधान केले की, समुद्रामार्गे दहशतवादी हल्ला होऊ शकतो असे आम्ही सांगितले होते. या हल्ल्याच्या संदर्भातील इशारा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ MMP/

श्री. नितीन गडगकरी .....

केंद्रीय मंत्रालयाने दोन वर्षापूर्वी सागरी पट्ट्यातील राज्य सरकारांना दिला होता. पुढे त्यांनी असेही म्हटले आहे की, यासाठी केंद्राने गुजरात आणि महाराष्ट्राला निधी सुध्दा दिला होता. यासंदर्भात माझा पहिला प्रश्न असा आहे की, आजच्या लोकमत या दैनिकात केंद्रसरकारने दहशतवाद्यांच्या हल्ल्यांच्या संदर्भात जो निधी दिला होता तो निधी सुध्दा महाराष्ट्र सरकारने वापरलेला नाही. आपल्या इंटेलिजन्सने महाराष्ट्रातील समता परिषदेत काय चालले आहे एवढेच महाराष्ट्रातील इंटेलिजन्सीचे काम होते असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. यासंदर्भात मुंबई पोलीस आयुक्तांने आणि पोलिसांनी तुमच्या घरी येऊन तुमची क्षमा मागितली होती. समता परिषदेत काय सुरु आहे यासाठी इंटेलिजन्सीचा वापर करण्यात आला होता. परंतु ज्यावेळी केंद्र सरकारने सागरी मार्गावर गंभीर धोका आहे असे कळवले होते त्यावेळी आमच्या इंटलिजन्स कमिशनरने , डी.जी. यांनी काय केले ? डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस यांनी यासंदर्भात काय कारवाई केली याचे उत्तर या सभागृहाला मिळाले पाहिजे. मला अशी माहिती मिळाली आहे की, इंटेलिजन्सच्या जागा चार वर्षापूर्वी मंजूर झाल्या होत्या. मला एकदा गमतीने विचारण्यात आले होते की, "महाराष्ट्रामध्ये सगळयात शक्तीशाली व्यक्ती कोण आहे?"

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

मला एका पत्रकार मित्राने विचारले की, या राज्यात शक्तीशाली व्यक्ती कोण आहे ? त्यांना वाटले की, मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री किंवा माननीय गृहमंत्री यांच्यापैकी एकाचे नाव घेईन. मी त्यास सांगितले की, या राज्याची शक्तीशाली व्यक्ती आहे श्री.सुबोध कुमार. ते या राज्याचे गाईड आणि फिलॉसॉफर आहेत. फायनान्स मिनिस्ट्री त्यांच्याशिवाय हलत नाही. त्यांनी सांगितल्याशिवाय कोणताही निर्णय होत नाहीत. ते या राज्याचे सर्वात शक्तीशाली लोहपुरुष आहेत.

सभापती महोदय, गेल्या नऊ वर्षात गृह विभागाच्या किती संवेदनशील फाईल्स वित्त विभागाकडे गेल्या, त्यातील किती फाईल्स रिजेक्ट झाल्या हे पाहिले पाहिजे. जर अर्थ मंत्र्यांनी एखाद्या विभागासाठी बजेट ठरवून दिल्यानंतर त्या विभागाच्या फाईल रिजेक्ट करण्याचा त्यांना अधिकार आहे काय ? तेव्हा याबाबत प्रशासकीय चौकशी केली पाहिजे. केवळ राजकीय नेत्यांचे राजीनामे देऊन हा विषय सुटणार नाही. मी प्रशासनाबद्दल बोलतो म्हणून अनेक अधिकारी माझ्यावर नाराज होतात. हे अधिकारी कोणत्या फाईल्सला कसे ब्रेक लावतात हे मी पाहिले आहे. जर शस्त्रास्त्र खरेदीच्या फाईल्स रिजेक्ट होणार असतील, इंटेलिजन्स विभागातील पदे भरण्याबाबत मंत्रिमंडळाने चार वर्षापूर्वी घेतलेल्या निर्णयाबाबत अजून ऑर्डर निघत नसेल काय होणार आहे ? पुणे शहराचे आयुक्त श्री.सतपाल सिंग यांचे स्टेटमेंट आहे की, चंदीगड लॅबोरेटरीजने रिजेक्ट केलेले बुलेटप्रुफ जॅकेट देण्यात आले. श्री. अशोक कामटे सारख्या शूरवीराच्या हेल्मेटमधून गोळी जाते याची मला लाज वाटते. अशाप्रकारची हेल्मेट कोणी दिली ? हेमंत करकरे यांच्या बुलेटप्रुफ जॅकेटमधून गोळी जाते. जर त्यांना चांगल्याप्रकारची हेल्मेट आणि बुलेफप्रुफ जॅकेट मिळाले असते तर या चांगल्या अधिकाऱ्यांचे प्राण वाचले असते. सरकारजवळ चांगल्याप्रकारचे बुलेटप्रुफ जॅकेट खरेदी करण्यास निधी नाही काय ?

सभापती महोदय, मी एक महिन्यापूर्वी इस्त्रायलमध्ये दहा दिवस होतो. तेथील एअर फोर्सचा चीफ हा माझ्या कंपनीबरोबर जॉईन्ट व्हेन्चर झालेल्या कंपनीचा डायरेक्टर आहे. मोसादचा डायरेक्टर त्यामध्ये आहे. मी इस्त्राइल एअर क्राफ्ट इंडस्ट्रीमध्ये गेलो. त्यांचे बुलेटप्रुफ

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

जॅकेट मलमलच्या कापडासारखे आहे. त्यातून कोणतीच गोळी जात नाही. मी जबाबदारीने आरोप करतो की, हे बुलेटप्रुफ जॅकेट एके-46,एम-6 सारख्या गन्समधून सुटणाऱ्या गोळ्यांकरिता नव्हते. जगातील सर्व आतंकवांद्यांकडे आता सॉफिस्टीकेटेड वेपन्स आहेत तर आपल्या पोलीस दलाकडे सर्वात आऊट डेटेड झालेली वेपन्स आहेत. अत्याधुनिक शस्त्रास्त्रासमोर आऊट डेटेड झालेली शस्त्रास्त्र कसा काय सामना करतील ?

सभापती महोदय, दुसऱ्या महायुध्दातील रिजेक्ट बंदुकांचा स्टॉक विकत घेऊन त्या पोलिसांना देण्यात आलेल्या आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगावे ही गोष्ट खरी किंवा कसे. मुंबई पोलीस आयुक्तालयात एके 47, एम-6 टबाईन्स किती होत्या हे विचारले तेव्हा सांगण्यात आले की, ती शस्त्रास्त्रे नक्षलग्रस्त विभागासाठी दिलेली आहेत. मुंबई अतिसंवेदशनशील असताना मुंबईतील शस्त्रास्त्र नक्षलग्रस्त विभागासाठी देण्यात आली. आपले सरकार इतके गरीब आहे काय ? सरकारजवळ विमाने आणि हेलिकॉफ्टर्स घेण्यास पैसे आहेत. सरकारी कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग देण्यास पैसे आहेत. आता सहावा वेतन आयोग देण्याबाबत विचार सुरु आहे. परंतु राज्याच्या रक्षणासाठी शस्त्रास्त्र घेण्यासाठी सरकारजवळ पैसे नाहीत. कोकणात जेव्हा आरडीएक्स पडकले होते त्यावेळी झालेल्या चर्चेच्या वेळी त्यावेळचे गृहमंत्री श्री.छगन भुजबळ यांनी चांगले उत्तर दिले होते. त्यावेळी त्यांनी सांगितले होते समुद्रात टेहळणी करण्याकरिता स्पीड बोटींची खरेदी करणार आहोत. वेळ पडल्यास वेगळे कोस्टल दल तयार करु. टेळहणी करण्याकरिता हेलिकॉपर्टस् घेऊ. मला माननीय उपमुख्यमंत्री यांना विचारावयाचे आहे की, त्यांचे हेलिकॉपर्टस कुठे गेले ? कुठे गेल्या स्पीट बोटी ? आपण या सर्व गोष्टींची खरेदी करणार असे सांगितल्यावर त्याची अंमलबजावणी का झाली नाही ? आपण सांगितलेल्या बाबींची पूर्तता करण्यात आली असती तर आज ही वेळ आली नसती. कस्टम विभागाकडे चार बोटी आहेत. त्यासुध्दा बंद अवस्थेत आहेत. कस्टम विभागच्या कर्मचाऱ्यांनी सांगितले की, त्या बोटींचा वापर अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना समुद्रात फिरविण्यासाठी केला जातो. आपण त्यावर भाष्य करणे बरोबर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

नाही कारण तो विभाग राज्य सरकारच्या अखत्यारितील नाही. आतंकवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात आपल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्राण गेले. Who is responsible for the negligence ? The Master is always responsible for the servant. जो गाफीलपणा आणि गलथानपणा आहे त्यास कोण जबाबदार आहे ?

यानंतर श्री.गायकवाड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.अजित 11.40

श्री.नितीन गडकरी..

सभापती महोदय, गृह मंत्री किंवा मुख्यमंत्री या सर्व बाबी पाहू शकणार नाहीत. झारीतील शुक्राचार्य कोण आहेत हे शासनाने शोधून काढले पाहिजे. फायनान्स मिनिस्ट्रीमध्ये ते लपलेले आहेत व त्यानीच तुमची वाट लावली आहे आणि ते तुम्हाला राज्य करु देत नाहीत. बजेट ठरल्यानंतर त्यानुसार खर्च का करु दिला नाही.? केन्द्र सरकारने आपल्याला या बाबतीत पूर्व कल्पना दिल्यानंतरसुध्दा सगळे गाफील राहिले आहेत. केन्द्रीय गृह मंत्र्यांनी अलर्ट केले होते. माजी केन्द्रीय गृह मंत्री श्री.शिवराज पाटील यांनी डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस यांच्या समोर भाषण केले होते असे असतानासुध्दा श्री अनामी रॉय काय करीत आहेत ? शासनाने दोन
अधिका-यांना टांळून त्यांची पोलिटीकल अपॉईन्टमेट केली होती. ही नेमणूक कोणाच्या सांगण्यावरुन केली होती ? श्री. अनामी रॉय यांना या घटनेच्या संदर्भात का जबाबदार धरत
नाही ? या घटनेच्या वेळी ते कोठे होते ? याचे आपण उत्तर द्यावे. डायरेक्टर जनरल ऑफ पोलीसच्या कार्यालयात ते सॅन्डविच खात बसले होते काय ? सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, कै. कामठे यांच्या पत्नीने मला प्रश्न केला होता व त्या गोष्टीच्या बाबतीत माझ्या मनात अजूनही अस्वस्थता आहे. या शूर वीराच्या पत्नीने मला पुण्याला प्रश्न विचारला होता की, माझ्या पतीचे निधन झाले आहे ते तर आमच्यातून निघून गेले आहेत परंतु गोरेगाव येथे राहणारे कै. विजय साळसकर आपल्या पत्नीला व मुलांना सांगून गन घेऊन घटना स्थळी ताबडतोब हजर झाले होते त्याचप्रमाणे कै. करकरे हे सुध्दा ही घटना घडल्याचे समजल्या बरोबर ताबडतोब घरातून घटना स्थळी हजर झाले होते मी तर असेही ऐकले आहे की, कै. करकरे यांनी आपल्या पत्नीला असे सांगितले होते की, "मी जरी बुलेट प्रुफ जॉकेट घातलेले असले तरी हे काही ख-या अर्थाने ते बुलेट प्रुफ नाही."" अशा प्रकारचे जॉकेट घालून ते घटना स्थळी पोहोचले आणि आपला जीव धोक्यात घातला आहे. कै. कामठे यांनीसुध्दा आपल्या प्राणाचे बलिदान दिले आहे. कै.दाते यांचे सुध्दा या घटनेमध्ये दु:खद निधन झाले आहे. त्यावेळी मुंबईचे दक्षिण विभागाचे जॉईट पोलीस आयुक्त कोठे गेले होते त्यावेळी ए.सी.पी कोठे गेले होते ? ते या घटनेच्या ठिकाणी किती वाजता पोहोचले होते ?. ही अत्यंत गंभीर व दु:खदायक घटना आहे. मुंबईमध्ये अनेक मोठे पोलीस अधिकारी आहेत. श्रीमती त्यागी, श्री. दयाल यांच्या सारख्या मोठ मोठया पोलीस अधिकाऱ्यांचे दक्षिण मुंबईत कार्यालये आहेत माझ्या मनात एक प्रश्न आहे की, अशा प्रकारची घटना धडल्याचे कळल्याबरोबर गोरेगाव येथे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

राहणारे कै. साळसकर आपली बंदूक घेऊन घटना स्थळी पोहोचले होते परंतु टॉप रॅंकचे अधिकारी का पोहोचू शकले नाहीत.? त्यांची थरारकी कोठे गेली होती ?यासंबंधीचे उत्तर कधी तरी मिळणार आहे किंवा नाही आणि यासंबंधीची चौकशी केव्हा तरी होणार आहे किंवा नाही .अशा प्रकारे जे अधिकारी घरी बसले होते त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात यावी व त्यांना नोकरीतून काढून टाकण्यात यावे. सभापती महोदय, हजार नामर्दापेक्षा दहा मर्दाची फोज परवडते . जे अधिकारी घटना स्थळी पोहोचले नाहीत. त्यांच्या विरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी . शासनाने पोलीस खात्याचे पोलिटीकलायझेशन करुन टाकले आहे. आपल्याला निवडणुकीची चिंता असल्यामुळे आपल्या भागात अमुक एस.पी पाहिजे अशा प्रकारचा आग्रह धरला जातो. सभापती महोदय, आपण बांधकाम मंत्री होता त्याचबरोबर मी सुध्दा मंत्री म्हणून काम केले होते. मी आमदाराच्या शिफारशी प्रमाणे व मंत्र्याच्या सांगण्यावरुन अधिका-यांची बदली केली नाही म्हणून श्री. मनोहर जोशी माझ्यावर नाराज झाले होते.कार्यकारी अभियंत्या पेक्षा वरच्या अधिका-याच्या बदल्या आमदाराच्या शिफारशीनुसार मी कधीही केल्या नव्हत्या . तेव्हा आमदार म्हणून आपणही या गोष्टीचा विचार केला पाहिजे परंतु तो विचार न करता आम्ही आमदार मंडळीच अमुक एका अधिका-याची बदली करण्यात यावी म्हणून पत्र देतो व तशा प्रकारचा आग्रह मंत्र्याना करीत असतो. अमुक एक अधिकारी माझ्या गावात द्यावा असे त्यांना सांगत असतो. चांगले पोलस अधिकारी दुसरीकडे पाठविले आणि जे बिन कामाचे व भाषण देणारे पोलीस अधिकारी होते ते या ठिकाणी आले आहेत. कोकणातील, मुंबईतील आणि महाराष्ट्राच्या भूमीतील सगळे अधिकारी शूर आहेत अर्थात मराठी आणि बिगर मराठी असा मी वाद करीत नाहीत. परतु आमच्याकडील जे शूर अधिकारी आहेत ते प्राणाची पर्वा न करता लढले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रतापराव यांना सांगितले की मुसलमान सरदाराला तू का सोडले ? त्यावेळी शिवाजी महाराज प्रतापराव यांना रागाने जे बोलले होते ते त्यांच्या जिव्हारी लागले आणि त्यांनी मुसलमान सरदारावर सहा सरदारासह त्वेषाने चाल केली. त्यावरच "वेगात दौडले वीर मराठे सात "अशी कविता करण्यात आली होती. शिवाजी महाराजांनी तेव्हा प्रतापरावांना विचारले की तू मुसलमान सरदाराला का सोडले तेव्हा अस्वस्थ झालेले प्रतापराव त्वेषाने बाहेर निघाले आणि त्यानी आपल्या प्राणाचे बलिदान केले होते हा इतिहास आम्ही वाचला आहे. मुंबईत जो हल्ला झाला होता

3..



VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.अजित 11.40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

त्यावेळी जे तीन पोलीस अधिकारी निघाले होते त्यांच्याकडे अगोदर इंडिका गाडी होती परंतु त्या गाडीची उंची कमी असल्यामुळे त्यांनी ती बदलून घेंतली व जास्त उंचीची गाडी घेउन त्यामध्ये ते तीनही अधिकारी एकत्र बसले होते. अतिरेक्याची लढत असताना त्यांनी शौर्य दाखवले व त्यामध्ये त्यांचे प्राण गेले परंतु अशी घटना पुन्हा घडता कामा नये. या सुरक्षा व्यवस्थेमध्ये ज्या काही त्रृटी आहेत त्याची चौकशी होणे आवश्यक आहे केवळ राजकीय नेत्यांचे राजीनामे घेऊन चालणार नाही सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, इंटेलीजन्स करिता जबाबदार असलेले डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस श्री.अनामी रॉय यांना या पदावरुन काढून टाकण्यात यावे, त्यांना घरचा रस्ता दाखविण्यात यावा. ते मुंबईची कायदा व सुव्यवस्थेची स्थिती सांभाळण्याच्या लायकीचे नाहीत हे या प्रकरणातून सिध्द झाले आहे तेव्हा ही हिंमत आपण दाखवावी. त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे डायरेक्टर जनरल ऑफ पोलिसांच्या परिषदेमध्ये केन्द्रीय गृह मंत्री श्री. शिवराज पाटील यांनी जे काही सांगितले होते ते मी आपल्याला वाचून दाखवतो. त्या परिषदेला श्री.अनामी रॉय उपस्थित होते त्या वेळी श्री शिवराज पाटील यांनी असे म्हटले होते की, "Our coastal areas are coming under increased threat from terrorist groups, which have decided to use the sea route to infiltrate into India. They also plan to induct arms and ammunition through the sea routes". Shri Shivraj Patil addressing the Directors General and Inspectors General of Police in November, 2006.said "We understand they (the terrorist) have been collecting information regarding location of various refineries on or near the Indian coastline... Some Lashkar-e-Toiba operatives are also being trained specially for sabotage of oil installations. There are plans to occupy some uninhabited island off the country's coastline to use them as bases for launching operations on the Indian coasts."

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी .....

सभापती महोदय, त्यांनी डी.जीं.च्या कॉन्फरन्स मध्ये दिलेले हे भाषण आहे. पण तुमच्यावर त्याचा काहीही परिणाम नाही. तुम्ही आपल्या समुद्र किनाऱ्यांच्याबाबतीत काय चिंता केली ? काहीही नाही. आणि आता ही घटना घडल्यानंतर तीन बोटी देता आहात. तुम्ही वेळीच का याबाबत काळजी घेतली नाही ? कोकणातील समुद्र किनाऱ्यावर आरडीएक्स पकडले गेले होते तेव्हाच तुम्ही हे का केले नाही ? आता हा तुमचा निष्काळजीपणा किती प्रमाणात आपल्याला भोवला आहे हे आपण लक्षात घ्या. सभापती महोदय, सन 2006च्या नोव्हेंबर मध्ये आपल्याला केंद्रीय गृहमंत्र्यांनी इशारा दिला होता. त्यांनी तेव्हा आपल्याला सांगितले होते की, "On November 22, 2008 that is literally on the eve of the attacks in Mumbai, he told the police Chiefs, "To control terrorism in the hinterland, we have to see that infiltration of terrorists from other countries does not take place through the sea routes and through the borders between India and friendly countries. The coastlines also have to be gurarded through Navy, Coast Guard and Coastal Police". नेव्ही, कोस्टल गार्ड आणि कोस्टल पोलीस यांच्यामध्ये काहीही कोऑर्डिनेशन नव्हते. भुजबळ साहेब हे मी म्हणत नाही तर तुमचेच केंद्रीय गृहमंत्री श्री.शिवराज पाटील साहेबांनी म्हटलेले आहे. "The states special branches and the CID should identify the persons forming part of the sleeper cells and lodging in cities and towns and studying in educational institutions and working in industries and professions." And four days later, the terrorists using the exact same sea route, do the same exact thing that these worthies have been warning others about". केंद्रीय संरक्षण मंत्र्यांनी लोकसभेत दिलेले उत्तर मी आपणांस वाचून दाखवितो त्यात असे म्हटले आहे की, "The Minister of Defence has been no less alert. On March 9, 2007, he was asked in the Lok Sabha. whether "the intelligency agencies have warned about the possibility of terrorists trying to infiltrate through the sea route or trying to target our offshore installations ?" He answered, "Yes sir. There are reports about terrorists of various *tanzeems*

...2/-



Shri Gadkari...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

being imparted training and likelihood of their infiltration through sea routes.." He was asked whether "maritime terrorism, gun-running, drug-trafficking and piracy are major threats that India is facing from the sea borders of the country?" His answer "Yes sir,"हे देशाच्या पार्लमेंटमध्ये संरक्षण मंत्र्यांनी दिलेले उत्तर आहे, ते तुमच्याकडेही आलेले आहे. हे सगळे आपल्याला अगोदरच कळविले आहे. हे तर साऱ्या जगाला माहिती होते मग आम्हाला यातील काहीच कळले नेव्हते काय ? राज्यसभेमध्ये गृहमंत्र्यांना काही प्रश्न विचारले होते ते मी आपल्याला वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले होते की, "On May 9, 2007, the home minister was asked in the Rajya Sabha, whether "it is a fact that there are strong apprehensions of terrorist threats to the country through the sea route?" As per available reports, he answered, "Pak based terrorist group, particularly LeT, have been exploring possibilities of induction of manpower and terrorist hardware through the sea-route." 9 मे, 2007 ला राज्यसभेत दिलले हे उत्तर आहे. वाटल्यास आपण हे कन्फर्म करा. यामध्ये त्यांनी लष्कर-ए-तोयबाचे नाव घेतले आहे. आता यात कोठली गोपनीयता आली ? आपण किती गाफील राहिलात ? हे संवेदनशील राज्यकर्त्यांचे लक्षण आहे का ? ..

( यानंतर श्री. सरफरे .... के 1 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

मुंबईचा समुद्र किनारा अडचणीत आहे यावर पार्लमेंटमध्ये चर्चा झाली. आणि तुम्ही बोटींची ऑर्डर 27 तारखेला देता. जेव्हा लोक मेले तेव्हा तुम्ही ऑर्डर दिली. याहूनही भयंकर गोष्ट मी तुम्हाला सांगणार आहे की, तुमच्या पोलिसांना गुजरातच्या मच्छिमारांनी नावासहीत माहिती सांगितली होती त्याबाबतचे पुरावे आपल्याकडे आहेत. "Shri A.K. Antony addressed the "International Maritime Search and Rescue Conference, " in Delhi. He warned the delegates of "dangers of terror attacks from the sea in the region." In the course of his address, Antony admitted that the Coast Guard faces shortage of manpower as well as hardware. But "necessary steps are being taken to strengthen the search and rescue infrastructure of the Indian Coast Guard." हे सर्व आपल्याबाबत बोलत आहेत. माझ्याजवळ एम.के.नारायण यांचे भाषण आहे. आय.बी. ने सरकारला पत्र दिले. माननीय श्री. भुजबळ साहेब आपण राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून आपणाकडून मी हे जाणून घेऊ शकतो काय? आपण आम्हाला हे सांगण्याची हिंमत दाखवाल काय? केंद्र सरकारने 19 नोव्हेंबर 2008 रोजी राज्य सरकारला लेखी पत्र पाठविले आहे. ते पत्र आपण सभागृहाच्या पटलावर ठेवावे. पत्राव्दारे समुद्र मार्गाने दहशतवाद्यांकडून मुंबईवर हल्ला होणार आहे, ताज हॉटेलवर हल्ला होणार आहे असे त्यांनी आपल्याला कळविले होते. तरीही आपण काही करीत नाही, हे अधिकारी कसे? "आंधळे दळते आणि कुत्रे पीठ खाते""अंधेरे रातमे दिया मेरे हातमे" हे कसले सरकार आहे?काय चालले आहे? आपण या पत्राची काहीही दखल घेतली नाही. आपल्या कॅबिनेटची सबकमिटी आहे. त्यामध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री व वरिष्ठ अधिकारी आहेत. यांची एक बैठक घेऊन त्यामध्ये आपल्या यंत्रणेला सूचना देणे, बंदोबस्ताची व्यवस्था करणे यापैकी आपण काहीही केले नाही. शांत, निरपेक्ष, निर्गुण, निराकार, थंड पडलेल्या डेड बॉडीसारखे हे सरकार थंड पडले होते. इतके अधिकारी आणि लोक आपण गमावले, त्यांना वाचविण्यासाठी सरकारने काहीही केलेले नाही.

सभापती महोदय, आपण पोलीस खात्याच्या व्यवस्थेसंबंधी विचार करावा. त्यांच्याकडे किती फायरींग रेंज आहेत? मा. श्री. आर.आर. पाटील यांनी आपल्याला माहिती सांगितली. एन.एस.जी. चा एक पोलीस 400 राऊंड मारतो, आणि आपला पोलीस त्याच्या आयुष्यात 4 राऊंड मारीत नाही.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

आपल्याकडे फायरींग ग्राऊंड किती आहेत? त्याठिकाणी किती पोलिसांना आपण प्रॅक्टिस देता? पोलिसांनी ध्यावयाच्या प्रशिक्षणाची काय व्यवस्था आहे? सभापती महोदय, मी सिन्सिअर्ली मान्य करतो. From the core of my heart पोलीस प्रशिक्षण महाविद्यालयाबाबत मी आज जास्त बोलत नाही. जे लोक डंपिंग यार्ड सारखे बिन कामाचे आहेत, ज्यांचा काहीही उपयोग नाही, त्यांना आपण प्रशिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य करता? माझी आपणास पहिली विनंती आहे की, पोलीस अधिकारी आणि पोलिसांना प्रशिक्षण देणारी व्यवस्था आपण अपग्रेड करावी. मिलिटरीमध्ये श्री. चौधरी नावाचे मेजर जनरल होते. त्यांनी नॅशनल सिक्युरिटी गार्डची रचना केली. त्या व्यक्तिने मा. श्री. आर.आर. पाटील यांच्याकडे प्रेझेंटेशन केले की, आपल्याला ही यंत्रणा कशाप्रकारे अपग्रेड करता येईल. परंतु या सरकारला त्याबाबत काहीही करावेसे वाटले नाही. मंत्र्यांना जागा मिळतात, आमदारांना सरकारी जागा स्वस्तात मिळतात. इंजिनिअरींग, मेडिकल कॉलेज काढण्यासाठी आपण टेकडया खाली करता, परंतु पोलिसांच्या प्रशिक्षणासाठी, फायरींग रेंजसाठी त्यांना जागा मिळत नाही. राज्याच्या अनेक जिल्हयांमध्ये त्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था नाही. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, पोलिसांना प्रशिक्षण देण्यासाठी एक वेगळे केडर तयार करा. आणि मिलिटरीमध्ये मेजर, लेफ्टनंट, कर्नल या पदावरुन निवृत्त झालेले उदा. एन.एस.जी.चे रिटायर्ड मेजर दत्ता सारखे मिलिटरीचे अधिकारी नियुक्त करुन एन.एस.जी. च्या ग्रेडच्या 5 ॲकॅडमी राज्याच्या वेगवेगळया रिजनमध्ये सुरु करा. या प्रत्येक ठिकाणी एन.एस.जी.च्या लेव्हलचे 500-500 प्रशिक्षित कमांडो असले पाहिजेत. एक विदर्भामध्ये करा, एक मराठवाडामध्ये करा, एक पश्चिम महाराष्ट्रामध्ये करा, एक कोकणमध्ये करा, एक ठाणेमध्ये करा, आणि विशेष करुन मुंबईमध्ये अशाप्रकारची कमांडो प्रशिक्षण ॲकॅडमी निर्माण करा. त्यासाठी एक विशेष अधिकारी नियुक्त करा, त्याचे वेगळे केडर निर्माण करा, त्यांना वेगळा भत्ता दिला पाहिजे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

मला पत्रकार बंधूंना एक विनंती करावयाची आहे. या मंत्र्याने मोबईल फोन घेतला का, या मंत्र्याने चांगली गाडी घेतली का, ती एअर कंडीशन आहे का, ते नियमात बसते का, यावर चर्चा करतात. सभापती महोदय, एकवेळ फायनान्सचे ऑडिट झाले नाही तरी चालेल पण "Make audit for performances". कार्यक्षमतेचे ऑडिट करा आणि ते करावयाचे असेल तर दोन फॅसिलिटीज जास्त द्या. नियमामध्ये सुधारणा करा. अहो, कोठली गाडी ? मी त्या ठिकाणी होतो. सन्माननीय सदस्य श्री. तावडे साहेब दोन दिवस होते. मी त्या ठिकाणी आलो आणि बघून गेलो. मी दोन दिवस पाहिले. आम्हाला वाईट वाटले. लोक असे म्हणावयाचे की, क्रिकेट खेळाडूंना सोडण्याकरिता एअरकंडीशन बस आणि ज्यांनी आमचे प्राण वाचवले ते बिचारे नॅशनल सिक्युरिटी गार्डचे लोक बेस्टच्या बसमधून प्रवास करीत होते. सामान्य माणसांना हे सहन झाले नाही. लोक तुमच्यावर नाही तर आमच्यावर तुटून पडले. सीएनबीसी चॅनेलच्या एका चर्चेमध्ये मी गेलो होतो. त्या ठिकाणी जे लोक उपस्थित होते ते सगळे राजकारण्यांवर तुटून पडले. त्यांच्या मनात सगळ्यांबद्दल चीड निर्माण झाली. कारण या छोट्या छोट्या घटना आहेत. ज्यांनी आपले प्राण धोक्यात घालून आंतकवाद्यांचा खातमा केला आणि प्राणाची बाजी लावून जे लढले त्यांना त्या विजयानंतर तिथून घेऊन जाण्याकरिता चांगल्या व्यवस्था केल्या नाहीत. असे का ? मंत्रालयामध्ये अजूनही एक ऑर्डर आहे. आपल्याकडे जरी कोणी गेस्ट आला तर एका गेस्टवर 40 पैसे खर्च करावयाचे असतात. चार बिस्किटे, प्लॅस्टिकची डीश, एक खारे बिस्किट, एक क्रिम बिस्किट, एक पार्ले जी बिस्किट आणि एक खोबऱ्याचे बिस्किट आणि तो घाणेरडा काळाकुट्ट चहा. 40 पैसे एकावर खर्च करावयाचे अशी जीएडीची ऑर्डर आहे. अजूनही ते सुरु आहे. मी मंत्रालयात एकदा त्या कपबशा फेकल्या होत्या. आपण एकदा त्यांच्या अंगावर त्या कपबशा फेका. जीएडीच्या सचिवांना, हे घ्या असे म्हणा. त्यांच्या अंगावर फेका. महाराष्ट्र सरकार एवढे भुक्कड आहे का ? हे लोक सरकार चालविणार काय ? यांच्या सल्ल्याने सरकार चालणार आहे काय ? आम्ही म्हणू तसे सरकार चालेल. तुम्हाला फाईलवर काय लिहावयाचे ते लिहा. आम्ही म्हणू तसे सरकार चालेल. तुमच्या म्हणण्याप्रमाणे सरकार चालणार नाही. शिव्या आम्ही खातो, मंत्री राजीनामा देतात आणि हे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

त्या ठिकाणी नियम सांगणार. नियम तोडा. जनतेच्या हिताकरिता नियम तोडण्याचा अधिकार कॅबिनेटला आणि मंत्रिमहोदयांना आहे. जबाबदारी फिक्स झाली तर होऊ द्या. आम्ही जबाबदार राहू. मंत्रिपद गेल्यावर जबाबदार राहू. लोक न्यायालयात गेल्यावर जबाबदार राहू. ॲफिडेव्हिट करा. सरकार चालवावयाचे आहे.

सभापती महोदय, आमच्या पोलिसांची काय व्यवस्था आहे ? त्यांना आज आपण कोणत्या प्रकारच्या व्यवस्था देत आहोत ? ते तुलना करतात. माजी पोलीस महासंचालक श्री. अरविंद इनामदार यांचा एक लेख आला होता. त्यांनी रिपोर्ट कोणाला करावाचा ? गृह सचिवांना रिपोर्ट करावयाचा काय ? यासंदर्भात मी खूप दिवसांपूर्वी बोललो होतो. त्या बिचाऱ्या महिला आहेत, सज्जन आहेत. त्यांच्याबद्दल मला त्यांच्याबद्दल काही बोलावयाचे नाही. पण एवढ्या मोठ्या सगळ्यांचा आवाका करण्यासाठी आयएएस अधिकाऱ्यांमध्ये स्पेशलायझेशनचे गट करा. आज पत्रकारांनी सुध्दा बीट केले आहेत. बीजेपीचा बीट असेल ते पाच वर्षे बीजेपीच्याच मागे असतो. हा काँग्रेसचा बीट, हा यांचा बीट, इन्फ्रॉस्ट्रक्चरचे काम हा बघतो, पावरचे काम तो बघतो, असे त्यांनी बीट केलेले आहेत. आयएएस अधिकारी सगळ्याच विभागांचे काम बघतात. जसे 52 पत्त्यामध्ये जोकर असतो तो कोठल्याही सिक्वेंसमध्ये फिट बसतो तसे आहे. हे जोकर आहेत असे मला म्हणावयाचे नाही. पण हे कोठेही फिट बसतात. ते शिक्षण खातेही चालवतात. समाजकल्याण खातेहीचालवतात, महिला व बालकल्याण खाते चालवतात, परिवार नियोजन खाते चालवतात, उद्योग खाते चालवतात. म्हणजे सगळ्या खात्यांचे एक्स्पर्ट हेच असतात. त्यातही वर्गीकरण करा की, हे पाच अधिकारी एकाच खात्यामध्ये स्पेशलायझेशन करतील. "One person specialise in one subject. This is the key of success." आपण 100 गोष्टी करावयाच्या म्हटल्या तर ते शक्य होत नाही. एकदा एका विषयात तज्ज्ञ करा. आपण प्रशिक्षणाचे वेगळे कॅडर तयार करावे. त्यांचे तसे म्हणणे आहे. यामध्ये काय हरकत आहे ? मी आपल्याला सांगू इच्छितो की, आयएएस अधिकाऱ्यांमध्ये सगळ्यात जास्त जातीयवाद आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे आणि इरिगेशनचे जे अधिकारी सचिव होतात त्यांना हे आपल्या क्लबमध्ये येऊ देत नाहीत. आम्ही उच्च आहोत असे म्हणतात. आमचा आयएएस ऑफिसर्सचा क्लब आहे, आपण प्रमोटेड आहात असे म्हणतात. हे कशाकरिता ? म्हणून माझी आपल्याला विनंती आहे. पोलीस खात्यातील एखादा उत्कृष्ट पोलीस

...3/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/ KGS/ MMP

श्री. नितीन गडकरी .....

अधिकारी महासंचालक असेल त्याला सचिव म्हणून प्रमोट का करता येत नाही ? त्याला जेवढे समजणार आहे तेवढे यांना समजणार आहे काय ? त्यांना एक्स्पोझल आहे का ? आज चौकशी करा आणि जबाबदारी निश्चित करा. ज्या हेल्मेटमधून गोळ्या गेल्या ते कोणी खरेदी केले ? खरेदी हे करणार आणि लढणार ते. बुलेट प्रूफ जॅकेटमधून गोळ्या जातात. ते का सिलेक्ट केले ? चंदिगडच्या लेबॉरटरीने रिजेक्ट केल्यानंतर देखील ज्यांच्यामधून गोळ्या गेल्या ते थर्ड क्लास बुलेट प्रूफ जॅकेट का खरेदी केले ? याचे उत्तर कोण देणार आहे ? कोणती तरी मंत्रालयातील कमिटी तयार करावयाची, सेंट्रलाईजेशन ऑफ पावर करावयाचे, कोणत्या तरी कंपनीने सगळा बोगस माल आपल्या अंगावर खपवून घ्यावयाचा, काही लोकांनी लक्ष्मीदर्शन घ्यावयाचे आणि पोलिसांच्या गळ्यात अडकवून त्यांनी त्या ठिकाणी मरावयाचे काय ? हे कसे चालणार ? माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ साहेबांना सांगू इच्छितो की, या सगळ्या गोष्टी आपल्याला रिफॉर्म कराव्या लागतील.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या जवानांना विमान उपलब्ध झाले नाही. एखाद्या एअरवेजच्या विमानामध्ये त्या 195 जणांना बसवून तातडीने मुंबईला आणता आले नाही. जे विमान मिळाले ते जेट एअरवेजच्या विमानाप्रमाणे फास्ट नव्हते. खूप स्लो स्पीडचे ते विमान होते. त्या विमानाला मुंबईत पोहोचण्यासाठी 3 तास लागले. मुंबईत आणीबाणीसारखी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे जेट एअरवेजच्या विमानात बसलेल्या प्रवाशांना उतरवून या जवानांना त्या विमानातून आणण्याची आवश्यकता होती. असे का केले नाही ? दिल्लीला रात्री 11.30 वाजता मदत मागण्यात आली. माननीय मुख्यमंत्र्यांशिवाय केंद्र सरकारकडून कोणीही मदत मागू शकत नाही किंवा बोलू शकत नाही अशी माझी माहिती आहे. रात्री 11.30 वाजता तत्कालीन गृहमंत्री श्री.शिवराज पाटील यांच्याशी बोलणे झाले. घटना रात्री 9.30 वाजता घडली होती. आतंकवाद्यांच्या हल्ल्याचे स्वरुप पाहता त्या क्षणाला कंट्रोल रुममधून यासंबंधीचा निर्णय होणे आवश्यक होते. त्यावेळी सगळे भांबावून गेले होते. मी एकदम आरोप करीत नाही. परंतु प्रतिकार करणा-या दलास येथे घेऊन येण्यासाठी 9 तास लागतात ? त्या 9 तासामध्ये अनेक निरपराध लोक मारले गेले, किती मोठे लॅप्सेस आहेत ? विमान मागविण्यास विलंब होणे, त्यानंतर विमान उपलब्ध न होणे, येथे आल्यानंतर विमानतळ ते घटनास्थळापर्यंत आणण्याच्या व्यवस्थेत अडचण येणे, या सगळया गोष्टींचा माननीय श्री.छगन भुजबळ यांनी एकदा आढावा घ्यावा. आजच्या चुकांमधून भूतकाळात चुका होऊ नये म्हणून वर्तमान काळात शहाणे व्हावे. भविष्य काळात चांगली धोरणे ठरविली तरच महाराष्ट्र सुरक्षित राहणार आहे. हा कोणत्या पक्षाचा सवाल नाही, कोणत्या जाती, पंथाचा, धर्माचा नाही. नदीचे पाणी जेव्हा गावामध्ये शिरते तेव्हा ते अमूक एका धर्माची घरे पाहून शिरत नाही, ते पाणी सगळयांची घरे उद्ध्वस्त केल्याशिवाय रहात नाही. अशा घटनांमुळे सगळयांचा जीव धोक्यामध्ये आहे, त्यामुळे हा गंभीर विषय आहे. त्यामुळे शासनाने याबाबत गंभीरपणे विचार करावा अशी माझी विनंती आहे. एनएसजीचे महासंचालक श्री.दत्ता यांनी अशी माहिती दिली आहे की, 192 कमांडो एका क्षणाचाही विलंब न लावता शस्त्रसज्ज झाले होते. पण त्यांना दिल्लीहून मुंबईत येण्यासाठी विमान उपलब्ध झाले नाही. मला ही गोष्ट सहन होत नाही. दिल्लीहून

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

मुंबईला येण्यासाठी प्रत्येक एक तासाने विमान उपलब्ध असते. अशी अनेक विमाने त्या विमानतळावर उभी राहिलेली असतात. शासनाला कोणत्याही एअरवेज कंपनीला सांगता आले असते की, तुम्हाला द्यावयाच्या पैशाबाबत आम्ही तुमच्याबरोबर नंतर बोलतो, प्रथम तुम्ही या कमांडोजना मुंबईला विमानाने तातडीने घेऊन जावे. आपल्याकडे अनेक खाजगी एअरलाईन्सच्या कंपन्या आहेत. शासनाने त्यांच्याकडे मागणी केली असती तर त्यांनी नकार दिला नसता. एका मिनिटात विमान उपलब्ध झाले असते. त्या विमानातून लगेच लोक आले असते. परंतु ही परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी, काळजी घेण्यासाठी कोणीही उपलब्ध नव्हते. मला अशी माहिती मिळाली आहे की, त्यावेळी कोणतेही मंत्री घराबाहेर पडण्यास तयार नव्हते. मी त्या विषयावर बोलू इच्छित नाही. माननीय श्री.छगन भुजबळ यांना मी धन्यवाद देतो. घराबाहेर पडणारे आपण पहिले मंत्री आहात. आपण त्यावेळी असे म्हणालात की, जर कोणी जात नसेल तर मी प्रथम तेथे पोहोचतो. हे कळल्यावर बाकीचे मंत्री घराबाहेर पडले. या परिस्थितीबाबत सर्वांनी आत्मपरिक्षण करण्याची आवश्यकता आहे. सगळयाच गोष्टींची बाहेर चर्चा करणे योग्य होणार नाही. त्या पलिकडील काही गोष्टी मला माहीत आहेत. परंतु आत्मपरिक्षण करण्याची आवश्यकता आहे. आत्मचिंतनातून भूतकाळातील चुका दुरुस्त करुन वर्तमानकाळात विचार करुन भविष्याचा वेध घेत असताना या चुका पुन्हा होणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे. कारण हा धोका टळलेला नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी सर्व पक्षीय बैठक बोलविली होती, त्यावेळी सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे, मी स्वत: उपस्थित होतो. त्यांनी आम्हाला सांगितले होते की, एकूण 22 अतिरेकी आहेत. त्यापैकी 10 बाहेर निघाले, मग 12 अतिरेकी कोठे गेले, 22 होते की नाही, त्यांना कोणी माहिती दिली, ही माहिती चुकीची आहे काय ? यानिमित्ताने प्रत्येक गोष्टीचा विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये अनेक पर्यटक जातात. मी श्री.रतन टाटा यांच्याकडे एक्स-रे मशीनबाबत विचारणा केली असता त्यांनी मला माफ करावे असे म्हटले. या हॉटेल्सच्या 3-6 महिन्यांच्या बॅलन्सशीटवर 200-200 कोटींचा नफा दाखविलेला असतो. इतका

3...



NTK/ MMP/ SBT/ KGS/ KTG/

श्री.नितीन गडकरी....

नफा त्यांना मिळत असताना हे हॉटेल्सचे मालक प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी एखादे एक्स-रे मशीन बसवू शकत नाही ? त्या हॉटेलमध्ये त्यांनी एवढा मोठा दारुगोळा बरोबर नेला. यापूर्वी काही आतंकवादी ताज आणि ओबेरॉय हॉटेलमधील रुममध्ये राहिले होते. त्यांनी तेथे दारुगोळा नेला, त्याठिकाणी आपले मुख्यालय तयार केले. तेथे त्यांच्या कनेक्टिव्हीटीची व्यवस्था असलीच पाहिजे. कोणीही 80 किलो वजनाचे सामान घेऊन धावू शकतो काय ? 80 किलो वजन घेऊन आतंकवादी धावू शकतो काय, यावर माझा विश्वास बसत नाही. या आतंकवाद्यांपैकी काही आतंकवादी प्रवासी असे भासवून पळून गेले असण्याची मला भीती वाटते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 12:05

(श्री. नितीन गडकरी ...

या हॉटेलमध्ये महिन्याभरापूर्वी, दोन महिन्यापूर्वी कोण कोण माणसे राहात होती याची माहिती हॉटेल व्यवस्थापनाकडे असली पाहिजे. सभापती महोदय, या दहशतवाद्यांनी या हॉटेलमधील माणसे कोणत्या देशातील आहेत, कोणत्या देशाचे पासपोर्ट त्यांच्याकडे आहेत हे पाहून त्यांना वेचून मारले. अतिशय अमानवी कृत्य या नराधमांनी केलेले आहे. महिलांच्या संदर्भातील माहिती फार वाईट आहे. ती माहिती या सभागृहामध्ये सांगण्यासारखी नाही. महिलांच्या बाबतीत जे काही केलेले आहे ते अतिशय वाईट आहे. या निमित्ताने एक गोष्ट मला शासनाला विचारावयाची आहे की, एवढ्या मोठ्या हॉटेलातील सुरक्षा व्यवस्थेच्या संदर्भात शासन काही नियम करणार आहे की नाही ? एक्स-रे मशिन पासून प्रत्येक सामानाची तपासणी करणारे मशिन अशा ठिकाणी असायला पाहिजे. विमानतळावर माननीय मंत्री महोदयांच्या सामानाचे चेकिंग केले तर ते रागावतात. मुख्यमंत्री असो, मंत्री असो, आमदार असो, या सर्वांनी सुरक्षेच्या दृष्टीने चेकींगसाठी सहकार्य केले पाहिजे. आता परिस्थिती अशी निर्माण झालेली आहे की, कोणीही तुमच्या खिशामध्ये केव्हा बॉम्ब आणून ठेवील त्याचा पत्ता लागणार नाही. म्हणून लोकप्रतिनिधींचे सेक्युरिटीच्या बाबतीत प्रबोधन करा. सेक्युरिटी सगळयांच्या हितासाठी आहे. सेक्युरिटीच्या वेगवेगळया कन्सेप्ट कराव्या लागतील. मंत्रालय सेक्युरिटीची वेगळी कन्सेप्ट करावी, ऑफिसच्या सेक्युरिटीची वेगळी कन्सेप्ट करावी. जगातील ऑफिसेसमध्ये अशी व्यवस्था आहे की, तेथे काम करणा-या व्यक्तीने मशिनमध्ये कार्ड टाकल्या शिवाय दरवाजा उघडत नाही. आपल्या रुममध्ये कोणीही धुसतो, कोणीही येऊन बसतो. मी एकदा आमदार निवासातील माझ्या रुममध्ये बसलेलो असताना एकाने मला दरवाजा उघडून विचारले, "आपणाला कोण पाहिजे ? गडकरी साहेब सिनेमाला गेलेले आहेत." मग त्या व्यक्तीला सांगितले की मीच गडकरी आहे. सभापती महोदय, आमदाराला देण्यात आलेल्या निवास व्यवस्थेवर त्याच्या मतदारसंघातील साडेतीन लाख लोकांचा हक्क असतो. आमच्याकडे जो येतो त्याला चिठ्ठी द्यावी लागते, त्याला काही इलाज नाही. कारण ग्रामीण भागातील सर्वसामान्य माणूस हजार दोन हजार रु. भाड्याने राहू शकत नाही. मला हे सांगितले पाहिजे की हॉटेलमधील सुरक्षेच्या संदर्भात नियम केले पाहिजेत. अनुभवी आणि एक्स्पर्ट अधिका-या

..2..

(श्री. नितीन गडकरी।.)

मार्फत हॉटेल्स, कॉर्पोरेट सेक्टर या सर्वांच्या बाबतीत एक गोष्ट केली पाहिजे आणि ती म्हणजे प्रत्येक क्षेत्रातील सेक्युरिटीचे नॉर्म्स ठरविले पाहिजेत, ते कोडीफाय केले पाहिजेत. हा एक वेगळा विस्तृत विषय आहे. त्यावर वेगळी चर्चा करावी लागेल.

सभापती महोदय, हे सर्व का झाले ? आतंकवादी हा हिंदू किंवा मुस्लिम नसतो. या आतंकवाद्यांना मुस्लिम म्हणू नका. हे जिहादी आतंकवादी आहेत. कोणताही सच्चा हिंदू किंवा मुस्लिम असले कृत्य करणार नाही. एक काळ असा होता की, व्होट बँकसाठी अपीझमेण्ट ऑफ मायनॉयरिटी होत होती. आता सध्याची व्होट बँक ही अपीझमेण्ट ऑफ टेररिस्ट आहे. संसदेवर हल्ला करणारा अफझल गुरु याला हायकोर्टाने आणि सुप्रीम कोर्टाने फाशीची शिक्षा सुनावलेली असताना देखील त्याला अजून फाशी दिलेली नाही. त्याने दयेचा अर्ज केलेला आहे. आमचे मित्र श्री. तारीक अन्वर आणि श्री गुलाम नबी आझाद ........

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. अतिशय उच्च दर्जाची चर्चा येथे सुरु असून या चर्चेला अन्य कोणत्याही विषयाला स्पर्श न करण्यासंबंधीची मर्यादा घालून दिलेली असल्याचे सुरुवातीलाच सूचित केलेले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी विषयाला धरुनच आपल्या भावना व्यक्त कराव्यात. विषयाच्या बाहेर जाऊन चर्चा होणार असेल तर तशी परवानगी आम्हाला देखील दिली जावी. अफझल गरु हा या विषयामध्ये बसतो की नाही याचा खुलासा झाला पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : या आतंकवाद्यांच्या बाबतीत पोलिसांचे मनोबल कमी झालेले आहे हे मला सांगावयाचे आहे. मला कोणावरही टीका करावयाची नाही किंवा कोणाचे नाव घ्यावयाचे नाही. पोलिसांचे मनोबल कमी करणा-या पाच-सात धटना घडलेल्या आहेत आणि त्या मला सांगितल्या पाहिजेत.

.. नंतर श्री. गिते ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

मी असे सांगतो आहे की, या देशात आंतकवाद्यांचे तुष्टीकरण होता कामा नये. सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांना राग का येतो आहे हे मला कळत नाही.

**सभापती** : या चर्चेला सुरुवात होण्यापूर्वी सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी एक मुद्दा उपस्थित केला होता. त्या मुद्यांच्या अनुषंगाने मी सभागृहात सांगितले की, मुंबई शहरावर दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी जो आतंकवादी हल्ला झाला, त्या हल्ल्याच्या अनुषंगानेच आपल्याला चर्चा करावयाची आहे. सदर चर्चा ही उच्चस्तरीय झाली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे अतिशय उच्चस्तरीय मनोगत व्यक्त करीत आहेत. परंतु नकळत त्यांनी दिल्लीतील एक, दोन मुद्यांचा उल्लेख केला. परंतु मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्याच अनुषंगाने चर्चा केली तर ही चर्चा अधिक उच्चस्तरीय होईल. सन्माननीय सदस्यांनी मर्यादित विषयाच्या अनुषंगानेच आपापले मनोगत व्यक्त करावे अशी मी पुनःश्च अपेक्षा व्यक्त करतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी मर्यादित विषयाच्या अनुषंगानेच बोलतो आहे.

श्री. नवाब मलिक : गंभीर विषयावर सभागृहात चर्चा चालली आहे, त्याबाबतीत मला काहीही म्हणावयाचे नाही. परंतु सन्माननीय सदस्यांकडून "जिहादी आंतकवाद " या शब्दाचा वारंवार उल्लेख होतो आहे. "जिहाद" संदर्भात असा कन्सेप्ट तयार झालेला आहे की, "जिहाद" म्हणजे इस्लाम धर्मामध्ये इस्लाम समाजासाठी लढण्यासाठी दिलेला उपदेश. जिहादचा अर्थ स्ट्रगल असा आहे. गैरकाम झाले असेल तर "जिहाद" हा संघर्ष करीत असतो. पण आता एक कन्सेप्ट तयार होऊ लागली आहे की, "जिहाद" म्हणजे इस्लामासाठी लढणारी माणसे. या ठिकाणी "जिहाद" या शब्दाचा वारंवार उपयोग करीत आहात, त्या अर्थाने जिहाद शब्द वापरु नये अशी माझी विनंती आहे. "फिदायीन" म्हणजे स्वतःला मारुन घेणारा दस्ता. या शब्दाचा सन्माननीय सदस्य वापर करु शकतात. परंतु "जिहाद" हा शब्द वापरल्यामुळे थोडासा गैरसमज होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्या शब्दाचा वापर होऊ नये अशी माझी विनंती आहे.

श्री.नितीन गडकरी : प्रत्येक मुसलमान आतंकवादी आहे असे मुळीच नाही व तसे कोणाचेही म्हणणे नाही. आंतकवाद्यास धर्म नसतो यासंबंधी मी मघाशीच उल्लेख केला आहे. "जिहाद" हा शब्दप्रयोग भारत सरकारने वापरलेला आहे. लष्कर-ए-तोयबा किंवा अल-कायदा, आय.एस.आय. या अनुषंगाने तो वापरलेला दिसतो आहे. हा शब्द मी मुस्लीम धर्मियातील

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

कोणत्याही व्यक्तीसाठी वापरलेला नाही. असा कुठलाही अर्थ मला अभिप्रेत नाही. मला तशी टीका देखील करावयाची नाही. मुंबईतील श्री. इब्राहिम ताहिर या मौलांनी हे अतिरेकी मुस्लिम धर्माचे नाहीत असे जाहीर केले, त्यामुळे श्री. इब्राहिम ताहिर यांच्या निवासस्थानी दूरध्वनीकरुन त्यांचे स्वागत केले. श्री. इब्राहिम ताहिर यांनी सांगितले की, ते अतिरेकी इस्लामी धर्माचे नाहीत, त्यांना या देशात आम्ही अशा प्रकारचे कृत्य करु देणार नाही. त्यामुळे त्या मुस्लिम मौलवींचे मी अभिनंदन केले. आमच्या मनातील भावना त्यांनी व्यक्त केली.

सभापती महोदय, पोलीस खात्याचे मनाबेल का कमी होत आहे याबद्दलची मी माहिती या ठिकाणी देत आहे. आपण भारतीय राज्य घटना पहा. भारतीय राज्य घटनेमध्ये असे लिहिले आहे की, गुन्हेगाराला जात, पंथ, धर्म आणि भाषा नसते. गुन्हेगार हा गुन्हेगार असतो. सुप्रीम कोर्टाचा निर्णय सर्वोच्च असतो. पण वस्तुस्थिती अशी आहे की, आंतकवाद्याला काही कारणास्तव फाशीची शिक्षा सुनावली गेलेली आहे. चुकीच्या समजुतीने का होईना माननीय श्री. मोदीला मारण्यासाठी इशरत जहाँ गेली होती, तिच्या घरी एक लाख रुपयांचा चेक काही लोकांनी पोहोचविला. परंतु ती चूक लक्षात आली आणि तो चेक परत आणला गेला....

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे...

श्री. नितीन गडकरी : पोलिसांचे मनोधैर्य का खचत चालले आहे त्याबाबतीतील माहिती मी या ठिकाणी देतो आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आम्हाला देखील श्री.दयानंद पांडे व इतर प्रकरणाबाबत बोलण्याची परवानगी द्यावी लागेल.

श्री. नितीन गडकरी : सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात हवा तो उल्लेख करावा. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी परवानगी दिलेली आहे. मला त्यांनी बोलण्यासाठी परवानगी दिलेली नाही.

**सभापती** : कृपया आपण सभागृहात शांतता ठेवावी.

श्री.नितीन गडकरी : मी सन्माननीय सदस्यांच्या पक्षाबद्दल काहीही टीका केलेली नाही. सन्माननीय सदस्य मला माझे विचार मांडू देत नाहीत हे बरोबर नाही.

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : चर्चेचा स्तर अतिशय चांगला चाललेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपल्याला कबूल केल्याप्रमाणे कोणत्याही पक्षावर टीका न करता मी माझे भाषण करीत आहे. या राज्यात ज्या घटना घडल्या, त्या अनुषंगाने मी माझी माहिती सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. पोलिसांचे मनोबल कमी का झाले याचा शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. पोलिसांचे मनोबल कमी होता कामा नये असे माझे स्पष्ट मत आहे.

यानंतर श्री. भोगले....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ 12:15

श्री.नितीन गडकरी....

आणि म्हणून मला माझे विचार मांडावयाचे आहेत. तुमच्या पक्षावर टीका करावयाची नाही. वैचारिक भूमिका समजून घ्यावी. आवश्यकता वाटल्यास सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रस्ताव मांडावा. पांडे, साध्वी यांच्या संदर्भात जरुर चर्चा होऊ द्यावी. मी मनातील राजकारण बोललो नाही. पुष्कळ गोष्टी टाळल्या आहेत.

सभापती महोदय, बशीर नावाचा अतिरेकी गुजराथमध्ये पकडला गेला. तेथील एनकाऊंटरमध्ये पांडे नावाचा अधिकारी शहीद झाला. समाजवादी पक्ष, काँग्रेस पक्ष यांनी 5-5 लाखाचे चेक दिले. पक्षाने सांगितले की, एनकाऊंटर फेक आहे. त्यामुळे चेक परत केले. अशा घटना टाळल्या पाहिजेत. यामध्ये राजकारण करता कामा नये. यामधूनच पोलिसांचे मनोधैर्य कमी होत आहे. म्हणून Appeasement of terrorists for vote bank politics हे करु नये अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, पोटा कायदा म्हणा, टाडा कायदा म्हणा, काय म्हणायचे ते म्हणा. परंतु माननीय पंतप्रधानांनी मान्य केले. माझी आठवण बरोबर असेल तर सन्माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ हे गृहमंत्री असताना पोटा कायद्याखाली 8 आतंकवाद्यांना अटक केली आणि त्यांच्यावर कारवाई केली होती. आतंकवाद्यांवरील कारवाईसाठी जे कायदे आहेत, जे राज्य सरकारने मंजूर केलेले आहेत ते केंद्र सरकारने अडकवून ठेवले आहेत. त्या कायद्यांना राष्ट्रपतींची परवानगी मिळालेली नाही. त्या संदर्भातील रेकॉर्ड माझ्याकडे उपलब्ध आहे. परंतु ते वाचून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. महाराष्ट्र सरकारने पोटासारखा कायदा स्वीकारावा आणि आतंकवाद्यांवर कडक कारवाई करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, 750 कि.मी.चा सागरी किनारा आहे. या किनाऱ्याचे संरक्षण करण्यासाठी अद्याप पदे मंजूर नाहीत, कार्यालय नाही, बोटी नाहीत. बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात. किती दिवसात 750 कि.मी.च्या समुद्र किनाऱ्याचे संरक्षण करण्याची तुमची योजना आहे? तुम्ही काय उपाययोजना केली आहे? संरक्षण करण्यासाठी किती स्पीड बोटी घेणार आहात? किती पोलीस चौक्या स्थापन करणार आहात? चेक पोस्ट कुठे असणार आहेत? केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या एजन्सीमध्ये कोऑर्डिनेशन कसे करणार आहात? या एजन्सीच्या आतापर्यंत किती बैठका झाल्या? या संदर्भात मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ 12:15

श्री.नितीन गडकरी.............

सभापती महोदय, हे एक गंभीर प्रकरण असल्यामुळे याची चौकशी झाली पाहिजे. श्री.दामोदर तांडेल आणि मच्छिमार श्री.एकनाथ धनू यांनी पोलीस अधिकाऱ्यांना माहिती दिली होती की, नैसर्गिक वायू महामंडळाच्या नौका असतात तेथे दोन बोटी संशयास्पदरित्या दिसून आल्या आहेत. मुंबईवर हल्ला झाला त्या रात्री या बोटी गायब झाल्या. त्या बोटीमधूनच अतिरेकी कुबेर बोटीवर गेल्याचे उघड झाले. श्री.तांडेल हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांची मी क्षमा मागतो. मी राजकारण करीत नाही. त्यांनी लेखी स्वरुपात मागणी केली. या सरकारमध्ये जे मंत्री आहेत, विशेषत: मत्स्य व्यवसाय विभागाचे डायरेक्टर श्री.गोरख मेघ यांनी पैसे घेऊन 500 बांगलादेशी नागरिकांना लायसन्स दिले. हे श्री.तांडेल यांनी सांगितलेले आहे. या माहितीमुळे सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड दुखावले असतील तर मी क्षमा मागतो. परंतु पैसे घेऊन 500 बांगलादेशी लोकांना परवानगी दिली याची चौकशी झाली पाहिजे.

सभापती महोदय, माझी एकच विनंती आहे की, कस्टमच्या 4 बोटी धूळ खात पडल्या आहेत, सन्माननीय मंत्री श्री.भुजबळ यांनी, समुद्र तटाचे संरक्षण करणाऱ्या ज्या केंद्र सरकारच्या आणि राज्य सरकारच्या एजन्सी आहेत त्यांची संयुक्त बैठक घ्यावी. आज या एजन्सीमध्ये समन्वय दिसून येत नाही.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी......

कोणीच कोणाला काही सांगत नाही, त्यांचा समन्वय नाही म्हणून हा समन्वय प्रस्थापित करण्याचे काम आपण अगोदर करावे अशी माझी माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती आहे. कारण त्यांचे इन्फ्रास्ट्रक्चर एका दिशेने वापरता येईल म्हणून हा समन्वय आवश्यक आहे. माझ्याकडे तशी बरीच माहिती आहे परंतु वेळेअभावी ती मांडणे शक्य नाही. कारण कस्टमच्या चार बोटी धूळ खात पडलेल्या आहेत याची माहिती नाही. ऊरण, कारंजा, मुरुड, श्रीवर्धन, अलिबाग येथील गस्ती नौका बेपत्ता आहेत एवढी भयंकर परिस्थिती आहे, आणि ही माहिती त्यांच्याच लोकांनी मला दिली आहे. अशा प्रकारे आपला समुद्र किनारा कसा सांभाळता येईल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. सागरी सीमेच्या दृष्टीने गंभीर प्रकरण म्हणजे दि. 31 मार्च, 2008 रोजी सरकारी टिप्पणीमध्ये अधिकृतपणे म्हटले आहे की, कोस्टल सिक्युरिटी सिस्टम, किनारा सुरक्षा योजना सन 2005 मध्ये लागू करण्यात आली परंतु त्या योजनेचे काय झाले याची माहिती नाही. या योजनेत केंद्रशासित प्रदेश आणि ट्रॅब्युनलसाठी 400 कोटीची खरेदी अपेक्षित धरली होती. त्यात 151 कोटी आपल्यासाठी आहेत. त्या 151 कोटीमधून 73 पोलीस स्टेशन्स, 97 चेक पोस्ट, 98 आऊट पोस्ट, 30 बराकी, 55 पोलीस स्थानके उभारल्याचे सांगण्यात आले व त्यासाठी हे 151 कोटी रुपये खर्च केल्याचे सांगितले असे म्हणतात. तसेच 73 किनारा पोलीस ठाण्यासाठी 204 बोटी, 153 जीप एवढी खरेदी केल्याचे सांगितले परंतु मला वाटते या बोटी व जीप्स तिकडच्याच आणून इकडे वापरल्या असाव्यात. तसेच 312 मोटर सायकल्स देण्याचाही यामध्ये समावेश आहे, कुठे गेल्या या मोटर सायकली माहीत नाही.........(अडथळा)........महोदय, महत्वाची माहिती रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे म्हणून पाच मिनिटात माझे भाषण पूर्ण करतो व त्यासाठी मला परवानगी द्यावी, अशी माझी विनंती आहे.

महोदय, ख्वाजा युनुस अहमदच्या प्रकरणात, मी मागे राहूल गोपाल या प्रकरणाच्या संदर्भात मागे मी माजी उपमुख्यमंत्री श्री. पाटील यांच्याकडे गेलो होतो. पोलिसांकडे 5-10 टक्के चूक असेल तर पोलीस अधिकाऱ्यावर दुर्लक्ष करा. पण अशा प्रकारे तुम्ही दणादण पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करायला लागले तर त्यांचे मनोधैर्य खच्ची होणार नाही काय ? कदाचित आपल्याला आठवत असेल की, मी विरोधी पक्षनेता होतो त्यावेळेस मा. श्री. विलासराव देशमुख

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

मुख्यमंत्री होते. मी त्यावेळेस या ख्वाजा युनुस प्रकरणात आयोग वगैरे आणू नका म्हणून सूचना केली होती. तूम्ही त्यावेळेस ते पोस्टपोनही केले होते. कारण अशा प्रकारे चांगल्या पोलीस अधिकाऱ्यांचा खात्मा करीत राहिलो तर हे पोलीस कसे काम करणार ? तसाच प्रकार एका प्रफुल्ल भोसले नावाच्या अधिकाऱ्याच्या बाबतीत झाला, त्याला ख्वाजा युनुस अहमदच्या केसमध्ये सस्पेंड केले. वास्तविक त्याच्यावर या केसमध्ये चार्जशीट सुध्दा नाही, तो निर्दोष आहे, म्हणून त्याला ताबडतोब रिइन्स्टेट करा व पोलिसांचे मनोबल वाढवा, अशी माझी सूचना आहे. आतंकवाद्यांशी लढताना चांगल्या पोलिसांचा अशा प्रकारे खात्मा करणे योग्य नाही. कारण गुन्हेगारांना 12-12 वर्षे शिक्षा होत नाही, त्यांच्यावर केसेस चालत नाही, नाहीत परंतु अशा गुन्हेगारांवर कारवाई करणाऱ्या शूर पोलिसांवरच आपण कारवाई करतो. म्हणून यासंबंधीचा विचार करुन ताबडतोब निर्णय घेणे आवश्यक आहे. असे केले तर कोण या आतंकवाद्यांशी लढणार आहे ? शेवटचा मुद्दा म्हणजे मी एक एसएमएस रिसीव्ह केलेला आहे. त्यात असे म्हटले आहे की, "The world suffers a lot-not because of violence of bad people, but because of silence of good people." जगाने फार मोठे सहन केले व करुन राहिले, त्याचे कारण सज्जन माणसे आहेत ते दुर्जन माणसाच्या हिंसाचारामुळे नाही तर जगामध्ये चांगल्या माणसांच्या सायलेन्समुळे जग जास्त सफर करुन राहिले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

सभापती महोदय, संवेदनशील राजकीय मनाची या परिस्थितीवर मात करण्याची गरज आहे. राज्यकर्त्यांवर लोक कसे नाराज झालेले आहे, यासंदर्भात एकाने प्रतिक्रिया दिली आहे की

"नौ आतंकी देश पर भारी, कैसी यह सरकार है
क्या अपने इस देश में यारों छक्को की सरकार है
देश से ज्यादा व्होट प्यारा, यह कैसा व्यापार है.
कुर्सी की खातिर यह मच रहा हाहाकार है
ऐसी निकम्मी सरकार का धिक्कार है, धिक्कार है, धिक्कार है.

सभापती महोदय, सामान्य माणसाचा आता सरकारवरचा आणि राजकारणी माणसावरील विश्वास उडत चालला आहे. या चर्चेच्या निमित्ताने जर विश्वास संपादन करावयाचा असेल तर पोलीस खात्यामधील सुधारणांच्या संदर्भात एक ॲक्शन प्लॅन तयार करा, प्रशिक्षणापासून ते आधुनिक क्षेपन घेईपर्यंत तर सागरी मार्गाच्या सुरक्षेपर्यंत प्लॅन तयार करा. हा प्लॅन मंजूर करीत असतांना गृह मंत्र्यांना पूर्ण अधिकार द्या. सध्याचे गृहमंत्री त्यावेळी अर्थमंत्री असतांना त्यांनी गृहमंत्र्यांचा बळी घेतला, गृहमंत्रालयाच्या फाईल्स त्यांनी मंजूर न केल्यामुळे गृहमंत्र्यांचा या दहशतवादी हल्ल्यात खुर्ची गेली. यावेळी माजी गृहमंत्र्यांचा पॉलिटीकली एनकाऊंटर झालेला आहे. वित्त विभागाने गृहविभागाच्या सगळया फाईली दाबल्या. ज्या सेंसेटीव्ह फाईल्स असतील तर त्यासाठी कॅबिनेट सबकमिटी तयार करुन त्या सबकमिटीवर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व गृहमंत्री यांची नेमणूक करा. सेंसेटीव्ह फाईलचा निर्णय त्या सबकमिटीमध्ये घ्या. सुबोधकुमार सारखे अधिकारी सेंसेटीव्ह फाईल्स दणादण रिजेक्ट करीत सुटले आहेत व सरकार चालवत आहेत. असे गाफील सरकार भूजबळ साहेब आपण चालवू नका. येणा-या काळात काही तरी रिझल्ट द्या. पोलीस खात्यातील राजकारण समाप्त करा. याला काढता, त्याला बसवता यामुळे या व्यक्ती कोर्टात जातात आणि आपला तमाशा करतात. पोलिसांच्या नियुक्त्या कोणाच्या मर्जीने आपण करीत आहात? पोलिसांच्या नियुक्त्यांमध्ये कशा करता हस्तक्षेप करता ? लोक म्हणतात की, आता दिल्लीवरुन निर्णय होतात. नियुक्त्यांच्या संदर्भात दिल्लीवरुन कसे काय निर्णय होतात ? चांगले

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

काम करणा-या माणसाला सन्मान नाही आणि वाईट काम करणा-या माणसाला शिक्षा नाही अशी परिस्थिती आहे. जे चांगले असेल त्याचा स्विकार करा, जो काम करणारा असेल त्याला प्रोत्साहन द्या, त्यामध्ये जात, धर्म यामध्ये आड आणू नका. जो वाईट असेल, नॉन परफॉर्मिंग असेल तर त्याच्यावर कारवाई करा. तुम्ही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे राजिनामे घेतले पण या सर्व प्रकरणामध्ये साऊथ मुंबईमध्ये बसलेले जबाबदार पोलीस अधिकारी या घटनेच्या वेळी घराच्या बाहेर निघाले नाहीत, ज्यांनी केवळ तमाशा बघण्याचे काम केले त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार ते सांगा ? बुलेट प्रुफ जॅकेटाची खरेदी बिलो स्टँर्डने केली व हल्ल्यामध्ये ज्या पोलीस अधिका-यांचा व पोलिसांचा प्राण गेला त्यामध्ये आपण कोणावर कारवाई करणार ते सांगा ? लोखंडी हेल्मेटच्या आतून गोळया जातात त्यास कोण जबाबदार आहे ? इंटेलिजन्सचे अधिकारी का आले नाही ते सांगा. ? जे दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करा आणि कोठे तरी जनतेचा विश्वास वाढेल व महाराष्ट्रात सरकार नावाची वस्तु शिल्लक आहे असे जनतेला वाटू द्या. नाही तर स्थिती अशी येईल की, क्राईसेस ऑफ क्रिडीबीलीटीचा तुमच्या आणि माझ्या समोरचा प्रश्न आहे. कार्टुनिस्ट श्री. लक्षमण यांनी टाईम्स ऑफ इंडियामध्ये एक कार्टून काढले होते त्या कार्टूनमध्ये खादीचे कपडे घालून एक माणूस धावत होता, त्याच्या मागे लोक धावत होते. तो म्हणत होता "कॉल मी एनीथींग बट डोन्ट कॉल मी लिडर" आज आमची अशी अवस्था झालेली आहे. प्रतिष्ठा आणि सन्मान वाचवायचा असेल तर पोलीस खात्यातील राजकीय हस्तक्षेप सोडून गुणवत्तेच्या आधारावर सुधारणा करुन महाराष्ट्राची सुरक्षा राखणारे पोलीस दल हे सरकार खरोखर तयार करणार आहे काय? जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करुन, त्याचा परिचय तुम्ही द्यावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवतो.

धन्यवाद.

---------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, या ठिकाणी एका आगळया वेगळया चर्चेला हे सभागृह सामोरे जात आहे. काही दिवसापूर्वी लोकसभेत झालेल्या चर्चेत देखील मुंबईवरील दहशतवाद्यांच्या संदर्भाचाच विषय चर्चीला गेला होता. काल मला बोलण्याची संधी मिळाली नव्हती. परंतु ज्या शूर विरांनी, महाराष्ट्रातील शूर विरांची आणि छत्रपती शिवाजी महाराजांची थोर परंपरा दाखवत महाराष्ट्राच्या भूमीसाठी, देशासाठी, एकतेसाठी आणि अखंडतेसाठी आपले प्राणार्पण केले त्या सगळयांपुढे, त्यांच्या विचारांपुढे, त्यांच्या आदर्शांपुढे मी नतमस्तक होतो. महाराष्ट्र घडला वाढला तो छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शावर. कल्याणच्या सुभेदाराची सुन आपल्या दारी आल्यावर तीला साडी-चोळी नेसून परत पाठवण्याची पंरपरा छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राला शिकवली. आपला मुलगा आपल्या कक्षेच्या बाहेर वागतो हे कळल्यानंतर त्यांनी अष्टप्रधान मंडळापुढे छत्रवती संभाजी राजे यांना बोलावून सांगितले की, "बाळा तुझे वागणे मी खपवून घेणार नाही."

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड....

स्वकीय आणि परकीय असा भेदभाव न करता राज्य चालले पाहिजे असे सांगणारे छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचा आदर्श पुढे चालू ठेवणारे हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळसकर, शशांक शिंदे, तुकाराम ओंबाळे आणि इतर शहीद पोलीस कर्मचारी हे सर्व पुढच्या पिढीचे आदर्श आहेत. त्यांच्या आदर्शापुढे मी पुन्हा एकदा नतमस्तक होतो.

सभापती महोदय, मी सर्वप्रथम केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम यांचे अभिनंदन करतो. राज्याची सत्ता ही लोक कल्याणकारी राज्याचा महामार्ग असला पाहिजे. त्या लोक कल्याणकारी महामार्गामध्ये एखादी अडचण आली, एखादा अपघात झाला तर परिणामांची पर्वा न करता त्याची जबाबदारी घेण्याची हिम्मत राज्यकर्त्यांनी दाखविली पाहिजे. केंद्रीय गृह मंत्री श्री.पी.चिदंबरम यांनी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याच्या ठिकाणी भेट देऊन तेच केले. त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, It was failure of intelligence. माननीय विरोधी पक्ष नेता श्री.लालकृष्ण अडवाणी यांनी लोकसभेत केलेले भाषण आठवते. त्यांनी सांगितले की, "आतंकवादियों का कोई धर्म नहीं होता. इस देश में हिन्दू,मुस्लिम, सिख और ईसाई सभी को एक होकर आतंकवाद से लड़ना चाहिए. देश की अखंडता और एकता के लिए यह जरुरी है. "

सभापती महोदय, अनेक वर्षानंतर मी लोकसभेत चांगल्या चर्चेचा स्तर पाहिला. त्या चर्चेतून या देशातील अखंडेतेला धोका नाही असे चित्र देशासमोर गेले. मी याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचे देखील मी अभिनंदन करतो की, त्यांना याठिकाणी सांगितले की, आतंकवादाला कोणाताही धर्म नसतो. आतंकवाद्याचा कोणातही चेहरा नसतो. तो एक विकृत विचार असतो जो मानवी संहारातून विघटनाची बाब बोलत असतो. सन्माननीय सदस्य पुढे डिमॉरलायझ ेशन ऑफ पोलीस फोर्सबाबत बोलले. मी याठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री श्री.छगन भुजबळ यांना विनंती करतो त्यांनी श्री.प्रफुल्ल भोसले यांना कामावर घ्यावे.

सभापती महोदय, मी याठिकाणी अत्यंत जबाबदारी सांगतो की, कै.हेमंत करकरे हे मेन्टली डिस्टर्ब झाले होते. मी अत्यंत जबाबदारीने सांगतो की, सायकॉलॉजीकली डिस्टर्ब झालेला पोलीस फोर्स त्यादिवशी आतंकवाद्यांशी लढू शकला नाही. श्री.नितीन गडकरी आपण अपीजमेंट ऑफ टेररिझम म्हणता त्यास आमचा विरोध आहे. अफझल गुरुला फाशी द्यायलाच हवी. पण त्याच

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड....

बरोबर स्वकीय आणि परकीय असा भेदभाव न करता या मातीशी जो कोणी गद्दारी करेल त्यास सुध्दा तेच शासन झाले पाहिजे. ही आपली प्रमुख एक मागणी असली पाहिजे आणि ही जनतेची मागणी आहे. श्री.प्रफुल्ल भोसले यांना कामावर घेतले पाहिजे. दिनांक 26 नोव्हेंबर रोजी एटीएसचे प्रमुख श्री.हेमंत करकरे सकाळी वर्तमानपत्रात त्यांच्याबद्दल लिहून आलेले वाचतात काय आणि संध्याकाळी आतंकवाद्यांनी केलेल्या गोळीबारास मी कसा सामोरा जाऊ असा प्रश्न त्यांच्या समोर होता. सकाळी त्यांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविले जातात, त्यांच्या पत्नी व मुलांची धिंड काढण्याबाबत लेख लिहिले जातात. हे सर्व वाचून ते दिल्लीला जातात. नॅशनल सेक्युरीटी ॲडव्हाझरसमोर त्यांचे म्हणणे मांडतात. नॅशनल सेक्युरिटी ॲडव्हाझर त्यांना प्रश्न विचारतात की, आपण जी चौकशी करीत आहात त्याबाबत खरे काय, खोटे काय याबाबत देशासमोर प्रश्न निर्माण होत आहेत. या देशाचे माजी उप पंतप्रधान एटीसबद्दल शंका उपस्थित करीत आहेत. दिल्लीला जाऊन नॅशनल सेक्युरिटी ॲडव्हाझरला सर्व सांगून ते विमानाने परत आले. ....

श्री.नितीन गडकरी : अध्यक्ष महाराज, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी सांगू इच्छितो की, श्री.हेमंत करकरे हे शहीद होण्यापूर्वी एक महिना अगोदर मला चार वेळा भेटले होते. त्यांच्या कुटुंबांशी माझे चांगले जवळचे संबंध आहेत. ते कुठेही मानसिकदृष्टया डिस्टर्ब नव्हते. सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत असे काही नव्हते. तेव्हा त्यांनी कृपा करुन त्यांची बदनामी करु नये.

दुसरा मुद्दा म्हणजे याठिकाणी ठरले होते असे कोणतेही मुद्दे काढायचे नाहीत. सन्माननीय सदस्य चर्चेचा स्तर बिघडवित आहेत. माझ्याजवळ पुष्कळ विषय आहेत. सन्माननीय सदस्य साध्वी, व पांडे यांच्यासंदर्भात वेगळी सूचना देऊन चर्चा करु शकतात..... मला वाईट वाटत नाही. माननीय श्री.लालकृष्ण अडवाणी हे एटीएसच्या तपासाबाबत काही बोलले नाही.

यानंतर श्री.गायकवाड...

अस्धारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.गडकरी ..

एका महिलेला साल निघे पर्यत पोलिसांनी मारहाण केली होती त्या संदर्भात श्री.अडवाणी यांनी स्टेटमेन्ट केले होते. त्या संदर्भात को र्टात ॲफिडेव्हीट करण्यात आले होते त्यासंबंधीच फक्त त्यांनी उल्लेख केला होता त्या व्यतिरिक्त ते काहीही बोलले नाहीत. या प्रकरणातील तपासाबद्दल वा ए.टी.एस.बद्दल ते काहीही बोलले नाहीत. तेव्हा सन्माननीय सदस्यानी असत्य माहिती न सांगता खरी माहिती सांगावी. त्या विषयावर पाहिजे तर वेगळी चर्चा घेण्यात यावी परंतु या चर्चेच्या निमित्ताने बाकीचा उल्लेख करण्यास आपण त्यांना परवानगी देता कामा नये अन्यथा ही चर्चा दुसरीकडे जाईल.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना मी सांगू इच्छितो की, मुंबईवर जो दहशतवादी हल्ला झाला होता त्या संदर्भातच आपण बोलावे.

श्री.जितेंद्र आव्हाड :सभापती महोदय, माझी आपल्याला एक विनंती करावयाची आहे जेव्हा ख्वाजा युनूसच्या प्रकरणात श्री. प्रफुल्ल भोसले याना कामावर घेतले पाहिजे ही मागणी मांडत असतांना सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी असे म्हण्ाले होते की, यामुळे डिमॉरलायझेशन ऑफ पोलीस फोर्स झालेले आहे. तेव्हा पोलिसांचे जर डिमॉरलायझ्ोशन झाले असेल तर ते आतंकवाद्याशी लढू शकणार नाहीत असा मुद्दा जेव्हा ते मांडतात तेव्हा त्याला मी सुध्दा पाठिंबा देता. त्याच प्रमाणे हा पाठिंबा देत असतांना ख्वाजा युनूसच्या प्रकरणात जेव्हा डिमॉरलायझेशन झाले होते . श्री. प्रफुल्ल भोसले हे बाहेर गेलेले पोलीस अधिकारी हे एक डिमॉरलायझेशनचे कारण आहे. त्याच प्रमाणे ए.टी.एस. प्रमुखावर जो अतिरेक्यांनी हल्ला केला आहे त्यामुळे त्यांचे सुध्दा डिमॉरलायझेशन झालेले आहे. कै.करकरे ही काही सामान्य व्यक्ती नव्हे तर ते राज्यातील ए.टी.एस.चे प्रमुख होते. हे राज्य अतिरेक्याच्या दृष्टीने सर्वात महत्वाचे राज्य आहे. जेव्हा कै.करकरे यांच्यावर हल्ला होतो तेव्हा तो या ए.टी.एस. या संस्थेवर हल्ला होतो आणि या संस्थेवर जेव्हा हल्ला होतो तेव्हा येथील पोलीस अधिका-यांचे आणि पोलीस दलाचे मनोर्धेर्य खचणार नाही काय ? असा माझा प्रश्न आहे. तेव्हा हा प्रश्न जेव्हा मी मांडतो त्याचे उत्तर मिळाले पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना मी सांगू इच्छितो की, हा मुद्दा मांडत असतांना मूळ विषयापासून बाजूला जाता कामा नये .



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे : माझा हरकतीचा मुद्दा आहे..

श्री.नितीन गडकरी :माननीय सभापतींच्या निर्णयावर आपला हरकतीचा मुद्दा आहे काय ?

श्री.राम पंडागळे : आता आपला खरा चेहरा बाहेर यावयास लागला आहे....

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

**सभापती** :सन्मानीय सदस्य श्री.राम पंडागळे याना मी सांगू इच्छितो की त्यांनी मला उद्देशून बोलावे

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, 26 नवंबर, 2008 को मुंबई में आतंकवादियों ने जो आतंकवादी हमला किया था, उस विषय पर हम यहां अभी स्पेशल डिसकशन कर रहे हैं. मैं यह कहना चाहती हूं कि 26 नवंबर, 2008 को मुंबई में जो आतंकवादी हमला हुआ है और इसके अलावा अन्य जो आतंकवादी हमले हुए हैं वे आज की चर्चा के अन्तर्गत अलग अलग आयटम नहीं हो सकते हैं. दहशतवाद आज ग्लोबल फिनोमिना हो गया है. इसलिए केवल 26 नवंबर, 2008 को हुई घटना पर ही विचार व्यक्त करने के लिए कहा जाएगा तो यह चर्चा सीमित हो जाएगी और अर्थपूर्ण नहीं होगी. दहशतवाद के कारण, परिणाम और इस दहशतवाद को किस तरह से टेकल किया जाए, इन सब चीजों पर चर्चा होनी जरुरी है. इसलिए इस चर्चा को 26 नवंबर की घटना तक ही सीमित न किया जाए. अगर 26 नवंबर की घटना तक ही यह चर्चा सीमित रहेगी तो वह अर्थपूर्ण नहीं हो सकती.

**सभापती** :सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांना मी सागू इच्छितो की, 26 नोव्हेंबर रोजी मुंबईवर जो दहशतवादी हल्ला करण्यात आला होता ती घटना डोळयासमोर ठेवून सन्माननीय सदस्यांनी भाषण करावे. हे भाषण करीत असतांना आपण म्हणता त्याप्रमाणे काही संदर्भ दिले जाऊ शकतात परंतु विषयाला सोडून जर बोलले गेले तर मूळ चर्चेला बगल दिल्यासारखे होईल तेव्हा असे होता कामा नये म्हणून सन्माननीय सदस्यांनी विषयाला सोडून बोलता कामा नये.

डॉ.नीलम गो-हे ( बसून ): ते वेडे आहेत.

श्री.जितेंद्र आव्हाड : मी जर बसून आपल्या बद्दल काही बोललो तर आपण कृपया वाईट वाटून घेऊ नये मी वेडा आहे की शहाणा आहे याबद्दलची अक्कल तुम्ही मला शिकवू नये.

. काही गोष्टी रेकॉर्डवर बोलायलासुध्दा मी घाबरणार नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** :सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांना मी सांगू इच्छितो की, सभागृहामध्ये खाली बसून बोलण्याची पध्दत नाही त्यामुळे कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी खाली बसून बोलता कामा नये तसेच माझ्या परवानगी शिवाय कोणीही बोलू नये.

श्री.जितेंद्र आव्हाड :डिमॉरलायझेशन ऑफ पोलीस फोर्स संबंधी मी बोलत होतो....

( सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे अडथळे आणतात )

श्री.जितेंद्र आव्हाड : सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांना मी सांगू इच्छितो की, आपण माझ्या भाषणात कितीही अडथळा आणण्याचा प्रयत्न केला तरी सुध्दा आपली ही टेकनॉलॉजी चालणार नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी मला उद्देशून बोलावे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आम्ही शांतपणे सन्माननीय श्री.गडकरी साहेबांचे भाषण, त्यांचे विचार ऐकून घेतलेय. त्यांचा अनुभव, त्यांची बुद्धीमत्ता, ज्ञान आम्ही आत्मसाद करण्याचा प्रयत्न केला. शेवटी आम्ही लहान आहोत. तेव्हा आपण आमचे म्हणणे काय आहे ते किमान ऐकून तरी घ्यावे, समजून घ्यावे. आमचे काही चुकले तर आम्हाला तसे सांगा. हरकतीचे मुद्दे उपस्थित करा. पण अशा प्रकारे खाली बसून आम्ही खिशात हात घालून बोलतो आहोत की हसत बोलत आहोत यावर कॉमेंटस् कृपा करून करू नका. आमच्याकडून काही चुकी झाली तर आम्हाला माफ करा. पण अशा प्रकारे आम्हाला डिस्टर्ब करू नका.

सभापती महोदय, तेव्हा सायकॉलॉजिकली डिस्टर्ब झालेला पोलीस दहशतवाद्यांशी लढू शकेल की नाही ? हा मूळ मुद्दा आपल्यापुढे मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या संदर्भात आलेला आहे. खरे तर मुंबईचा पोलीस आणि त्या दिवशी झालेला हल्ला याचाही विचार करण गरजेचे आहे. जगाच्या इतिहासामध्य आजपर्यंत असा हल्ला कधीही कोठेही झालेला नाही. अशा प्रकारचे आतंकवादी कृत्य जगाच्या पाठीवर आजवर कोठेही झालेले नाही. आणि फेल्यूअर ऑफ इंटेलिजन्स इज अ ह्यूमन एरर ... आपण समस्त पोलिसांना आरोपीच्या पिंजऱ्यामध्ये उभे करून परत एकदा डिमॉरलाईज्ड करणे हे मला वाटते चुकीचे ठरेल. इंटेलिजन्सच्या दृष्टीने पाहिले तर सर्वात मोठ्या आणि चांगल्या मानल्या गेलेल्या अमेरिकेसारख्या देशामध्य देखील 9 सप्टेंबरची घटना घडू शकते. अगदी विमान उडवून इमारतीच्या इमारती उद्‌ध्वस्त होऊ शकतात. तेव्हा आपण ज्याला इंग्रजीत "To err is human" म्हणतो तेच खरे आहे. जर सगळेच मला समजले तर मी परमेश्वराच्या बाजूला नाही का जाऊन बसणार ? त्यामुळे काही अधिकाऱ्यांच्या चुका असतील, काही माहिती आपल्याकडे आलीही असेल. आता यातील एक महिती पत्राद्वारे आपल्याकडे आली आहे असे सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी येथे सांगितले. ती माहिती आयबीच्या अधिकाऱ्यांची आहे. ताज हॉटेलवर हल्ला होणार आहे असे पत्र आयबीच्या अधिकाऱ्यांनी आपल्या राज्याच्या पोलीस अधिकाऱ्यांना दिले असेल आणि त्यातून हा जो काही 'ब्लेम गेम' सुरू झालेला आहे तो काठे तरी थांबायला हवा. 19 तारखेला ट्रायडंटमध्ये इकॉनॉमिक एक्स्प्रेसमध्ये किंवा टाईम्स वा इंडियन एक्स्प्रेसच्या कोठल्या तरी एका कार्यक्रमाला स्वत: माननीय पंतप्रधान येणार होते. त्यासंबंधातील एक अतिगोपनीय बैठक मुंबई विमानतळावर दुपारी 2.00 वाजता आयबीचे अधिकारी

.... यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आव्हाड ....

आणि महाराष्ट्रातील काही मोठ्या पोलीस अधिकाऱ्यांची सेक्युरिटीच्या संदर्भात झाली. ही गोष्ट खरी आहे की असत्य आहे हे मला माहिती नाही. पण मला मिळालेली माहिती अशी आहे की, त्यात आयबीने हा प्रोग्राम क्लिअर केलेला होता. आयबीच्या क्लिअरन्सशिवाय माननीय पंतप्रधानांचा कोठलाही दौरा कोठल्याही भारतातील प्रदेशात होत नाही हे इतके स्पष्ट असतानाही हे पत्र आले कोठून आणि ते कोणी पाठविले, त्याच्या मागील कारणे काय आहेत ? हे देखील शोधण्याची गरज आहे. सभापती महोदय, हा ब्लेम गेमचा पार्ट थांबला पाहिजे. म्हणून कालच केंद्रीय मंत्रिमंडळाने ठराव संमत केलेला आहे की, आतंकवादाच्या चौकशीसाठी, आतंकवादाच्या एकंदरीतच कार्यकक्षा वाढत असताना, एक सेंट्रल एजन्सी असली पाहिजे. ती मागणी आज या सभागृहामध्ये आपण एकमताने ठराव पारित करून, विधीमंडळाने पारित करून, आपल्या कॅबिनेटने केंद्राकडे तसे प्रेशर डेव्हलप करून ती एजन्सी संमत करून घेतली पाहिजे. यामध्ये नुकसान देशाच्या एकंदर विश्वासार्हतेचे होत आहे. क्रेडिबिलिटीचा प्रश्न जेव्हा उभा राहतो तेव्हा सर्वसामान्यांचा विश्वास उडू लागतो. कोणावर विश्वास ठेवायचा ? केंद्राकडून एक पत्र आल्याचे वृत्तपत्राच्या माध्यमातून वाचायचे, दुसरीकडे पंतप्रधानांच्या दौऱ्यासाठी त्याच केंद्राचे अधिकारी राज्यामध्ये आलेली बातमीही वाचायची. तिसरीकडे पोलिसांनी दिलेल्या परवानग्या वाचायच्या आणि चौथीकडे हल्ल्याबाबत दिलली माहिती देखील वाचायची. म्हणजे मग यामध्ये जबाबदारी कोणी कोणावर फिक्स करायची?

पण मला माननीय श्री.चिदंबरम् साहेबांचे म्हणणे आज पटते आहे. ते म्हणजे इट वॉज अल्टिमेट फेल्यूअर ऑफ इंटेलिजन्स. अशा टेररिझमशी मुकाबला करण्याची जी एक सायकॉलॉजिकल तयारी पोलिसांची असायला लागते ती आपल्या पोलिसांची नाही, तशी तयारी आपण केली नव्हती. किंबहुना तशी परिस्थिती भारतात कधी उद्‌भवेल असे वाटलेच नव्हते. त्यामुळे जेव्हा ही परिस्थिती उद्‌भवली त्याला एक प्रकारची मानसिकता जबाबदार आहे. अखंड पोलीस दलाला यासाठी आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे किंवा आपल्या सगळ्या पॉलिसीजच चुकल्या असे म्हणणेही चुकीचे ठरेल असे मला वाटते. कारण आपल्यासमोर आपल्याच देशाच्या पार्लमेंटवर झालेला दहशतवादी हल्ला देखील आहे. पार्लमेंटच्या आतमध्ये जाऊन संपूर्ण पार्लमेंट उद्‌ध्वस्त करण्याची क्षमता आणि ताकद असणारे अतिरेकी तेथे घुसले होते. पण इट वॉज अ फेल्यूअर ऑफ पॉलिसीज आणि इट वॉज फेल्यूअर ऑफ इंटेलिजन्स असेच मानले पाहिजे आणि हे सगळे प्रकार भारताला नवीन

..... यू 3 ...

श्री. आव्हाड ....

नाहीत. भारताने बघितले आहेत. आपण म्हणतो ते शंभर टक्के खरे आहे की, एका देशाची वाढणारी शक्ती रोखण्याचे काम जव्हा बाजूचे राष्ट्र करते तेव्हाच तो प्रॉक्सिवॉर सुरू करतो. ...

( यानंतर श्री. सरफरे .... व्ही 1 ...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड....

मला पहिल्यांदा इथे असे दिसते की, आपले राजकीय मतभेद बाजूला ठेवून, राजकीय विचारसरणी बाजूला ठेवून या देशातील लेफ्ट असोत किंवा या देशातील सेंट्रल टू द लेफ्ट असोत, किंवा राईट असोत हे सर्व म्हणत आहेत की, दहशतवादाशी मुकाबला केला पाहिजे. कालपर्यंत जो शब्द कायम वापरला जायचा, आणि ज्याला आम्ही कायम विरोध करावयाचो, तो इस्लामी दहशतवाद हा हळू हळू लोकांच्या मनातून जात आहे. ही एक वाईटामधील चांगली घटना आहे. या देशातील मुसलमान असो, या देशातील हिंदू असो, या देशातील शिख असो, किंवा या देशातील ईसाई असो. ओरिसात आपल्या ननवर झालेल्या बलात्काराबद्दल त्याला तेवढेच दु:ख झाले पाहिजे जेवढे त्याच्या बहिणीवर बलात्कार झाल्यावर होईल. कारण या मातीने तुम्हाला ऋणानुबंध शिकविले, प्रेम शिकविले, वेदना शिकविल्या आणि संवेदना शिकविल्या. ही माती तुम्हाला एकतेची आठवण करुन देत असते. म्हणून महाराष्ट्राला शिवरायांची आठवण कायम होत असते. त्यांनी कायम संस्कारक्षम महाराष्ट्र घडविण्यासाठी "शेतातून जाल तर शेत उद्ध्वस्त करु नका, गावातून जाल तर मशिदीला स्पर्श करु नका" असे सांगत सैन्य वाढविले आणि मोठे केले. आणि म्हणून जे जे शिलेदार घडले त्यांनी ती ती प्रणाली आत्मसात केली. म्हणूनच शिवाजी राजांच्या राज्याची संकल्पना आणि विचार आजही महाराष्ट्रापुढे आदर्श म्हणून स्वीकारले जातात. सभापती महोदय, या सभागृहामध्ये इशरत जहॉला दिलेल्या चेकचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. तो चेक देण्यासाठी मी देखील गेलो होतो. त्यावेळी इशरत जहॉ ही कोर्टामध्ये आरोपी नव्हती किंवा कोणत्याही कोर्टाने तिला अतिरेकी म्हणून जाहीर केले नव्हते. आपण याठिकाणी विषय काढला म्हणून सांगतो की, प्रज्ञा ठाकूर ही देखील आरोपी आहे. आरोपीला मदत करणे हा जर गुन्हा असेल तर गुन्हेगार म्हणून तुमची सर्वांची नोंद करावयाची काय?

(अडथळा)

आपण आमच्यावर इशरत जहॉबाबत आरोप केलाच ना? इशरत जहॉच्या प्रकरणात मी स्वत: असल्यामुळे त्याबाबत बोलणे माझे काम आहे. नाही तर आपण आपले शब्द मागे घेऊन टाका म्हणजे प्रश्न मिटला. या देशातील प्रत्येक नागरिक जोपर्यंत कोर्टात आरोपी म्हणून सिध्द होत नाही तोपर्यंत तो गुन्हेगार नाही असे आपण म्हणू लागला आहात. त्याची मला आपल्याला आठवण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. जितेंद्र आव्हाड....

करुन द्यावयाची आहे. काय बोलायचे, कसे बोलायचे हे तुमच्याकडून शिकण्यासाठी मी याठिकाणी आलो नाही. ज्या कक्षेमध्ये आपण बोलायला पाहिजे त्या कक्षेमध्ये आपण बोलला नाहीत म्हणून आम्हाला स्पष्टीकरण द्यावे लागत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी मूळ विषयाला धरुन बोलावे.

श्री. जितेंद्र आव्हाड : आपण येथील सिक्युरिटीबाबत बोलला. काही काही गोष्टींची आठवण याठिकाणी करुन द्यावी लागते. दिल्लीच्या विमानतळावर नरेंद्र महाराजांना राजदंड सोबत आणण्यासाठी मनाई करण्यात आली. त्यावेळी मुंबईच्या विमानतळावर दंगल झाली. तेव्हा राजदंड आणणे किंवा न आणणे याबाबत आपले मतभेद असू शकतात. पण त्यावेळी कोण कोण बोलले याची त्या दिवशीची कात्रणे आपण तपासून बघावीत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपण विषयाशी संबंधित मुद्यावरच बोलावे.

श्री. जितेंद्र आव्हाड : जेव्हा सिक्युरिटीचा प्रश्न उपस्थित होतो त्यावेळी सिक्युरिटीच्या प्रश्नावर आपले एकमत असले पाहिजे. आपल्या विचारांच्या लढाईबाबत आपले एकमत असले पाहिजे. आपण जेव्हा विचारांशी लढतो त्यावेळी आपले एकमत असले पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जितेद्र आव्हाड यांना मी पुन्हा विनंती करतो की, मुंबईवर झालेल्या दहशतवाद्यांच्या हल्ल्याबाबत आपण बोलावे. राजदंड किंवा अन्य मुद्दे आपण उपस्थित करु नयेत.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, म्हणून मी सुरुवातीलाच बोलतांना सांगितले की, चर्चेची एक कक्षा ठरवून घेण्यात यावी. कक्षेच्या बाहेर कुणीही जाता कामा नये. कक्षेच्या बाहेर गेल्यानंतर त्याबाबतची काही उदाहरणे आम्हाला देणे राजकीय दृष्टया आणि वैचारिक दृष्टया महत्वाचे ठरते.....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मुंबईवर झालेल्या आतंकवाद्यांच्या हल्ल्याबाबत सभागृहामध्ये चर्चा व्हावी अशी आम्ही आणि सरकारी पक्षाने माननीय मुख्यमंत्र्यांकडे विनंती केली. ही चर्चा कशाप्रकारे व्हावी याबाबत ज्याचा त्याचा मुद्दे मांडण्याचा प्रश्न आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी इसरत बद्दल सांगितले म्हणून सन्माननीय सदस्य इसरत बाबत बोलत आहेत. त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. परंतु नरेंद्र महाराज हे काही कोणी आतंकवादी किंवा देशद्रोही नाहीत. ते एक धर्मगुरु आहेत. त्यांच्या राजदंडाची चर्चा या ठिकाणी करणे हे इतके अनैतिक आणि अव्यवहार्य आहे की, नरेंद्र महाराजांबद्दल बोलून ते हिंदू-मुस्लीम असा विषय निर्माण करणार असतील आणि समोरच्यांना आव्हान करणार असतील तर आज आम्ही बोलणार नाहीच. आम्हाला ते बोलण्याकरिता भरपूर संधी आहेत. मी मघाशी जशी विनंती केली आणि नम्रतेने म्हणालो की, या आतंकवादी हल्ल्यामध्ये जे शहीद झाले आहेत त्यांचा सन्मान आजच्या चर्चेत व्हावा, ही भावना आहे आणि ती राखली जावी. नरेंद्र महाराज यांचा विषय या ठिकाणी आणण्याची गरज नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांना सांगू इच्छितो की, आपण मुंबईमध्ये झालेल्या स्फोटाबद्दल बोलावयाचे असेल तर तेवढेच बोलावे. अन्यथा आपल्याला काही बोलावयाचे नसेल तर आपण खाली बसावे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांना हात वर करावयास सांगतात तेव्हा त्यांना राग येतो. म्हणून त्याबद्दल स्पष्टीकरण करत होतो. असा कोणाला राग वगैरे येत नाही. कधी कधी असे घडते. त्याबद्दल आपण न बोललेले बरे असते. ते घडत राहते. सभापती महोदय, कसाब याची जी बॅग दिसते त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी जे सांगितले त्याला दुजोरा द्यावयाचा आहे. त्या बॅगमध्ये किती ॲम्युनेशन राहू शकते हा महत्वाचा प्रश्न आहे. सर्वसाधारण असा समज आहे की, 10 अतिरेकी आले. त्या रात्री किंवा सकाळी 10 अतिरेकी कोठून तरी उतरले आणि ते 10 अतिरेकी मुंबईमध्ये येऊन त्यांनी मुंबईचा ताबा घेतला. ते ट्रायडंटमध्ये गेले. त्यांनी ट्रायडंट आणि ओबेरॉय या दोन्हीचा ताबा घेतला. त्यांनी ताजचा ताबा घेतला. त्यांनी नरीमन हाऊसचा ताबा घेतला. कसाबची जी बॅग दिसते त्या बॅगचा जर विचार केला तर त्यामध्ये किती ॲम्युनेशन मावू शकते, किती वजनाचे ॲम्युनेशन मावू शकते याबद्दल माझ्या मनात शंका आहे. ताजमध्ये जेव्हा 59 तास ही माणसे गोळीबार करतात, चण्याकुरमुऱ्यासारखे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड .....

ग्रेनेड्स ओबेरॉय ट्रायडंटमधून फेकली जातात तेव्हा त्या ग्रेनेड्सचे वजन आणि त्या बॅगमध्ये किती वजन मावू शकते याबद्दल प्रश्नचिन्ह उभे राहणे संयुक्तिक आहे. मला वाटते की, ज्याप्रमाणे जागतिक पातळीवर अतिरेक्यांशी मुकाबला करताना सर्वसामान्यांच्या मनातील संभ्रम दूर करण्यासाठी कायम उघडपणाने माहिती बाहेर दिली जाते तशी माहिती बाहेर येणे गरजेचे आहे. एक बॅग घेऊन आलेला अतिरेकी, त्या दिवशी ट्रायडंटमध्ये दोन अतिरेकी किंवा ताजमध्ये दोन अतिरेकी घुसले असतील तर 59 तास ती लढाई करु शकतील की नाही याबद्दल माझ्या मनात 100 टक्के शंका आहे. ते कुबेरमधून उतरले आणि दोन डिंगीमध्ये बसले. त्या दोन डिंगी घेऊन ते मुंबईच्या समुद्र किनाऱ्यावर आले. मुंबईच्या समुद्र किनाऱ्याचा विचार केला तर मुंबईचा समुद्र किनारा एक तर खडकाळ आहे आणि त्या खडकामध्ये गाळ साचलेला आहे. मुंबईच्या ज्या किनारपट्टीवर ते उतरले असा आमचा समज आहे तो म्हणजे कफ परेड ते कुलाब्याच्या पट्टयामध्ये ते उतरले. ते जेथे कोठे उतरले असतील त्या ठिकाणी चिखल असणारच. कोठलीही डिंगी ही किनाऱ्यापर्यंत येऊन त्या डिंगीतून उडी मारुन ते रस्त्यावर आले असतील त्याबद्दल आपल्या मनामध्ये शंका येते. कारण जर ते डिंगीतून उतरले असतील त्यांनी चिखलात पाय ठेवले असतील. त्या चिखलात पाय ठेवल्यानंतर त्यांच्या पॅंटला किंवा चपलांना चिखल लागला असेल आणि चिखलातून चालताना माणसाला चालता येत नाही. त्याला जड पावलांनी चालावे लागते आणि ते अंतर जास्त असते. हे सगळे प्रश्नचिन्ह उभे राहिल्यामुळे मनामध्ये प्रश्न उभा राहतो की, हे सगळे कसे झाले आणि का झाले आणि याच्या मागचा मूळ हेतू काय होता ? याच्यातील एक मूळ हेतू स्पष्ट आहे. ज्यांना कोणाला महाराष्ट्र डिस्टर्ब करावयाचा आहे, महाराष्ट्राला वेदना द्यावयाच्या आहेत, महाराष्ट्राला विव्हळताना बघावयाचे आहे ते नेहमी महाराष्ट्राला डिस्टर्ब करण्याचा प्रयत्न करतात. या देशाला हादरा द्यावयाचा असेल तर मुंबईची आर्थिक सत्ता डिस्टर्ब करा, मुंबईतील आर्थिक कणा मोडून काढा, मुंबईतील माणसांना डिस्टर्ब करा, संपूर्ण भारत डिस्टर्ब होईल. या जागाच्या व्यवहारातील मुंबई हे महत्वाचे शहर आहे. म्हणून ज्या देशाला या देशाविरुध्द लढाई लढावयाची आहे, ज्या देशाला हा देश अस्थिर करावयाचा आहे त्या देशाचा हा प्लॅन आहे की, या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. जितेंद्र आव्हाड ......

देशाची जर तुम्हाला मानसिकता गोंधळून टाकावयाची असेल, इथे जर विघटनाचा विचार मजबूत करावयाचा असेल तर मुंबई हे प्रमुख केंद्र बनवा. म्हणून मला असे वाटते की, या ठिकाणी आपण ही चर्चा करीत असताना पोलिसांचे मनोधैर्य उंचावण्यासाठी प्रयत्न करणे जसे गरजेचे आहे तसे पोलिस दलाच्या आधुनिकीकरणाकडे लक्ष देणेही तेवढेच गरजेचे आहे. या आधुनिकीकरणाचा विचार करीत असताना एनएसजी सारखा फोर्स मुंबईमध्ये असणे, महाराष्ट्रामध्ये असणे ही काळाची गरज आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/ KGS/ MMP/ श्री.बरवडनंतर 12:55

श्री.जितेंद्र आव्हाड....

कारण यानंतरच्या काळामध्ये या देशातील दिल्ली आणि मुंबई ही दोन शहरे आंतरराष्ट्रीय दृष्टीने महत्वाची असल्याने याच दोन शहरांना पुन्हा लक्ष्य करण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे घडू नये अशी आई भवानीच्या चरणी कायम प्रार्थना करु. पण देवाकडे प्रार्थना करीत असताना असे प्रकार पुन्हा घडत असतील तर त्याचा मुकाबला करण्यासाठी सर्व शक्तीमान महाराष्ट्र उभा राहिला पाहिजे, त्यासाठी सामाजिक प्रयत्न झाले पाहिजेत, राजकीय विचारप्रणाली बाजूला ठेवून एकमताने करण्याची आवश्यकता आहे हे या चर्चेतून बाहेर पडले पाहिजे. म्हणून या चर्चेत सहभागी होण्यासाठी उभा राहिलो आहे. खरे तर प्रत्येक पोलिसाला अमूक दिवसानंतर फायरिंगचे प्रशिक्षण देण्याची गरज आहे. आपले श्री.शशांक शिंदे यांच्याकडे रिव्हॉल्व्हर होते पण तेच अडकून पडले. पण रेल्वेचे हवालदार श्री.बबलू यादव यांचे शौर्य किती ? एका हवालदाराकडून 303 बनावटीचे रायफल ओढून ताब्यात घेऊन त्यातून गोळी मारण्यासाठी ते पुढे आले. श्री.ओंबाळे नावाचे पोलीस कर्मचारी होते त्यांनी कसाबला पकडले. त्यांनी तर गोळया झाडणा-या कसाबला मिठी मारुन त्याची बंदूक धरुन ठेवली. म्हणजे ही शौर्याची परंपरा आपल्याकडे आहे आणि असे भेकड हल्ले करुन आपल्या देशाचे चिंधडे उडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे आपले शौर्य, आधुनिकीकरण, त्यांचे मनोधैर्य याची एकवाक्यता झाली तर या देशावर नजर टाकण्याची कोणत्याही देशाची हिंमत होणार नाही. एवढी क्षमता आणि ताकद या मातीत आहे. म्हणून सर्व राजकीय विचारप्रणाली बाजूला ठेवू या. ठीक आहे, चुका आमच्याकडूनही होतात, त्यांच्याकडूनही होतात, धोरणांमध्ये चुका होतात, कधी फायनांसमध्ये चुका झाल्या असतील, काही फाईल्स थांबविल्या गेल्या असतील, पण आजच्या घडीला महाराष्ट्र एका संकटातून जात आहे, एका स्थित्यंतरातून जात आहे, एका संक्रमण काळातून जात आहे, त्यावेळेस मात्र आपल्या विचारांमध्ये एकवाक्यता ठेवून आपला क्रमांक 1 चा शत्रू कोण आहे, आपली लढाई कोणाशी आहे, हे निश्चित करण्याची आवश्यकता आहे. महाभारतामध्ये अर्जुनाला विचारण्यात आले की, तुला पाण्यामध्ये काय दिसत आहे, तुला काय साधावयाचे आहे, त्याप्रमाणे आपल्याला साधावे लागेल. जसे मा.श्री.अडवाणी यांनी सांगितले आहे की, आपल्याला आतंकवादाशी मुकाबला करावयाचा आहे,

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/ KGS/ MMP/

श्री.जितेंद्र आव्हाड......

आतंकवाद्यांना धर्म नसतो, पंथ, प्रांत नसतो, जात नसते. आतंकवाद हाच महाराष्ट्राचा व देशाचा क्रमांक 1 चा शत्रू आहे. त्या शत्रूचा निप्पात करण्यासाठी आपण सगळे एक होऊ या. भारतीयांच्या मनातील वेदना जाणू या आणि त्या वेदनांचे उत्तर राजकीय माध्यमातून न देता एकत्रितपणे या देशाची अखंडता राखण्यासाठी ज्यांनी ज्यांनी कसब पणाला लावले, आपले बलिदान दिले त्यांच्या आत्म्याला चिरशांती मिळावी, त्यांची शपथ घेऊन या महाराष्ट्राचे व देशाचे रक्षण करण्यासाठी आपण सर्वजण एकत्र येऊ या एवढेच मी याठिकाणी विचार मांडतो. या देशासाठी, या महाराष्ट्रासाठी ज्यांनी आपले बलिदान दिले त्यांच्या आत्म्याला चिरशांती लाभो, त्यांच्या कुटुंबियांना आधार मिळो एवढीच ईश्वर चरणी प्रार्थना करुन मी माझे विचार येथेच थांबवितो. धन्यवाद.

--------

3......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/ KGS/ MMP/

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे दुर्दैवाने मुंबईवर अतिरेकी हल्ला झाला त्याची पुन्हा एकदा हिवाळी अधिवेशनामध्ये चर्चा करीत आहोत. कारण आपल्या देशाच्या संसदेवर हल्ला करण्यात आला त्यावेळीही हिवाळी अधिवेशन सुरु होते. मुंबईवर काही दिवसांपूर्वी अतिरेक्यांकडून झालेला हल्ला हा महाराष्ट्राच्या नाही तर संपूर्ण जगाच्या इतिहासामध्ये अतिशय मोठा हल्ला आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होऊ नये. साधारणपणे 60 तास पाकच्या 10 आतंकवाद्यांनी संपूर्ण देशाला झुंजवत ठेवले. दिल्लीपासून ते मुंबईपर्यंतचा संपूर्ण पोलीस फोर्स यासाठी लढला. मात्र पाकचे केवळ 10 आतंकवादी संपूर्ण देशाला 60 तास झुंजवत ठेवतात. याचा विचार झाला पाहिजे. तसे पाहिले तर 1993 पासून या मुंबईवर आतंकवादी हल्ले होत आहेत. हा जो हल्ला झाला तो हिंदुस्थानच्या अस्मितेवर आणि मुंबईच्या आत्मविश्वासावर झालेला हल्ला होता.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KGS/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 13:00

(डॉ. दीपक सावंत..

वास्तविक हा सुनियोजित आणि सुनियंत्रित असा हल्ला होता. या हल्ल्याच्या तारखा आधी वेगळया ठरलेल्या होत्या. सप्टेंबर महिन्यामध्ये हा हल्ला होणार होता, ही तारीख काही कारणांमुळे पुढे गेली असे कसाबने दिलेल्या जबानीतून पुढे आलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, ताज हॉटेल, ओबेरॉय हॉटेल येथील बेछूट गोळीबार असो किंवा विलेपार्ले किंवा डॉकयार्ड रोड येथे टॅक्सीमध्ये झालेले बॉम्बस्फोट असो, ह्या सर्व घटना सुनियोजित आणि सुनियंत्रित होत्या. माझ्या आधीच्या सन्माननीय सदस्यांनी ताज हॉटेल आणि ओबेरॉय हॉटेलवर झालेल्या हल्ल्याच्या बाबतीत सांगितले. विलेपार्ले आणि डॉकयार्ड येथे टॅक्सीमध्ये झालेल्या स्फोटांचा मला याठिकाणी उल्लेख करावयाचा आहे. या दोन्ही ठिकाणी झालेल्या टॅक्सीतील बॉम्बस्फोटाचा कोणताही छडा अद्याप पोलिसांना लागलेला नाही. मध्यंतरीच्या काळामध्ये ट्राफिक आयुक्तांनी टॅक्सी युनियनच्या पदाधिका-यांना बोलावून घेतले आणि सांगितले की, मुंबईतील टॅक्सीमध्ये ज्या ज्या वेळी प्रवासी बसतील त्या त्या वेळी त्यांच्याकडील सामानाची नोंद घ्यावी. एवढेच नाही तर या दहशतवाद्यांनी 5 टॅक्सी धेतल्या होत्या. त्यामधील दोन टॅक्सीमध्ये स्फोट झाले. अजून तीन टॅक्सी मुंबईमध्ये फिरत आहेत अशा प्रकारचे वक्तव्य टॅक्सी युनियनच्या प्रमुख पदाधिका-यांनी केलेले आहे. मुंबई शहरामध्ये लोक टॅक्सी आणि रिक्षामधून फिरत असतात या पार्श्वभूमीवर या तीन टॅक्सीच्या संदर्भात आणि विलेपार्ले व डॉकयार्ड येथे टॅक्सीमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाच्या संदर्भात कोणताही उलगडा पोलिसांना झालेला नाही. विलेपार्ले येथील टॅक्सीमध्ये जो स्फोट झाला त्यावरुन अतिरेक्यांचा एअरपोर्ट उडविण्याचा डाव होता काय किंवा डॉकयार्ड येथील झालेल्या स्फोटामुळे डॉक उडविण्याचा कट होता काय याचा उलगडा झालेला नाही. छत्रपती शिवाजी टर्मिनस येथे अंधाधुंद गोळीबार करुन हजारो निरपराध लोक मारले गेले. जेथे जास्तीत जास्त लोक सापडतील अशा ठिकाणी फायरिंग करण्याचा दहशतवाद्यांचा इरादा होता. छत्रपती शिवाजी टर्मिनस येथे त्यांनी बर्स्ट फायरिंग केले. काही क्षणात शेकडो लोक मारले जात होते. या चर्चेच्या निमित्ताने मला हे सांगावयाचे आहे की, ताज हॉटेलमध्ये जेव्हा हल्ला झाला त्यावेळी तेथे इस्त्रायली लोकांचे कन्व्हेन्शन होते अशी माहिती पुढे आलेली आहे. ही माहिती तपासून पहावी.दहशतवाद्यांनी नरीमन

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत ..)

हाऊस का निवडले ? तर इस्त्रायली लोकांचे ते सेंटर होते. अतिरेक्यांना धर्म नसतो असे आपण म्हणतो. परंतु ज्यू लोकांच्या, ओशोच्या आर्त किंकाळया फुटल्या. त्या ठिकाणी अडकलेल्या लोकांना आपण बाहेर काढू शकू असे वाटत होते. परंतु दुर्दैवाने विदारक सत्य पुढे आले. या दहशतवाद्यांचा इरादा मुबईच्या नागरिकांना वेठीस धरण्याचा होता की ज्यू लोकांवर हल्ला करण्याचा होता ? नरीमन हाऊसवर हल्ला करण्याचे दहशतवाद्यांनी का ठरविले याचा उलगडा होणे आवश्यक आहे. सर्वसामान्य माणसाच्या मनातील प्रश्न मी या ठिकाणी मांडत आहे. हा हल्ला झाला त्यावेळी वेळ काय होती ? एका जबाबदार वृत्तपत्रामध्ये असे छापून आलेले आहे की, अमेरिकेतील लोकांना हा हल्ला दिसावा, त्यांना त्याची जाणीव व्हावी म्हणून रात्रीच्या वेळी हा हल्ला करण्यात आला. तेव्हा या वृत्ताची देखील नोंद घेण्याची आवश्यकता आहे. लिओपार्ड कॅफे हल्ल्यासाठी का निवडण्यात आले ? तर इस्त्रायली लोक लिओपार्ड कॅफेमध्ये जाऊन जेवणाचा आस्वाद घेतात म्हणून ते निवडण्यात आले.

.. नंतर श्री. गिते..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, म्हणून गोळीबार करण्यास सुरुवात तेथून केली. आपल्याकडील सर्व तेज दूरदर्शन वाहिन्या "दो गुटो में दंगल" असे प्रक्षेपण दाखवित होत्या. "अंधाधूंद फायरिंग हो रही हैं " अशा प्रकारचे वृत्त दूरदर्शन वाहिन्यांवरुन दिले जात होते. ही सर्व घटना दूरदर्शन वाहिन्यांवरुन दाखविण्यात येत होती. मध्येच दूरदर्शनच्या वाहिन्यांमधून लायनिंगमध्ये दाखविण्यात येत होते की, आर.बी.आय. येथे फायरिंग झाली. विलेपार्ले येथे बॉम्बस्फोट झाला यासंबंधीचे प्रक्षेपण दाखविण्यात येत होते. ते प्रक्षेपण बघून मुंबईतील सामान्य माणूस कनफ्यूज झाला होता की, मुंबई शहरात नेमके काय झाले आहे? त्यानंतर रात्री 9.15 पासून ते दुस-या दिवसापर्यंतचा घटनाक्रम दाखविण्यात आला तो अतिशय धक्का देणारा होता. बहादूर पोलीस अधिका-यांनी फायरिंगला जबाब दिला, त्यामध्ये श्री. नांगरे पाटील यांचे नाव घेणे आवश्यक आहे. जो पर्यंत एनएसजीचे कमांडो ताज हॉटेलपर्यंत येऊ शकले नव्हते, तो पर्यंत श्री.नांगरे पाटील व त्यांच्या सहका-यांनी सदर अतिरेक्यांना सहा तास झुंजविले. ज्याप्रमाणे श्री.करकरे, श्री.कामटे, श्री.विजय साळसकर हे अधिकारी महत्वाचे होते, या महत्वाच्या अधिका-यांना श्री. नांगरे पाटील यांनी फायरिंगच्या संदर्भात प्रोटेक्शन दिले. श्री. नांगरे पाटील यांचा देखील शौर्य विरांमध्ये उल्लेख होणे आवश्यक आहे. केवळ पिस्तुलच्या आणि लाठया,काठयांच्या जोरावर व कमांडो येईपर्यत सहा तास अतिरेक्यांशी किल्ला लढविला ही गोष्ट खरोखरच त्यांचे धैर्य अतुलनीय आहे. पोलिसांच्या मनोबलावर आपण टीका करतो, या हल्ल्यात एक उत्तम रॉ चे इंटेलिजंट ऑफिसर, एटीएसचे प्रमुख हेमंत करकरे शहीद झाले. या उत्तम अधिका-यास कुठे तरी गुंतवून ठेवले असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. पोलीस अधिका-याचे, इंटेलिजेंट अधिका-यांचे, राज्यातील जनतेचे लक्ष दुस-या दिशेने करावयाचे असा सुध्दा ही घटना घडविण्यामागचा मनसुभा असेल. प्रकरणे काहीही असतील, परंतु त्याचवेळी ही सगळी प्रकरणे बाहेर का यावीत आणि या प्रकरणाकडे संपूर्ण देशाचे लक्ष तसेच हेमंत करकरे यांच्याकडे लक्ष केंद्रीत का व्हावे हा एक विवादाचा मुद्दा होऊ शकतो. त्यामुळे आपण सर्वांनी पक्षभेद बाजूला सारुन असा विचार केला पाहिजे की, या घटनेमागचे कट कारस्थान काय आहे ? आपण एकमेकांवर आरोप करतो, नंतर आपण सोबत बाहेर जाऊन चहा घेतो. ही घटना घडण्यामागची नेमकी पार्श्वभूमी काय आहे याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. या हल्ल्यात आपल्याला हेमंत करकरे सारखा एक उमदा अधिकारी गमवावा लागला. विजय साळसकर,एन्काऊंटर स्पेशालिस्ट अधिकारी आपल्याला गमवावा लागला. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, विजय साळसकर यांच्याकडे फक्त पिस्तुल होते. ते

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

16-12-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Z-2

ABG/ MMP/ KGS/ प्रथम श्री. शिगम 13:05

डॉ.दीपक सावंत...

एन्काऊंटर स्पेशालिस्ट होते त्यावेळी त्यांच्याकडे स्टेनगन होती अशी माझी माहिती आहे. मी या ठिक्राणी अतिशय जबाबदारीने बोलतो आहे. ती स्टेनगन त्यांच्याकडून का काढून घेण्यात आली याबाबतची शासनाने माहिती घेऊन ती माहिती सभागृहाला सांगणे आवश्यक आहे. हेमंत करकरे आणि विजय साळसकर यांच्या गाडीत श्री.जाधव हे उपस्थित होते. श्री.जाधव यांनी सकाळ या वृत्तपत्रास मुलाखत दिली आहे, ती मुलाखत आपण सर्वांनी वाचली असेल. त्या गाडीत श्री.जाधव नसते तर अतिरेक्यांनी पळविलेली स्कोडा गाडी कोणालाही पकडता आली नसती असे माझे विधान आहे. या हल्ल्यामध्ये श्री.जाधव यांचे दोन्ही हात जायबंदी झाले नसते तर त्यांनी त्या अतिरेक्यांना तेथेच उडविले असते. आपल्या सर्वांच्या मनात शंका आहे की, ताज हॉटेलमध्ये 80 किलो आर.डी.एक्स कसे आले ? ताज हॉटेलमधील काही डिपार्टमेंटमध्ये आपली माणसे पाखरुन ठेवली होती...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 13:10

डॉ.दीपक सावंत.........

आणि ताजमध्ये हाऊस किपिंग विभागामध्ये यांची काही माणसे मागील काही दिवसांपासून काम करीत होती, हे मी जबाबदारीने सांगू इच्छितो. कृपया आपण हे तपासून घ्यावे. ताज हॉटेलचा नकाशा सामान्य माणसाला, नेहमी तेथे जाणाऱ्या माणसाला दाखविला तरी ताज हॉटेलच्या मेन बिल्डिंगमधून ॲनेक्स बिल्डिंगमध्ये ॲक्सेस कोणत्या बाजूने आहे हे कळणार नाही. इतक्या बिनदिक्कतपणे हे अतिरेकी ताज हॉटेलमध्ये वावरत होते, याबाबत तपासून बघणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, श्रीमती राईस मॅडम भारतात आल्या. त्यांनी पाकिस्तानला दम दिला. कारगिल युध्दामध्ये पाकिस्तानची खुमखुमी काही प्रमाणात आपण मिटविली. परंतु पुन्हा खुमखुमी मिटविली पाहिजे असे माझे मत आहे. राजकीय पडसाद जरुर उमटतील परंतु कधीतरी उत्तर देणार आहोत की नाही? अमेरिकेच्या खांद्यावर बंदूक ठेवून किती दिवस चालणार? भारत महासत्तेकडे वाटचाल करीत आहे. महासत्तेकडे जाताना तुम्हाला अशा प्रकारचा हल्ला पचविता येऊ लागला तरच महासत्तेकडे जाऊ शकाल आणि 10 लोक जर आपल्याला 60 तास झुंझवत ठेवतात ही घटना म्हणजे भारताच्या लष्कराच्या अपमान आहे. 13 मार्च, 2003 पासून आजपर्यंतच्या पाच वर्षाच्या काळात 19 दहशतवादी हल्ले झाले. त्याबाबत पाकिस्तानकडून स्पष्टीकरण मागावे लागते. तो देश म्हणतो हे अतिरेकी आमचे नाहीत. आज कसाब सापडला नसता तर हे अतिरेकी लष्कर-ए-तोयबा या संधटनेचे आहेत याबाबत काय पुरावा आहे? आज कसाबचे जे उदात्तीकरण चालले आहे ते ताबडतोब थांबले पाहिजे. त्याला बिर्याणी हवी आहे. त्याला अमिताभचे चित्रपट आवडतात, अमिताभ त्याचा आयडॉल आहे अशा प्रकारची वर्णने छापून येत आहेत. त्याने सांगितले की, मी माझ्या आईकडून जेहादसाठी परवानगी घेऊन आलो आहे. त्याने हे शब्द वापरले म्हणून कदाचित सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या भाषणात जेहादचा उल्लेख आला असावा. मी माझ्या आईकडून परवानगी घेऊन आलो अशा प्रकारचे कसाबचे स्टेटमेंट प्रसिध्द झाले. या संदर्भात खुलेपणाने चर्चा केली जाते. ऑपरेशनच्या वेळी एनएसजीचे कमांडो कसे उतरत आहेत याचे लाईव्ह चित्रीकरण प्रत्येक माणसाला नव्हे तर जगातील अनेक देशातील टीव्हीवरुन प्रसारित केले जात होते. पाकिस्तानात बसलेल्या आका हा म्होरक्या हे चित्रीकरण पाहून सॅटलाईट फोनवरुन या अतिरेक्यांना माहिती देत असावा अशा प्रकारचे सर्वसामान्य माणसांचे विचार आहेत. ऑपरेशन चालू असताना मिडियावर का बंधने

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.........

आणली नाहीत? चित्रीकरण दाखवायचे असेल तर केंद्राने कायदा बनविणे आवश्यक आहे. टीव्ही वर काय दाखवावे आणि काय दाखवू नये याविषयी निर्णय घ्यावा लागेल. जर हे चित्रीकरण दाखविले गेले नसते तर कदाचित हे ऑपरेशन काही तासात संपुष्टात आले असते असे मला वाटते. ज्याप्रमाणे तांडेल यांनी पोलीस विभागाला माहिती दिली त्याप्रमाणेच एका महिलेने टीव्ही वर मुलाखतीत सांगितले की, 5-7 लोकांना आम्ही हटकले होते. त्यांनी हेही सांगितले आमच्या वस्तीतील लोकांनी पोलिसांना तात्काळ जाऊन माहिती दिली की, अनोळखी लोक याठिकाणी वावरत आहेत. परंतु तरी देखील या माहितीची दखल घेतली गेली नाही. काही लोकांनी असेही सांगितले की, हे अतिरेकी मागील आठ महिन्यापासून मुंबईत येऊन राहिले आहेत. मघाशी सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री.चिदंबरम यांच्या वाक्याचा हवाला देण्यात आला. त्यांनी सांगितले की, इट इज अ इंटेलिजन्स फेल्युअर. असे असेल तर संबंधितांवर कारवाई होऊ नये असे वाटते का? याला कोणीतरी जबाबदार आहे असे आपल्याला वाटत नाही का? या हल्ल्यामध्ये आपण पोलीस दलातील चार-पाच मोहरे गमावले. शशांक शिंदे, तुकाराम ओंबळे यांच्याबरोबर 16 अधिकारी गमावले.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ......

आपल्याला असे वाटत नाही काय की, या हल्ल्याला इंटेलिजन्स ब्युरो जबाबदार आहे, त्यांच्यावर कुठेतरी अकाऊंटेबिलिटी असली पाहिजे. का घाबरतात राजकारणी माणसे, का राजीनामा देतात ? प्रत्येक वेळेला असा प्रकार घडल्यानंतर म्हणून राजकारणी माणूसच बळीचा बकरा म्हणुन का जातो? श्रीकांत बापट यांचे उदाहरण आपल्यासमोर आहे, त्यांनी राजीनामा दिला होता की त्यांच्याकडून घेतला होता ? अनामी रॉय आणि हसन गफूर मात्र जागेवरच आहेत. परंतु दुसऱ्या बाजूला आर.आर.पाटील आणि विलासराव देशमुख यांना राजीनामा द्यावा लागला. अशी घटना झाल्यानंतर प्रत्येक वेळेला मुंबईत मेणबत्त्या लावून श्रध्दांजली वाहतात आणि राजकारण्यांना शिव्या देतात. ही मेणबत्त्यांची संस्कृती आपल्याकडे नव्हती, आपण पाश्चिमात्यांचे अनुकरण करतो ही गोष्ट जरी ठीक असली तरी पण मुंबईत ज्यावेळी ट्रेनमध्ये सिरीयल बॉम्बस्फोट झाले त्यावेळेस हे लोक कुठे गेले होते ? गेट वे ऑफ इंडिया येथे बॉम्बस्फोट झाले त्यावेळेस यांना जाग आली नव्हती का ? .....अडथळा..... रंग दे बसंती जरी असली तरी तो किती चढवून घ्यायचा हे आपणच समजून घेतले पाहिजे. मुंबईची ही संस्कृती नाही परंतु पंचतारांकित हॉटेलमधील लोक गेले, परदेशी लोक गेले आणि थ्री पेज पार्ट्या बंद झाल्या म्हणून हा आऊट क्राय होता की काय अशी मला शंका येते. परंतु ट्रेनमध्ये गरीब व मध्यमवर्गीय मेले त्यांच्यासाठी कोणीच श्रध्दांजली वाहिली नाही याचा कुठेतरी विचार झाला पाहिजे. या हल्ल्यामध्ये इतर ठिकाणी देखील अनेक लोक जखमी झाले, कामा ॲंड ऑल्ब्लेस रुग्णालय, सेंट जॉर्जेस मधील डॉक्टरांनी तर अतिशय उत्तम कामगिरी केली. त्याचबरोबर ज्यांनी अजून महत्वाची कामगिरी बजावली, ज्या तृतीय आणि चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांनी बॉडया उचलल्या, घाण साफ केली, आपल्या जिवाचे रान केले त्यांचे मात्र कोणीच कौतूक केले नाही. आपल्याला माहीत आहे की, कामा हॉस्पिटलमधील दोन कर्मचारी मृत झाले. तसेच जखमींपैकी श्री. उघडे, श्री. भानू नारकर, हीरा विलास जाधव, कैलास ओकडमल यांच्यापैकी श्री. हीरा विलास जाधव हा जखमी झाला, त्याला जी.टी. हॉस्पिटलमध्ये उपचार करुन सोडून दिले परंतु त्याला शासनाने मदत नाकारली. यासंबंधीच्या पत्रात असे म्हटले आहे की, वरील मयत व जखमी कर्मचारी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयात त्याची नोंद घेतलेली आहे. त्यातील हीरा विलास जाधव या व्यक्तीला मदत मिळालेली नाही. या घटनेत मयत झालेल्यांना

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ......

शासनाने 25 लाखाची मदत जाहीर केली पण अजूनही त्यांच्या खात्यात हे 25 लाखाचे चेक डिपॉझिट झालेले नाहीत. या घटनेला एक महिना होत आला तरी मदत मिळाली नाही, म्हणून त्याचे घर कसे चालेला हा प्रश्न त्याच्या कुटुंबासमोर आहे व याबाबत आम्हाला उत्तर देण्यात आले की, 25 लाखाचे जे व्याज येणार आहे त्यातून त्याचे घर चालेल. शासनाने या मयत झालेल्या लोकांच्या मुलांची शिक्षणाची व्यवस्था केली पण जे 25 लाख रुपये मदत देणार आहात ती कधी देणार ? याचा खुलासा झाला पाहिजे. कारण या कर्मचाऱ्यांचे पगार आता बंद आहेत याचा विचार करुन ताबडतोब त्यांना मदत देण्यात यावी.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

सभापती महोदय, सरकार संवेदनशिल विषयाच्या संदर्भात मदत करीत असते परंतु ती मदत संबंधिताला विलंबाने मिळत असते. यामुळे लोकांचे संसार उद्ध्वस्त होऊन उघडयावर पडत असतात. त्यामुळे तातडीने मदत गरजूना मिळण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, हॉस्पिटल मधील एका कर्मचा-याला दोन बायका होत्या. दहशतवादी हल्ल्यामध्ये हा कर्मचारी मृत पावला. ही मदत आता कोणत्या बायकोला द्यावयाची याबद्दल वाद सुरु आहे. फाईली नाचवण्याचे जे काम सुरु आहे ते थांबवावे. ज्यावेळेस अशा प्रकारच्या घटना घडतात त्यावेळी सिंगल विंडो सिस्टीम सुरु करुन आपत्कालीन परिस्थितीत लवकरात लवकर सोयी उपलब्ध करुन द्याव्यात एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, नियमानुसार कोस्ट गार्डच्या संदर्भात आपल्याकडे कोणत्याही प्रकारची सिस्टीम उपलब्ध नाही. ज्यावेळेस मुंबईत आरडीएक्स उतरवण्यात आले होते त्यावेळेस यासंदर्भात नियम बनवण्यात आले होते. कोस्टगार्डच्या संदर्भात आपल्याकडे कागदपत्रावरच नियम आहेत. From the baseline of sea shore to 7 Nautical miles Marine Police in handle, 7 ते 200 नॉटीकल्स माईल्स अंतरापर्यंत कोस्टगार्ड रक्षण करेल व 200 नॉटीकल्स माईल्सच्या पुढे इंडीयन नेव्हीने संरक्षण करण्याचे काम आहे परंतु यासंदर्भात नेमके काय करणार आहात ? खरे म्हणजे मुळातच आपल्याकडे ही यंत्रणा उपलब्ध नसल्यामुळे अतिरेक्यांनी या सिस्टीमचा उपयोग करुन मुंबईवर हल्ला केलेला आहे. लोकमत या वर्तमानपत्रात गृहविभागासाठी 90 कोटी रुपयांची खरेदी फक्त कागदपत्रावरच करण्यात आल्याची माहिती छापून आलेली आहे. सन 2003-2004 ते सन 2007-2008 पर्यंत पोलीस दलाच्या आधुनिकीकरणसाठी केंद्रसरकारकडून 90 कोटी रुपये आले होते. यामध्ये बुलेट प्रुफ जॅकेटस्ची खरेदी करावयाची होती परंतु अधिका-यांच्या हलगर्जीपणामुळे ही खरेदी होऊ शकली नाही त्यामुळे या अधिका-यांवर आपण काय कारवाई करणार आहात ? सन 2005-2006 मध्ये पुन्हा वेगवेगळया खरेदी करण्यात आली यामध्ये बुलेट प्रुफ जॅकेट, हायपॉवर बायनॅक्युलर यांसाठी 1 कोटी 21 लक्ष 61 हजार हजार रुपये मंजूर करण्यात आले होते त्या वर्षी 40 एमएमच्या युडीजीएल, ग्रॅनाईडसाठी आणि 7.62 एसएलआर रायफलसाठी 1.34 कोटी रुपये मंजूर आले त्याच वर्षात पोलीस वायरलेस डिपार्टमेंटसाठी 63,394 रुपये देण्यात आले होते. पोलीस दलाच्या संगणकीकरणासाठी त्याच वर्षी

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

1.12 कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते. दुसरीकडे मुंबई पोलीस आयुक्तांना 2005-06 मध्ये या वर्षात वेगवेगळया वस्तू खरेदीसाठी 9.43 कोटी रुपये एवढी रक्कम मंजूर करण्यात आली. यामध्ये महानगरांसाठी शस्त्रखरेदी कार्यक्रम पुनरुज्जिवित करण्यात आला. त्यात मोटरसायकल, बोटस्, हायग्राऊंड क्लीअरन्स व्हेईकल्स, हिप्पोक्रेन्स, स्मॉल क्रेन्स, ॲम्ब्युलन्स, वॉकीटॉकी खरेदी करण्यात आले. सन 2007-08 मध्ये मेगासिटी सुरक्षेसाठी म्हणून बुलेटप्रूफ कार आणि बोटी खरेदी करण्यात आल्या. या बोटी आता कोठे गेल्या हा माझा प्रश्न आहे. ज्यावेळेस ताज हॉटेलवर हल्ला झाला त्या रात्री 11.30 वाजता कोणत्या व्हीआयपी व्यक्तीची सुटका करण्यात आली होती याचीही माहिती या ठिकाणी मिळण्याची आवश्यकता आहे. ताज हॉटेलमध्ये त्याच रात्री श्रीमती चित्कला झुत्सी, सचिव या सुध्दा होत्या. ताजवर दहशतवाद्यांचा हल्ला झालेला आहे याची माहिती त्यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना का दिली नाही ? मुंबईत दिल्लीवरुन कमांडो येण्यासाठी 9.30 तासाचा अवधी का लागला याचीही माहिती या ठिकाणी मिळण्याची आवश्यकता आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांची केंद्रीय गृहमंत्र्यांशी बोलणे होण्यासाठी 1.30 तासाचा अवधी का लागला याचीही माहिती या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. ताज हॉटेलवर दहशतवाद्यांनी जो हल्ला केला होता त्यामध्ये फायरब्रिगेडने फार मोलाचे काम केलेले आहे परंतु फायरब्रिगेडचा कोठेही उल्लेख होत नाही. फायर ब्रिगेडने त्या वेळी प्राणाची शर्थ लावून 40 लोकांना हॉटेलमधून बाहेर काढण्याचे काम केलेले आहे.

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सांवत......

कै.हेमंत करकरे, कै.अशोक कामटे, कै.विजय साळसकर आणि पोलीस अधिकारी व कर्मचारी आतकंवाद्यांशी लढताना शहीद झाले त्यांच्याबद्दल सर्वजणांना आदर आहे.

सभापती महोदय, माझी अशी माहिती आहे की, हेमंत करकरे यांनी जे बुलेटप्रुफ जॅकेट कुलाबा पोलीस स्टेशनमधून मागविले होते ते तेथून मिळालेले नाही. त्यांना ते दुसरीकडे उपलब्ध करुन देण्यात आले होते. तेव्हा त्याबाबत सभागृहाला माहिती होणे आवश्यक आहे. कोळी बांधवांनी समुद्रातून 10 अतिरेकी आल्याचे सांगितले तर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी 25 अतिरेकी आले असे सांगितले. जर 25 अतिरेकी आले असतील तर बाकीचे अतिरेकी कुठे आहेत ? मुंबई शहर अजून अतिरेक्यांच्या तडाख्यात आहे काय ? आपली हॉस्पीटल्स अशा आपत्ती व्यवस्थापनात काम करण्यास सशक्त आहेत काय ? याठिकाणी जे.जे.हॉस्पीटल्समधील डॉक्टरांचा उल्लेख करण्यात आला. ज्यादिवशी ही घटना घडली तेव्हा जे.जे.हॉस्पीटल्स डीन ए.सी.मध्ये झोपले होते. इर्मजन्सीसाठी लागणारी औषधे हॉस्पीटल्समध्ये उपलब्ध नव्हती. ती ऐनवेळी बाहेरुन आणावी लागली. जे.जे.हॉस्पीटल्समध्ये इमर्जन्सीसाठी 40 बेडसचे वॉर्ड तयार केले आहे परंतु ते बंद का असते या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ): सभापती महोदय, जी दुर्दैवी घटना घडली त्याच्या दोन तास अगोदर मी ओबेरॉय हॉटेलमध्ये होतो. 1993 मध्ये झालेल्या बॉम्बस्फोट मालिकेनंतर कायदा व सुव्यवस्थेवर या सभागृहात अनेकवेळा चर्चा झाली. परंतु जी उपाययोजना करावयास पाहिजे होती ती आजपर्यंत झालेली नाही त्याबद्दल खेद वाटतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रास 720 कि.मी.चा समुद्र किनारा आहे. त्यापैकी 175 कि.मी.चा समुद्र किनारा रायगड जिल्ह्यात आहे. यामध्ये खाडी किनाऱ्याचा सुध्दा समावेश आहे. सन 1952 मध्ये रायगड जिल्ह्यात 1200 पोलीस अधिकारी व कर्मचारी कार्यरत होते. आजच्या घडीला ती संख्या 1867 आहे. म्हणजे 50 वर्षात काळात फक्त 400-450 पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांची वाढ झालेली आहे. आज रायगड जिल्ह्यातील पोलीस विभागाकडे अत्याधुनिक दळव-वळणाची साधने नाहीत. त्यांच्याकडे चांगल्याप्रकारच्या गाड्या नाहीत. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे रायगड जिल्ह्यास 175 कि.मी.चा समुद्र किनारा आहे. तेव्हा या गोष्टीचा प्रामुख्याने विचार व्हावयास पाहिजे अशी माझी मागणी आहे. मागे काय झाले, कोण कुणावर आरोप करतो यामध्ये मला जावयाचे नाही.

सभापती महोदय, एक घटना सांगतो. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मला दिवाळीच्या दिवशी स्पीड बोटने "गेट वे ऑफ इंडिया" येथे सोडले. परंतु ती स्पीड बोट भरकटली आणि आम्ही एका खडकावर आदळलो. थोड्या वेळानंतर मला श्री.नितीन गडकरी यांचा फोन आला की, आपण पोहोचलात काय ? माझ्या बोटीस अपघात झालेला आहे असे मी त्यांना सांगितले. त्यावेळी मी जवळपास साडेसात तास समुद्रात होतो. त्यावेळी मी पोहून जाण्याची मानसिक तयारी केली होती.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.अजित शिगम 13.30

श्री.जयंत प्र.पाटील.

मला चांगले पोहता येत असतांनासुध्दा त्या ठिकाणी खडक असल्यामुळे पोहून जाण्याची हिंमत मला झाली नाही. आपल्याकडे जे कोस्टल गार्डस आहेत त्याची क्षमता किती आहे ? सन्माननीय श्री.गोपीनाथ मुंडे यांनी कोस्टल गार्डला फोन केला होता त्याचप्रमाणे माझ्या पार्टनरने नेव्हीला फोन केला होता परंतु 11.30 वाजेपर्यत माझ्याकडे कोणीही आले नव्हते त्यामुळे मी त्या ठिकाणीच अडकून पडलो होतो त्या ठिकाणाहून फोनची रेंजसुध्दा मिळत नव्हती अशा परिस्थितीमध्ये मला चुकून एक फोन आला होता त्या फोन वरुन मी माझ्या तालुक्यातील लोकाशी संपर्क साधल्यानंतर कोळीवाडयातीलल 200 ते 300 कोळी बांधव आले आणि त्यांनी माझी सुटका केली. या महिन्यामध्ये दोन वेळा माझा जीव वाचला आहे एकदा ऑबेरॉय हॉटेलमधील अतिरेक्यांच्या हल्यातून आणि दुस-यांदा बोाटीला झालेल्या अपघातातून अशा प्रकारे त्या महिन्यामध्ये दोन वेळा माझा जीव वाचला आहे. ज्या ठिकाणी बोटीला अपघात झाला होता त्या ठिकाणी कोणतीही पोलीस यंत्रणा नव्हती. मांडवा येथे मरीन पोलीस स्टेशन आहे त्याच बरोबर तेथे पोलीसही आहेत . कोस्टल गार्डला फोन केल्यानंतर त्यांच्याकडून असे सांगण्यात आले की आमच्याकडे कोणतीही व्यवस्था नाही. त्यामुळे तुम्ही तुमच्या सुटकेची व्यवस्था करावी. अशा परिस्थितीमध्ये जर अतिरेकी आले तर आपले काय होईल ?अतिरेकी मुंबईतील कुलाबा येथे उतरले होते असे सांगितले जाते. सभापती महोदय, मी गेल्या अनेक वर्षापासून बोटीचा व्यवसाय करतो. मी अत्याधुनिक पध्दतीच्या बोटी तयार करतो व या बोटी दुबई आणि आबुधाबीच्या कोस्टल गार्डला देतो. अशा प्रकारच्या अत्याधुनिक बोटी शासनाने घ्याव्यात यासाठी मी अनेक वेळा बैठका घेतल्या होत्या परंतु त्या संबंधीचा निर्णय होऊ शकला नाही शासनाकडे पुरेसे तंत्रज्ञान असलेले अधिकारी नाहीत. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी कस्टमच्या बोटीचा उल्लेख केला होता परतु या बोटी फायबरच्या बनविलेल्या आहेत या बोटीला एक जरी गोळी लागली तर त्यामुळे छिद्रे पडून बोटीत पाणी घुसल्याने बोट बुडू शकते. त्यासाठी ॲल्युमिनियमची बोट वापरण्यात आली पाहिजे. परंतु शासनाकडे या विषयाचे ज्ञान असलेला अधिकारी नाही.त्यामुळे हा निर्णय होत नाही. तेव्हा चांगल्या प्रकारच्या बोट खरेदी करण्याच्या संदर्भात निर्णय व्हावयास पाहिजे आजच्या चर्चेच्या निमित्ताने या ठिकाणी शासनाने ठोस निर्णय घेतला पाहिजे आणि तो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

महाराष्ट्रातील जनतेपर्यत पोहोचला पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. गेल्या अनेक वर्षापासून मी बोटीच्या व्यवसायात असून समुद्राशी माझा अत्यंत जवळचा सबंध आहे तरी सुध्दा माझ याबाबतीत जो अपघात झाला होता त्यानंतर मी समुद्रामध्ये जाण्यास घाबरत आहे. आपल्याकडील काही बोटी लाकडाच्या आहेत त्यांचा स्पीडसुध्दा कमी आहे. या बोटीचा स्पीड 2 नॉटीकल माईल्स इतका आहे मात्र अतिरेक्यांकडे असलेल्या बोटीचा स्पीड 45 ते 60 नॉटीकल माईल्स एवढा आहे. सन्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथ याना मी माझ्या बोटीतून एकदा घेऊन गेलो होतो त्या बोटीचा स्पीड 45 नॉटीकल माईल्सएवढा होता. त्या बोटीतून प्रवास करीत असताना ते घाबरले होते आणि त्यांनी असे सांगितले की," येथून पुढे मी बोटीत बसणार नाही ." पोलिसांच्या बोटीचा स्पीड 2 नॉटीकल माईल्स एवढा आहे आणि अतिरेक्यांकडे असलेल्या बोटीचा स्पीड 45 ते 60 नॉटीकल माईल्स एवढा आहे अशा स्थितीत आपण त्यांच्या बोटीचा पाठलाग कसा करणार आणि त्यांच्याशी मुकाबला कसा करणार? हा प्रश्नच आहे. तेव्हा या संदर्भात चर्चा करुन निर्णय घ्यावयास पाहिजे असे मला या निमित्ताने शासनाला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मी दुसरा एक मुद्दा मांडू इच्छितो.या चर्चेत भाग घेत असतांना सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सागरी हद्दीच्या संदर्भात काढलेल्या जीआरचा उल्लेख केला होता मी देखील त्या जीआरचा अभ्यास केला आहे. 7 नॉटीकल माईल्स पर्यत मरीन पोलिसांची हद्द राहील त्यानंतर 30 नॉटीकल माईल्स पर्यत कोस्टल गार्डची हद्द राहील आणि त्या नंतर नेव्हीचीहद्द राहील असे ठरविण्यात आले आहे परंतु 7 नॉटीकल माईल्समध्ये मरीन पोलिसांची नेमकी हद्द कोठून सुरु होणार आहे यासंबंधी शासनाने निर्णय घेतलेला नाही. तसेच पोलिलांनी देखील निर्णय घेतलेला नाही त्यामुळे पोलीस असे सागतात की, ही आमची हद्द नाही आणि कोस्टल गार्डसुध्दा सांगतात की ती आमची हद्द नाही. त्याचबरोबर नेव्हीचे अधिकारी असे सांगतात की आम्हाला त्या भागात येण्याचा अधिकारच नाही त्यामुळे या वादामध्ये अतिरेकी सहजपणे येऊ शकतील. मुंबईवर जो अतिरेक्यांनी हल्ला केला होता ते अतिरेकी कुलाबा येथे उतरले होते मी सुध्दा ऑबेरॉय हॉटेलमध्ये त्या दिवशी उतरलो होतो आणि दीड तासानतर या अतिरेक्यांनी त्या हॉटेलवर हल्ला केला होता ज्यांनी मला या बोटीच्या व्यवसायात आणले ते श्री. सुनील पारेख हे सुध्दा त्यांच्या पत्नीसह तेथे उतरले होते.

नतर श्री.सुंबरे

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

KBS/KGS/MMP. श्री. गायकवाड नंतर --- 13:35

श्री. जयंत प्र. पाटील ....

त्यांच्यावर त्या अतिरेक्यांनी गोळीबार करून एवढ्या क्रूरपणे मारले की, त्यांच्या बॉडीज् घरी आणण्याच्या अवस्थेमध्ये नव्हत्या. मी स्वत: त्यांच्या बॉडीज् आणण्यासाठी जे.जे.रूग्णालयात गेलो होतो. तेव्हा तेथे शंभर प्रेते अशीच पडलेली होती. ते सारे दृश्य पाहून मी 10-15 दिवस जेवलो नव्हतो. जवळ जवळ हजार गोळ्या त्यांच्या शरीरामध्ये होत्या. अत्यंत भयानक अवस्था तेथे सर्वांचीच झाली होती. त्यावेळी मला सन्माननीय सदस्य श्री.तावडे यांचा फोन आला होता. त्यांचीही तशीच मनस्थिती झाली होती. सभापती महोदय, त्यातील एक अतिरेकी माझ्या गाडी टॅक्सी असल्याचे समजून माझ्या ड्रायव्हरला 'मला अमुक ठिकाण सोड' म्हणून सांगत होता. पण माझ्या ड्रायव्हरने 'ही टॅक्सी नाही, खाजगी गाडी आहे' असे त्याला सांगितल्यानंतर त्याने नम्रपणे 'सॉरी' असे म्हटले आणि तो दुसऱ्या टॅक्सीने ताजच्या बाजूला गेला. जेव्हा त्या अतिरेक्यांचे फोटो वृत्तपत्रातून आले तेव्हा माझ्या ड्रायव्हरने त्याला ओळखले. सभापती महोदय, कुलाब्याला ज्या ठिकाणी ती बोट लागली म्हणून सांगितले जाते तेथे बोट लागूच शकत नाही कारण तो भाग पूर्णपण खडकाळ आहे. ताजच्या समोरची पाच नंबरची जेट्टी आहे तेथेच खऱ्या अर्थाने हे अतिरेकी आले असणार. सभापती महोदय, त्या दिवशी माझी बोट मला सोडून परत मुंबईला आली आणि त्यानंतर हा सगळा प्रकार घडला. अन्यथा काल आपण ज्यांना श्रद्धांजली अर्पण केली त्यामध्ये माझे नाव देखील आले असते. म्हणूनच यामध्ये कोठे तरी निर्णय हा घेतला गेला पाहिजे. कोणी काय केले, कोण काय करते आहे. पण हे राज्य कोण चालवित आहे ? अधिकारी चालवित आहेत का ? याची चर्चा किती वेळा आम्ही येथे करायची ? आम्ही मेल्यानंतर त्यावर निर्णय घेणार आहात का ? आम्ही जीवंत असतानाच कायदा बदलण्याची परिस्थिती निर्माण करणार आहात की नाही हा माझा आपल्याला प्रश्न आहे. आपले कायदे कोणासाठी आहेत ? अधिकाऱ्यांसाठी आहेत की जनतेसाठी आहेत ? अधिकारी केवळ फाईली अडवितात. त्या अधिकाऱ्यांना खरोखरी त्यातील ज्ञान आहे का ?

आता आपण किनाऱ्यांवर बंदरे निर्माण करू लागला आहात. त्यांची कोठली सुरक्षितता आहे काय ? कोठलीही नाही. मी स्वत: या संदर्भात अर्ज दिला आहे. तेव्हा मी एस.पी.ंना सांगितले की, यावर बंदी आणा, त्यावर नियंत्रण आणा. पण त्यांनी सांगितले की, माझ्याकडे पुरेसा स्टाफच नाही. 1952 साली 1200 पोलीस हाते पण आज ते केवळ 1100 आहेत. आता आमच्या रायगडमध्य 50 टक्के औद्योगिकीकरण झालेले आहे. तेव्हा कोस्टगार्डमध्ये सक्षम असे अधिकारी आणि माहितगार

..... एफएफ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

अधिकारी तेथे नाहीत. अशा परिस्थितीमध्य आपले सारे सागरी किनारे सुरक्षित करण्यासाठी, सांभाळण्यासाठी हेलिकॉप्टर्स आवश्यक आहेत, तसेच अद्यावत अशा स्पीड बोटींचीही गरज आहे. त्यांच्याकडे ज्या लाकडी बोटी आहेत त्या रद्द केल्या पाहिजेत. ज्याप्रमाणे जुन्या टॅक्सीज आता आपण रद्द करीत आहोत त्याप्रमाण जुन्या बोटींबाबत देखील निर्णय घेतला पाहिजे. शेवटी कायदा हा सर्वांना सारखा असला पाहिजे. खरे तर या निर्णयातून माझे वैयक्तिकरित्या खूप नुकसान होईल. पण तरीही मी आपल्याला याबाबत निर्णय घेण्याचा आग्रह करीत आहे. आज तुम्ही संपूर्ण गेटवे ऑफ इंडियाकडील प्रवासी वाहतूक थांबविली आहे. तेथील 5 जेट्टींपैकी एकच चालू आहे. खरे तर त्याबाबतीत तेथील आपल्या कोणाही अधिकाऱ्यांना नॉलेज नाही. तेव्हा या बाबत निर्णय घेण्यासाठी आपण एक चांगली समिती नेमावी आणि त्या समितीमध्ये या व्यवसायातील उद्योगपतींना आपण बोलवावे. तसेच केवळ 'लोएस्ट रेट' हे तत्त्व आपण सर्वच ठिकाणी पाळणे योग्य होणार नाही. ते आपण बदलले पाहिजे. जो लोएस्ट रेट देईल तो मग त्याप्रमाणेच लोएस्ट दर्जाच्या बोटी आपल्याला देणार. तेव्हा त्यांचा दर्जा आणि आयुष्यमान ठरवून त्यादृष्टीने योग्य तो निर्णय घेतला पाहिजे. या चर्चेला उद्या द्यावयाच्या उत्तरातून आमची अपेक्षा आहे की, आम्हाला याबाबत काही ठोस निर्णय समजला पाहिजे. त्याची आम्ही वाट पाहत आहोत. .....

( यानंतर श्री. सरफरे .... जीजी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून या सभागृहामध्ये कोणते निर्णय घेतो? मा.सदस्य डॉ. दीपक सावंत म्हणतात त्याप्रमाणे ही गोष्ट खरी आहे की, मुंबईमध्ये लोकप्रतिनिधींकडे बघण्याचा लोकांचा दृष्टीकोन बदलला आहे. आपल्याकडे लोक वेगळया नजरेने बघत आहेत. लोकप्रतिनिधी म्हणून तुम्ही कोणतेही काम करीत नाही. राजकारणामध्ये भ्रष्टाचार बोकाळला असल्यामुळे हे अतिरेकी मुंबईमध्ये आले, हे अतिरेकी तुमच्यामुळे आले अशी सर्वसामान्य माणसांची भावना झाली आहे. आणि म्हणून याबाबतीत आपण आत्मपरिक्षण केले पाहिजे. आपल्या जवानांनी, पोलिसांनी फार चांगली कामगिरी केली आहे, त्यांनी धैर्याने काम केले आहे. परंतु दिल्लीहून मुंबईमध्ये कमांडो येण्यासाठी 9 तास लागले. ताज हॉटेलचे मालक श्री. टाटा आमच्या अलिबागहून रोज अपडाऊन करतात. त्यांचा अलिबागला बंगला आहे. त्यांची स्पीड बोट आली नाहीतर ते सुध्दा लाईनमध्ये उभे राहून 50 रुपयांचे तिकिट घेऊन माझ्या कॅटॅमरानमधून प्रवास करतात. त्यांना अप्पर डेकवर बसण्याची विनंती केली तरी ते त्याठिक्‍ाणी न बसता खाली लोकांमध्ये बसतात. त्यावेळी त्यांनी मला या ऑपरेशनबाबत सांगितले की, माझ्याकडे कुणीही हॉटेलचा प्लॅनसुध्दा मागितला नाही. हॉटेलच्या प्लॅनमध्ये कोणती रुम कोणत्या बाजूला आहे, याबाबत अजूनपर्यंत कुणीही माझ्याकडे विचारणा केलेली नाही. ते म्हणाले माझ्या हॉटेलचे 500 कोटींचे नुकसान झाले. हॉटेल ताजमध्ये ऑपरेशन सुरु असतांना आपली यंत्रणा एवढी भांबावून गेली होती, घाबरली होती. अशावेळी काय करावे, कोणता निर्णय घ्यावा हे सुध्दा त्यांना सुचले नाही. अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होता कामा नये अशाप्रकारचे वातावरण आणि विश्वास आपण महाराष्ट्रातील जनतेला दिला पाहिजे.

सभापती महोदय, माझी गाडी आली नाहीतर मी आज सुध्दा टॅक्सीमध्ये बसायला घाबरतो. मी निर्भीड असलो तरी माझ्यासारखा माणूस सुध्दा टॅक्सीमध्ये बसायला घाबरत आहे. आजच्या टॅक्सींचा दर्जा काय आहे? टॅक्सी चालकांचे शर्ट कित्येक दिवस धुतलेले नसतात, त्यांची दाढी वाढलेली असते. ते अतिरेकी आहेत काय? हे सुध्दा कळत नाही. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी याबाबत अनेक वेळा चर्चा केली आहे. ते टॅक्सी चालकांच्या संघटनेचे नेते आहेत. तरीसुध्दा आपण काही पथ्ये पाळली पाहिजेत, आणि यामधील दोष दूर केले पाहिजेत असे त्यांचेही म्हणणे आहे. याबाबत मा. गृह राज्यमंत्र्यांना उत्तर देण्याचे काम करावे लागणार आहे. मी नवीन मंत्री आहे, मला माहीत नाही, मी आत्ताच कारभार हाती घेतला आहे असे आपल्याला सांगता येणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. जयंत प्र. पाटील....

नाही. मा.श्री. जयंत पाटील हे सुध्दा नवीन कॅबिनेट मंत्री आहेत. मी आपणास नम्रपणे सांगतो की, ते अर्थमंत्री असतांना स्पीड बोटींबाबत दोन-तीन वेळा सभागृहात चर्चा झाली आहे. स्पीड बोटींच्या खरेदीसाठी केंद्र सरकार आपल्याला 90 % पैसे देण्यास तयार आहे. परंतु उर्वरित निधी आपणाकडे नसेल आणि त्यासाठी ती फाईल थांबत असेल, आणि त्यामुळे जीवितहानी होत असेल तर ते महाराष्ट्राचे दुर्दैव आहे असे मला वाटते. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, आपली पोलीस यंत्रणा अत्याधुनिक करीत असतांना मागील चुका आपण पुन्हा करावयास लावू नका एवढीच विनंती करुन माझे विचार संपवितो.

-----

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, 26 नोव्हेंबरचा मुंबईवरचा हल्ला ही एक राष्ट्रीय आपत्ती, एक जागतिक आपत्ती म्हणून आपण याकडे पाहिले पाहिजे. मला समाधान वाटते की, या ठिकाणी विरोधी बाकांवरुन देखील जी भाषणे झाली ती फार चांगल्या पध्दतीने झाली. या महाराष्ट्राच्या रक्षणासाठी, मुंबईच्या रक्षणासाठी आम्ही या ठिकाणी एकत्र आहोत अशा पध्दतीचा संदेश आजच्या चर्चेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशात जाणार आहे. 26 नोव्हेंबर हा दिवस माणुसकीला काळिमा फासणारा दिवस आहे. हा दिवस राज्याच्या आणि देशाच्या इतिहासातील काळा दिवस आहे अशा पध्दतीने ही घटना घडली. आपण पाहिले तर 2003 पासून आजपर्यंत जे हल्ले झाले त्यामध्ये दिल्लीमध्ये 3 हल्ले झाले. राजस्थानमध्ये जयपूरला हल्ला झाला. कर्नाटकमध्ये बंगलोरला हल्ला झाला. आंध्र प्रदेशमध्ये हैद्राबादला 2 वेळा दहशतवादी हल्ले झाले. परंतु सर्वात जास्त हल्ले मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये झाले. या दृष्टीकोनातून या मुंबईचे आणि महाराष्ट्राचे रक्षण करणे ही आपणा सर्वांची सामुदायिक जबाबदारी आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या ठिकाणी चांगला मुद्दा मांडला. केवळ सत्ताधारी पक्ष किंवा एखाद्या विशिष्ट पक्षाचा नेता किंवा कार्यकर्ताच नाही तर राजकारणातील कोणत्याही पक्षाचा माणूस असेल त्याच्या संदर्भात एक असंतोष आणि चीड अशी भावना जनतेमध्ये निर्माण झाली आहे. हे आव्हान आपल्याला स्वीकारावयाचे आहे. आम्ही सर्व तुमच्या रक्षणासाठी एक आहोत. डेव्हलपमेंट हा शब्द आपण पाठीमागे घेऊ. त्याला दुसरा क्रमांक देऊ. पहिला क्रमांक सिक्युरिटीसाठी असेल. सुरक्षा ही पहिली बाब आणि विकास ही दुसरी बाब असेल. दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आहे. उद्योगांच्या बाबतीत आपला पहिला क्रमांक आहे सर्वात जास्त गुंतवणूक महाराष्ट्रात आहे. या सर्व बाबी होत असताना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र पहिला आहे हे चित्र निर्माण करण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आणि विशेषत: शासनावर आहे. शासनाने याकडे लक्ष दिले पाहिजे. मला असे वाटते की, हे अघोषित युध्द आहे काय ? याच्याकडे केवळ दहशतवादी हल्ला म्हणून पाहता कामा नये. शेजारच्या देशाकडून आपल्यावर एक अघोषित युध्द लादण्याचा प्रयत्न होत आहे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. अरुण गुजराथी .....

या भावनेने याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. म्हणून भविष्यात होणारे हल्ले, मग रासायनिक हल्ले असतील, जैविक हल्ले असतील, जैवतंत्रज्ञानिक अस्त्रे असतील त्याचा धोका आपल्याला पुढे होणार आहे या भावनेने पुढे जावे लागेल. ही नांदी होती की नाटकाचा अंक होता की अंकातील पहिला प्रवेश होता हे काही सांगता येत नाही. लोकांच्या मनामध्ये आज देखील भीती आहे. ते 26 लोक होते. 10 लोकांचा हिशेब लागला. 16 लोक कोठे आहेत ? नेमके किती लोक होते हे कोणालाही माहीत नाही. आजही त्या ठिकाणी ते आहेत काय याची कोणालाही कल्पना नाही. या दृष्टीकोनातून आज आपण या क्षणापासून त्याकडे जास्त लक्ष देण्याची गरज आहे. केवळ एखादा मंत्री बदलला, केवळ त्यांचे खाते बदलले किंवा एखादे सरकार बदलले किंवा जुन्या पक्षाचे सरकार जाऊन नवीन पक्षाचे सरकार आले यामुळे हे सर्व प्रश्न सुटतील अशातील भाग नाही. दोन राज्यांमधील समन्वय देखील महत्वाचा आहे. कराचीवरुन येणाऱ्या बोटी गुजरातच्या हद्दीत आल्यानंतर त्या राज्याची जबाबदारी आहे. आपल्याही राज्याची जबाबदारी आहे. संपूर्ण समुद्राची जबाबदारी तिघांवर सोपवली जाते. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे कोणत्या किलोमीटरपर्यंतची जबाबदारी पोलिसांची, तटरक्षक दलाची किंवा नौदलाची याचा निर्णय देखील सत्वर घेणे महत्वाचे आहे. त्या दृष्टीकोनातून प्रयत्न झाले पाहिजेत. एनएसजी प्रमाणे एमएसजी स्थापन करण्याचा एक चांगला निर्णय शासनाने घेतला. नॅशनल सिक्युरिटी गार्ड प्रमाणे महाराष्ट्र सिक्युरिटी गार्ड निर्माण करण्याची योजना चांगली आहे. त्याची अंमलबजावणी त्वरेने व्हावयास पाहिजे. त्या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे महत्वाचे आहे. चौकामध्ये पोलिसाच्या तोंडामध्ये फक्त शिट्टी असते. तोंडातील शिट्टीने तो रक्षण करु शकणार नाही. काही वेळा त्याच्या बरोबर हातात काठी घेऊन दोन पोलीस असतात. ते अतिरेक्यांबरोबर लढू शकणार नाही. तोंडात शिट्टी असलेले पोलीस, हातात काठी असलेले पालीस अतिरेक्यांशी कोणताही सामना करु शकणार नाहीत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

त्यादृष्टीकोनातून आपण धोरणे आखली पाहिजेत. चौकातील पोलिसांकडे शिट्टीबरोबर एक अत्याधुनिक हत्यार दिले पाहिजे, केवळ हत्यार देऊ चालणार नाही तर ते वापरण्यासाठी त्यांना प्रशिक्षण दिले पाहिजे. मघाशी कोणी तरी म्हटले की, वर्तमानपत्रात बातमी आली होती की, गृह खात्याला दिलेला पैसा परत गेला. याबाबत शासनाने निश्चित भूमिका स्वीकारली पाहिजे. शासनाला नवीन धोरण आखावे लागेल. अर्थसंकल्पामध्ये एकदा गृह खात्याला पैसा दिल्यानंतर ती फाईल पुन्हा वित्त व नियोजन विभागाकडे जाणार नाही असा धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. एकदा अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर त्वरेने त्यांना जी काही खरेदी करावयाची असेल ती करण्यासंबंधी निर्णय घेणे आवश्यक आहे.

सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी चांगला मुद्दा मांडला होता. त्यांनी असे म्हटले होते की, वेगगवेगळया ठिकाणी वेगवेगळी सिक्युरिटी सिस्टिम निर्माण करावी लागेल. हॉस्पिटल्स, हॉटेल्स, शाळा, कॉलेज याठिकाणी वेगळया पध्दतीची यंत्रणा उभी करावी लागेल. त्यासाठी एखादा कायदा आवश्यक असेल तर तो करावा लागेल. 500 कोटींचे हॉटेल उभे करीत असताना सुरक्षेसाठी 5-10 कोटी रुपये लागत असतील तर त्याची तरतूद झाली पाहिजे. आज मुंबई शहरांतील अनेक शाळांमध्ये 15 ते 25 हजार रुपये वार्षिक फी घेतली जाते. तेथे सुध्दा सुरक्षिततेची व्यवस्था कशी आहे ? म्हणून सुरक्षिततेसाठी एक नवीन कायदा करावा लागेल. आपण इंटरनल आणि एक्सटर्नल सिक्युरिटी म्हणतो. राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी महाराष्ट्र सरकारची आहे. परंतु पाकिस्तानातून दहशतवादी लोक आले असतील तर त्यांचे आक्रमण परतवून लावण्याची जबाबदारी महाराष्ट्र सरकारची आहे. त्याचबरोबर केंद्र सरकारची सुध्दा ही जबाबदारी आहे. या मुंबई शहरातून आयकराच्या माध्यमातून, अबकारी कराच्या माध्यमातून देशाला दरवर्षी 60 हजार कोटी रुपये उत्पन्न मिळते. त्यामुळे देशातील प्रत्येक राज्याची आणि केंद्र सरकारची मुंबईला सांभाळण्याची जबाबदारी आहे. 4 दिवसांपूर्वी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री यांनी माननीय पंतप्रधानांना भेटून राज्याच्या सुरक्षिततेसाठी केंद्र सरकारकडून सहाय्य मिळण्याची विनंती केलेली आहे. केंद्र सरकारने ते

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.अरुण गुजराथी....

सहाय्य दिलेच पाहिजे. या पध्दतीची भूमिका घेऊन सर्वांनी पाठिंबा देणे आवश्यक आहे. केवळ मेटल डिटेक्टर लावले म्हणजे सर्वांना सुरक्षितता मिळाली असे होत नाही तर मेंटल डिटेक्टर लावण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या डोक्यामध्ये काय शिजत आहे, कोणता कट रचला जात आहे ते समजणे अत्यंत आवश्यक आहे. हे मेटल डिटेक्टरच्या माध्यमातून लक्षात येत नाही. मेटल डिटेक्टर बसविले म्हणून सभागृह सुरक्षित आहे असे समजले जाते. देशातील प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे की, माझे डोळे हे देशाचे डोळे आहेत आणि माझे कान हे देशाचे कान आहेत. या दृष्टीकोनातून पुढे गेले पाहिजे. राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून लॅप्सेस होत असतील तर ते निश्चितपणे सुधारले पाहिजे. कोणतेही शासन असे म्हणू शकत नाही की,"Totally we are right, there is always a room for improvement." सुधारणा करण्यासाठी नेहमी जागा असते. घडलेल्या घटनांच्या माध्यमातून त्वरित सुधारण्याची जबाबदारी शासनाने घ्यावी. जनतेची जबाबदारी जनता घेईलच. त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधींनी सुध्दा ती घेतली पाहिजे. एका कवीने असे म्हटले आहे की, ."Commit 100 mistakes but dont repeat the mistakes" 100 चुका करा, परंतु एक चूक दुसऱ्यांदा होणार नाही याची खबरदारी घ्यावी. 26 नोव्हेंबरची घटना ही "Eternal vigilence is a price of liberty" आपल्याला सुराज्य मिळाले आहे, त्या सुराज्याचे स्वातंत्र्य टिकविणे यासाठी ही लढाई आहे. ही लढाई सोपी नाही. मघाशी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी एक मुद्दा मांडला होता.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ SBT/ MMP/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 13:55

(श्री. अरुण गुजराथी पुढे सुरु.. )

त्यांनी नरिमन हाऊसला का निवडले ? त्या ठिकाणी ज्यू धर्मिय लोकांची वस्ती आहे. पोलीस आणि इस्त्रायलचा लढा आता आपल्याला मुंबईच्या जमिनीवर लढायचा आहे काय ? संपूर्ण जग ही एक युध्दभूमी झालेली आहे. कुठे इस्त्रायल अरब देश, कुठे नरिमन हाऊस आणि कुठे आमचे मुंबईचे पोलीस. म्हणून अत्यंत जबाबदारीने आपण पुढे जाण्याचा विचार केला पाहिजे. आपली गुप्तचर यंत्रण आहे. ते खबरे आहेत असे म्हटले जाते. ही गुप्तचर यंत्रणा सक्षम करण्यासाठी खबरे वाढवावे लागतील. प्लेन ड्रसेमधील पोलिसांची संख्या वाढवावी लागेल. माजी गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी सांगितले की 55 हजार पोलिसांची भरती करण्यात येणार आहे. ही भरती त्वरेने करावी. कोकणाला 730 कि.मी.चा सागरी किनारा लाभलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज हे देखील सागरी मार्गाच्या बाबतीत अत्यंत सतर्क होते. समुद्रमार्गे येणा-या शत्रूचा हल्ला परतवून लावण्याचे नियोजन पहिल्यांदा छत्रपती शिवाजी महाराजांच्या माध्यमातून झाले. सागरी किनारा सांभाळणे अत्यंत महत्वाचे आहे. हा सागरी किनारा आपण कसा काय सांभाळणार ? महाराष्ट्राच्या ग्रामीण भागासाठी हजारी अर्धा पोलीस, मुंबई शहरामध्ये हजारी 4 पोलीस. मग 720 कि.मी.च्या सागरी किना-यासाठी किती पोलीस यंत्रणा लागेल ? सागरी किना-याची संपूर्ण जबाबदारी ही तटरक्षक दल किवा आपले पोलीस यांच्याकडे असण्या ऐवजी नौसेनेने ही जबाबदारी स्वीकारावी असा आग्रह राज्य सरकारने केन्द्र सरकारकडे धरला पाहिजे जेणेकरुन यापुढे अशा प्रकारचे हल्ले होणार नाहीत. वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या दोन इमारती पाडण्यात आल्या. मला ती जागा पाहून येण्याची संधी मिळाली. काही लोक असे म्हणत होते की, आम्ही तेथे गार्डन करु तर काही म्हणत होते की, आम्ही यापेक्षाही उंच इमारत बांधू आणि दहशतवाद्यांना सांगू की, या पुन्हा आणि तोडा आमची इमारत. केव्हा काय होईल याचा नेम नाही. म्हणून पोलिसांची संख्या, त्यांचे प्रशिक्षण, त्यांना देण्यात येणारी हत्यारे, लागणारी सामग्री यासंदर्भातील जबाबदारी शासनाला सवीकारावी लागेल. हे सर्व प्रश्न येथे मांडत असताना एक विचार पुढे येतो तो म्हणजे आज लहान लहान मुलांच्या मनामध्ये देखील भीती निर्माण झालेली आहे. उद्याच्या नव्या पिढीला आपण ताकद दिली पाहिजे. अशा घटना पुन्हा होणार नाहीत यासंदर्भातील जबाबदारी आपण स्वीकारली पाहिजे. आज कुठे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ SBT/ MMP/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 13:55

(श्री. अरुण गुजराथी पुढे सुरु..

एखादा फटाका फुटला तरी लहान मुले घाबरुन आईला बिलगतात. याला केवळ पोलीसच जबाबदार आहेत अशातला भाग नाही तर नवीन धोरण, कायद्याची अंमलबजावणी, समाजिक एकता, एकात्मता या भावनेने आपण पुढे गेलो तर त्याचा निश्चितपणे आपल्याला फायदा मिळेल. माझी अशी विनंती आहे की, 26 नोव्हेंबर 2008चा एक धडा पाठ्य पुस्तकामध्ये येऊ द्या. केवळ स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये लोक मंतरलेले होते असे नाही तर स्वातंत्र्योत्तर काळामध्येही हेमंत करकरे, अशोक कामटे या सारख्या पोलीस अधिका-यांनी दिलेले योगदान व्यर्थ जाणार नाही या संदर्भातील भूमिका आपण सवीकारली पाहिजे. 26 नोव्हेंबरची घटना कशी घडली, त्यासाठी पुढे काय करावे लागेल यासंदर्भातील दिशा निश्चित केली पाहिजे. असे म्हटले जाते की डू नॉट लिव्ह एनी ॲव्हेन्यू, एकही मार्ग सोडायचा नाही या पध्दतीने या परिस्थितीचा मुकाबला करावा लागेल आणि तो करण्यासाठी सज्ज राहाणे ही काळाजी गरज आहे. त्या दृष्टीकोनातून आपण काम करु या.

.. नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी...

या भारत देशात कै.इंदिरा गांधी आणि कै.राजीव गांधी हे दोन पंतप्रधान दहशतवाद्यांच्या हल्ल्यात मारले गेले. या घटनांना फार काळ झालेला आहे. या गोष्टींचा विचार केला तर दहशतवादी हा फक्त महाराष्ट्रात, हिंदुस्थानातच आहे असे नाही. पाकिस्तानमध्ये निवडणुकीच्या काळात बेनझीर भुत्तो यांची सुध्दा दहशतवाद्यांकडून हत्त्या करण्यात आली. पाकिस्तानामध्ये अनेक दहशतवादी हल्ले होत आहेत. आपण सर्व दहशतवाद विरोधी आहोत असे चित्र निर्माण केले पाहिजे. अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्री श्रीमती राईस यांना या देशात पाठविण्यात आले होते, त्या गोष्टीचे थोडे कौतुक, थोडे अभिनंदन, थोडे आभार मानले पाहिजेत. त्या या देशात आल्या आणि येथून त्या पाकिस्तानात गेल्या. त्यांनी 48 तासांची मुदत दिली. पाकिस्तानने दोन दिवसात यांना पकडतो, त्यांना पकडतो असे त्यांना सांगितले. परंतु पाकिस्तानने याबाबतीत पुढे काय केले याची मला माहिती नाही. ते आधी म्हणतात की, आम्ही यांना पाठवितो, त्यांना पाठवितो आणि नंतर म्हणतात की, आपण संयुक्त मुकाबला करु. परंतु याबाबतीत सांगू इच्छितो की, यासंदर्भात जे काही व्हावयाचे असेल ते होईल. परंतु जबाबदारी आपली,जबाबदारी शासनाची, जबाबदारी खात्याच्या मंत्र्यांची, जबाबदारी शासनाच्या संबंधित खात्यांच्या अधिका-यांची, जबाबदारी लोकप्रतिनिधींची, या सर्व जबाबदार व्यक्तींनी एकत्र येऊन, सर्वांनी जागरुक राहून अशा घटनांचा आम्ही मुकाबला करण्याचा विचार मनाशी बाळगला तर अशा पध्दतीच्या घटना टळू शकतील. अशा घटना पूर्णपणे थांबतील अशातला भाग नाही, परंतु इतका मोठा हल्ला होणार नाही असे मला वाटते. यापुढे अशा प्रकारचा हल्ला होणार नाही यासंबंधी अधिक काळजी घेणे हे जास्त महत्वाचे आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे मांडले आहेत, त्यांचा मी उल्लेख करणार नाही. आजच्या या चर्चेच्या माध्यमातून महाराष्ट्रात तसेच देशात एक चांगला संदेश जातो आहे. महाराष्ट्रातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी अशा घटनांचा मुकाबला करण्यासाठी, तसेच महाराष्ट्रातील नव्या पिढीचा सांभाळ करण्यासाठी एकत्र येऊन चर्चा करीत आहेत ही अतिशय स्वागतार्ह गोष्ट आहे. अतिशय चांगल्या वातावरणात या विषयाची चर्चा होत आहे त्याबद्दल मी सर्वांचे स्वागत करतो आणि या विषयासंबंधीचे माझे मनोगत पूर्ण करतो.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज सभागृहामध्ये दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबई शहरात झालेल्या दहशतवादी हल्ल्यासंबंधी चर्चा करीत आहोत. त्या घटनेतील अनेक मुद्दे सन्माननीय सदस्यांच्या भाषणात आलेले असल्यामुळे मी त्यांचा पुनरुच्चार न करता 26 नोव्हेंबरच्या दिवशी दहशतवादी हल्ल्याच्या निमित्ताने ज्या गोष्टी माझ्यासारख्या लोकप्रतिनिधीने अनुभवल्या किंवा अशा प्रकारचा हल्ला हा पहिलाच हल्ला या देशावरचा होता आणि त्यामुळे यातून सर्व घटकांनी काहीतरी शिकण्यासारखे आहे, बोध घेण्यासारखे आहे त्याचे विश्लेषण मी माझ्या भाषणातून करण्याचा प्रयत्न करणार आहे. खरे म्हणजे प्रामाणिकपणे मान्य करावयाचे झाले तर या घटनेच्या दिवशी त्या भागात फिरत असताना मी या राजकीय व्यवस्थेचा भाग आहे याची मला मनापासून लाज वाटत होती, ही वस्तुस्थिती आहे. लोकांची चीड म्हणून नाही, लोक राजकीय नेत्यांच्या विरोधात बोलतात म्हणून नव्हे पण 26 नोव्हेंबरच्या मध्यरात्री 1.30 वाजताच्या सुमारास गेटवे ऑफ इंडियाजवळ उभे राहून ताज हॉटेलच्या कळसाला लागलेली आग आणि हॉटेलच्या आतील बाजूने महिलांचे सेव्ह, सेव्ह असे आवाज येत होते ते ऐकल्यानंतर आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून चार पावले पुढे टाकूनही काही करु शकत नव्हतो. तिथे बंदोबस्ताला असलेले इन्सपेक्टर सांगत होते की, पुढे गेलात तर रेंजमध्ये याल, मागे फिरले पाहिजे. तेथे फक्त उभे राहून लोक मदतीची अपेक्षा करीत असताना आपण काही करु शकत नाही याची मनाला खंत वाटत होती. रस्त्यावर चहा विकणारा चहावाला आणि या राजकीय व्यवस्थेचा भाग असणारा विनोद तावडे यांच्यामध्ये काही अंतर नव्हते. नरिमन पॉईंट येथील पक्ष कार्यालयातून फोन येत होते की, त्या भागात अतिरेकी आले आहेत. त्याठिकाणी मी धाव घेतली. तेथील सर्वोच्च पोलीस अधिकारी श्री.बागवान याना भेटलो. त्यांना विचारले की, कमांडो किंवा एटीएसचे अधिकारी याठिकाणी आले आहेत का? ते म्हणाले, आता माझ्याकडे एवढेच अधिकारी आहेत व सर्वोच्च अधिकारी मी एकटाच आहे. सध्या गर्दी कंट्रोल करणे एवढेच काम आम्ही करु शकतो. ओबेरॉय हॉटेलजवळ गेलो. तेथे मुंबईचे पोलीस आयुक्त श्री.हसन गफूर हे हजर होते. त्यांच्या कानावर ही गोष्ट घातली. पोलीस आयुक्तांचे वास्तवातील उद्गार होते. मॅक्झीमम कॅज्युअल्टी सीएसटी, ताज आणि ओबेरॉयमध्ये होऊ शकते. नरिमन हाऊसमध्ये 8 ते 10 इतकी होऊ शकते. उपलब्ध सगळा फोर्स आम्ही लावतो आहोत. तेथे पाठवावयास माझ्याकडे माणसे नाहीत. मी गेली सहा वर्षे विधानपरिषदेत गृहखात्याच्या मागण्यांवर नेहमी बोलत होतो. अशा प्रकारे मुंबई शहर हे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ SBT/ 14:05

श्री.विनोद तावडे..........

प्रचंड दहशती हल्ल्याच्या छायेखाली असताना सुध्दा या राजकीय व्यवस्थेचा भाग म्हणून विरोधी पक्षात असलो तरी आपण या मुंबईच्या पोलिसांना इल इक्वीप ठेवले असल्यामुळे शशांक शिंदेसारख्या अधिकाऱ्याने दोन गोळया झाडल्यानंतर त्यांचे पिस्तूल अडकले. खऱ्या अर्थाने मुंबई पोलीस इल इक्वीप असल्यामुळेच त्यांना जी ताकद दिली पाहिजे ती देऊ शकत नाही, दिलेली नाही. या राजकीय व्यवस्थेचा भाग असताना खरेच आपण काय करु शकतो आणि काय केले पाहिजे हेच विचार सातत्याने मनात रुंजी घालत आहेत. ज्यावेळी पहिला एस.एम.एस.आला की, अशा प्रकारे फायरिंग झाल्याचे ब्रेकिंग न्यूज प्रसारित झाली आहे, त्याच्या पाच मिनिटानंतर एका अधिकाऱ्याशी बोलल्यानंतर कळले की, may be probable terrorists attack. मी बाहेरगावी चाललो असताना परत फिरलो. पार्ल्याजवळ असताना तेथे बॉम्ब ब्लास्ट झाला. आतापर्यंत फक्त वाचले होते की, शरीराच्या चिंधड्या झाल्या................

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ........

त्या दिवशी चिंधडया गोळा केल्या, 200 मीटरवर पडलेला हात आणि 100 मीटरवर पडलेला पाय एकत्र करुन ॲड. गोयलची बॉडी स्ट्रेचरवर ठेवली व कुपर हॉस्पिटलमध्ये पाठविली त्यावेळेस खरोखरच अतिरेकी हल्ला किती भयानक असतो याची मला जाणीव झाली, त्यापूर्वी मी फक्त ऐकलेच होते. अशा पध्दतीने अतिरेकी येतील आणि हल्ला करतील व त्या हल्ल्याला परतविण्याची क्षमता आपल्याकडे आहे की नाही असे अनेक प्रश्न माझ्या मनात दुसऱ्या दिवशी दिवसभर निर्माण होत होते. त्यासंबंधीची सविस्तर चर्चा व वर्णन या ठिकाणी माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी केलेलेच आहे पण मला एक गोष्ट मात्र जाणीवपूर्वक सांगावीशी वाटते की, राजकारणी नेत्यांचे जे राजीनामे आलेले आहेत ते या घटनेची जबाबदारी घेऊन आले नाही तर ही घटना घडल्यानंतर जी वक्तव्ये आणि ज्या कृती करण्यात आल्या त्यावरुन उसळलेल्या जनक्षोभामुळे आले. राज्यात पोलिसांचे डिमॉरलायझेशन झाल्याचे सन्माननीय सदस्य श्री. आव्हाड हे म्हणाले, ते खरे आहे. ते डिमॉरलायझ ेशन एखाद्या केसमुळे, एखाद्या लेखातील गोष्टीमुळे होते की ते होण्याचे खरे कारण गेल्या 7-8 वर्षांपासून झालेले पोलिटासाययझेशन ऑफ पोलीस सिस्टम यामुळे झाले हे वास्तव आहे, याचा उहापोह होणे आवश्यक आहे. यासंबंधी मनापासून आणि मोकळेपणाने जर विश्लेषण आणि आत्मपरीक्षण करायचे झाले तर मुंबईचे पोलीस आयुक्त अनामी रॉय यांची नेमणूक होताना तीन अधिकाऱ्यांना डावलून, बाजूला सारुन त्यांना कमिशनरपदी बढती देण्यात आली, हीच स्थिती डी.जी. पदावर नेमणूक करताना होती. अशा प्रकारे विशेष न्याय दिला म्हणून उच्च न्यायालयाने त्याला केराची टोपली दाखविली व शासनाची कृती कोर्टाने बेकायदेशीर ठरविली. पण या अनामी रॉयचे नाव कोणाच्या पाठिंब्यामुळे येते याचा विचार आपण करणार नाही काय हा महत्वाचा विषय आहे. जर त्यांचे विशेष असे कर्तृत्व असेल तर ते कोणते आहे याचीही माहिती होणे आवश्यक आहे. अनामी रॉयच्या फाईलवर सही करताना राज्याचे मुख्यमंत्री काय बोलले होते ते काही वर्तमानपत्रांनी छापले होते, त्यात मी जाणार नाही पण हे बोलत असताना सर्व पोलीस सिस्टमचे डिमॉरलायझेशन होत आहे याचा प्रामाणिकपणे स्वीकार करणार की नाही ? कशा प्रकारे पोलिसांच्या बढती होतात, कर्तुत्वाच्या आधारे होतात की नाही याचीही चर्चा करणे आवश्यक आहे. ॲडिशनल कमिशनर ऑफ पोलीस एका बिल्डरच्या केसमध्ये दुसऱ्या बिल्डरला गोवण्याचे काम

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ......

करतात. जुहू पोलीस स्टेशनच्या चार अधिकाऱ्यांनी जॉइंट कमिशनर ऑफ पोलिसाचे ऐकले नाही म्हणून त्यांना सस्पेंड केले होते. त्यानंतर त्या जॉइंट कमिशनर ऑफ पोलिसच्या विरोधात मी सभागृहात मुद्दा उपस्थित केला आणि रण उभे केले होते तो अधिकारी एका वरिष्ट नेत्याकडे आपल्या बायको-मुलांना घेऊन गेला आणि म्हणाला की, "साहेब मला वाचवा". मी ज्यावेळी यासंदर्भात अनामी रॉयला सांगितले त्यावेळेस त्याने त्या राजकीय नेत्याला फोन लावून माझ्या कानाला लावला तेंव्हा मी नाही म्हणू शकलो नाही. अशा प्रकारे एखाद्या डेव्हलपरच्या केसमध्ये अमुक एका डेव्हलपरला मदत करा हे कोण सांगतो ? याची माहिती मिळणे आवश्यक आहे. श्री. साळसकर, कामटे आणि शिंदे यांच्यावर आरोप नव्हते. कुठल्या तरी राजकीय पक्षाच्या बैठकीमध्ये कुठला तरी नेता म्हणणार आणि ते खरे असेल तर .......

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

विशिष्ट धर्माच्या लोकांची परेड घेतात परंतु बाकीच्यांची परेड करीत नाही. प्रहार दैनिकाच्या प्रकाशनाच्या वेळी वक्तव्ये येते आणि त्यानंतर हे सर्व सुरु होते. ज्यावेळेस रेल्वेमध्ये बॉम्बस्फोट झाला होता त्यावेळी एका नेत्यांनी म्हटले होते की, तुम्ही एका विशिष्ट धर्माच्या लोकांनाच अटक करतात, त्यांच्या घरावर छापे मारता, त्यांच्या मोहल्ल्यात छापे मारता. यासंदर्भात एका आयपीएस अधिका-याचे म्हणणे आहे की, " जर अशा प्रकारे दिल्लीतील नेत्यांची वक्तव्ये आली तर आमच्या तपासात अडथळे उत्पन्न होतात व नकळत आमच्यावर दबाव येतो. दिल्लीतील नेता कोणत्याही पक्षाचा असेल पण राजकीय हस्तक्षेप ज्या पध्दतीने होतात त्या राजकीय हस्तेक्षेपाविषयी खरे म्हणजे विचार करण्याची गरज आहे. सस्पेन्स अकाऊंट म्हणजे नेमके काय असते तर खब-याकडून ज्या खबरी मिळतात त्या खबरीच्या आधारे पोलीस काम करीत असते. परंतु पुण्याच्या पोलीस आयुक्तांच्या सस्पेन्स अकाऊंटवर चौकशी समिती बसवली गेली. मा. भुजबळ साहेब आपण सुध्दा गृहमंत्री म्हणून काम केलेले आहे. सस्पेन्स अकाऊंटवर चौकशी बसली गली हे आपल्या ऐकिवात तरी आहे काय ? मला तर वाटते ते गृहमंत्री होते की, निलंबित मंत्री होते हे समजत नाही. पोलीस खाते हे क्राईम थांबविण्यासाठी असले पाहिजे. लोक तर म्हणतात दि बिगेस्ट एनजीओ वॉज मुंबई अँड महाराष्ट्र पोलीस. माजी गृहमंत्र्यांनी केवळ डान्सबार बंद करा, बालमजुरी बंद करा, सावकारांना कोपरापासून ढोपरा पर्यंत सोलून काढा एवढेच काम केलेले आहे. पोलिसांचे खरे काम आहे क्राईम थांबवणे, दहशती थांबवणे हे आहे, अतिरेकी थांबवणे हे अहे. चांगले काम समाज कल्याण मंत्र्यांचे असेल किंवा बाकीच्या मंत्र्यांचे असेल परंतु गृहमंत्र्यांचे काम हे क्राईम थांबवणे हेच आहे. क्राईम थांबवण्यासाठी गृहमंत्र्यांनी आपले सर्व लक्ष एक केले पाहिजे. प्रत्येक अधिवेशनात त्यांचे एकच म्हणणे असायचे की, " माझे एवढेच पोलीस आहेत, मी काय करणार आहे, माझ्या फाईल्स मान्य होत नाहीत." आपण गृहमंत्री होते की, काय होते? गृहविभागाच्या फाईलींवर सहया कशा होत नाहीती? जर गृह खात्याला 100 कोटी रुपये दिले तर या 100 कोटी रुपयांमध्ये काय करायचे हे गृह खाते ठरविणार. त्या पैशामध्ये चरस-गांजा-अफीम याची खरेदी झाली तर त्याचे ऑडीट ए.जी. करतील. परंतु हे सर्व बघण्याचे अधिकार अर्थखात्याला कोणी दिले आहेत? माननीय गुजराथीसाहेबांनी प्रश्न विचारला होता अर्थ

....2

श्री. विनोद तावडे.....

खात्याला जे अवास्तव अधिकार आहेत ते अधिकार आपली राजकीय सिस्टीम खिळखिळी करणारे आहे का ?त्यामुळे गेल्या 8 वर्षात पोलिटीसायझेशन ऑफ पोलीस सिस्टीम झालेली आहे. यामुळे पोलीस डिमॉरलाईज झाले आणि मुंबईच्या पोलिसांची जी शान होती ती शान धुळीला मिळवण्याचे काम राजकीय हस्तक्षेपामुळे झालेले आहे. हल्ल्याच्या नंतर अनेक गोष्टी आता घडत आहेत. प्रत्यक्षात काय घडले, कोण कोठे होते, ज्याला जो भेटतो आणि लिहितो ते आपल्याला वाचावयास मिळते ते खरे आहे की, खोटे आहे याची माहिती नसते. माननीय सभापती महोदय माझी शासनाकडे मागणी आहे की, यासंदर्भात उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बाबत चौकशी करा. ही चौकशी आपण जनतेपुढे नाही आणली तरी चालेल पण कोणता पोलीस अधिकारी कोठे होता याची माहिती मिळणे आवश्यक होते. कै. हेमंत करकरे, साळसकर, कामटे यांनी अतिरेक्यांच्या मागे धाव घेतली तसेच

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे... 14:20

श्री.विनोद तावडे....

श्री.दाते धावले तसेच अन्य पोलीस अधिकारी सुध्दा अतिरेक्यांच्या मागे धावले. कोणी कंट्रोल रुममध्ये धावला तर कोणी डी.जी.कंट्रोल रुममध्ये धावला. कोणता अधिकारी कुठे पाहिजे होता आणि तो अधिकारी कुठे होता यासंबंधीची खरी माहिती सरकारकडे आली पाहिजे. वाटल्यास पोलीस विभागाची लाज जाऊ नये म्हणून सरकारने ती माहिती जाहीर करु नये. परंतु संबंधित अधिकाऱ्यांच्या सी.आर.मध्ये त्याची नोंद घेतली पाहिजे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी पोलीस अधिकारी श्री.नागंरे-पाटील यांनी अमूक केले तमूक केले असे सांगितले. त्यांनी काय केले हे मला माहीत नाही. श्री.नागंरे-पाटील यांनी काय केले हे कशामुळे कळले तर त्यांनी केलेल्या कामाची सी.डी.करुन त्या लोकांना वाटल्या. मी कशाप्रकारे काम केले त्याची सी.डी.काढून ती दाखवा म्हणून फोन करुन सांगत होते. श्री.नांगरे-पाटील हे कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी आहेत किंवा कसे हे मला माहीत नाही. परंतु मला त्यांच्यासंबंधी जी माहिती आहे ती सांगतो. ते रेव्ह पार्टीवर धाड टाकताना प्रथम चॅनेल्सला बोलावितात. दुसरा पोलीस अधिकारी प्रथम पोलीस ताफा जमा करील, त्याचे सहकारी जमा करील मग धाड टाकेल जेणेकरुन कोणी सुटणार नाही. परंतु श्री.नांगरे-पाटील प्रथम चॅनेल्सला बोलावितात आणि मग कारवाई करतात. रेव्ह पार्टीवर धाड टाकलीच पाहिजेच यात दुमत नाही. पण ती पोलीस अधिकाऱ्यांनी घातली पाहिजे. श्री.नांगरे-पाटील रेव्ह पार्टीवर धाड टाकतात सोबत चॅनेल्सवाले घेऊन जातात आणि मग त्या धाडीमध्ये पकडलेल्या 100-150 लोकांना पोलीस चौकीवर घेऊन जातात. त्यापैकी 40-50 जणांनी ड्रग घेतल्याचे निष्पन्न होते. तर ज्यांनी ड्रग्ज घेतले नाही त्यांची देखील धिंड निघते. त्या तरुण-तरुणींच्या आयुष्यात काय धडले याची त्यांनी कधी माहिती घेतली आहे काय ? ज्या दिवशी मुंबई शहरावर अतिरेक्यांनी हल्ला केला त्यावेळी कोणता अधिकारी कुठे पाहिजे होता, कोण रस्त्यावर लढायला पाहिजे होता याची माहिती होणे आवश्यक आहे. मला 1993 मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाची मालिका आठवली. त्यावेळी मुंबई पोलीस आयुक्त श्री.सामरा दूरदर्शनवर आणि पत्रकारांना सामोरे जाऊन सांगितले होते की, "परिस्थिती आमच्या आटोक्यात आहे."त्यावेळी आता इतकी चॅनल्सनव्हती. परंतु मुंबई शहरावर हल्ला झाला त्यावेळी मुंबईचे पोलीस आयुक्त श्री.गफूर कुठे दिसले नाहीत. मी दुसऱ्या दिवशी पोलीस आयुक्तांबरोबर तीन-चार तास होतो. परंतु ते आपल्या पोलीस अधिकाऱ्यांशी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

बोलताना वा त्यांना धीर देताना पाहिले नाही. पोलीस आयुक्तांनी ऑपरेशन करणाऱ्या अधिकाऱ्यांबरोबर राहून त्यांना धीर देणे आवश्यक होते. ते एक चांगले ऑफीसर आहेत म्हणून मला त्यांच्याबद्दल आदर वाटत होता. परंतु त्या कृतीवरुन मला मनोमनी वाटले की, श्री.गफूर हे चांगले ऑफीसर नाहीत. "Incharge of command & incharge of troop." त्यांनी ऑपरेशन करणाऱ्या अधिकाऱ्यांबरोबर राहून त्यांची हिम्मत वाढविली पाहिजे. मी एन.सी.पी.ए.जवळ होतो. ओबेरॉय हॉटेलच्या 18 व्या मजल्यावर कमांडोज निशाणा साधत होते. त्यांना तेथून निशाणा साधता येत नव्हता म्हणून त्यांनी 14 व्या मजल्यावरील रुम रिकामी करुन द्यावी म्हणून सांगितले. ते त्याठिक्‍ाणी गेले परंतु असे करताना त्यांनी खाली उभ्या असलेल्या अधिकाऱ्याला दहाव्या मजल्यावर जाऊन फायरिंग करा म्हणजे ते अतिरेकी आमच्या टप्प्यात येतील. तो पोलीस अधिकारी मोठ्या हिमतीने निघाला होता. परंतु त्याचा चेहरा सांगत होता की, आपण काय करायला चाललो आहोत, त्यांनी मला सांगितले की, माझ्याकडे जे रिव्हॉल्व्हर आहे ते गेली आठ वर्षे वापरात नाही. ते कितपत चालेल याची मला माहिती नाही. सभापती महोदय, मी अगोदर सांगितल्याप्रमाणे या आतंकवादी हल्ल्याच्यावेळी कोण पोलीस अधिकारी कुठे असावयास पाहिजे होता याची माहिती घेतली पाहिजे. त्याची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे. त्यावेळी मला कंट्रोल रुममधील मॅसेज ऐकायला यायचे ते ऐकले तर प्रत्येक अधिकाऱ्यांची एकमेकांवर राबवाराबवी चालू होती. क़ंट्रोल रुममधील मॅसेजेसची रेकॉर्डींग होते ते आपण ऐकावे.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ..

ज्या अधिका-यांची आम्ही भेट घेतली होती त्या भेटी नंतर त्यांनी आम्हाला असे सांगितले की जवळजळ 45 मिनिटे आम्हाला मदत येत नव्हती. अतिरेक्यांनी केलेल्या हल्यामुळे सगळीकडे गोंधळ निर्माण झाल्यामुळे कदाचित असे होणे स्वाभाविक आहे परंतु यासंबंधीची न्यायालयीन चौकशी होण्याची गरज आहे. ही चौकशी करुन वस्तुस्थिती बाहेर आली पाहिजे. जी काही वस्तुस्थिती आहे ती हा विभाग चालविणा-या मंत्र्यांना समजली पाहिजे. जनतेपर्यत जर ही माहिती आली तर पोलीस विभागाची आणि चांगल्या अधिका-यांची नाचक्की होईल त्यामुळे जनतेपर्यत ही माहिती येता कामा नये परंतु मंत्र्यांना तरी ही माहिती समजली पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. सध्या या अधिका-यामध्ये आपआपसातील इगोचा वाद मोठया प्रमाणावर विकोपाला चालला आहे. काही जणांच्या बलीदानाची ढाल केली जाते. श्री.अनामी रॉय असो वा श्री मारिया असो श्री.हसन गफूर असो वा अन्य काही पोलीस अधिकारी असोत ते सर्व अधिकारी स्वत:ची कातडी वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत मी माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास एक गोष्ट आणून देऊ इच्छितो की, 8 जुलै 2004 रोजी विशेष शाखा नंबर 4 ने एटीएसच्या स्थापनेसंबंधी एक परिपत्रक काढले होते त्या परिपत्रकाचा नंबर . एसएसए/1003/15/ विशेष शाखा नंबर 4 असा आहे. माननीय गृह राज्य मत्र्यांनी हा नंबर लिहून घ्यावा.त्या परिपत्रकानुसार दहशतवादी हल्याची चौकशी एटीएसने केली पहिजे. तसे जर असेल तर 26 , 27 नोव्हेंबर 2008 रोजी झालेल्या दहशतवादी हल्याची चौकशी मुंबईच्या क्राईम ब्रॅचकडे कशी गेली ? या घटनेची चौकशी क्राईम ब्रॅच का करीत आहे ? एटीएसकडे ही चौकशी का दिली नाही. एटीएस सक्षम नाही असे जर आपले मत असेल तर त्यांच्याविरुध्द कारवाई करावी. आज या अधिका-यांमध्ये आपआपसात राजकारण सुरु आहे .राष्ट्रपती पदक मिळविण्यासाठी अधिका-यांमध्ये स्पर्धा सुरु झालेली आहे त्यामुळे त्यांच्यात राजकारण होत आहे. काही अधिका-यांनी अतिरेक्याशी लढून प्राण्याचे बलीदान दिले. कै. दाते यांच्यासारखे काही अधिकारी अतिरेक्याशी लढले होते काही अधिकारी जखमी झाले आहे परंतु आज राष्ट्रपती पदक मिळविण्याची स्पर्धा इतकी तीव्र झाली आहे की क्राईम ब्रॅचचे सेन्ट्रल डिपार्टमेन्ट क्राईम ब्रॅचच्याच माझगाव आणि पार्ला डिपार्टमेन्टला सहकार्य करीत नाही. जो एक अतिरेकी पकडला आहे त्यासंबंधाने वर्तमानपत्रात रोज बातम्या छापून येत आहेत. या कहाण्या वर्तमानपत्रात कशा प्रसिध्द होत आहेत ? हा अतिरेकी पूर्ण

श्री.विनोद तावडे ..

प्रोटेक्शनमध्ये आहे त्याची चौकशी मोठा अधिकारी करीत आहे. अशा बातम्या प्रसिध्द होत आहेत पोलीस तपासातील चौकशीचा हा एक भाग असेल, समोरच्या व्यक्तीची दिशाभूल करावयाची असेल पाकिस्तान वर दबाव आणण्याच्या दृष्टीने अशा प्रकारच्या बातम्या प्रसिध्द केल्या जात असतील तर तो भाग वेगळा आहे परंतु त्या अतिरेक्याने आपल्या जबानी मध्ये जे काही सांगितले आहे त्यातील शब्दन् शब्द वर्तमानपत्रात प्रसिध्द केला जातो..संपूर्ण पान भर त्यासंबंधीच्या बातम्या प्रसिध्द केल्या जातात. काय केले पाहिजे याबाबतीत श्री.संजय दत्त आम्हाला शिकवायला लागले आहेत. एका प्रख्यात इंग्रजी वर्तमानपत्रात नेतृत्व कसे करावे हे तो आम्हाला सांगतो- टी.व्ही. च्या चॅनल्स समोर आपल्या पत्नीसह येऊन कसे केले पाहिजे आणि काय केले पाहिजे हे तो आम्हाला सांगतो. जो अतिरेकी पकडला गेला आहे तो त्याच्या विरुध्द बॉम्ब स्फोटातील आरोप सिध्द झालेला आहे ना असे असतांना त्याच्या बातम्या वर्तमानपत्रात प्रसिध्द का होत आहेत ? परंतु दुर्देवाची गोष्ट आहे की सापडलेल्या अतिरेक्याचे उदात्तीकरण केले जात आहे चार पत्रकारांना जर यासबंधीची माहिती दिली तर नंतरच्या काळात चार गोष्टी आपल्या छापून आण्ांवयाच्या आहेत त्या गोष्टी छापून आणण्यास मदत होते . तेव्हा कोणत्या बातम्या प्रसिध्द केल्या पाहिजेत यासबंधीचे नियम करण्याची आवश्यकता आहे आज कोणत्याही पोलीस स्टेशनमधील कोणताही अधिकारी कोणत्याही चॅनल्ससमोर बोलत असतो. चॅनल्स समोर कोणी बोलावे यासबंधी काही पध्दत ठरविलेली आहे की नाही ? पोलीस अधिका-यांनी वर्तमानपत्राशी व मिडियाशी बोलले पाहिजे कारण त्यांना माहिती मिळणे हा त्यांचा अधिकार आहे त्याच्या मार्फत ही माहिती जनतेपर्यत गेली पाहिजे परंतु मिडियाला सांगणारे अधिकारी कोण असावेत, त्यासबंधीची व्यवस्था कोणती आहे या बाबत काही नियम पाहिजे की नको ? जर नियम नसतीलतर अधिका-याला जे काही वाटेल ते तो बोलत जाईल व वर्तमानपत्रात छापून येईल. मध्यंतरी वर्तमानपत्रात असेही छापून आले होते की अमुक अतिरेकी पंजाबीमध्ये बोलला होता, तमुक अतिरेकी तामिळमध्ये बोलला होता.....

. **( सभापती स्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )**

नंतरश्री. सुंबरे

अमुद्रित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

KBS/KTG/SBT. श्री. गायकवाड नंतर --- 14:30

श्री. विनोद तावडे ....

अशा काही बातम्या येतही असतील. परंतु शासनाचा, पोलिसांचा एक विशिष्ट प्रतिनिधीच वर्तमानपत्र आणि मिडियाशी बोलेल आणि त्याच्याद्वाराच वास्तव माहिती बाहेर जाईल असे काही आपण करणे आवश्यक आहे. त्यामुळे गणवेशातील पोलीस अधिकारी जे बोलतात ते आजही लोक खरे मानतात आणिआज तरी त्याबाबत लोकांचा विश्वास आहे. सभापती महोदय, या घटनेबाबत आज काल जे वर्तमानपत्रांतून सातत्याने येत आहे, ही वर्तमानपत्रे जे काही देत आहे त्याची माहिती घेऊन त्यांच्यावर आवश्यक ती कारवाई करण्याची गरज आहे हे मला यथे आवर्जून सांगावेसे वाटते. सभापती महोदय, या दहशतवादी हल्ल्याच्या संदर्भातील कमांडो ऑपरेशन संपले त्याच्या दुसऱ्याच दिवशी मुंबईमध्ये पोलीस आयुक्तांनी पत्रकार परिषद घेऊन सांगितले की, या हल्ल्यामध्ये स्थानिकांचा सहभाग नव्हता. आता आपले पोलीस आयुक्त इतके इफिशिअंट आहेत की, त्या घटनेमध्ये 'लोकल इन्व्हॉल्वमेंट' नाही हे त्यांना कळले असेल. पण त्यात स्थानिकांचा सहभाग नव्हता तर मग त्याबाबतची चौकशी क्राईम ब्रँचकडे कशी आणि का जाते ? ही चौकशी एटीएस ऐवजी क्राईम ब्रँचकडे द्यायची असेलतर त्यासाठी महाराष्ट्र शासनाची अधिकृत परवनगी घ्यावी लागते, तशी परवानगी या बाबत घेतलेली नाही. मग याचे कारण काय ? त्यावेळी सरकार या राज्यात अस्तित्त्वात होते. राज्याचे गृहमंत्री नामदार श्री.आर.आर.पाटील यांचा राजीनामा येण्यापूर्वी ती बदली झाली होती आणि श्री.मारिया तर आधीच तेथे गेले होते. त्यांना अगोदरच माहिती होते की, असा असा फोन येणार आहे आणि ही चौकशी क्राईम ब्रँचकडे येणार आहे आणि त्यादृष्टीनेच त्यांचे काम सुरू झालेले होते. या सगळ्या गोष्टींनी पोलीस खाते अतिशय डिस्टर्ब झाले किंबहुना अशा गोष्टीतूनच पोलीस दलाचे खच्चीकरण होते. त्यामुळे याला जबाबदार काण आहे, काय आहे हे समोर आणण्याची गरज आहे. सभापती महोदय, या सगळ्या घटनांमध्ये मिडियाचा रोल जो काही होता त्याबद्दल अनेकांचे वेगवेगळे विचार आहेत. काहींनी त्याबाबत टीका केली आहे तर काहीही त्याबद्दल प्रशस्तीपत्रही दिले आहे. मी सुरूवातीस म्हटल तसे ही घटना अशा पद्धतीची पहिलीच घटना होती त्यामुळे पोलीस खात्यापासून, सामान्य माणसापासून, राजकीय नेत्यांपासून ते मिडियापासून सगळ्यांच्याच आयुष्यातील हा पहिलाच प्रसंग होता. माझी या निमित्ताने सरकारला विनंती आहे की, त्या 60-65 तासांतील सगळे शूटस् आपण स्क्रीन करावे आणि त्यात पोलीस खात्याचे जवान, एनआरएसचे कमांडोजच्या कारवाईसंबंधातील जी दृश्ये सुरक्षिततेच्यादृष्टीने

..... क्यूक्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तावडे .....

आपल्याला चुकीची वाटतील ती बाजूला काढा आणि त्या त्या चॅनेल्सच्या प्रमुखांना बोलावून घेऊन त्यांना तसे शूटस् दाखवून सांगा की हे नसते तरी चालले असते नव्हे बरे झाले असते. त्यामागील आपली कारणमिमांसा देखील त्यांना सांगावी. यातून मिडियादेखील मॅच्युअर होऊ शकते. त्याबाबत नुसती टीका करून होणार नाही तर असे त्यांना प्रत्यक्ष बोलावून घेऊन पटवून देऊन सांगितले गेले तर त्यातून चांगलेच निष्पन्न होईल. या साऱ्या घटनांची दृश्ये आणि माहिती देताना काही चॅनेल्सनी खरोखरी जबाबदारी काही दृश्ये दाखविलीच नाहीत. असे इतरही करू शकतात. मी माझ्या दिल्लीतील एका चॅनेल्सवाल्या मित्राला, जो त्या चॅनेलचा प्रमुख आहे त्याला बोललो की, सगळे राजकीय पक्ष एकाच भावनेत बोलतात की नाही ? आम्ही तर वेगवेगळ्या विचारातील राजकारण करणारी माणसे आहोत, तेव्हा आम्ही निश्चितपण वेगवेगळे बोलणार. पण 12 चॅनेल्स आपले आहेत त्यांनीही प्रत्येकाने वेगवेगळे दाखवायचे का ? तर त्याने देखील ते मान्य केले. तेव्हा या घटनेतून आपल्या पोलिसांनी, राजकीय माणसाने, सामान्य माणसान तसेच मिडियानदेखील शिकले पाहिजे. त्यादृष्टीने काही कॉंक्रीट गोष्टी त्यांच्यासमोर मांडल्या गेल्या पाहिजेत. ....

( यानंतर श्री. सरफरे .... आरआर 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

मला विश्वास वाटतो की, या गोष्टी जर मांडल्या गेल्या तर कबूल केल्याप्रमाणे मिडिया सुध्दा यापुढील काळात योग्य प्रकारची काळजी नक्की घेईल. या प्रकरणासंबंधी झालेल्या चर्चेच्या मांडणीनंतर सांगू इच्छितो की, मी विजय साळस्कर यांच्या घरी गेलो, हेमंत करकरे यांच्या घरी गेलो, शशांक शिंदे आणि बाकीच्या दहा-अकरा शहीद झालेल्या पोलिसांच्या घरी गेलो. त्यांच्या कुटुंबियांशी माझे बोलणे झाले. त्यांनी आपल्या भावना वेगवेगळया प्रकारे मांडल्या आहेत. त्यामधील एक भावना मा.श्री. भुजबळ साहेब आपणासमोर मांडीत आहे. त्यांनी माझ्याकडे हात जोडून विनंती केली की, पोलीस दलाचे राजकीयीकरण आपण थांबविले पाहिजे. पोलिसांचे खच्चीकरण चालले आहे ते आपण थांबविले पाहिजे. विजय साळस्कर यांची मुलगी टी.व्ही.समोर बोलत असतांना तिच्या शब्दामधून हेच विचार बाहेर येत होते. अशोक कामटे यांच्या पत्नीच्या तोंडून हेच विचार येत होते. पोलीस यंत्रणेचे राजकीय खच्चीकरण आपण थांबविले पाहिजे. आमचे पोलीस बहाद्दर आहेत. त्यांना बुलेटप्रुफ जॅकेट आणि रिव्हॉल्वर काय आहे हे माहीत आहे. ते निधडया छातीने अतिरेक्यांना सामोरे जायला, निधडया छातीने लढायला तयार आहेत. या पार्श्वभूमीवर एका पोलीस अधिकाऱ्याची मुलाखत मी वाचली. त्याने सांगितले की, माझी मुलाखत आपण छापू नका. मी माझे कर्तव्य केले. असे सांगणारा हा पोलीस अधिकारी आहे. आणि अशावेळी आपण पॉलिटीसायझेशन ऑफ पोलीस सिस्टीम थांबविणार आहोत की नाही? आज तुम्ही सत्तेत आहात, उद्या तुम्ही तिकडून ईकडे याल. परंतु जोपर्यंत पोलिसांचे राजकीयीकरण थांबत नाही तोपर्यंत नव्याने अशाप्रकारचे हल्ले होत रहातील. अशाप्रकारच्या हल्ल्यांना जर आपल्याला सडेतोड जबाब द्यावयाचा असेल आणि मी नमूद केल्याप्रमाणे पोलिसांचे राजकीयीकरण आपण थांबविले तरच या शहिदांना खऱ्या अर्थाने श्रध्दांजली ठरेल. आपण सर्व राजकीय नेत्यांनी तशाप्रकारच्या कृतीमधून या शहीदांना श्रध्दांजली अर्पण करु या. तरच या हल्ल्यामधून आपण काही शिकलो, या घटनेमधून आणि लोकांच्या बलिदानामधून आपल्याला काहीतरी शिकायला मिळाले. तरच हा महाराष्ट्र 4 पाऊले पुढे गेला असे होईल. म्हणून माझी आपणास हात जोडून विनंती आहे की, आपण पोलिसांचे राजकीयीकरण थांबवावे आणि ते थांबविण्याची आज गरज आहे, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, दिनांक 26 नोव्हेंबर 2008 रोजी रात्री मुंबई शहरावर अतिरेक्यांचा हल्ला झाला तो केवळ मुंबई शहरावर नव्हे तर या देशावर हल्ला झाला असे या शासनाने सांगितले आहे. या ठिकाणी भाषण करीत असतांना मा. सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेबांनी असे सांगितले की, 100 चुका झाल्या तरी चालतील परंतु कुठल्याही चुकांची पुनरावृत्ती होता कामा नये. 1993 मध्ये मुंबई शहरामध्ये बॉम्बस्फोट झाले. त्या बॉम्बस्फोटासंबंधी झालेल्या चौकशीमधून जे निष्कर्ष बाहेर आले, त्यावेळच्या झालेल्या चुका पुन्हा पुन्हा होत आहेत. 1993 मध्ये सुध्दा सागरी मार्गाने तस्करांनी आरडीएक्स मुंबईमध्ये आणले. तशाप्रकारचे आरडीएक्स व शस्त्रसाठा सागरी मार्गाने मुंबई शहरामध्ये आला. तर मग आपण काय नव्याने सुधारणा केली? या गोष्टीमधून आपण काय शिकलो? आज या ठिकाणी आपण दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यासंबंधी चर्चा करीत आहोत. पुढील सात-आठ वर्षांनंतर अशाचप्रकारची चर्चा आणि अशाचप्रकारचे उत्तर याठिकाणी आपणास अपेक्षित आहे. सन 2001 नंतर क्विक रिस्पॉन्स टीम नावाची 60 जणांची टीम अशाप्रकारच्या दहशतवाद्यांच्या हल्ल्याला उत्तर देण्यासाठी तयार केली. त्या टीमचे आज अस्तित्व काय आहे? ती कुठे आहे? त्यामधील फक्त 10 जवान अस्तित्वात आहेत. त्या 10 जवानांनी मुंबई पोलिसांच्या साथीने दहशतवाद्यांना थोपविण्याचे काम केले.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब .....

काही वेळा घोषणा केल्या जातात आणि त्या घोषणा अंमलात आणण्यापूर्वीच हवेत विरुन जातात. या सगळ्या बाबतीत ज्यावेळी मंथन करण्यासाठी बसतो त्यावेळी लक्षात येते की आपण फक्त घोषणा करतो. अशा प्रकारचा हल्ला झाल्यानंतर आपण शहिदांना श्रध्दांजली वाहतो आणि अधिवेशन संपल्यानंतर पुन्हा एकदा सगळे जण आपापल्या घरी जातात आणि पुन्हा ज्यावेळी हल्ला होतो तेव्हा पुन्हा जुन्या फाईल्स काढल्या जातात. आज या ठिकाणी सगळी चर्चा झाली. या चर्चेमध्ये बरेच विषय आले. अर्थ मंत्रालय विरुध्द गृह मंत्रालय हा वाद या घटनेच्या मुळाशी आहे असे एक चित्र दिसून येते. अर्थ मंत्रालय गृह खात्याला पैसे देत नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी नाव घेऊन सांगितले. जर पोलिसांना पैसे मिळाले नाहीत तर केवळ निधड्या छातीने पोलीस काय करणार ? मुंबईचे पोलीस जबरदस्त आहेत. त्यांनी आपली ताकद दाखवून दिलेली आहे. दहशतवाद्यांकडे असलेली शस्त्रे आणि मुंबई पोलिसांकडे असलेली शस्त्रे यावर खूप चर्चा झालेली आहे. त्या चर्चेमध्ये मी पुन्हा जाऊ इच्छित नाही. परंतु 1993 मध्ये जे बॉम्बस्फोट झाले होते तशाच प्रकारचे छुपे युध्द पुन्हा एकदा मुंबई शहराने अनुभवले. आज सांगितले जाते की, हे हल्ले पाकिस्तानातून केले जातात. आजही पाकिस्तानातून हल्ले केले जातात ही गोष्ट खरी असली तरी या हल्लेखोरांना मुंबई शहरातून मदत मिळते. पोलिसांची अशी बातमी आहे की, दाऊदचे नेटवर्क वाढले आहे. दाऊदच्या नेटवर्कची मदत मुंबईमध्ये हल्ला करण्यामध्ये झाली. मुंबईमध्ये दाऊदच्या कारवाया चालू आहेत. दाऊदच्या नातेवाईकांच्या आणि गँगस्टरच्या केसेस कोर्टात लढवल्या जातात. जोपर्यंत अशा प्रकारची मदत मिळत नाही तोपर्यंत दहशतवादी कृत्य करण्याची ते हिंमत करणार नाहीत. आजही मुंबई पोलिसांकडे रेकॉर्ड आहे. त्यांच्याकडे दाऊदच्या सगळ्या गॅन्गस्टर्सची नावे आहेत. ते कोणाशी जोडले गेले आहेत याचा पूर्ण इतिहास पोलिसांकडे आहे. त्याबाबतीत आतापर्यंत काय कारवाई झाली ? त्यांना कोणाचे संरक्षण मिळते ? या सगळ्या गोष्टी या चर्चेच्या निमित्ताने मुंबईच्या जनतेसमोर आल्या पाहिजेत. ते सागरी मार्गाने आले असे पुन्हा पुन्हा सांगितले जाते. ते सागरी मार्गाने येऊन हा हल्ला झाल्यानंतर दोन तीन दिवस मंत्रालयामध्ये नेव्हीचे अधिकारी, मेरीटाईम बोर्डाचे अधिकारी इकडून तिकडे फाईल घेऊन पळत होते. हा हल्ला झाला त्याच्या कित्येक वर्षे आधी केंद्रीय सचिव श्री. माधव गोडबोले

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

ॲड. अनिल परब .....

तसेच श्री. व्ही.एन.देशमुख यांनी आपला रिपोर्ट दिलेला आहे. तो रिपोर्ट मंत्रालयामध्ये धूळ खात पडलेला आहे. सागरी मार्गाचे रक्षण कसे केले पाहिजे, सागरी मार्गावर कसे अतिक्रमण होणार आहे या सगळ्या गोष्टी आपल्याकडे उपलब्ध असताना आपल्या निष्क्रियतेमुळे हे हल्ले परत परत होत आहेत. जोपर्यंत अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत यावर केवळ चर्चा करुन काही होणार नाही. माननीय श्री. छगन भुजबळ साहेबांसारखा आक्रमक नेता या पदावर आलेला आहे. आपल्या पोलीस दलाचे मनोधैर्य वाढवणे गरजेचे आहे. मी पोलिसांतील बऱ्याच अधिकाऱ्यांना ओळखतो. त्यांची मानसिकता दुभंगली आहे. जे पोलीस शौर्य गाजविणारे आहेत, जे पोलीस दिवस रात्र कठोर मेहनत करुन मुंबईच्या संरक्षणावर कवच आणू इच्छितात त्यांना केवळ त्यांचा वशिला नाही म्हणून किंवा त्यांचा कोणी गॉडफादर नाही, रेट कार्डमध्ये बसत नाहीत म्हणून उत्तम दर्जाचे पोस्टिंग मिळत नाही. मुंबई पोलीस स्टेशनचे रेट कार्ड आहे. कोणत्या पोलीस स्टेशनचा काय भाव आहे याची माहिती मी मागच्या वेळी सभागृहात दिलेली आहे. प्रत्येक वेळी आपण कायदा व सुव्यवस्थेच्या बाबतीत ओरडत असतो. पोलिसांची मानसिकता तुटलेली आहे. जे अधिकारी काम करतात तेच काम करीत आहेत. मुंबईमध्ये काही अधिकाऱ्यांची 100-100 कोटी रुपयांची मालमत्ता आहे आणि काही पोलीस महिन्याचा पगार पुरेल की नाही अशा मानसिकतेमध्ये जगत आहेत. काही पोलीस अधिकाऱ्यांचे 25-25 फ्लॅट आहेत परंतु जे पोलीस अधिकारी सरकारी निवासस्थानामध्ये राहतात ते सिलिंग कधी कोसळेल आणि आपण त्याखाली कसे गाडले जाऊ या मानसिकतेमध्ये जीवन जगत आहेत. त्यांच्याकडून आपण काय अपेक्षा करणार ? सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितले. या सगळ्या गोष्टींना जे पोलीस अधिकारी जबाबदार आहेत त्यांची देखील सखोल चौकशी झाली पाहिजे. ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी एनएसजीचे कमांडो येईपर्यंत शौर्याने संरक्षण केले त्यांना अशा प्रकारचा पुरस्कार मिळाला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. खंदारे .....

अडॅ.अनिल परब....

कालच्या या घटनेमध्ये जे पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी मारले गेले त्यांना शासनाचे संरक्षण मिळाले पाहिजे. श्री.नंदकुमार गोखलेंची केस मला माहिती आहे. ते डयूटीवर नव्हते, परंतु नागपाडयात दंगल झाली असल्याचे कळल्यावर ते बाहेर पडले आणि त्या दंगलीमध्ये मारले. त्यांना कापून टाकण्यात आले. डयूटीवर नसल्यामुळे त्यांना शासकीय फायदे मिळाले नाहीत. अशाप्रकारची कृती पुन्हा होणार नाही याची काळजी घेतली गेली पाहिजे. शासनाने या हल्ल्यात मरण पावलेल्यांच्या कुटुंबियांना 25 लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे, ही रक्कम वाढविली पाहिजे. कोणतेही पोलीस अधिकारी शस्त्राविना स्वत:चा जीव घालवितात त्याला ते स्वत: जबाबदार नसतात. त्यांना शस्त्रानिशी न पाठविणारे हे शासन जबाबदार आहे म्हणून शासनाने जबाबदारी घेतली पाहिजे. अशाप्रकारच्या घटनांमध्ये कोणी पोलीस कर्मचारी शहीद झाला तर त्यांच्या कुटुंबियांना किमान 50 लाख रुपये मदत मिळाली पाहिजे, शासकीय घर मिळाले पाहिजे, त्याची कोणतीही चौकशी होऊ नये, अशाप्रकारची सुरक्षितता वाटली तर तो निधडया छातीनिशी पुढे येईल. शहीद तुकाराम ओंबळे यांनी सर्व गोळया पोटात घेतल्या नसत्या, त्यांनी त्याची स्टेनगन पकडली नसती तर हा कसाब पकडला गेला नसता आणि कसाब पकडला गेला नसता तर या हल्ल्यात पाकिस्तानचा हात आहे हे कधीही उघड झाले नसते. आज एटीएस की क्राईम ब्रँच हा वाद सुरु आहे. परंतु श्री.राकेश मारिया यांच्यासारखे अधिकारी जीवाचे रान करुन या प्रकरणाचा तपास करीत आहेत. त्यांच्या पाठिशी सर्व शासकीय यंत्रणा उभी राहिली पाहिजे. मी या सर्व अधिका-यांना भेटून त्यांच्याकडून माहिती घेत असतो. त्यावेळी माझ्या लक्षात येते की, शासनाने सुरक्षिततेला प्राधान्य दिले पाहिजे ते दिले जात नाही. महत्वाच्या व्यक्तींना सुरक्षितता देणे, डान्स बारला आळा घालणे ही गृह खात्याची प्राथमिकता असेल तर अधिकारी तरी काय करणार ?

सभापती महोदय, या हल्ल्यांसाठी सागरी मार्गाने सर्व मटेरियल आले आहे. 1993 साली सुध्दा सागरी मार्गाने मटेरियल आले होते. त्यावेळी सागरी मार्गाने आरडीएक्स सारखी स्फोटके आणणारी सर्व माणसे सध्या कोठे आहेत याची कधी चौकशी करण्यात आली आहे काय, या

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

केसमधील ज्या लोकांना पकडले जाते ते नंतर जामिनावर सुटतात, नंतर ते काय करतात त्याची तपासणी केली जात नाही, त्यांचा कोणीही रेकॉर्ड ठेवत नाही. त्यावेळच्या मुंबई बॉम्ब स्फोटातील 100 आरोपींना सजा झाली आहे. अशा लोकांना मदत करणारे लोक मुंबईत उघडपणे फिरत आहेत. या लोकांना मदत करणा-या लोकांविरुध्द देशद्रोहाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. कारण दहशतवाद्यांना मदत करणारे देशद्रोहीच आहेत, परंतु अशा लोकांविरुध्द देशद्रोहाचा गुन्हा दाखल झालेला नाही. देशद्रोहाच्या गुन्हयाची शिक्षा ही फाशीच आहे. त्यामुळे छोटा देशद्रोह, मोठा देशद्रोह अशी विभागणी होऊ शकत नाही. या बॉम्ब स्फोटासाठी मदत करणारा माणूस हा छोटा आहे की मोठा आहे असे न समजता तो देशद्रोहीच आहे. त्याला फाशीची शिक्षाच दिली पाहिजे अशी कायद्याद्वारे तरतूद केली पाहिजे. सभापती महोदय, राज्य सरकारने केलेले कायदे केंद्र सरकार अडवून ठेवते. केंद्रात आणि राज्यात एकाच पक्षाचे सरकार आहे. म्हणून शासनाने पाठपुरावा करुन राज्यात टाडा, पोटासारखे कायदे लागू करावा. हे कायदे आतंकवाद्यांसाठीच तयार करण्यात आले असल्यामुळे राज्यात ते लागू करण्यासाठी शासनाने पुढाकार घेतला पाहिजे. या कायद्याचा बडगा त्यांच्यावर उगारला जात नाही तोपर्यंत त्यांना भीती वाटणार नाही. आज 10 आतंकवादी होते असे म्हटले जाते. पण मला ते खरे वाटत नाही. मी या सर्व गोष्टीची जवळून पाहणी केली आहे. केवळ 10 लोकांच्या भरवशावर हे एवढे मोठे हत्याकांड होऊ शकत नाही. ओबेरॉय, ताज हॉटेलमधील गर्दीचा फायदा घेऊन यातून सुटलेले आरोपी आजही मुंबई शहरात फिरत असतील. याबाबत पोलीस काही सांगत नाही. मुंबईची जनता बॉम्बस्फोटाने घाबरली नव्हती. आपण दुस-या दिवशी म्हणत होतो की, 'दॅट इज दी स्पिरीट ऑफ मुंबई.' परंतु अशाप्रकारचे स्पिरीट आता मुंबईत राहिलेले नाही. सकाळी बाहेर पडलेला माणूस संध्याकाळी घरी येईल याची शाश्वती राहिलेली नाही. सी.एस.टी.स्टेशनमधील लोकांचा काय अपराध होता ? त्या स्टेशनमध्ये 8 दिवसापासून आरडीएक्स पडलेले होते. सह पोलीस आयुक्त त्या आरडीएक्सवरुन चालत गेले त्यावेळी त्यांना सुध्दा माहीत नव्हते. पोलीस हवालदारांनी येथे आरडीएक्स पडलेले आहे असे त्यांना बाजूला करुन सांगितले. त्या जागेवर 8 किलो आरडीएक्स पडून होते, तेथील

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

पोलिसांना ते 4 दिवस कळले नाही. हा कोणाचा दोष असू शकतो ? घटनास्थळी जे बघे लोक येतील त्यावेळी त्या आरडीएक्सचा त्यांना स्फोट घडवून आणावयाचा होता. पहिल्या दिवशी नव्हे तर दुस-या, तिस-या दिवशीही मुंबईत प्रचंड हत्याकांड घडवून आणण्याचे त्या आतंकवाद्यांनी षडयंत्र रचले होते. रॉ व इंटेलिजन्स ब्यूरो यांच्या वादामध्ये आज मुंबईतील जनता भरडली जात आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ॲड. अनिल परब..

हा केवळ मुंबईचाच नाही तर संपूर्ण देशाच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. या राज्याची आर्थिक धडी संपूर्णपणे उस्कटवून टाकण्याचे काम चालू आहे. म्हणून अशा गोष्टी न होण्यासंबंधी जबाबदार असणारी यंत्रणा जो पर्यन्त सक्षम आणि मजबूत होत नाही तोपर्यन्त याबाबतीत आपणाला कोणतेही उत्तर देता येणार नाही. आज आपण शहीदांना आदरांजली वाहू, त्यांच्या कुटुंबियाबाबत दोन दिवस बोलू. परंतु मी जबाबदारीने सांगतो की एक वर्षानंतर शहीद झालेल्या जवानाच्या घरी कुणीही जाऊन विचारणार नाही. आता त्याच्या कुटुंबियांना सरकारी धर खाली करण्याची नोटीस लागण्याची शक्यता आहे. शासनाने त्यांना घर देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्या निर्णयाची ताबडतोबीने अंमलबजावणी करावी. पोलिसांना अत्याधुनिक शस्त्रे देण्यासाठी ताबडतोबीने पैसे उपलब्ध करुन देण्याची घोषणा आपण केली. परंतु हे पैसे केव्हा मिळतील ? सभापती महोदय 22 हजाराचे बुलेट प्रूफ जाकीट 7 हजारामध्ये विकत धेतले जाते. खरे म्हणजे ज्या अधिका-याने हे बुलेट प्रूफ जाकीट घेण्यास मंजुरी दिली त्या अधिका-याला ते धालून आणि त्याच्यावर दोन गोळया झाडून ते जाकीट योग्य आहे की नाही याची तपासणी करावयास पाहिजे होती. केवळ मंत्रालयामध्ये बसून फायलींवर सह्या करणारे हे अधिकारी आमच्या पोलिसांच्या जिवाशी खेळले आहेत. त्यांच्यामुळे आज आमचे पोलीस अधिकारी आणि पोलीस मारले गेले आहेत. त्यांच्याकडे चांगले बुलेट प्रुफ जाकीट, हेल्मेट, एके-56 सारख्या स्टेनगन्स असत्या तर त्यांनी अतिरेकांना ताबडतोब कंठस्नान घातले असते.

सभापती महोदय, विलेपार्ले येथे टॅक्सीमध्ये बॉम्बस्फोट झाला त्यावेळी मी तेथेच जवळपास होतो. तो स्फोट इतका भयानक होता की, त्या ठिकाणी असलेल्या माणसांचे फक्त मासांचे गोळे आम्ही जमा केले आणि कूपर हॉस्पिटलमध्ये पाठविले. रेल्वे बॉम्बस्फोटामध्ये देखील अशीच परिस्थिती अनुभवायला मिळाली. त्यावेळी देखील लोकांची प्रेत मी उचलली. माझ्या मनात असा विचार येतो की, लोकांची प्रेते उचलण्याचेच माझ्या नशिबी आहे काय ? शासनाच्या नाकर्तेपणामुळे प्रत्येक वेळी अशा घटना घडल्यानंतर लोकांची प्रेत उचलून त्यांच्या नातेवाईकांना कळविण्याचे प्रसंग माझ्यावर आलेले आहेत. असे प्रसंग येऊ नयेत म्हणून पक्षीय राजकारण बाजूला ठेवून आपली सुरक्षा यंत्रणा सक्षम आणि मजबूत केली पाहिजे. आपला 12 नॉटीकल माईल्स सागरी

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ॲड. अनिल परब..

किनारा आहे. त्यावर गस्त ठेवण्यासाठी एका फायबरच्या बोटीतून केवळ 5 पोलीस जातात. हे 5 पोलीस असे आहेत की त्यांना समुद्रामध्ये पोहायला देखील येत नाही. त्यांना 175 रु. अलाऊन्स देण्यात येतो. 175 रु.मध्ये कोणता पोलीस आपला जीव धोक्यात टाकील ? गोळीबारामध्ये सहज फुटू शकेल अशी फायबर बोट पोलिसांना दिलेली आहे. या बोटीतून गेलेला पोलीस परत येईल याची शाश्वती नाही. म्हणून त्यांना फायबर ऐवजी ॲल्यूमिनच्या बोटी दिल्या पाहिजेत. यासाठी राजकीय इच्छा शक्तीची आवश्यकता आहे. सभापती महोदय्, लोकांची सुरक्षितता हे पहिले प्राधान्य असले पाहिजे. या घटनेनंतर लोकांच्या टी.व्ही.वरील प्रतिक्रिया पाहून आम्हाला आमदार, खासदार म्हणवून घेण्यास लाज वाटते. लोकप्रतिनिधींना लोकांनी आरोपिच्या पिंज-यामध्ये उभे केलेले आहे. या पिंज-यातयून बाहेर यावयाचे असेल तर या सर्व परिस्थितीचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मला कोणत्याही गोष्टीचे राजकारण करावयाचे नाही. परंतु डी.जी., अे.जी.च्या नियुक्तीबाबत मॅटने शासनावर ठपका ठेवला, कोर्टाने चपराक दिली. शासनाच्या अधिका-यांकडे आणि हवालदारांकडे रेटकार्ड असते. सकाळी ड्युटीवर आलेला अधिकारी आणि हवालदार रात्री किती पैसे घेऊन जातात हे रेटकार्डवरुन ठरते. त्यांची ही मानसिकता बदलण्याची अतिशय आवश्यकता आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

..नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ KGS/ SBT/ प्रथम श्री. शिगम 14:55

श्री. अनिल परब..

आणि म्हणून पोलीस अधिकारी आणि कर्मचा-यांचे पगार वाढविले पाहिजेत, तसेच त्यांना इतरही सवलती शासनाने उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. राज्यातील पोलीस यंत्रणेला अत्याधुनिक शस्त्रांचा पुरवठा केला गेला पाहिजे. पोलिसांना सर्व प्रकारच्या सोयी सुविधा मिळता आहेत किंवा नाही ही गोष्ट पाहण्याची शासनाची तसेच आपली सर्वांची जबाबदारी आहे. आम्ही या घटनेसंबंधी राजकारण करु इच्छित नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले की, दहशतवादाचे उच्चाटन करण्यासाठी आम्ही तुमच्या सोबत आहोत. तुमचे पाप आमच्या डोक्यावर घेण्यासाठी आम्ही तुमच्या बरोबर नाही. यासंबंधीच्या तुमच्या सुधारणांमध्ये आमचा देखील सहभाग असला पाहिजे, त्यामुळे आम्ही तुमच्या बरोबर आहोत. या विषयासंबंधी कोणत्याही प्रकारचे राजकारण न आणता याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी ज्या काही गोष्टी निदर्शनास आणून दिलेल्या आहेत, तसेच मौलिक सूचना केलेल्या आहेत, त्या सूचनांचा गांभीर्याने विचार करावा. तसेच याबाबतीत सर्वंकष असा ॲक्शन प्लॅन माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला सादर करावा अशी माझी विनंती आहे. तसेच आपणाकडून जो ॲक्शन प्लॅन सादर केला जाईल त्या अनुषंगाने कठोरपणे कार्यवाही करावी अशी देखील मी अपेक्षा व्यक्त करतो. भविष्यात शासनाच्या निष्क्रीयतेमुळे पोलिसांचे प्राण जाणार नाहीत याची शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी अशा प्रकारची शासनास विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

--------------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मुंबई शहरात जो दहशतवादी हल्ला झाला, त्या अनुषंगाने मला फक्त तीन, चार प्रश्न उपस्थित करावयाचे आहेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी अधिकाराच्या संदर्भात काही महत्वाचे प्रश्न उपस्थित केले. आपण जेव्हा दिल्ली येथून कमांडो मागविले, त्यांना घटनास्थळापर्यंत पोहोचण्यासाठी कशा प्रकारे उशीर झाला याबाबतची त्यांनी माहिती दिली. दिल्लीतील कमांडो मुंबई येथील एअर पोर्ट येथे उतरल्या नंतर त्यांना घटनास्थळापर्यंत येण्यासाठी उशीर का झाला? या प्रश्नाचे उत्तर सभागृहात शासनाकडून दिले गेले पाहिजे. कमांडोंना एअर पोर्टवरुन घटनास्थळी आणण्यासाठी साधी वाहने देखील का उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत या गोष्टीची देखील माहिती या सदनाला दिली गेली पाहिजे. ही बाब सर्वमान्य झाली आहे की, बुलेटप्रुफ जॅकेटमधून आणि हेल्मेटमधून गोळया घुसल्यामुळे आपले पोलीस जवान आणि पोलीस अधिकारी धारातीर्थी पडले. ही बुलेटप्रुफ जॅकेटस् रिजेक्ट झाली होती, तर मग ही खरेदी कोणी केली ? का केली ? या प्रश्नांचे देखील उत्तर मिळाले पाहिजे. दिनांक 19 नोव्हेंबर, 2008 रोजी यासंबंधी केंद्र शासनाकडून राज्य सरकारला इशारा मिळाला होता. त्याबाबतीत राज्य शासनाकडून कार्यवाही का केली गेली नाही ? यासंबंधी राज्य शासनास जी यंत्रणा सज्ज करावयास पाहिजे होती ती का केली नाही ? ती यंत्रणा सज्ज करण्यास शासन कुठे कमी पडले ? या सर्व प्रश्नांची उत्तरे सभागृहात मिळाली पाहिजेत. एटीएस प्रमुख हेमंत करकरे यांनी सर्व पंचतारांकित हॉटेल्सना यासंबंधी पत्र पाठविले होते. पंचतारांकित हॉटेल्सवाल्यांनी याबाबतीत काय रिस्पॉन्स दिला याबाबचा देखील खुलासा सभागृहात झाला पाहिजे. या घटनेच्या संदर्भात अधिका-यांचा काही प्रमाणात दोष आहे. सभागृहाने मान्य केले पाहिजे की, मुंबई वाचविण्याचा प्रयत्न आमच्या जवानांनी, आमच्या पोलीसांनी ज्या पध्दतीने केला, त्यांनी शौर्याची परिसीमा दाखविली, त्यांचा उचीत गौरव झाला पाहिजे. किमान या सगळया प्रकरणामध्ये बाधा येता कामा नये ही गोष्ट काळजीपूर्वक पाहिली पाहिजे. तुकाराम उंबाळे यांचे शौर्य मोठे आहे, त्यांच्या हातात कोणत्याही प्रकारचे शस्त्र नसताना त्यांनी एक जीवंत अतिरेकी पकडून दिला. म्हणून जागतिक समुह आज आपल्या बाजूने उभा आहे. एवढे मोठे हौतात्म्य तुकाराम उबाळे यांनी केलेले आहे. ही बाब लक्षात घेऊन आपण पोलिसांच्या संदर्भात अधीक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. एका बाजूला आपल्या राज्यातील पोलिसांच्या

3...



ABG/ KTG/ KGS/ SBT/ प्रथम श्री. शिगम 14:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

हाती शस्त्रे नाहीत, दुस-या बाजूला पोलिसांना सन्मानपूर्वक वेतन दिले जात नाही. याबाबतीत शासन कधी तरी सुधारणा करणार आहे किंवा नाही याबाबतीत देखील शासनाने खुलासा करणे आवश्यक आहे. पोलीस यंत्रणेकडे आपले पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. त्यास वित्त विभाग सुध्दा जबाबदार आहे. वित्त विभागाच्या अधिका-यांनी पोलीस विभागाच्या फाईल्स दाबून ठेवल्या, प्रलंबित ठेवल्या, त्या अधिका-यांविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे किंवा नाही असा माझा प्रश्न आहे व त्या प्रश्नाबाबतचा देखील उत्तराच्या भाषणात खुलासा झाला पाहिजे. माननीय उप मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांचे अभिनंदन करतो की, त्यांच्याकडे गृह खाते नसताना ते अर्ध्या तासात घटनास्थळी पोहोचले आणि त्या ठिकाणी यंत्रणा कार्यरत करण्यासाठी त्यांनी स्वत:हून पुढाकार घेतला. अशा पध्दतीची राजकीय इच्छाशक्ती आपल्याला मिळाली असती तर पुढचा अनर्थ टळला असता. आपल्याकडे हेलीकॉप्टर्स नाहीतं, आपल्याकडे पोलिसांसाठी लागणारी अत्याधुनिक शस्त्रे नाहीत, लाठया आणि काठयांनी पोलीस आपले रक्षण करतात....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ KTG/ SBT/ 15:00

श्री.कपिल पाटील.........

आणि त्यामुळे या पोलिसांना शस्त्रसज्ज करणे, आधुनिक प्रशिक्षण देणे महत्वाचे आहे. आता आपण एम.एस.जी.स्थापन करीत आहोत. एम.एस.जी.आपत्तीच्या काळात असेल. प्रत्येक नाक्यावर एम.एस.जी.असू शकत नाही. पोलीस शौर्याने लढले. त्यांच्या हातात अधिक शस्त्रे असती तर कदाचित त्यांनी अधिक संरक्षण केले असते. माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी अतिशय महत्वाची गोष्ट सांगितली. पोलिसांचे राजकीयीकरण होता कामा नये. त्यांनी हेही सांगितले की, पोलिसांचे मनोबल, धैर्यबल टिकले पाहिजे. ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. काल सभागृहात मी याच भावनेने बोललो होतो. माननीय सभापतींचा सर्वाधिकार असतो. मी तो रिपिट करीत नाही. पण हेमंत करकरे साहेबांचे जे दु:ख होते, ज्या वेदना होत्या त्या त्यांच्या वीर पत्नीने बोलून दाखविल्या. त्या दु:खाचे हरण करणार आहोत की नाही हा महत्वाचा प्रश्न आहे. आज बाहेरची जनता आपल्याकडे बोट दाखविते. राजकीय नेतृत्वाबद्दल विश्वास राहिलेला नाही. केवळ या बाजूने किंवा त्या बाजूने नव्हे तर सगळ्या राजकीय नेत्यांबद्दलचा प्रश्न आहे. सत्ताधारी पक्षाबद्दल नव्हे तर विरोधी पक्षाबद्दल सुध्दा जनता तितकीच गंभीर आहे. एकूणच पोलिसांचे मनोबल वाढविणे आणि जनतेच्या मनात विश्वास निर्माण करणे ही जबाबदारी आपणा सर्वांची आहे. ही लढाई एकजुटीने करणार आहोत की नाही हा प्रश्न आहे. यापुढच्या काळात पोलिसांचे मनोधैर्य कमी होऊ द्यायचे नसेल, जनतेमधील विश्वासार्हता कमी होऊ द्यायची नसेल तर जसे पक्षभेद विसरुन एकत्र उभे आहोत त्याप्रमाणेच जात, पंथ, भाषा, प्रांत या पलिकडे जाऊन विचार करणार असू तरच देशाचे संरक्षण करु शकतो. ज्या ज्यावेळेला या भेदांनी देश ग्रासला, राज्य ग्रासले त्या त्यावेळेला अतिरेकी हल्ले प्रखर झालेले आहेत हे इतिहास सांगतो. म्हणून यामध्ये सुधारणा करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. मुंबईच्या पोलिसांनी आणि जवानांनी जी शौर्याची परिसीमा गाठली त्याची आठवण यापुढच्या काळात जपली पाहिजे. हेमंत करकरे यांची 12 डिसेंबर रोजी जयंत होती. त्या दिवशी आम्ही मुंबईतील सर्व शाळांना आवाहन केले, त्यानुसार शौर्यदिन पाळला गेला. माझी शासनाला आणि उपमुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, 12 डिसेंबरच्या दिवशी केवळ हेमंत करकरे नव्हे तर तुकाराम ओंबळे असतील, विजय साळसकर असतील, संदीप उन्नीकृष्णन असेल, गजेंद्र सिंह, अशोक कामटे असतील जे अनेक वीर या हल्ल्यामध्ये शहीद झाले ज्यांनी आपल्या प्राणाची शर्थ केली त्यांची आठवण केली पाहिजे. त्याप्रमाणे सन्माननीय सदस्य

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ KTG/ SBT/ 15:00

श्री.कपिल पाटील.........

श्री.अरुण गुजराथी यांनी सांगितल्याप्रमाणे एका बाजूला शौर्य दिन पाळणे आणि पाठ्यपुस्तकामध्ये त्याचा समावेश करणे महत्वाचे आहे. 26 नोव्हेंबर, 2008 रोजी काय घडले आणि त्याबाबत आपल्या जवानांनी एकजुटीने प्राणांची कशी शर्थ केली, तुकाराम ओंबळेंनी कसे शौर्य दाखविले हे त्यांच्यापुढे जाणे आवश्यक आहे. उद्याची पिढी यातूनच शिकते. एक शिवराय इतकी वर्षे पुरतात. त्यांचा आदर्श दोन-तीन पिढ्यांपुढे दाखविला गेला आहे. त्यामुळे यापुढच्या पिढीला या शौर्याची आठवण सदोदित राहिली पाहिजे एवढेच बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद!

--------------

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ KTG/ SBT/ 15:00

श्री.जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, आज सभागृहामध्ये अतिशय गंभीर आणि अत्यंत महत्वपूर्ण विषयावर आपण चर्चा करीत आहोत. 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबई शहरावर झालेला आतंकी हल्ला हा खरे म्हणजे केवळ बॉम्बस्फोटसारखा हल्ला नव्हेतर अक्षरश: ज्याला युध्द म्हणता येईल अशी युध्दसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. अतिरेक्यांनी छत्रपती शिवाजी टर्मिनसमध्ये बेछूट गोळीबार केला. लिओपोल्ड कॅफेमध्ये केलेला बेछूट गोळीबार, ओबेरॉय आणि ताज या पंचतारांकित हॉटेल्समध्ये, तद्वत मुंबईतील विविध ठिकाणी केलेल्या गोळीबारामुळे निर्माण झालेली परिस्थिती ही युध्दजन्य होती. मुंबई पोलीस दलातील नामवंत अधिकारी, ज्यांचा महाराष्ट्राला गौरव वाटतो, ज्यांच्या कर्तृत्वाचा महाराष्ट्राला गौरव वाटतो............

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड .........

आणि या अधिकाऱ्यांच्या कर्तबगारीमुळेच मुंबईच्या पोलीस दलाची तुलना स्कॉटलँड यार्डच्या पोलीस दलाबरोबर व्हायला लागली. दुर्दैवाने या हल्ल्यात मात्र अनेक अधिकाऱ्यांना शहीद व्हावे लागले. त्याचप्रमाणे आतंकवाद्यांशी लढताना एनएसजीचे कमांडो श्री. संदीप उन्नीकृष्णन् यांना शहीद व्हावे लागले आणि एक मोठा प्रश्न या राज्यातील जनता, राज्य तसेच देशासमोर उभा राहिला. मुंबईत अतिरेकी आले आणि हल्ला केला हे आपण बघितले. परंतु ज्या पध्दतीने त्यांनी हल्ला केला त्यामुळे राजकीय कारणमिमांसेचाही विचार आपल्याला करावा लागणार आहे. ज्या पध्दतीने आपल्या देशाचा आर्थिक विकास होतो, आर्थिकदृष्टया मजबूत होतो आणि त्यापेक्षा महान अशी लोकशाही परंपरा आपल्या देशाची आहे व या परंपरेवरच हल्ला करण्याचा अतिरेक्यांचा हा प्रयत्न होता. यापूर्वी सुध्दा आपल्या देशात विविध ठिकाणी बॉम्बस्फोट झाले, त्यात दिल्लीत तसेच रेल्वेमध्ये आणि अक्षरधामवर हल्ला अशा प्रकारे विविध हल्ले करण्यात आले आणि यामागे एकच हेतू दिसतो की, देशातील लोकशाहीवरच हल्ला करावयाचा. या अतिरेक्यांपैकी एक अतिरेकी पोलिसांच्या सतर्कतेमुळे आपल्या हाती लागला आणि त्या माध्यमातून संपूर्ण षडयंत्र जगासमोर आले व संपूर्ण जगाने आतंकवाद्यांबाबतची आपली भूमिका योग्य असल्याचे मान्य केले, आपल्या भूमिकेची पाठराखण केली, अशी आपली परराष्ट्र नीती आहे. ही घटना घडल्यानंतर अनेक गोष्टी समोर आल्या व त्यासंदर्भात माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उदाहरण दिले, त्यात पोलिसांच्या मनोधैर्याचाही उल्लेख झाला, त्यांच्याकडील शस्त्रास्त्रांबाबतची चर्चा झाली. एकाच वेळेस मुंबईत अतिरेकी घुसतात, आरडीएक्स आणतात, स्टेनगन, अेके-47 सारखी आधुनिक शस्त्रे घेऊन जे चित्र लोकांच्या समोर उभे करतात परंतु आपल्या पोलिसाकडे त्यांचा सामना करण्यासाठी शस्त्रास्त्रे नसल्यामुळे विजय साळसकर , अशोक कामटे तसेच हेमंत करकरे सारख्या अधिकाऱ्यांच्या छातीची चाळण होते हे चित्र देखील सामान्य माणसासमोर आले, अशा वेळेला सामान्य जनतेला शासनाच्या विश्वासाबद्दलचा प्रश्न सहाजिकच निर्माण होतो. हे सर्व करीत असताना या सभागृहात चर्चा होत आहे त्यावेळी पोलिसांच्या कमजोरपणाचीही चर्चा होण्याची गरज आहे. पोलिसांना आधुनिक शस्त्रे देण्याच्या बाबतीत विचार होणे आवश्यक आहे. गृह खात्याची फाईल अर्थ खात्याकडे अडकली आणि वेळेवर मंजुरी मिळाली नाही म्हणून शस्त्रे उपलब्ध होऊ शकली नाहीत, अशी माहिती

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड...........

मिळाली हे योग्य नाही. आता माननीय अर्थमंत्री देखील या सभागृहात आहेत. सुदैवाने अर्थमंत्री असलेले आता गृहमंत्री झालेले आहेत आणि त्यामुळे भविष्यात असा प्रश्न पुन्हा निर्माण होणार नाही. तसाच योग केंद्रातही आला. केंद्रात सुध्दा अर्थमंत्र्यांकडे गृह खाते देण्यात आले. या सर्व परिस्थितीत मला दोन तीन सूचना करावयाच्या आहेत. त्यात एक म्हणजे अशा प्रकारचा अतिरेकी हल्ला मुंबईतील मुख्य ठिकाणांवर होणार असल्याची माहिती ताज हॉटेलच्या व्यवस्थापनाला मिळाल्यानंतर या हॉटेल्सच्या व्यवस्थापनाने सुरक्षेच्या दृष्टीने कोणती कारवाई केली यासंबंधीची माहिती देणे आवश्यक आहे. कारण हॉटेल व्यवस्थापनाने सुरक्षेच्या दृष्टीने दुर्लक्ष केले की काय याचाही गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे..

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड ...

हे सर्व करीत असतांना शहराच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून भविष्यात योजना आखत असतांना सरकारला माझी विनंती आहे की, ज्या प्रमाणे लंडन येथे सर्व्हीलन्स कॅमेरे बसविण्यात आले असून त्याद्वारे पूर्ण नियंत्रण करण्यात आलेले आहे तशाच प्रकारचे कॅमेरे मुंबईमध्ये सुध्दा बसविण्याची नितांत आवश्यकता आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. हे करीत असतांना टेक्निकल सर्व्हीलन्स कॅमेरे लावण्याची सुध्दा नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये पीआरओची पोस्ट असते. आपल्या पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रामध्ये जाऊन किती सोसायटया आहेत, किती झोपडपट्टया आहेत, सार्वजनिक काम करणारे कार्यकर्ते कोण आहेत या सर्वांची पीआरओने भेट घेऊन संपर्क वाढवला पाहिजे. परंतु दुर्दैवाने हा प्रकार आता कोठेही दिसून येत नाही. त्यामुळे हे नेटवर्क पुन्हा प्रभावीपणे उभारण्याची आवश्यकता आहे. मुंबईवर दहशतवाद्यांनी जो हल्ला केला त्यामध्ये कसाब नावाचा एक जिवंत आतंकवादी आपल्या हाती लागलेला आहे. या कसाबच्या संदर्भातील बातम्या रोज मथळेच्या मथळे भरुन वर्तमानपत्रातून येत आहेत. या बातम्यामुळे तरुणांमध्ये अनावश्यक आकर्षण वाढत आहे. त्यामुळे सामान्य माणसाला जशी आचार संहिता आहे तशाच प्रकारची आचार संहिता मिडीयाला सुध्दा लावण्याची आवश्यकता आहे. मी मिडीयाला सेन्सॉर लावा असे बोलत नाही परंतु कोठे तरी मिडीयाने सुध्दा काही भान ठेवले पाहिजे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. ज्या वेळी मुंबईवर अतिरेक्यांनी हल्ला केला त्याच्या दुस-या दिवशी ताज हॉटेल, ओबेरॉय हॉटेल, आरबीआय चौक, पारशी डेअरी या ठिकाणी आतंकवाद्यांनी गोळीबार केलेला आहे अशा प्रकारची ब्रेकींग न्युज टीव्ही वरुन दिसत होती. त्यामुळे अशा प्रकारच्या असत्य बातम्या दिल्या जातात त्यासाठी मिडीयावर आचार संहिता लावण्याची आता गरज निर्माण झालेली आहे. आपत्कालीन परिस्थितीत जे अफवा पसरवतात त्यांच्यावर आचार संहितेच्या माध्यमातून योग्य ती कारवाई झाली पाहिजे अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, मुंबईत जेव्हा आतंकवादी हल्ला झाला त्यावेळी राजकीय वातावरण चांगल्या प्रकारचे तापले होते. यामध्ये कोण होते याबद्दल मला काही बोलावयाचे नाही. परंतु ज्या दिवशी आतंकवाद्यावर कारवाई करुन त्यांना मारले गेले तेव्हा मुंबईतील ताज हॉटेल समोर

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड ...

मुंबईतील प्रतिष्ठीत लोक एकत्र जमून जे निरपराध लोक पोलीस जवान, एनएसजीचे जवान यामध्ये मरण पावले त्यांना मानवंदना देण्यासाठी मेनबत्या घेऊन आले होते व त्यांनी त्यावेळी साश्रू नयनांनी श्रध्दांजली अर्पण केली होती. या हल्ल्यामध्ये करकरे, साळसकर, कामटे अशा किती तरी चांगल्या अधिका-यांना आपले प्राण द्यावे लागले आहे. त्यावेळी या जनतेची मानसिकता पार बदलून गेली होती त्यांनी आतंकवाद्यांना शिव्या सुध्दा दिल्या होत्या. तसेच या घटनेमुळे लोकांचा राजकीय लोकांकडे बघण्याचा दृष्टिकोनही बदलला होता. आतंकवाद्यांचे लक्ष हे केवळ लोकांनाच मारणे एवढे नसून जनतेला शासनाविरुध्द चिड आणण्याचे सुध्दा ते काम करीत असतात. पाकिस्तानला हिंदुस्तानातील लोकशाहीचा हेवा वाटतो त्यामुळे त्यांना हिंदुस्तानातील लोकशाही खिळखिळी करावयाची आहे. ज्यानी आयुष्यभर समाजाच्या भल्यासाठी राजकारण केले आहे अशांकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन सुध्दा आता बदलत चालला आहे. हा प्रकार लोकशाहीला फार मारक आहे. सरकार कोणत्या पक्षाचे आहे, सरकारमध्ये कोण आहे याबद्दल मला काही बोलावयाचे नाही. परंतु मुंबईवर आतंकवाद्यांनी जो हल्ला केलेला आहे तो हल्ला खरे म्हणजे लोकशाहीवरच झालेला आहे. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, ज्या पध्दतीने या घटना घडल्या त्या घटनांकडे सरकारने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. त्सुनामीच्या वेळेस माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री हे केरळला मदत करण्यासाठी गेले होते ज्यावेळेस या त्सुनामीचा फटका महाराष्ट्रालाही बसला त्यावेळेस ते तातडीने परत आले होते व त्यांनी आपल्या महाराष्ट्राकडे बारकाईने लक्ष दिले होते. माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी तसेच अधिका-यांनी त्यावेळेस 50-50 तास अविरत काम केले होते. हे सरकार संवेदनशील सरकार आहे. जनतेच्या कल्याणासाठी हे सरकार काम करीत आहे. ज्यावेळेस मुंबईवर दहशतवाद्यांनी हल्ला केला तेव्हा आपण 183 लोकांचे प्राण वाचवू शकलो नाही म्हणून त्यांनी आपली वैयक्तिक जबाबदारी समजून या संवेदनशील सरकारचे मुख्यमंत्र्यांनी व उपमुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिला. खरे म्हणजे या संवेदनशील सरकारने चांगलाच पायंडा पाडलेला आहे.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड.....

हा देखील लोकशाहीत चांगला पायंडा पडलेला आहे. सरकारकडून काही त्रुटी राहिल्या असतील अशातला भाग नाही. परंतु ज्या त्रुटी निदर्शनास आल्या मग त्या यंत्रणेतील असतील की, सुरक्षा व्यवस्थेतील असतील त्याकडे सरकारने गांभीर्यान लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नाम नियुक्त) : सभापति महोदय, 26 नवम्बर को हमारे देश पर जो भारी हमला हुआ है, उसमें शहीद हुए पुलिस अधिकारी, कर्मचारी, आर्मी के कमांडो और जिन मासूम लोगों की जान इस हमले में गई हैं, उन सब को मैं सब से पहले अपनी तरफ से श्रद्धांजलि अर्पित करना चाहती हूँ. मुंबई की इस घटना के बाद हमारे देश में एक अलग सा चित्र उभरकर आया है. पहली बार एक ऐसा चित्र हमारी आँखों के सामने आया है कि जनता खुद एकता और सामाजिक सुदृढ़ता का सबूत देने के लिए सड़क पर उतर आई है. और इसलिए मुझे ऐसा लगता है कि जनता की सभी भावनाओं का रिफलेक्शन यहां पर होना आवश्यक है. जनता कहती है कि हम एक थे, एक रहते आए हैं, एक रहना चाहते हैं और एक रहना बेहद जरूरी है. आज की परिस्थिति में जनता का आक्रोश हमें देखने को मिला और जनता का यह आक्रोश इतना तीव्र था कि हमारे देश के गृहमंत्री, महाराष्ट्र के उप मुख्यमंत्री और मुख्यमंत्री को राजीनामा देने की नौबत आ गई. सभापति महोदय, जनता का यह आक्रोश खुले तौर पर सिर्फ और सिर्फ राजनैतिक लोगों पर था. जनता का यह आक्रोश सभी राजनैतिक दल के लोगों के बारे में है. जनता ने एक इशारा हमको दिया है और जनता की यह आवाज हमें नजर आती है कि कहीं न कहीं राजनैतिक स्तर पर एथिकल बाउंड्रीज से हम लोग नीचे गिरते जा रहे हैं. हम जनता की आवाज हैं और उस आवाज का यहां पर रिफलेक्शन होना आवश्यक है, क्योंकि जब तक हम इस सभागृह में जनता की आवाज को रिफलेक्ट नहीं करते है, जब तक हम आत्म परीक्षण नहीं करते हैं, तब तक आज की चर्चा मीनिंगफुल हो रही है, ऐसा मुझे नहीं लगता है. लेकिन हमारी आज की यह चर्चा बहुत उच्च स्तर की चल रही है, इस बात का मुझे समाधान महसूस हो रहा है. लेकिन इसके बावजूद हमें बहुत ही मूलभूत स्तर पर बदलाव के बारे में सोचना होगा और ऐसा करते समय हमने अब तक जिस एकता का सबूत दिया है, उसी एकता का सबूत देते हुए हमें अपने देशके लिए तुरन्त क्या कदम उठाने है और लॉंग टर्म के आधार पर हमें क्या करना है, इस पर चर्चा होना बहुत आवश्यक है, ऐसा मुझे लगता है.

सभापति महोदय, माननीय गडकरी जी ने एक एस.एम.एस.का मजकूर पढ़कर सुनाया था "The world is destroyed not because of violent people, but because of the silence of good people." मैं इस एस.एम.एस. में यह जोड़ना चाहती हूँ कि "The world is also destroyed because of prejudice perspective of politicians."

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/SBT/ MMP/ पूर्वी श्री शर्मा.... श्रीमती फौजिया खान ............15:20

अगर हमारा पर्सपेक्टिव प्रिजुडाईज रहेगा, अगर हम संकुचित दृष्टिकोण से विचार करते रहेंगे तो हमारी जांच कभी भी जड़ तक नहीं जा सकती. हमें अब डालियाँ नहीं छांटनी है. हमें रुट तक पहुंचना है और अपरुट करना है. जहां तक दहशतवाद के संबंध में अपरुट पर चर्चा करनी हो तो हमें इस बात पर भी खुले दिमाग से ब्राडर पर्सपेक्टिव लेकर गहराई से सोचना होगा कि आखिर यह दहशतवाद क्यों हो रहा है, कौन कर रहा है और क्यों कर रहा है, हमें कौन बर्बाद करना चाहता है और क्यों ? अगर इस तरह से हम सोचते हैं तो हमें दिखाई देगा कि दहशतवाद बहुत बड़ा ग्लोबल फिनामिनो हो गया है. सम्माननीय सदस्य श्री गडकरी जी ने अभी यहां पर कहां-कहां हमले हुए है, उसकी सूची यहां रखी. मैं यह कहना चाहती हूं कि दहशतवादी हमले ग्लोबल लेवल पर अनेक देशों में हो रहे हैं. यूएसए में 9/11 को एक घटना हुई है. पाकिस्तान जो कि दहशतवाद का पालकत्व कर रहा है, ऐसा हम सोचते हैं, उस पाकिस्तान में भी दहशतवादी हमले हो रहे हैं. पाकिस्तान भी दहशतवादी हमलों से पीड़ित है. इस बात पर भी विचार करने की आवश्यकता है. अगर हम दहशतवाद का ग्लोबल लेवल पर विचार करते हैं तो इस बात पर भी विचार करना चाहिए कि आज हमारा भारत दुनिया में चौथा लार्जेस्ट इकॉनॉमिक पावर वाला देश बन रहा है. तो इस प्रकार से भारत देश की प्रगति से सुपर पावर देश खुश होंगे, ऐसा मुझे नहीं लगता है. पाकिस्तान की ताकत, पाकिस्तान की शस्त्र संबंधी ताकत, वहां की हाईली टेक्नॉलॉजी, यहां भारत की प्रगति से ज्यादा ताकतवर है, ऐसा मुझे नहीं लगता है. इसलिए इस संबंध में भी गंभीरता से जांच करनी चाहिए और सोचना चाहिए कि आतंकवाद के पीछे कौन है, क्या इसका संबंध भारत की प्रगति से है, इस बारे में विचार किया जाना चाहिए. आसाम में हमले हो रहे है. वहां के हमलों का संबंध बांगलादेश में चल रहे ट्रेनिंग कैंप से जोड़ा जा रहा है. चायना कह रहा है कि अरुणाचल प्रदेश, मिजोरम हमारा है. इसलिए अगर हम इन बातों की ओर फोकस नहीं करेंगे और एक ही दिशा में सोचेंगे तो दहशतवाद की जड़ तक पहुंच नहीं सकेंगे. हमारे सामने जो सुबूत आए हैं उससे हमें ऐसा लगता है कि ये आतंकवादी पाकिस्तान से आए है लेकिन इसके बावजूद जो भी क्रिमीनल गतिविधियां हो रही है, उसके पीछे क्या उद्देश्य है, कौन है, इस संबंध में हमें गहराई से सोचना चाहिए, ऐसा मेरा मत है. इसके साथ ही साथ जो पेट्रो डिक्टेटरशिप जो एक नेशन को दूसरे नेशन से लड़ाकर उनको बर्बाद करने का षडयंत्र भी ग्लोबल लेवल पर हो रहा है,यह हमें नहीं भूलना चाहिए, यह मुझे कहना है.

इसके बाद श्री शर्मा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . .श्रीमती फौजिया खान का भाषण जारी (पूर्वी तालेवार)

मैं यह कहना चाहती हूँ कि यह एक अन्तर्राष्ट्रीय समस्या है और इसको हमें उसी सीमा के अन्दर देखना चाहिए.

सभापति महोदय, जहां तक हमारी सिक्योरिटी का सवाल है, जनता की भावना पूरी एकता के साथ उभरी है और इस हाउस में भी आज हम एकता की बात कर रहे हैं. हमें यहां पर चर्चा करने के बाद और सभी माननीय सदस्यों के विचार सुनने के बाद यह तय करना है कि हमारे सिक्योरिटी मेजर्स क्या होने चाहिए.

सभापति महोदय, यहां पर पुलिस बल के बारे में बात हुई . हमें पुलिस दल का बल और मनोबल बढ़ाने की आवश्यकता है. यह बहुत बड़ा सच है कि जब तक पुलिस के बल का आधुनिकीरकरण नहीं होता है, तब तक हम इस तरह के हमले का सामना नहीं कर सकते हैं. हमने देखा कि 10 आतंकवादी मुंबई में घुस गए और उनसे निपटने के लिए हमारी नेवी, आर्मी और एयरफोर्स को 60 घंटे तक अपनी ताकत लगानी पड़ी. अगर हमें पुलिस पर निर्भर रहना है तो पुलिस को बहुत स्पेशल ट्रेनिंग देने की आवश्यकता है. यहां पर एक माननीय सदस्य ने कहा कि ताज होटल का मॅप किसी ने नहीं मांगा, पुलिस अधिकारियों को मॅप मांगने की आवश्यकता महसूस नहीं हुई . हमारी मशीनरी को यह मालूम नहीं था कि इस प्रकार की सिचुएशन को कैसे डील करना है. इसलिए पुलिस दल की ट्रेनिंग होने की जरूरत है. आज स्थिति यह है कि रेल्वे स्टेशन्स पर हमले हो रहे हैं, मॉल्स और धार्मिक स्थलों पर हमले हो रहे हैं, सिनेमाघरों में हमले हो रहे हैं तो कितना पुलिस दल कहां कहां पर रहेगा. मुझे ऐसा लगता है कि सिक्योरिटी के लिए जो कायदे बनाए जाते हैं उसमें लोगों को किस तरह से शामिल कर सकते हैं, इस बारे में संशोधन करने की जरूरत है.

सभापति महोदय, हर विभाग में कोर्डिनेशन की जरूरत है. स्टेट्स में कोर्डिनेशन की जरूरत है, स्टेट और सेन्टर में कोर्डिनेशन की जरूरत है, जब तक इस प्रकार का कोर्डिनेशन नहीं होगा, तब तक हम इस प्रॉक्सी वार का मुकाबला अच्छी तरह से नहीं कर सकेंगे. यह युद्ध की स्थिति है और इस स्थिति से निपटने के लिए हमें सभी तरह का कोर्डिनेशन बनाने की जरूरत है.

. . 3B 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . .श्रीमती फौजिया खान

सभापति महोदय, मैं एक बात यहां पर कहना चाहती हूँ कि हम एक्सटरनल रीजन्स की बात तो कर रहे हैं, लेकिन जब तक हमारा इन्टरनल फाउन्डेशन मजबूत नहीं होगा, तब तक हम इस अन्तर्राष्ट्रीय बदनीयती का कैसे सामना करेंगे. पहले हमारी दीवारें मजबूत होनी चाहिए. हमारी इन्टरनल ताकत मजबूत होगी तो हम किसी का भी सामना कर सकते हैं. यह क्षमता हम में है, ऐसा मुझे लगता है. अगर हम एक्स्टरनल आतंकवाद को डील कर रहे हैं तो हमें अपनी इन्टरनल दीवारों को मजबूत करने के लिए उन कारणों को भी देखना चाहिए जो समाज में सामाजिक और आर्थिक विषमता पैदा करती हैं और इनको दूर करने के बारे में हमें सोचना चाहिए.

सभापति महोदय, हमें कल्चरल टेरिरिज्म के बारे में सोचना चाहिए, क्योंकि आज की दुनिया में साइंस यह कहती है."Every action has equal and opposite reaction"

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री शर्मा श्रीमती फौजिया खान .......5:30

आग से आग कभी नहीं बुझ सकती. आग को पानी से ही बुझाना पड़ेगा और जितनी तेज आग होगी उतना ही ज्यादा पानी आग बुझाने के लिए लगेगा. इसलिए महात्मा गांधी के जो विचार है, उस बारे में भी कहीं न कहीं सोचना आवश्यक है. क्योंकि अगर हम रिएक्शन और एक्शन की बात करते रहेंगे तो हमारा देश खत्म हो जाएगा. इसलिए हमें नवीन समाज निर्माण के बारे में सोचते हुए नीति तय करनी चाहिए. मैं इस संबंध में जापान का उदाहरण् देना चाहूंगी. महायुध्द में जापान के दो शहरों हिरोशिमा और नागासाकी को बम से खत्म कर दिया गया था लेकिन आज वही जापान इतना शक्तिशाली हो गया है कि कोई जापान की तरफ नज़र उठा कर भी देख नहीं सकता. इसका एक मात्र कारण है- जापान के नागरिकों का देश प्रेम. सही मायने में देश प्रेम. वहां एक पिन का भी नुकसान होता है तो वहां का हर नागरिक सोचता है कि मेरा नुकसान हुआ है. हमारे देश में क्या होता है, हमारे देश में पब्लिक प्रापर्टी को हम अपनी प्रापर्टी है, ऐसा सोचते ही नहीं है. यह भारत के नागरिक और जापान के नागरिक में फर्क है. यहां तोड़फोड़ हम अपने पालकत्व में करते हैं. इसलिए मैं यह कहना चाहूंगी कि जब तक हमारे मन में जापान के नागरिकों की तरह देश प्रेम पैदा नहीं होगा तब तक लोग हमारी तरफ नज़र उठा कर देखते रहेंगे. जब तक हमारी भीतरी दीवार कमजोर रहेगी तब तक यही स्थिति बनी रहेगी. इसलिए आज हमारे नागरिकों के मन में देश भक्ति की भावना को निर्माण करने की आवश्यकता है.

सभापति महोदय, अगर गौर से देखा जाए तो किसी भी प्रकार का दहशतवाद इसलिए होता है कि हमारे रिसोर्सेस कम है और जरुरत ज्यादा है. नागरिकों के मन में अन्याय की भावना पैदा होना भी एक कारण है. शासन को इस ओर ज्यादा फोकस करना चाहिए. फॉरेस्ट, एनवायर्नमेंट,एनर्जी रिन्यूवल, एप्रोच टू एज्युकेशन इत्यादि चीजों के बारे में सरकर को ज्यादा से ज्यादा फोकस करना चाहिए. हमारी वित्तीय योजनाओं में सुन्दर बॅलेंस होना चाहिए. सुरक्षा और अन्य आवश्यक चीजों पर भी ज्यादा से ज्यादा फोकस होना चाहिए. अगर हम इस प्रकार की व्यवस्था नहीं करेंगे तो नागरिकों पर अन्याय होता ही रहेगा और उस के कारण यह दहशतवाद चलता रहेगा. इसलिए अगली पीढ़ी के मन में देश प्रेम की भावना पैदा करनी होगी,चरित्र निर्माण करना होगा, नागरिकों के मन में पैदा हुई अन्याय की भावना दूर करनी होगी और यह करने के लिए हमें रिसोर्सेस बढ़ाने होंगे.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापति महोदय, यहां यह भी कहा जाता है कि, इस संबंध में आय.बी. और रॉ का इंटेलिजंस फेल हो गया. हमें इंटेलिजंस दुरुस्त करना है. हमें भ्रष्टाचार से निपटना है. जब तक भ्रष्टाचार है तब तक इन चीजों का सामना करते रहना पडेगा. इसलिए भ्रष्टाचार को दूर करना होगा. डॉ. बाबा साहब आंबेडकर जी ने देश का संविधान राष्ट्र को अर्पित करते समय यह इशारा दिया था -" राजकीय लोकशाही आम्ही सामाजिक लोकशाहीत बदलू शकलो नाही तर या देशातील लोकच राज्य घटनेचा डोलारा उद्ध्वस्त केल्याशिवाय राहणार नाही."

सभापति महोदय, सामाजिक लोकशाही व्यवस्था आवश्यक है. अगर हमें सही हल ढूंढना है तो हमको इन सारी बातों को पर्सपेक्टिव में रखना जरुरी है. मिस्टर थामस नाम के एक व्यक्ति ने अमेरिका में 9/11 को हुई घटना के संबंध में एक किताब लिखी है. उस किताब में उन्होंने यह लिखा है कि उस घटना को अमेरिका ने कैसे टेकल किया, उस के बाद क्या किया. मैं उस किताब का एक वाक्य पढ़ना चाहूंगी. हम सिक्योरिटी के सिलसिले में कितने ही मेजर उठा लें, लेकिन उससे हमारे मसले हल होंगे, ऐसा नहीं है.

भाषण अपूर्ण, इसके बाद श्री शर्मा...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजीया खान .......

लेखक थॉमस फ्राईडमॅन की किताब हॉट, फ्लॅट ॲण्ड क्राऊड मे यह कहा हे कि, "Because a place where birds don't fly is a place where people don't mix, ideas don't get sparked, friendship don't get forged, stereotypes don't get broken, collaboration doesn't happen, trust doesn't get built and freedom doesn't ring". वहां पर इतनी सिक्योरिटी है कि परिंदा भी पर नहीं मार सकता. इस पुस्तक में आगे लिखा है : "India living in a defensive crouch it cannot fully tap the vast rivers of idealism, innovation, volunteerism and philanthropy that still flow through our nation."

सभापति महोदय, हमारी "नेरो थिंकिंग" नहीं होनी चाहिए, हमारा माइंड "प्रि-ज्युडिश" नहीं होना चाहिए. अन्त में मैं आपके सामने एक शेर पढ़ती हूँ :

"दिल गनी हो तो हर रंज भी दिल की राहत है,
जहन मुफलिस हो तो हर सूद जीया होता है."

सभापति महोदय, जहन मुफलिस हो तो हर कर्म नष्ट हो जाता है और अगर जहन बड़ा हो तो कितनी भी बड़ी तकलीफ हो, उसके रास्ते निकल आते हैं. इतना कहते हुए मैं अपना भाषण खत्म करती हूँ. धन्यवाद.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, या अतिरेकी हल्ल्यासंबंधी वर्तमानपत्रामध्ये आलेली स्थिती किती भयानक होती हे मी प्रथम सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, "आग को बुझाने के लिये आग की जरुरत नही." या ठिकाणी मी दोन तीन चित्रे दाखवू इच्छितो. किती विदारक स्थितीने आणि असहाय्य पध्दतीने आपण त्या सगळ्यांचे मरण बधत होतो हे यावरुन दिसून येईल. 'लोकमत' या वर्तमानपत्रामध्ये तसेच जवळजवळ सर्वच वर्तमानपत्राच्या पृष्ठांवर ते छापून आलेले आहे. व्ही. टी. रेल्वे स्टेशनमध्ये जवळजवळ 57 मुडदे पडलेले आहेत आणि पोलीस कॉन्स्टेबल असहाय्यपणे म्हाताऱ्या व्यक्तीस त्या रक्तातून वाट काढत घेऊन जात आहे असे हे एक चित्र आहे. दुसरे जे चित्र आलेले आहे त्यामध्ये हॉटेलमध्ये जेवता जेवता एक परदेशी बाप आणि त्याची मुलगी दाखवलेली आहे. असहाय्यपणे कदाचित ती मुलगी आपल्या वडिलांना सांगत असेल की, तुम्ही मरु नका, मी मरते. कदाचित त्या ठिकाणी बापाने सांगितले असेल की, माझ्या मुलीला वाचवा, मला सोडा. तिसरे चित्र जे आहे त्यामध्ये विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील एका गावातून 10 वर्षाचा मुलगा आणि त्याची आठ वर्षाची बहीण आपल्या मामाकडे सुट्टी घालविण्यासाठी आल्यानंतर मामाला गोळी लागली म्हणून तो पडला आणि बहीण भावंड हातामध्ये हात घालून मेलेली या मध्ये पाहावयास मिळतात. शेवटी जे एक चित्र आहे त्यामध्ये तथाकथित समाजवादी लोक जेव्हा मेणबत्त्या धेऊन नाचत होते त्यावेळचे आहे. ही शांतीची कबुतरे त्या रक्तपाताजवळ थांबली नाहीत. ती आकाशात उडून गेली. आम्ही त्या ठिकाणी थांबू शकत नाही. त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, बहेनजी, आगीला आगीनेच मारावे लागेल. दातासाठी दात पाडावा लागेल. डोळ्यासाठी डोळाच घ्यावा लागेल, तरच हे संपेल. शिवाजी महाराजांनी गुदगुल्या करुन अफझलखानाला मारले नाही. त्यांनी त्यांचा कोथळा बाहेर काढला त्यावेळी तो पळाला. त्यांनी जसे पर स्त्रिला माता मानले आणि फार मोठे उदात्त मन दाखवले तसे मन खंबीर करुन त्यांनी त्या ठिकाणी त्याला सुध्दा सोडले नाही. म्हणून मला असे वाटते की, धर्म-अधर्माच्या गोष्टी अतिरेक्यांच्या बाबतीत होता कामा नये. करकरेंच्या बाबतीत दिलेले वाक्य किती भयानक आहे ते सांगू इच्छितो. त्याबाबत यामध्ये असे म्हटले आहे की, करकरे, कामटे आणि साळस्कर यांना दबा धरुन मारले. तिघांचेही मृतदेह रस्त्यावरुन फरपटत

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्री. मधुकर चव्हाण .....

फेकले. 10 अतिरेक्यांनी सगळा देश आणि सगळ्यांना वेठीस धरलेले होते. माननीय श्री. छगन भुजबळ, आमचे विधानसभेचे विरोधी पक्ष नेते श्री. रामदासजी कदम, शिवसेनेचे श्री. सूर्यकांत महाडिक, आणखी दोन शिवसैनिक, मी आणि श्री. विनोदजी तावडे, आम्ही जवळजवळ पावणेअकरा वाजल्यापासून त्या ठिकाणी होतो. मित्र म्हणून मी आपल्या बहाद्दर मुख्यमंत्र्यांची स्तुती करत नाही. ते रात्री आले.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/ श्री.बरवडनंतर 15:40

श्री.मधुकर चव्हाण....

त्यावेळी माननीय श्री.आर.आर.पाटील आले, माननीय श्री.विजयसिंह मोहिते-पाटील हे देखील आले होते. त्यावेळच्या दृश्यामध्ये किती भयानकता होती ? आज आपण याठिकाणी शासनाने हे करु नये, ते करु नये असे असे म्हणत आहोत. ही चर्चा अरण्यरुदन होता कामा नये. It must be result oriented discussion. काल माननीय सभापतीं महोदयांकडे चर्चा झाली होती. मी त्यांचे अभिनंदन करतो. या चर्चेवरील उत्तर मिळण्यासाठी शासनाला पुरेसा अवधी मिळणार आहे. याठिकाणी ज्या सूचना येतील त्या दुःखीतांच्या आर्त किंकाळया समजू नयेत. कारण त्या हवेत उडून जातात. या चर्चेमुळे जे मुद्दे समोर आले आहेत त्याबाबत शासनाने आज रात्रभर विचार करावा, मंत्रिमंडळाची बैठक घ्यावी. शासनाने मायक्रोस्कोपिक डिटेल्स असे धोरण जाहीर करावे अशी आमची मागणी नाही. परंतु या सूचनांच्या आधारे आम्ही असे असे निर्णय घेतले आहेत ते जाहीर करावेत. या निर्णयाबाबत आम्ही डिटेलिंग नंतर करु असे सांगावे. आपण सगळयांनी हे ठरविले पाहिजे. आपण केवळ मुडदे उचलणार काय ? अशा घटना घडल्यावर प्रत्येक वेळी आपण मुडदे उचलण्याचे काम केले आहे. त्यादिवशी एवढे भयानक चित्र होते. पावणे चारची ती वेळ होती. शेवटची 604 क्रमांकाची ती खोली असावी. तेथे आग लागल्यावर पाचव्या मजल्यावरील एका खिडकीतून 5 वर्षांची विदेशी मुलगी आणि तिची आई अशा दोघी हेल्प, हेल्प, हेल्प असा टाहो फोडून मदत मागत होते आणि असहायपणे सर्व यंत्रणा, माणसे ते दृश्य पहात होते. इलेक्ट्रॉनिक मिडिया ते दुःख सगळयांना दाखवित होते. आम्ही काही करु शकत नव्हतो. नेमकी कशामुळे असहाय स्थिती निर्माण झाली, रेल्वेमध्ये बॉम्बस्फोट झाल्यावर आम्ही मुडदे उचलले आहेत, त्यावेळी काही झाले नाही, त्यावेळी दोन वेगवेगळी मते पुढे आले. प्रेशर कुकरमध्ये आरडीएसक्स बॉम्ब ठेवून त्याचा स्फोट घडविण्यात आला असे सांगितले गेले आणि पुन्हा श्री.राकेश मारिया यांनी सांगितले की, वेगळया कारणासाठी वेगळे 10 आरोप पकडले गेले. पोलीस खात्यामध्ये गोंधळ चालला आहे. याठिकाणी जे सांगण्यात आले ते 100 टक्के बरोबर आहे. दहशतवादाला धर्म नसतो, ते माणसातील क्रुरता वाढवितात. क्रौर्य वाढवितात. त्या 2 वर्षाच्या मुलाला ती मोलकरीण खाली घेऊन गेली नसती तर त्या मुलाला देखील त्यांनी ठार मारले असते. मी असे

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.मधुकर चव्हाण....

ऐकले आहे की, अतिरेक्यांच्या कॅम्पमध्ये त्यांच्या इमोशन्स जाळून टाकल्या जातात. या हल्ल्यात लहानसहान मुले मेली. मला आचार्य अत्र्यांच्या 'मी कसा झालो' या कवितेची आठवण होते. त्यात त्यांनी असे लिहिले आहे की, मला फूल बघितल्यावर कविता कराविशी वाटते आणि मूल बघितल्यावर पटकन माझ्यातील ममत्व जागे होते आणि त्याला गोष्टी सांगाव्यात, त्याला गोंजारावे असे मला वाटते. पण येथे त्या मुलांनाही ठार मारण्यास सांगितले होते. कोणती विचारसरणी त्यांना एवढी क्रूर होण्यास बंधनकारक ठरते ? यापुढे असे होऊ नये असे वाटत असेल तर यावर विचार करणे आवश्यक आहे. इस्त्राईल हा छोटासा देश आहे. तेहरान, इजिप्त अशासारख्या शत्रू राष्ट्रांनी वेढलेला तो देश आहे. एन्टेबे विमानतळावर युगांडाच्या इदी अमीनने त्यांची विमाने पळवून नेली. इतके बहाद्दर लोक हजारो मैलावर दोन विमान घेऊ गेले होते. एक विमान त्या सगळया ओलितांना घेऊन येण्यासाठी त्यांनी वापरले. त्यांना केवढा आत्मविश्वास होता की आम्ही जाऊ, इदी अमीनच्या पोटावर बसू, एन्टेबे विमानतळ ताब्यात घेऊ, ते ताब्यात घेतल्यावर सर्वांना सुरक्षित आणू. वैमानिकाने विमान पळवले असे कंट्रोल रुमला कळविल्याबरोबर इस्त्राईलने प्लॅनिंग केले. त्यानंतर लगेच 2 तासामध्ये त्यांची यंत्रणा एकत्र आली. ओलितांची कशाप्रकारे सुटका करावी यासाठी त्यांनी अनेक योजना आखल्या होत्या. कारण राज्य चालविण्यासाठी भान ठेवून योजना आखव्या लागतात. आपण मात्र बेभान होऊन मते मागतो. कधी गरीबी हटावचा नारा देतो, कधी कोणाच्या मृत्यूचे पोस्टर्स लावतो. हे सर्व करुन सत्ता मिळवितो आणि सत्तेचा मुकूट चढविल्यावर राज्यकर्ता आई-बापाच्या भूमिकेमध्ये जावा लागतो, त्यातून पहिली भूमिका जनतेच्या संरक्षणाची असावयास पाहिजे. त्याठिकाणी त्यांच्या लोकांनी एन्टेबे विमानतळावर जाऊन सर्व 74 प्रवाशांना सुरक्षित आणले. त्यापैकी एक म्हातारी बाई आजारी होती, तिला त्यांनी ॲडमिट केले. एवढयाशा छोटया इस्त्राईल या देशाने एवढे बळ कोठून आणले ? तो देश घाबरला नाही, अमेरिकेला काय वाटेल, रशियाला काय वाटेल असा विचार करीत बसला नाही. आपल्याकडे दिल्लीचे कमांडो येथे येतील मग मुंबईच्या नागरिकांचे संरक्षण करतील असा विचार करण्यामध्ये वेळ घालविला जातो. पण इस्त्राईलने त्यावेळी असे केले नव्हते.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 15:45

(श्री. मधुकर चव्हाण..)

ज्यावेळी पोलीस यंत्रणेच्या हे लक्षात आले की, श्री. हेमंत करकरे, श्री. अशोक कामटे आणि श्री.विजय साळसकर हे पोलीस अधिकारी मारले गेले त्यावेळी ते सर्व हतबल झाले. हे स्वाभाविकच आहे. सेनापती गेल्यानंतर कसे लढणार ? आम्ही ज्या वेळेला कामा हॉस्पिटलमध्ये गेलो त्यावेळी कोणी सांगत होते की, अतिरेकी आत आहेत तर कोणी सांगत होते की अतिरेकी बाहेर आहेत. त्यांच्या बरोबर असलेला कॉन्स्टेबल असहाय्यपणे साहेबाच्या प्रेताजवळ उभा राहून रडत होता आणि ते असहाय दृष्य आम्हाला पहावे लागले. बाकीचे पोलीस अधिकारी कुठे होते ? रश्मी शुक्ला ह्या रात्री 11.30 वा.आल्या. आम्ही त्यावेळी तेथे होतो. माननीय श्री. भुजबळ साहेब, श्री.आर.आर.पाटील साहेब, श्री. विजयकुमार हे त्याठिकाणी आलेले होते. श्री. जावेद अहमदसाहेब हे जणूकाही मॉर्निंग वॉकला आल्याप्रमाणे टी शर्टवर रात्री 12.15वा.आले. श्री. अे.के.जैन ज्यांच्याकडे सी.आय.डी.ची लॉ ॲण्ड ऑर्डर आहे हे त्या ठिकाणी काय चर्चा करत होते ? तर केन्द्रीय गृहमंत्री श्री. शिवराज पाटील येणार आहेत, त्यांना कमांडो किती द्यायचे, कॅनव्हाय कसा उभा करायचा, एअर पोर्टवर किती कमांडोज पाठवायचे अशी चर्चा ते करीत होते. माणसांच्या संरक्षणासाठी जे कमांडो येणार आहेत त्यांना आणण्यासाठी फाटकी तुटकी बस देण्यात आली. त्यांना आणण्यासाठी तुम्ही चांगली बस देऊ शकला नाहीत. म्हणून हे अधिकारी त्यावेळी कुठे होते त्याची पहिल्यांदा चौकशी करावी. श्री. जावेदसाहेब, अे.के.जैन हे सगळे अधिकारी कुठे होते हे मी सांगतो. पावणेदोनच्या सुमारास माननीय श्री. भुजबळसाहेब आणि बाकीचे सर्व वर गेले त्यावेळी ते सर्व अधिकारी त्याठिकाणी रुममध्ये बसून कंट्रोल करीत होते. ते फिल्डवर, समोर का आले नाहीत ? बाकीचे सर्व अधिकारी आले होते. हे तिघे अधिकारी पुढे गेले. श्री. साळसकर हे आपल्या उपनगरातील निवासस्थानातून आले होते. श्री. करकरे आणि श्री. दाते साहेबांनी मला सांगितले की, पोलीस आयुक्तांनी त्यांना येण्यास सांगितले. हे जे अधिकारी शहीद झाले त्यांचे धाडस कौतुकास्पद आहे, अभिमानास्पद आहे. परंतु त्याच बरोबर प्रशिक्षणाचा अभावही आहे. तीन मोठे अधिकारी एकाच वेळी एकाच गाडीत बसून जातात. त्यांच्या धाडसाला आम्ही सलाम करतो. श्री. साळसकर यांनी ड्रायव्हरला बाजूला करुन ते स्वत: गाडी चालवायला बसले. सी.एस.टी.वर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण..)

ज्यांनी शंभर मुडदे पाडलेले आहेत त्या दहशतवाद्यांना पकडण्यासाठी आणि लोकांना वाचवण्यासाठी ते गेले. परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्याच्या भावनेतून त्यांनी जीवाची पर्वा न करता मृत्यूला कवटाळले. जे काय होईल ते होईल, समोर अंधारामध्ये कोणीही असले तरी त्याची पर्वा न करता ते पुढे गेले. 1993मध्ये बॉम्बस्फोट झाले. त्यानंतर मुंबईमध्ये अनेक बॉम्बस्फोट झाले. त्याची जंत्री मी आपल्याला देत नाही. अशा त-हेने अचानक बॉम्बस्फोट झाल्यानंतर आपण काय करणार ? ज्या वेळी श्री. कदमसाहेब आयुक्तांना आणि श्री. आर.आर.पाटील साहेबांना म्हणाले की त्या नरीमन हाऊसजवळ कोणी नाही. त्यावेळी दुस-या अधिका-याने अगदी योग्य आणि व्यवहार्य उत्तर दिले. त्या अधिका-याचे मी नाव घेत नाही. ताज हॉटेल आणि ओबेरॉय हॉटेलमध्ये शेकडो माणसे अडकलेली आहेत आणि नरीमन हाऊस येथे ठराविक माणसेच आहेत म्हणून पहिल्यांदा जेथे जास्त विध्वंस होत होता तो थांबविण्याचा आणि जेथे कमी माणसे आहेत तेथे नंतर जाण्याचा निर्णय त्यावेळी त्या अधिका-यांनी धेतला. पण तोपर्यन्त त्या निर्दय माणसांनी सर्वांना ठार मारले होते. त्या ठिकाणी सर्व पक्षाचे लोक जमलेले होते. दहशतवादी असहाय्यपणे हॅण्डग्रेनेड खाली फेकत होते. दुस-या दिवशी पोलीस त्या नरीमन हाऊसमध्ये गेले. म्हणजे हे सिध्द झाले की, 10 कोटी जनतेसाठी असलेली आपली पोलीस यंत्रणा फक्त 4 स्पॉटवर असलेल्या दहशतवाद्यांना नियंत्रित करु शकली नाही. म्हणून या गोष्टीचा कुठे तरी विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. या हल्ल्याची त्यांनी पूर्व तयारी केली होती. काही लोक सांगतात की, त्यांना गुगलच्या माध्यमातून ताज हॉटेल कुठे आहे हे पाकिस्तानामधून सांगण्यात आले. परंतु हे सर्व खोटे आहे. येथल्या कुणालाही आम्ही गुगलच्या माध्यमातून लंडन दाखवतो आणि त्याला सांगतो की तुझी या या ठिकाणी राहाण्याची व्यवस्था केलेली आहे. एवढया माहितीवर तो तेथे जाईल काय ? या ठिकाणी एका मुद्याचा उल्लेख करण्यात आला तो बरोबर आहे की, या देशात कुणी राहाणारा एतद्देशीय त्यांच्यामध्ये सामील नव्हता असे पोलीस आयुक्तांनी जाहीर करण्याची काय गरज होती ? उद्या जर 10 लोक पकडले आणि त्यामध्ये असे मिळाले तर.. शेवटी यांनी जी पोझिशन घेतली त्यासाठी नऊ साडेनऊ तासाचा वेळ लागला. माहिती असल्या शिवाय ही पोझिशन धेतली काय ? तेथे अक्षरश: युध्दजन्य स्थिती होती. पोलीस हतबल झाले होते. पावणेदोन वाजेपर्यन्त पोलीस आम्हाला

..2..



MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 15:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण..)

सांगत होते की येथे जाऊ नका, तेथे जाऊ नका. साडेनऊला हल्ला झाला, 11.00 वाजता एनएसजीची मागणी केली, सव्वादोन वाजता दिल्ली विमानतळावर पथक गेले. तेथे 190 लोकांना एकाच वेळी घेऊन जाईल असे विमान नव्हते. त्यानंतर पहाटे 5.25 वाजता तेथून विमान सुटले, 6.05 वाजता विमान येथे आले आणि 7.00 वाजता त्या कमांडोजनी सर्व हातामध्ये घेतले. या साडेनऊ तासामध्ये या सैतानानी बरोबर पोझिशन घेऊन ठेवली होती. खासदार श्री. जयसिंग गायकवाड यांनी सांगितले की, मला जेव्हा बाहेर आणण्यात आले त्यावेळी 14-15 बॉडीज ओलांडून मी बाहेर आलो. त्या बॉडीज सभोवती रक्त सांडलेले होते आणि माशा घोंगावत होत्या.

..नंतर श्री. गिते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>सभापतीस्थानी माननीय उपसभापती</u>**

श्री.मधुकर चव्हाण...

साडेनऊ तास वाचले असते तर आपण त्या ठिकाणचा पुढचा विध्वंस थांबवू शकलो असतो. यासंदर्भात श्रीमती शोभा डे यांनी वृत्तपत्रात लेख लिहिला आहे. त्यांनी आपल्या लेखात म्हटले आहे की, ताज हॉटेल, ऑबेरॉय हॉटेल ही महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेची स्थाने आहेत. ताज, ऑबेरॉय ही आमच्या अभिमानाची स्थाने आहेत. महाराष्ट्राच्या अभिमानाच्या व प्रतिष्ठेच्या स्थानामध्ये छत्रपती शिवाजी टर्मिनस नाही काय ? श्रीमती शोभा डे यांचा या घटनेसंबंधीचा आपण सर्वांनी लेख वाचावा. खरे तर त्यावर बोलण्याची ही वेळ नाही. सदर घटना घडल्यानंतर दोन तीन दिवसानंतर काही लेफ्टीस लोकांनी जो काही प्रकार केला आहे, तो सगळया सिस्टीमवरील विश्वास उडविण्याचा प्रकार आहे. राज्यकर्त्यांवरील विश्वास उडेल अशा प्रकारचा तमाशा या लोकांनी तेथे केला आहे. हा मोर्चा पर्पजली काढला गेला. कोणी म्हणत असेल की, अचानकपणे सगळे लोक त्या ठिकाणी जमले. परंतु तसे होणे शक्य नाही. राज्यकर्त्यांचा निषेध करणारे दीड ते दोन हजार ब्लॅकॅकटस् दोन ते तीन मिनिटात येत नाहीत. त्यात कोण कोण सामील होते त्या विषयी मी आता काही बोलत नाही. रॉ आणि आय.बी.च्या बाबतीत अनेक सदस्यांनी आपापली मते व्यक्त केलेली आहेत. परंतु मी यासंदर्भात एवढेच सांगू इच्छितो की, दिनांक 18 सप्टेंबर, 2008 रोजी लष्कर-ए-तोयबाचा प्रतिनिधी अज्ञात व्यक्तीशी सॅटेलाईटवरुन बोलतो आहे ते रॉ ने टेप करुन ठेवले आहे आणि त्याबाबतीत राज्य शासनाला कळविले आहे. दिनांक 20 सप्टेंबर, 2008 रोजी देखील अशाच प्रकारचे संभाषण झ ाले आहे या विषयी देखील राज्य शासनाला कळविले होते. 19 नोव्हेंबर, 2008 रोजी देखील शासनाला यासंबंधी कळविले होते. मुंबई शहरावर हल्ला करण्यासाठी आम्ही 9.00 ते 11.00 वाजेच्या दरम्यान तेथे पोहचू अशी लष्कर-ए-तोयबाच्या प्रतिनिधींकडून धमकी आली होती व त्या धमकी बाबताची माहिती रॉ आणि आय.बी.यांनी लेखी स्वरुपात राज्य शासनाच्या संबंधित अधिका-यांना कळविली होती. या घटनेच्या बाबतीत राज्य सरकारला दोषी ठरविले जाते आहे. परंतु रॉ आणि आय.बी. Both are answerable to Central Government that is directly under Prime Minister and Home Minister. यासंदर्भात पंतप्रधान यांनी देखील राजीनामा द्यावयास पाहिजे होता. आपण राजीनाम्याचे कौतूक आम्हाला सांगू नका. दिनांक 26 नोव्हेंबर,2008 रोजी म्हणजे हल्ला होण्याच्या आदल्या दिवशी देखील लष्कर-ए-तोयबाच्या

2....

श्री.मधुकर चव्हाण...

प्रतिनिधींचे संभाषण पकडले गेले. सदर संभाषणात ऑपरेशन्ससाठी पाच मोबाईलचे सीमकार्ड लागणार आहेत असे सांगितले गेले तसेच आणि काही हॉटेल्सची नावे देखील संभाषणात घेतली गेली. त्यानंतर श्री. एस.के.नारायणन यांची खळबळ माजली. यासंदर्भात त्यांना माननीय पंतप्रधान यांनी बोलाविले.हा सगळा इतिहास झाला. राज्य शासनाच्या गृह विभागास एवढी महत्वाची माहिती मिळाली असताना गृह विभागाने काय केले या गोष्टीचा खुलासा होणे आवश्यक आहे. पोलीस आयुक्तांवर सर्व तुटून पडले आहे, त्याचे कारण असे आहे की, कोणीही वरिष्ठ पोलीस अधिकारी घटना सुरु असताना घटनास्थळी गेले नाहीत. ते अधिकारी घटनास्थळी तात्काळ का गेले नाहीत यासंबंधीचा देखील या सभागृहात खुलासा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी टर्मिनस रेल्वेस्टेशनवर श्री.शिंदे नावाचे पोलीस अधिकारी कार्यरत होते. त्यांनी आपल्याकडे असलेल्या सर्व्हीस रिव्हाल्वरमधून अतिरेक्यांवर गोळया झाडून रेल्वेतील हजारो प्रवाशांचे प्राण वाचवून त्या प्रवाशांना पाठीमागे पाठविले. अतिरेक्यांचे कामा हॉस्पीटलमध्ये जाण्याचे प्लॅनींग नव्हते. त्यांना छत्रपती शिवाजी टर्मिनस रेल्वे स्टेशन ताब्यात घ्यावयाचे होते ते तेथील प्रवाशांना ओलिस ठेवावयाचे होते. प्रवाशांना ओलिस ठेवून त्यांना रेल्वे स्टेशनच्या वर जावयाचे होते. त्या ठिकाणी जाऊन त्यांना लष्कर-ए-तोयबाचा जो कोणी चाचा होता त्यांच्याशी संपर्क साधावयाचा होता आणि मग आपल्या मागण्या त्यांना मांडावयाच्या होत्या. परंतु सदर रेल्वे स्टेशनवरील कर्तव्यदक्ष पोलिसांमुळे अतिरेक्यांना ते करणे शक्य झाले नाही. त्यामुळे पुढचा फार मोठा अनर्थ टळला. पोलिसांकडे अतिशय जीर्ण हत्त्यारे दिली होती. त्या हत्यारानेच त्यांना मुकाबला करावा लागला. पोलिसांना अत्याधुनिक शस्त्रे देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी आहे की, एवढया दुर अंतरावरुन 10 अतिरेकी येतात. हा 100 कोटी लोकसंख्या असलेला देश आहे. या देशाला सिक्यूरेटी फोर्स देण्यात आलेला आहे. या देशात नेव्ही आहे, बॉर्डर सिक्यूरेटी फोर्स आहे. एअर फोर्स आहे. कोस्टल गार्डस् आहेत. रॉ आहे, आय.बी. आहे. सर्व सुविधा या देशाला देण्यात आलेल्या आहेत. दहा अतिरेकी येतात, दोन-दोन अतिरेकी वेगवेगळया वाहनांमध्ये बसतात आणि पूर्णपणे दहशतवाद पसरवितात ही अतिशय खेदाची गोष्ट आहे. सकाळी या ठिकाणी सांगितले गेले की, अतिरेक्यांचा चिखलात पाय गेला आणि तो खाली पडला. वगैरे,वगैरे असे त्यांनी सांगितले. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी बसून

3...



ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 15:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

सांगितले असेल की, त्याने नंतर अंघोळही केली असेल. ही चर्चा आपण कशासाठी करावयाची? वर्ल्ड ट्रेड सेंटरवर दोन विमाने अतिरेक्यांनी घातली आणि त्या इमारतींचा पूर्णपणे् विध्वन्स केला आणि त्यातील काही संबंधित अतिरेकी निघून गेले. मुंबई शहरात जो अतिरेकी हल्ला झाला त्यामुळे संपूर्ण जग हादरुन गेले. दहा लोक एका देशाला वेठीस धरु शकतात ही एक मोठी शोकंतिका आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्री या ठिकाणी राईस खाण्यासाठी आल्या नव्हत्या. ब्रिटनचे पंतप्रधान देखील घटनास्थळी येऊन गेले. ते काही विनाकारण आले नाहीत. त्या घटनेची ग्रॅव्हेटी त्यांना कळली, त्यांनी या घटनेच्या बाबतीत अतिशय सखोल माहिती घेतली. त्यांना देखील कळून चुकले की, आपल्या देशावर सुध्दा अशा प्रकारचा हल्ला होऊ शकतो.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, दहशतवाद असा होतच राहील आणि तो होतच राहणार यासंबंधी अनेक वृत्तपत्रांमध्ये लेख छापून आलेले आहेत. "षंड काय करणार रक्षण". तुम्ही राज्यकर्ते आहात, तुम्हाला कोणी षंड म्हटले तर त्याचा आनंद आम्हाला होता कामा नये.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ SBT/ MMP/ KTG/ 15:55

श्री.मधुकर चव्हाण..........

उद्या आम्हाला म्हणतील. ज्यावेळी असे लोक म्हणतात "Politicians are zero, Politicians go back, No Politicians" ज्यावेळेला तुमच्या एका काँग्रेसमध्ये गेलेल्या माणसाला तुम्ही हाकलून लावता त्यावेळेला सगळ्यांनी आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. जनतेचा आपल्यावरील विश्वास का उडाला आहे? Present Democratic form वरुन जेव्हा जनतेचा विश्वास उडेल त्यावेळी लोक कायदा हातात घेऊन आपल्याला आपल्या घरातून बाहेर काढून मारतील, हाकलून देतील. त्यापूर्वीच आपण जागे झाले पाहिजे. जनतेला आपण सुरक्षितता देऊ शकत नाही. किती बळी दिले? या देशाचे दोन पंतप्रधान दहशतवादात बळी पडले आहेत. तुम्ही त्याठिकाणी कुठल्याही प्रकारचा विचार करणार नाही का? 1993 चा उल्लेख झाला. 1993 मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाचा खटला 14 वर्षे चालविलात. 14 वर्षे खटला चालविल्यानंतर अतिरेक्यांना भारतात यावे असे का वाटणार नाही. याठिकाणचे प्रचलित कायदे आपल्याला फाशी देऊ शकत नाही, जन्मठेप देऊ शकत नाही. 14-15 वर्षे खटला चालणार, तोपर्यंत बिर्याणी खाऊ, खीर कुर्मा खात बसू. शबाना आझमीसारखे कोर्टात जातील. किती मारता, आईला भेटू दिले नाही म्हणून ओरड करतील. 1993 च्या बॉम्बस्फोट खटल्यामध्ये असेच वर्णन केले गेले होते. दहावीच्या परीक्षेचा शेवटचा पेपर संपला. 87 मुले पेपर सोडवून घरी परत चालली होती. बेंगाल केमिकलजवळ ती 87 मुले चिंधड्या होऊन मेली. त्यांच्या आई वडिलांनी आपल्या घरात मुलांचा फोटो लावला असेल. परंतु रेल्वे स्टेशनवर गरीब माणसे मेली. कुणाचा बाप, कुणाची आई, कुणाची मुलगी विधवा झाली. त्यांच्या दु:खाच्या वेदना कमी करण्यासाठी त्यांच्या गावागावात जाऊन कोणी मेणबत्त्या लावल्या नाहीत. एक सेक्शन ऑफ प्रेस तसेच एका बेंच ऑफ थॉटला कळले. चार दिवस चाललेला तमाशा सत्तापालट करील की काय? तुमचे मुख्यमंत्री व तुम्हा सर्वांचे फोटो होते. You are all heroes. किती विश्वास आपल्याबद्दल व्यक्त करीत होते. त्यात इंडिया टीव्हीवर मुलाखत घेत असताना राज ठाकरे के बारे में आप का क्या कहना हैं? बरखा दत्त होत्या. त्यांना पंतप्रधान करा. तिस्टा सेतलवाड यांना होम मिनिस्टर करा. त्यांनी उत्तर देताना सांगितले की, "He is coward, where is he." त्या एका वाक्यानंतर अडचण निर्माण होणार नाही का? उद्या मनसेचे 100 कार्यकर्ते ते फुटेज पाहून त्यांच्या घरी गेले असते तर? ही वेळ येऊ द्यायची का? या देशामध्ये कायदा आहे का? 1993 च्या खटल्याचे काय झाले? त्या खटल्यातील आरोपींपैकी कुणी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ SBT/ MMP/ KTG/ 15:55

श्री.मधुकर चव्हाण..........

पॅरोलवर, कुणी जामिनावर सुटले. ब्रिटिश काळातील कायदे बदलले का? अमेरिकेवर हल्ला झाल्यानंतर पुन्हा कुणी हल्ला केला नाही. लंडनमध्ये ट्यूब रेल्वेत झालेल्या बॉम्बस्फोटानंतर पुन्हा हल्ला झाला नाही. जेथे जेथे अतिरेक्यांनी हल्ले केले तिथे पुन्हा हल्ला झाला नाही. वयं पंचाधिकम शतम्. सन्माननीय श्री.लालकृष्ण अडवाणी बोलले ते योग्यच होते. ज्यावेळेला देशावर संकट येते त्यावेळेला पक्ष महत्वाचा नाही. त्या ठिकाणी देशाप्रती भावना असली पाहिजे. परंतु श्री.अडवाणी यांनी केलेल्या सूचनेची अंमलबजावणी केली का? 1993 च्या बॉम्बस्फोटातील सगळ्या आरोपींचे तुम्ही काय करणार आहात?

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ......

त्यामधील पाच-सात लोकांना भेटी दिल्या, हायकोर्ट झाले, सुप्रिम कोर्ट झाले मग ती फाईल संसदेवर हल्ला करणाऱ्या अफझलसारखी राष्ट्राध्यक्षांकडे दयेसाठी जाईल आणि ते जाहीर करतील की माझ्याकडे फाईलच आली नाही. आज या कसाबला पकडले परंतु त्याला सोडविण्यासाठी इतर आतंकवाद्यांनी 10 लोकांना ओलीस धरुन आमच्या माणसाला सोडविण्याची मागणी केली तर काय करणार ? माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, 22 अतिरेकी होते, मग उरलेले 12 अतिरेकी कुठे गेले, ते जर पुन्हा बाहेर आले आणि आपल्यापैकी 10 लोकांना अथवा समाजातील घटकाला पकडून कसाबला सोडा नाही तर आम्ही ओलिसांना ठार मारु असा प्रकार केला तर काय करणार ? अशी परिस्थिती पुन्हा उद्‌भवू नये म्हणून टेररिझमच्या बाबतीत अत्यंत कडक कायदे करुन त्याची अंमलबजावणी करताना कुणाचाही मुलाहिजा ठेवायचा नाही, असा निर्णय घ्यावा लागणार आहे. अमेरिकेने सद्दामच्या बाबतीत जशी भूमिका घेतली तसे आपण करा. कोण होता तो सद्दाम, त्याचा आणि बुशचा काय संबंध ? परंतु अमेरिकेने आपल्याला जग काय म्हणेल याचा कुठलाही विचार न करता जे जगाच्या व अमेरिकेच्या आड येतात त्यासाठी जगाचीही पर्वा केली नाही. आपण मात्र जगाची पर्वा करीत आहोत. त्याचबरोबर आपल्या राज्यात मानवाधिकार आयोगाची स्थापना केली तो मानवाधिकार आयोग पहिल्यांदा रद्द करुन टाका, कारण तो आयोग ठराविक लोकांचीच बाजू घेतो. या देशातील सर्वांना मारा, तो मार सर्व सहनकरतील कारण या देशातील लोक सहनशील आहेत, साधूसंत सर्व सहन करतील परंतु कसाबला मारु नका, अशी वेळ येऊ नये. जसे मुलाच्या पायात काटा रुतल्यानंतर आईच्या डोळ्यात टचकन पाणी येते तसे या देशामध्ये विविध प्रकारचे मानवतावादी नेते आहेत, त्यांच्या कानावर हे जाऊ देऊ नका. माननीय मंत्री महोदय श्री. दिलीप वळसे-पाटील यांना मी एक उदाहरण म्हणून सांगू इच्छितो की, ज्यावेळेस हेमंत करकरे यांची डेड बॉडी अंत्यदर्शनासाठी पडली होती तेंव्हा आम्हीही तेथे बसलो होतो. त्यावेळेस तिस्ता सेटलवाड उपस्थित होत्या. अशा गंभीर प्रसंगी सुध्दा त्या म्हणाल्या की "हम दिल्ली जीतने वाले हैं, राजस्थान में जीत रहे है. उधर श्रीमती वसुंधरा जी की कुछ नहीं चलेगी. " मी त्यांना सांगितले की," Don't talk nonsense. This is not the place to talk. If you continue this speech, I will show you." तेथे हेमंत करकरे यांची बॉडी

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ..........

पडली आहे, सर्व लोक दर्शन घेत आहेत आणि यांना मात्र कोपऱ्यात राहून राजकारण सूचत आहे. आम्ही एका शब्दानेही बोललो नाही. तसेच या हल्ल्यात "ज्यू" दाम्पत्याचा दोन वर्षाचा मुलगा वाचलेला आहे, त्याचे आई-वडिल शहीद झाले, तो मुलगा आपला आहे. जरा कल्पना करा की, करकरेंच्या सौभाग्यवतींवर कोणता प्रसंग उद्‌भवला, त्यांच्या जागी आपण आहोत अशी कल्पना करा, साळसकरांच्या मुलीच्या जागी आपण आहोत अशी कल्पना करा. त्याचबरोबर संदीप उन्नीकृष्णनच्या अंत्यविधीच्या वेळेस त्याची आई म्हणाली "Can I touch? Can I go there? " मग ती भावनाविवश होऊन बोलली की, "अरे तुझ्या खांद्यावरुन मी जाण्याच्या ऐवजी तूच चालला आहेस, तू कधी परत येशील, मला का टाकून गेला ?" परंतु हे सगळे कशामुळे झाले असा विचार केला तर त्याला राज्यकर्तेच जबाबदार आहेत असे म्हटले तरी चालेल. म्हणून लोकांचा राज्यकर्त्यांवरील विश्वास उडत चालला आहे आणि असा प्रयत्न म्हणूनच करण्यात येतो. तेव्हा जी चूक झाली आहे, जे लोकशाहीला घातक आहे हे आपल्याला कधी कळणार आहे हा महत्वाचा प्रश्न आहे. कारण याच देशात स्व. इंदिरा गांधींनी आणिबाणी सुरु केली होती त्यावेळेस आम्ही सगळे तुरुंगात होतो, पण कोणाच्याही मनात हिंसा करुन सत्तापालट करावा अशी कल्पना कधी आली नाही. सत्तापालट ही सनदशीर मार्गानेच व्हायची असते. म्हणून मला असे वाटते की, एक तर अमेरिकेमध्ये हल्ला झाल्यानंतर तेथील सिनेटची आणि काँगेसची एक संयुक्त बैठक झाली आणि त्यांनी अशा प्रकारच्या टेररिझमच्या बाबतीत कोणत्या उपाययोजना करावयाची तसेच त्यासाठी जो निधी असतो त्याचा विनियोग होतो की नाही हे पाहण्यासाठी एक समिती तयार केली. त्याच धर्तीवर आपल्याकडे एक समिती तयार करावी आणि त्यामध्ये इतर समित्यांवर ज्याप्रमाणे विविध पक्षांचे प्रतिनिधी असतात, त्यांना घेण्यात यावे. यापुढेही असे हल्ले चालूच राहणार आहेत. कारण माणसाला मनुष्यत्वाकडून देवत्वाकडे नेण्याच्या ऐवजी मनुष्यत्वाकडून पशुत्वाकडे नेण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे आणि काही लोक त्याला खतपाणी घालत आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण......

आणि त्याला आपल्या स्वार्थासाठी जगातील काही मंडळी खतपाणी घालीत आहेत. हे जर होणार असेल तर त्यासाठी उपाययोजना सुध्दा करणे आवश्यक आहे. केवळ शांतीची कबुतरे उडवून चालत नाही. गुलाबांच्या फुलांचा ताटवा चांगला ठेवायचा असेल व त्यामध्ये जनावराने जाऊन विध्वंस करु नये म्हणून माळी त्याला तारेचे कुंपण घालत असतो व त्यामुळेच गुलाबाची फुले आपल्यला सुंदर दिसत असतात. कै. पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी सुध्दा या देशात शांततेची कबुतरे उडवली होती परंतु चीन आणि पाकिस्तानने आपल्या पाठीत खंजीर खुपसला आणि जगाकडे शस्त्रांसाठी आपल्याला दे दाण सुटे गि-हाण म्हणून भीक मागावी लागली. त्यामुळे मला असे वाटते आतंकवादाला तोंड देण्यासाठी तशा प्रकारची कमिटी करा आणि त्या कमिटीला त्या ठिकाणी अधिकार दिले नाही तरी चालतील परंतु शासनाने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी नीट होते की, नाही ते बघा. इस्त्रायल, अमेरिका, युके या सर्व देशांनी दहशतवादाला तोंड देण्यासाठी एक वेगळे मंत्रालय निर्माण केले आहे. डिफेन्स मिनिस्टर वेगळा, लॉ अँड ऑर्डर वेगळी परंतु दहशतवादाच्या संदर्भात या देशांनी एक वेगळेच मंत्रालय तयार केलेले आहे. जसे आपण आता मा.पतंगराव कदम यांच्याकडे शालेय शिक्षणाचे काम दिलेले आहे त्याचे आठ महिन्यात काय होईल याची आम्हाला माहिती नाही परंतु दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी आपण एक वेगळीच कमिटी तयार केली पाहिजे. पूर्वी कोस्टल एरियामध्ये 12 नॉटीकल्स माईल्सपर्यंत राज्य पोलीस दलाने संरक्षण करावयाचे असते परंतु आपण केंद्र सरकारला सांगा की, कस्टम, राज्य पोलीस आणि कोस्टल गार्ड या तिघांनी आता एकत्र येऊन सर्व काम करणे आवश्यक झालेले आहे.

सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाच्या लोकांनी "मुंबई स्पिरीट" नावाचे पोस्टर्स लावले आहेत परंतु मला वाटते हे मुंबई स्पिरीटचे पोस्टर्स आपण लावू नका. मुंबई स्पिरीट कधी पर्यंत? आम्ही काय मुडदे उचलायचेच काम करायचे? आम्ही काय केवळ श्रध्दांजलीच्या सभाच घ्यावयाच्या का? अमर रहेच्या घोषणा आम्हीच द्यावयाच्या काय? नातेवाईकांचे सांत्वन आम्हीच करावयाचे, त्यांना चेक द्यावयाचे, ठिकठिकाणी मरणा-यांच्या फोटो बरोबर आपले फोटो लावावयाचे? जसे काही त्यांच्याबरोबर हेच अमर झालेले आहेत. मला वाटते मुंबई स्पिरीट वगैरे काही नाही, मुंबईचे लोक आता असा अर्थ काढत आहे की, तुम्ही आम्हाला मारत राहणार आणि आम्ही आपले सर्व काही सहन करत रहायचे. नवसारीला जेव्हा बंद होऊन हत्याकांड झाले तेव्हा महात्मा गांधींना

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

सावरकरांनी विचारले की, काय प्रकार सुरु आहे त्यावेळी महात्मा गांधी म्हणाले की, "त्यांचा धर्म मारण्याचा आहे आणि आपला धर्म सहनशिलतेचा आहे." त्यामुळे आता असले धर्म बिर्म काही पाळू नका. स्पिरीट बिरीट काही नाही, मुंबईचे लोक त्यावेळी रस्त्यावर वेगळया कारणासाठी आले होते परंतु आता लोक वेगळया कारणासाठी येतील. त्यावेळचे लोक हेतु:पुरस्सर आली होती.

सभापती महोदय, मिडीयावर आपण काही तरी कंट्रोल ठेवणार आहात की, नाहीत? अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली काय चालले आहे? एक दोन ठिकाणी सोडून प्रिंट मिडीयाने कोठेही बेजबाबदारपणे वागला नाही. सगळेच इलेक्ट्रॉनीक्स मिडीया याला बेजबाबदार आहेत असे माझे मत नाही परंतु मी नावे घेऊन सांगतो की, त्या दिवशी इंडिया टीव्हीवर सांगितले जात होते की, "आतंकवादियों सावधान. पुलिस ने आपको चारों ओर से घेर लिया है. अब आपके मौत की घंटी बज गयी है. मैं आपसे अपील करती हूं कि आप शरण आईये, नहीं तो फिर आपकी मौत दरवाजे पर खड़ी है. माझ्याकडे यासंदर्भातील क्लिप आहे. दुपार पर्यंत ताज हॉटेल आणि इतर ठिकाणच्या टीव्हीचे कनेक्शन कट केले नव्हते. त्यांच्याकडे आधुनिक यंत्रे होती त्यामुळे तुम्ही टीव्हीचे कनेक्शन जरी कट केले असते तरी त्यांनी आपल्या लॅपटॉप वरुन इंटरनेटवरुन माहिती घेतली नसती? आंतकवांद्यानी म्हटले असते की, मला जर पोलिसांनी घेरले आहे तर मी येथे ओलिस ठेवलेल्या लोकांना मारुन टाकेन. या आतंकवाद्यांनी एका माणसाला 19 माळयावरुन उडी मारावयास सांगितली होती. त्या व्यक्तीने उडी मारली नाही तेव्हा त्याच्यावर आतंकवाद्यांनी मशिनगनने गोळया घातल्या होत्या. जे. जे. हॉस्पीटलच्या डॉक्टरांनी अनेक पोस्टमार्टेम केलेली आहेत परंतु त्यांनी सांगितले की, इतक्या निर्दयपणे मारल्याचे आम्ही तरी पाहिले नव्हते. या आतंकवाद्यानी चाकूने कान कापले, नाक कापले आणि त्यावेळेस सर्व महिला विवस्त्र होत्या. त्या परिस्थितीचे आम्ही या ठिकाणी वर्णन करावयाचे? आम्ही या ठिकाणी या निर्णयाखाली चर्चा करावयाची की, त्या नियमाखाली चर्चा करावयची? आपण नियम कोणतेही लावा. नियम हे व्यवस्थेसाठी केलेले आहेत. मुंबई हल्ल्याच्या वेळी दुस-या एका मिडीयाने सांगितले होते की, " मुझे ऐसा लगता है फायर ब्रिगेड का युनिफॉम पहनकर कमांडो अंदर जाने वाले है. ताकि अंदर रहने वाले आतंकवादियों को मार सके. हा मिडीया सर्व काही वर्णन सांगत होता.

यानंतर श्री. अजित...

अशुध्दित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

अब आतंकवादी चौथे माले पे गये ऐसा लगता हे, अब इधर गये ऐसा लगता है, टी.व्ही.वर ताज हॉटेलमधील सर्व ऑपरेशन दाखविले जात होते. समजा त्यातील दोन अतिरेकी बाजूच्या बिल्डींगमध्ये लपून राहिले असतील आणि त्यांनी टी.व्ही.वर पाहिले असते की, कमांडोज दोरीने खाली उतरत आहेत तर ते त्यांनी त्यांच्यावर गोळीबार करु शकले नसते काय ? अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उपयोग कल्याणासाठी झाला पाहिजे, पॉझीटीव्ह झाला पाहिजे.

सभापती महोदय, काही पोलीस अधिकाऱ्यांची त्वरित चौकशी होणे आवश्यक आहे. आपण त्यांची न्यायालयीन चौकशी करावी किंवा अन्य मार्गाने चौकशी करावी, परंतु त्या पोलीस अधिकाऱ्यांची चौकशी झाली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितल्याप्रमाणे काही पोलीस अधिकाऱ्यांना त्वरित घरी पाठविण्याची आवश्यकता आहे. सरकारने लगेच जाहीर करावे की अमुक अमुक अधिकाऱ्यांना घरी पाठविले आहे. श्री.अनामी रॉय यांच्या प्रकरणात उच्च न्यायायालाने सरकारच्या विरोधात निकाल दिल्यानंतर सरकारने त्याबाबत सुप्रीम कोर्टात धाव घेतली. अनामी रॉय कोणाचे तरी जावई असतील पण ते शासनाचे जावई आहेत काय ? मुंबईचे पोलीस आयुक्त श्री.हसन गफूर यांच्याबद्दल मला आदर आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे त्यांच्याबद्दल बरोबर बोलले. आपले पोलीस अधिकारी चालू स्थितीत असलेली वा नसलेली रिव्हॉल्व्हर घेऊन अतिरेक्यांशी कमांडो येईपर्यंत लढले. तुकाराम ओंबाळे या पोलीस कॉन्स्टेबलने पोट्यात गोळ्या घेऊन त्या अतिरेक्याला जीवंत पकडले. त्यांच्या मुलीने नवाकाळमध्ये मुलाखत देताना सांगितले आम्हाला 25 लाख रुपये देऊ नका, परंतु माझ्या बाबाने दिलेले बलिदान कमी ठरवू नका. आपण त्यांचा कुठेही उल्लेख करीत नाही. तुकाराम ओंबाळे यांनी पोट्यात गोळ्या घेऊन त्या अतिरेक्यास जीवंत पकडले नसते तर आपण पाकिस्तान विरुध्दचा पुरावा देऊ शकलो असतो काय ? एवढा पुरावा देऊन सुध्दा पाकिस्तानचे अध्यक्ष श्री.झरदारी सांगत आहेत की, हमारा कुछ नही है.

सभापती महोदय, अतिरेक्यांशी लढताना जे पोलीस अधिकारी आणि कर्मचारी शहीद झाले त्यांचा आपण सन्मान केलाच पाहिजे. त्यांच्या प्रेतयात्रेला आपण सर्वजण उपस्थित होतो. जे.जे.हॉस्पीटलमध्ये हेमंत करकरे, अशोक कामटे व विजय साळसकर यांचे शव पाहिले, त्यावेळी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

त्यांच्या चेहऱ्यावरील भाव असे वाटत होते की, दहा लोकांना मारुन जीव गेला असता तर बरे झाले असते. अतिरेक्यांशी लढताना आपले हे शूरवीर शहीद झाले. आपण त्यांचा सन्मान केला पाहिजे, त्यांच्या कुटुबियांची आपण काळजी घेतली पाहिजे. परंतु रेल्वे स्टेशनवर जे निरपराध नागरिक अतिरेक्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पावले त्यांच्या कुटुंबियांची देखील आपणास काळजी घेतली पाहिजे. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना कामाला लावून अतिरेकी हल्ल्यात मृत्युमुखी झालेल्या व्यक्तींच्या घराचे पत्ते शोधले पाहिजेत. त्यांच्या घरी जाऊन सरकार म्हणून आपल्या कुटुंब प्रमुखाचे आम्ही संरक्षण करु शकलो नाही म्हणून त्यांची क्षमा मागावी. या सर्व निरपराध लोकांचे शव आम्ही जे. जे. हॉस्पीटलमध्ये पाहिले आहेत. एका पोलीस शिपायाचा पट्टा वाकडा झालेला होता, तो पट्टा नसता तर तो पोलीस कर्मचारी मृत्यु पावला असता. तेव्हा या सर्वांकडे देखील दुर्लक्ष होता कामा नये. दराबारातील राजाचा ताज दिसतो पण राजाच्या मागे छत्री घेऊन उभा असलेला व त्यास वारा घालणारा सेवक कोणाच्या लक्षात राहत नाही. त्यांच्याकडे सुध्दा लक्ष गेले पाहिजे. तेव्हा मला असे वाटते की, आपण अतिशय शूरवीर अधिकारी गमावले. ज्यावेळी हल्ल्यासंदर्भात बातम्या येत होत्या त्यावेळी सन्नाटा झाला होता. हल्ल्यामध्ये पोलीस अधिकारी श्री.दाते जखमी झाले अशी बातमी आली तेव्हा सर्व पोलीस दल हतबल झाले. पोलिसांमध्ये शिथिलता आली. आपले सेनापती गेले तर किती भयाण परिस्थिती होती त्याप्रमाणे पोलीस दलात वातावरण निर्माण झाले. तेव्हा माझी आपल्यामार्फत सरकारला विनंती आहे की, याठिकाणी होणारी चर्चा, याठिकाणी केल्या जाणाऱ्या सूचनांना केराची टोपली दाखवून ती वांझोटी चर्चा होऊ नये It must be oriented & healthy discussion. त्यासाठी सरकारने काही ठोस उपाययोजना धेऊन यावयास पाहिजे. अन्यथा आम्ही याठिकाणी पोटतिडकीने बोलायचे आणि सरकारने थातूरमातूर उत्तर द्यायचे असे होता कामा नये.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ..

या अतिरेकी हल्ल्यात देशातील आणि परदेशातील ज्या व्यक्ती मरण पावल्या आहेत त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो. त्याचबरोबर ज्या पोलीस अधिका-यांनी शोर्य दाखविले त्यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. मुंबई शहरामध्ये जी काही घटना घडलेली आहे त्या बाबतीत शासनाने गांभीर्याने विचार करुन पाकिस्तानने आपल्या देशात आतंकवाद माजवला आहे परंतु असे कृत्य करण्यास पाकिस्तान पुन्हा धजावणार नाही अशा प्रकारची व्यवस्था आपण सर्व जण करु या. तसेच हा रक्तपात घडविणारे राक्षसी प्रवृत्तीचे जे "जल्लाद" आहेत त्यांच्या विरुध्द राजकारणविरहीत वर्तन करु या ,एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे (विधान सभेने निवडलेल्या ) :सभापती महोदय, मुंबईत घडलेल्या अतिरेक्यांच्या हल्यासबंधी आज या ठिकाणी चर्चा करण्यात येत आहे. अतिरेक्यांनी मुंबईवर जो हल्ला केला होता ती घटना अतिशय गंभीर स्वरुपाची असून सहा महिने किंवा वर्षभरच त्या घटनेचा परिणाम देशावर वा राज्यावर होणार नसून संपूर्ण राज्याला व हिंदुस्थानातील राजकीय जीवनाला वेगळे वळण मिळेल अशी ही घटना घडली असून त्यासंबंधीची चर्चा या सभागृहात सुरु आहे.

सभापती महोदय, मुंबईत अतिरेक्यांनी हल्ला केल्यानंतर ब-याच राजकीय घटना घडून गेल्या आहेत या घटना कशामुळे झाल्या यांसबंधीचे सविस्तर विवेचन येथे करण्यात आले आहे त्याचबरोबर विधानसभेमध्येसुध्दा झाले आहे. अधिवेशन सुरु होण्याच्या अगोदर वेगवेगळया राजकीय नेत्यांची वेगवेगळी विश्लेषण प्रसिध्द झाली आहेत. त्याचप्रमाणें या विषयाच्या संदर्भात लोकसभेमध्ये देखील चर्चा करण्यात आली होती.

सभापती महोदय, या विषया वरील चर्चेत भाग घेत असतांना भ्रष्टाचारासंबंधीच्या एका मुद्दाकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. गेल्या चार ते साडेचार वर्षापासून भ्रष्टाचाराचा मुद्दा सदनामध्ये आम्ही सातत्याने मांडत आहोत. पोलीस विभाग असो वा सागरी गस्ती घालणारा विभाग असो त्या ठिकाणी होणा-या भ्रष्टाचाराची बुजबुटात झालेली आहे. त्याचा अंतिम स्फोट मुंबईवर अतिरेक्यांनी केलेल्या युध्दानंतर आपल्याला पहावयास मिळत आहे. मुंबईमध्ये अतिरेक्यांनी जे बॉम्ब स्फोट केले आणि जो गोळीबार केला त्यामध्ये पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच सर्वसामान्य व्यक्ती शहीद झाल्या आहेत त्या सर्वाना मी प्रथम श्रध्दांजली अर्पण करते. आपण जो पर्यत जीवंत आहोत तसेच आपला शेवटचा श्वास असे पर्यत या शहीद झालेल्या कुटुंबाविषयी आपली काही बांधिलकी आहे अशी प्रतिज्ञा करण्याचा हा दिवस आहे अतिरेक्यांशी जे लोक लढले आहेत त्याच्या पैकी काही जणांची नावे प्रसिध्द झाली असतील परंतु काही जणांची नावे प्रसिध्द झालेली नाहीत सी.एस.टी. स्टेशनवरील अनाऊन्सर श्री झेंडे असतील वा पोलीस स्टेशनमधील एखादा कर्मचारी असू शकेल वा दवाखान्यात काम करणारे डॉक्टर्स असू शकतील अशा व्यक्तींचा उल्लेख करावा तेवढा थोडाच आहे .या सगळयाच्या शौर्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे आणि अजूनही माणुसकी जीवंत आहे याचे प्रत्यंतर या लोकांच्या वर्तणुकीतून आपल्याला दिसून आले



VTG/ SBT/ KTG/ प्रथम श्री.शिगम 16.15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे....

आहे.देशामध्ये मध्यंतरी आपल्या देशात बोफोर्स प्रकरण घडले होते त्याचप्रमाणे बुलेट प्रुफ जॉकेटच्या खरेदीच्या संदर्भात आपल्याकडे मिनी बोफोर्सचे प्रकरण झाले आहे याकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. या प्रकरणाची चौकशी होऊन त्यातील जबाबदार अधिकारी निलंबित होतील वा काही अधिका-यांच्या बदल्यासुध्दा होतील. विधानमंडळाचे अधिवेशन सुरु असल्यामुळे ही सर्व जबाबदारी आपण आपल्या खाद्यांवर घेतली असली तरी मला एका गोष्टीचा येथे उल्लेख करावयाचा आहे की, या व्यवस्थेमध्ये जेवढे आपल्या राज्यातील यंत्रणेचे फेल्युअर आहे त्या पेक्षा जास्त फेल्युअर केन्द्रातील यंत्रणांचे आहे. तट रक्षक दलाने योग्य ती काळजी का घेतली नाही त्याचबरोबर अतिरेकी येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतरही योग्य ती कार्यवाही केली नाही म्हणून केन्द्रीय गृह मंत्री श्री शिवराज पाटील यांचा राजीनामा घेतला गेला वास्तविक ही घटना अशा प्रकारची आहे की पंतप्रधानांनी राजीनामा द्यावयास पाहिजे होता राज्याच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर ही घटना घडल्या नंतर माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री बदलले गेले आहेत परंतु संपूर्ण ठिकाणी भुसभुशीत झालेल्या जमिनीतून आणि समुद्रावरुन या अतिरेक्यांनी मुंबईत प्रवेश केला आहे ही वस्तुस्थिती आहे. मला एका गोष्टीकडे शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे की, या भ्रष्टाचाराबरोबरच गृह विभागाचा जो काही कारभार चालला आहे त्याबासबतीत सन्माननीय सदस्य ॲड. अनिल परब यांनी मुद्दा मांडला आहे.अशा प्रकारच्या घटनांच्या संदर्भात या ठिकाणी बोलून काय करावयाचे असे कधी कधी आम्हाला वाटते. काही वेळा काही मंत्री किवा सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य आमचे म्हणणे ऐकतील व जे काही संवेदनशील आहेत ते त्याबाबतीत विचारही करतील परंतु रेल्वे स्टेशनमध्ये सुरक्षेची जी काही यंत्रणा बसविण्यात आली होती त्यात एक्सप्लोझिव्ह डिटेक्टर सुध्दा बसविण्यात आला होता परंतु तेथे जाहिरात लावण्यासाठी तो बाजूला काढण्यात आला होता याबाबतीत रेल्वेच्या अधिका-यांना विचारण्यात येणार आहे काय ? रेल्वेशी संबंधित दुसरा एक विषय असून जे सीसी टीव्ही बसविण्यात आलेले आहेत.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KTG/SBT. श्री. गायकवाड नंतर --- 16:20

डॉ. नीलम गाऱ्हे .....

या सीसी टीव्ही पैकी जे मेंटेनन्स आणि ज्या दूरच्या पल्ल्याच्या गाड्या होत्या तेथील सगळे सीसी टीव्ही 25 तारखेला रात्री बंद पडलेले होते. संबंधित सुरक्षा अधिकाऱ्यांनीच याबाबत सांगितले आहे की, आम्ही याबद्दलची माहिती घेत आहोत. सिनिअर डिव्हिजनल सेक्युरिटी कमिशनर,मुंबई श्री.एस.एस.पुरी, मध्य रेल्वे यांनी स्वत: ही माहिती दिलेली आहे. शिवाय श्रीमती कल्पना शर्मा आणि श्री.प्रशांत रांगणेकर, इंडियन एक्स्प्रेस यांची बातमी आहे की, 25 नोव्हेंबरलाच रेल्वे स्थानकातील सीसी टीव्ही बंद पडले होते. तेव्हा हे सीसी टीव्ही नेमके 25 तारखेलाच का बंद पडले होते ? यासारखे प्रश्न वरकरणी छोटे वाटले तरी देखील त्या मागे फार मोठी भ्रष्टाचाराची साखळी असू शकत असे येथे मला म्हणावे लागेल. सभापती महोदय, आज खरा प्रश्न असा आहे की, ही चर्चा आज आपण येथे का करीत आहोत ? आपण या संबंधात काही तरी मतैक्यावर, काही तरी समान मुद्यांवर आपण येणार आहोत का ? हा प्रश्न मला येथे उपस्थित करावासा वाटतो. सभापती महोदय, ही घटना घडल्यानंतर तीन चार प्रकारच्या प्रतिक्रिया देताना आणि तीन चार प्रकारे लोक बोलताना मी पाहिले आहे. त्यामध्ये वाहिन्यांवरून विशेषत: सगळ्या इंग्रजी वाहिन्यांचा डार्लिंग म्हणजे श्री. मिलिंद देवरा यांचे खूप इंटरव्ह्यूज मला दिसले. त्यांनी अनेक ठिकाणच्या वाहिन्यांवरून मागणी केली की, मुंबईला स्वतंत्र सीइओ असावा तसेच मुंबईचा निधी हा मुंबईलाच मिळाला पाहिजे. हे खरे आहे की, मुंबईचा निधी मुंबईला त्या प्रमाणात कमी मिळतो, तो पूर्ण मिळाला पाहिजे. पण मुंबईला वेगळा सीइओ असावा आणि महाराष्ट्रापासून आमची मुंबई वेगळी असली पाहिजे. जेव्हा ताज आणि ओबेराय हॉटेलमध्ये लोकांचे मृत्यू होतात त्यावेळेस टॅक्सपेअर जर असे म्हणू लागले की, म्हणूनच आमची मुंबई स्वतंत्र असली पाहिजे. दुसरे असे की, मेघना देसाई यांचे देखील असेच वक्तव्य आलेले आहे. याबद्दल सत्ताधारी पक्षाच्या बाजूने श्री.विनय कोरे यांनी महाराष्ट्र टाईम्समध्ये त्याचा प्रतिवाद केला आहे की, श्रीमती मेघना देसाई अशा म्हणाल्या आहेत की, मला असे वाटते की, मुंबई हे स्वतंत्र राज्य झाले पाहिजे. या सर्व गोष्टींची दिशाभूल सुरू होते तेव्हा प्रश्न असा पडतो की, यातून नक्की काय साध्य होते आहे ? वेगवेगळ्या लोकांनी स्वत:चे असंतोष, स्वत:ची नाराजी व्यक्त करणे योग्य आहे, माझे त्याबद्दल काही म्हणणे नाही. परंतु यामध्ये आपण रिडींग बिटविन द लाईन्स, कोणत्या प्रकारचा एक विषारी प्रचार पोहोचवितो आहे हे लक्षात घेऊन त्याला एक आव्हान दिले जाणे आवश्यक आहे असे मला

..... 3एम 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

वाटते. सभापती महोदय, ज्या निर्दयीपणे या अतिरेक्यांनी लोकांना मारले त्याचे वर्णन कितीही क्लेषकारक असले तरी त्याचे वर्णन जेव्हा जेव्हा होत असते तेव्हा तेव्हा असे वाटते की, ज्या हेतूने ज्यांनी कोणी या अतिरेक्यांना येथे पाठविले ते अतिरेक्यांचे सूत्रधार आता निश्चितपणे हसत असतील, निश्चितपणे त्यांना आनंद होत असेल की आपण कशा प्रकारे या देशाला, या राज्याला खिळखिळे करण्याचे काम केले आहे. मुंबईतील पैसा दिसतो, मुंबईमध्ये ज्या प्रकारे लोकांना जगण्याचे एक स्वातंत्र्य मिळते ते स्वातंत्र्य आणि गुजराथच्या किनाऱ्यावर येणारे कोट्यवधी रूपयांचे मोठ्ठाले उद्योग आणि मुंबई शहर हे पर्यटकांना एक आवडणारे असे शहर आहे, म्हणून या मुंबई शहरालाच खिळखिळे करून टाकायचे असा देखील या अतिरेक्यांचा एक हेतू होता हेही यातून स्पष्ट होत आले आहे. म्हणून मला या सदनासमोर एक प्रश्न उपस्थित करावासा वाटतो की, या कसाबला वकील मिळता कामा नये. दुसरे म्हणजे युद्धातील कैद्यांबाबत ज्याप्रकारे भूमिका त्या त्या देशाची असते तसा हा कैदी कोठल्या देशातील आहे, हा कैदी कोठल्या देशाचे नागरिकत्त्व मानणारा आहे, याबद्दल आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठपुरावा केला गेला पाहिजे आणि त्याला कोठलाही वकील न देता, त्याचेवर एकतर्फी खटला चालवून त्याला या संबंधात जे काही म्हणावयाचे असेल ते तुझे तू नोंदव म्हणून सांगाव आणि त्यानंतर त्याला त्वरित फाशीची शिक्षा झाली पाहिजे. कसाबचे वकीलपत्र जे जे वकील घेत नाहीत त्यांचे ते कृत्य अत्यंत समर्थनीय असेच आहे असे मला येथे निश्चितपणे नोंदवावयाचे आहे. सभापती महोदय, मी या संबंधात आणखी एक प्रतिक्रिया कलाकारांची ऐकली आहे. ती म्हणजे आता पाकिस्तानी कलाकारांना भारतात येऊ देता कामा नये. कारण भारतातील कलाकारांना पाकिस्तानात येऊ दिले जात नाही. तिसरी प्रतिक्रिया मी क्रिकेट जगतासंबंधातील ऐकली आहे. ती म्हणजे आता यापुढे पाकिस्तानशी क्रिकेट खेळले जाता कामा नये. ही विधाने कदाचित आमच्या समोरच्या मित्रांच्या ओळखीचीही असतील. आतापर्यंत अशी विधाने कोणी कलाकार करीत नव्हते. केवळ शिवसेना प्रमुख माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे हेच अशी विधाने करीत होते. त्यावेळेस आमच्या सन्माननीय भगिनी श्रीमती फौजियाखान ज्याप्रमाणे त्याला 'सांस्कृतिक दहशतवाद' म्हणत होत्या. परंतु आता तीच विधाने कलाकार आणि क्रिकेटच प्रेमी देखील स्वत: करीत आहेत. याला काही ठोस कारण आहे. या कसाबला वकील मिळता कामा नये. तो भारताचा नागरिकच नाही आणि पाकिस्तान जर त्याची जबाबदारी स्वीकारण्यास तयार

...... 3एम 3 ...



KBS/KTG/SBT. श्री. गायकवाड नंतर --- 16:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे ....

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती ॲड. अनिल परब )**

नाही तर हे सदन आता असे म्हणणार आहे का ? असा निर्णय घेणार आहे का ? की, या कसाबला वकील मिळाला नाही तरी न्यायसंस्थेला विनंती करून त्याला न्यायालयापुढे त्याचे असे जे काही म्हणणे असेल ते त्याने नोंदवावे अन्यथा त्याचे वकीलपत्र घेण्यासाठी कोठल्या देशाच्या वकिलाला येथे यायच आहे ते तरी आम्हाला कळावे. ....

( यानंतर श्री. सरफरे .... 3एन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

आणि त्याबाबत महिन्याभराच्या आत किंवा पंधरा दिवसाच्या आत निर्णय झाला नाहीतर न्यायसंस्था त्याबाबतचा निकाल देईल अशाप्रकारचा निर्णय आपण ठोसपणे घेणार काय? काल दै. सामनाचे संपादक आणि शिवसेना नेते खासदार श्री. संजय राऊत असे म्हणाले की, "पुन्हा कुठेतरी अतिरेकी हल्ला होऊन या कसाबला आमच्या ताब्यात द्या असे करावयास हे अतिरेकी पुढे मागे पहाणार नाहीत." आज नागपूरमध्ये दै. हितवादने आपल्या अंकात बातमी दिली आहे की, "5 terrorists in the Nagpur city" नागपूर शहराजवळ आणि पाटणसावंगीच्या जंगलामध्ये भरपूर शस्त्रात्रे आणि खांद्याला हॅवर सॅक असणारे 5 लोक त्यांना दिसले. त्या संदर्भात दै. हितवादने वृत्त दिले आहे. हा काय प्रकार आहे? याची देखील चौकशी झाली पाहिजे. या चर्चेच्या निमित्ताने दहा प्रश्न निर्माण होत आहेत. वेळेची मर्यादा असल्यामुळे हे दहा प्रश्न मी याठिकाणी वेगाने मांडणे अत्यावश्यक आहे. कारण त्यामुळे पुढील काही वस्तुस्थितीवर प्रकाश पडेल असे मला वाटते. पहिला प्रश्न असा उपस्थित करावासा वाटतो की, इतके दिवस न संपणारा दारु गोळा आणि शस्त्रसाठा व जेवण घेऊन आपण नौकेतून आलो असा तो अतिरेकी म्हणत आहे. तर मग नौकेतून आल्यानंतर संपूर्ण मुंबईभर फिरत असतांना त्या अतिरेक्यांच्या मुव्हमेंट कशाप्रकारच्या होत्या? त्यांनी मुंबईत आल्यापासून ते प्रत्यक्ष हल्ला करीपर्यंत कोणते वाहन वापरले? दुसरा प्रश्न असा उपस्थित करावासा वाटतो की, माझ्या माहितीप्रमाणे त्यावेळी माननीय मुख्यमंत्री हे केरळ राज्यात दौऱ्यावर होते. केरळमधून मुंबईत येण्यासाठी त्यांना दोन तास लागले. तोपर्यंत त्यांचा संपर्क झाला नाही. आणि तोपर्यंत एन.एस.जी. मुंबईत येण्यासाठी विलंब झाला ही त्यामधील वस्तुस्थिती आहे. तिसरा महत्वाचा मुद्दा असा की, सेंट्रल रेल्वेच्या जनरल मॅनेजर श्रीमती सौम्या राघवन सी.एस.टी. येथे स्फोट झाल्यानंतर दोन दिवसांनी दिल्लीमध्ये गेल्या होत्या. सी.एस.टी. मधील ऑपरेशन कसे तरी संपले होते, आणि दोन दिवसांनी त्या दिल्लीच्या हॉटेल ताजमधील एका आलिशान पार्टीमध्ये सहभागी झाल्या होत्या. अशाप्रकारे त्यांनी पार्टीमध्ये सहभागी होणे या गोष्टी योग्य आहेत काय? जो न्याय आपण मंत्र्यांना लावतो तोच न्याय आपण अधिकाऱ्यांना सुध्दा लावला पाहिजे. मग ते अधिकारी राज्यातील असोत किंवा केंद्रामधील असोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

डॉ. नीलम गोऱ्हे...

चौथा प्रश्न मला असा उपस्थित करावासा वाटतो की, त्या भागामध्ये सामान्य लोकांचे जीव धोक्यात असतांना पोलिसांनी आपली यंत्रणा त्याठिकाणी घुसवून त्या लोकांचे प्राण वाचविण्याच्या बाबतीत कुठलीचखबरदारी कशी घेतली नाही? मिडियाच्या संदर्भात बरेच मुद्दे उपस्थित करण्यातआले आहेत. परंतु त्या संदर्भात मला एक साधा प्रश्न उपस्थित करावासा वाटतो की, ज्यावेळी अफगाणिस्तावर हल्ला झाला किंवा अमेरिकेवर हल्ला झाला त्यावेळी सी.एन.एन. चॅनेलवर सारख्याच पध्दतीच्या बातम्या दाखविल्या जात होत्या. याला कारण माध्यमांची जेवढी जबाबदारी आहे, तेवढयाच जबाबदारीने सरकारच्या बाजूने कुणीतरी त्यांना ब्रीफ करीत होते काय? तुमच्याकडून याबाबत व्यवस्थित ब्रीफ होत नसल्यामुळे एक चॅनेल एक बातमी देते, दुसरे चॅनेल दुसरी बातमी देते. अशावेळी कुणाकडून ऑथेंटीक बातमी घ्यावयाची? याबाबत तुम्ही स्पष्टता केलेली नाही. त्यामुळे भ्रष्टाचाराच्या बरोबरीने एक संपूर्ण सत्य उघड झाले की, या महाराष्ट्राला नेता नाही. मुंबईतल्या गरीब जनतेला नेता नाही. दिल्लीमधून जी नेतेमंडळी आली त्यांची व्यवस्था बघण्यात मुंबईच्या पोलिसांची फरफट झाली, ही यामधील वस्तुस्थिती आहे. श्रीमती सौम्या राघवनच्या मुद्याबरोबरच अजून एक मुद्दा उपस्थित होतो की, आर्मीमधील काही लोकांची मुलाखत हिंदुस्थान टाईम्समध्ये छापून आली होती. त्यांनी असे म्हटले की, हे पोलीस अधिकारी मृत झाले त्याची बातमी तात्काळ वाहिन्यांवर प्रसारित झाल्यामुळे पोलिसांचे नैतिकदृष्टया खच्चीकरण झाले. ते अधिकारी सिरियस आहेत, आजारी आहेत असे दूरदर्शनवर सांगता आले असते. परंतु कोणतीही गोष्ट थांबविणे हातामध्ये राहिले नव्हते. संपूर्ण मोहीम निर्णायकी होती. यामध्ये पोलीस स्वत: लढत होते, आणि लोक स्वत:चा जीव वाचवीत होते. ज्यांना योग्य वाटेल त्या माध्यमातून माहिती दिली जात होती. ज्या लोकांना मदत करता येईल ते तिथल्या तिथे लोकांना मदत करीत होते. त्याक्षणी संपूर्ण अनागोंदी कारभार तयार झाला होता. याला कारण ही संपूर्ण परिस्थिती नेतृत्वहीन होती. यावर आपल्याला शिक्कामोर्तब झालेले दिसते. याबरोबरच मला आणखी एक प्रश्न विचारावासा वाटतो की,अतिरेकी नक्की किती होते? सरकार सातत्याने 11 अतिरेकी होते असे सांगत आहे. परंतु 11 अतिरेक्यांपेक्षाही ही संख्या जास्त असावी की काय? माननीय मुख्यमंत्र्यांनी 22 अतिरेकी असल्याचे सांगितले होते. अशापध्दतीने वेगवेगळया तऱ्हेने त्यांचे आकडे सांगितले जात होते. या सर्व मुद्यांबरोबर आणि प्रश्नांबरोबर मला अजून एका गोष्टीबाबत प्रश्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

डॉ. नीलम गोऱ्हे...

विचारावासा वाटतो की, ही घटना घडल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी कोणती आश्वासने दिली? या सभागृहामध्ये गेल्या दोन ते तीन वर्षापासून काम करणारे अनेक सभासद मला दिसत आहेत. सन 2006 मध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी जी आश्वासने दिली होती, तीच आश्वासने म्हणजे "आम्ही हे-हे करणार आहोत" अशाप्रकारे ही घटना घडल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

त्याच सागरी नौका आणि तीच सगळी व्यवस्था आम्ही करणार अशी आश्वासने दिली. जर दोन वर्षांमध्ये त्या आश्वासनांची अंमलबजावणीच झाली नसेल तर कशा प्रकारे आपल्याला न्याय मिळणार आहे ? म्हणून लोकांना सातत्याने खोटी आश्वासने देत राहणे याबद्दल देखील विचार करण्याची वेळ आलेली आहे. आणखी एक मला असे वाटते की, लोकांनी राजकारण्यांवर राग का व्यक्त केला याबाबतीत वेगवेगळ्या गोष्टी व्यक्त होत आहेत. मला असे वाटते की, राजकारण्यांकडून बहुतेक काही सुशिक्षित लोकांच्या अपेक्षा असावी की एनएसजी प्रमाणे वेगवेगळे राजकीय नेते ताजच्या रुफटॉपवर उतरणार आणि तिथे उतरुन हिरोप्रमाणे सोडविण्याचे काम करणार. अशा ठिकाणी सैन्याला किंवा पोलिसांना कमीतकमी डिस्टर्ब करणे हे काम राजकीय नेत्यांचे असते असे मला वाटते. परंतु साधारणपणे वाहिन्यांवर बोलतांना लोकांची आज देखील अशी अपेक्षा दिसते की, हे नेते काय करीत होते ? अशा सगळ्या परिस्थितीमध्ये समाजाचे प्रशिक्षण करणे देखील तितकेच गरजेचे आहे याकडे मला खासकरुन लक्ष वेधावेसे वाटते. श्री. अनामी रॉय आणि श्री. हसन गफूर यांच्याबद्दल मला सांगावयाचे आहे. खरे तर श्री. अनामी रॉय यांची नियुक्तीच चुकीची आहे, बेकायदेशीर आहे याबद्दल कोर्टाने वारंवार निर्णय दिलेले आहेत. हे निर्णय देऊन देखील श्री. अनामी रॉय हे नेहमी कॅज्युअली वावरत असतात. इतकेच नव्हे तर नरीमन पॉइन्ट भागामध्ये सगळे आमदार, मंत्री वावरत असतात. आपल्याला दिसेल की, ओबेरॉय आणि ताजवर हल्ला झाला त्यांच्या अगोदर इंग्रजी वर्तमानपत्रांमध्ये ज्या पेज थ्री वरच्याच्या बातम्या छापून याव्याच्या त्यामध्ये जेव्हा श्री. अनामी रॉय मुंबईचे पोलीस आयुक्त होते तेव्हा कायम त्यांचा फोटो असावयाचा. आता श्री. हसन गफूर आणि श्री. अनामी रॉय बॉम्बस्फोट हल्ल्यानंतर नव्हे तर त्याच्या अगोदरच्या सहा महिन्यातील पेज थ्री ची कात्रणे जर माननीय मंत्रिमहोदयांनी काढली तर आपल्याला दर दोन दिवसाआड हे लोक पार्टीला गेलेले दिसतील. यांना एवढा वेळ कसा काय मिळतो ? या पध्दतीने संपूर्ण मुंबई शहराचा कारभार हे पोलीस अधिकारी म्हणविणारे लोक करीत आहेत. श्री. आर. आर. पाटील यांचे यामध्ये एक वेगळे एन्काऊंटर झाले असे मला वाटते. त्यांचा राजीनामा क्रमप्राप्त होता. कोठल्या तरी आधीच्या निमित्ताने अनेकांना तो पाहिजे होता आणि शेवटी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

तो आता मिळाला. मला नेहमी असे वाटते की, माननीय मुख्यमंत्र्यांचा राजीनामा दोन वर्षापूर्वीच झाला असता तर एखादवेळेस या हल्ल्यातील काही जीव वाचले असते. कारण एवढ्या बेफिकिरीने गेले दोन वर्षे कारभार चाललेला आम्ही पाहात आहोत. त्याबद्दल कोठलीही खंत नाही, खेद नाही. ते स्वत: ताजमहाल हॉटेलला भेट देण्यासाठी गेले त्यावेळी रामगोपाल वर्मा यांना घेऊन गेले आणि त्यावरुन संपूर्ण वाद पेटला. ते काही डिझास्टर टुरिझम आहे काय ? आपण कोठे चाललो आहोत, कशासाठी चाललो आहोत याचा विचार करावयास पाहिजे होता. ते सगळे वाहिन्यांवरुन दाखवले जात होते आणि मग विरोधकांना काय करावयाचे ते त्यांनी केले असेल किंवा दिल्लीतील लोक सुध्दा इंग्रजी वाहिन्या आणि वर्तमानपत्रे वाचत असावीत असे मला वाटते. शेवटी श्री. विलासराव देशमुख यांनाही जावे लागले. परंतु मला सत्ताधाऱ्यांना सांगावयाचे आहे की, जनतेच्या मनामध्ये आपला काऊंटडाऊन सुरु झालेला आहे. फक्त चार किंवा पाच महिन्यांचा प्रश्न आहे. आम्हाला जरी यामध्ये राजकारण आणावयाचे नसले तरी मला यासंदर्भामध्ये या ठिकाणी सांगावयास पाहिजे की, मृतांच्या छाताडावर नाचून आम्ही सिंहासनावर कसे बसलो याच्याबद्दलचा आपला असुरी आनंद आणि दु:शासनाचा असुरी आनंद यामध्ये काहीच फरक नाही हे मला या ठिकाणी सांगावयास पाहिजे. दिल्लीमध्ये काय झाले आणि राजस्थानमध्ये काय झाले याचा आपल्याला आनंद वाटत असेल. आम्हाला असे वाटते की, कोणत्याही राज्याच्या निर्णयावरुन महाराष्ट्रावर परिणाम होत नाही. इतर राज्येही वेगवेगळ्या स्वरुपाची असतात. गावागावातील माणसांनी पाहिलेले आहे. मेलेल्या लोकांमध्ये बुलढाण्याचे लोक आहेत, साताऱ्याचे लोक आहेत तसेच गोहत्तीचे लोक आहेत, बंगलोरचे लोक आहेत. संपूर्ण हिंदुस्थानच्या हृदयावर हा फार मोठा एक व्रण झालेला आहे. याला महत्वाचे कारण असे आहे की, पाकिस्तानबद्दलची बोटचेपी, कमजोर, लांगूलचालन करणारी भूमिका जी काही तुमच्या रक्तारक्तात भिनलेली आहे त्याचा देखील हा परिणाम आहे. प्रत्येक वेळेला कधी तरी, कोठे तरी, कोणी तरी एकमेकाला सांगतो परंतु प्रत्यक्षामध्ये कोणताही इशारा दिला जात नाही. कोणतीही कठोर पावले उचलली जात नाहीत. इतकेच नव्हे तर या सगळ्या परिस्थितीमध्ये महाराष्ट्रामधील, मुंबईमधील जिना हाऊसची मागणी देखील करण्याचे धारिष्ट्य पाकिस्तान करीत असते. आज निदान सदनामध्ये एवढे तरी म्हणावे की, कसाबला वकील मिळता

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

कामा नये. तो पाकिस्तानचा नागरिक असल्यामुळे त्याला येथील वकील मिळण्याचे काही कारण नाही. त्याच्यावरचा जो खटला आहे तो ताबडतोब निकाली काढून त्याला मृत्यूदंड झाला पाहिजे, त्याला फाशी झाली पाहिजे एवढे तरी एकमताने म्हणावे. आपण जर का असे एकमताने म्हटले तर एखादवेळी आम्ही असे म्हणू की, एरवी आपण बाष्कळासारखे बडबडत असता त्याच्यातून आम्ही तुम्हाला एक गुन्हा तरी माफ केला. आज तरी आपण ठामपणे असे म्हणणार आहात काय की, पाकिस्तानी कलावंत येता कामा नये. आम्ही पाकिस्तानशी क्रिकेट खेळणार नाही असे म्हणणार आहात काय ? पाकिस्तानच्या राज्यकर्त्यांबरोबर आम्ही बोटचेपे धोरण ठेवणार आहोत असे म्हणणार आहात काय ? शेवटी मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, या सगळ्या परिस्थितीमध्ये मुस्लीम समाजातील निदान काही जणांनी समजूतदार भूमिका दाखवली आणि खरे तर त्याचे ते कर्तव्यच आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

मुस्लीम समाजातील काही जणांनी समजुतदारपणाची भूमिका घेतली आहे. आतंकवाद्यांचे मृतदेह दफन करण्यासाठी आपल्याकडील कब्रस्तानामध्ये जागा देणार नाही, काहींनी ईद साधेपणाने साजरी करण्याचे आवाहन केले होते. एक चांगली सुरुवात झाली आहे असे मला वाटते. काहींचे असे म्हणणे आहे की, मुस्लिमांनीच हे का सांगितले पाहिजे ? याचे कारण असे की, अनेक मुस्लीम लोकांची नावे सारखीच आहेत. अतिरेक्यांची नावे आहेत तशीच अनेक लोकांची नावे आहेत. पण त्याला नाईलाज आहे. माझ्याच नावाचा माणूस गुन्हयासारखे उद्योग करु लागला तर मला एकदा काय दिवसातून हजारवेळा सांगावे लागेल. तुम्हालाही सांगावे लागेल. काही वेळा एखाद्या कार्यकर्त्याचे नाव गुंडाच्या नावासारखे असते. काही आमदारांची नावे गुंडांच्या नावासारखी असू शकतात, म्हणून ते गुंड असू शकत नाहीत. त्यामुळे मुस्लिमांना बोलले म्हणजे आम्हाला बोलले असे समजण्याचे कारण नाही. जिहाद, जिहादच्या संदर्भात आम्ही किती दिवस प्रबोधन करुन घ्यावयाचे याला मर्यादा आहे. अतिरेकी लोक जिहाद हा शब्द वापरत आहेत त्यावेळी मुस्लीम धर्मानुसार तो जिहाद नाही, मग खरा जिहाद कोणता आहे, देशासाठी आम्ही काय करणार आहोत, देशासाठी काम करणे हाच मुस्लीम धर्मानुसार जिहाद आहे काय याचे स्पष्टीकरण ज्यांना मुस्लीम धर्म कळतो त्यांनी हे सर्व मुस्लीम समाजासमोर मांडले पाहिजे आणि हे मांडणे म्हणजे तुम्ही कमी प्रतीचे नागरिक आहात असा त्याचा अर्थ होत नाही. हा एकमेकाबद्दल विश्वास दृढ करण्यासाठी ही एकमेकाजवळ जाण्याची पावले असतात, एवढे बोलून मी आपली रजा घेते. धन्यवाद, जय भीम, जय महाराष्ट्र.

-------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. या चर्चेच्या दरम्यान सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांकडून बोफोर्स तोफांचा स्कॅण्डल म्हणून वारंवार उल्लेख केला जात आहे. 1986 साली बोफोर्स तोफांच्या खरेदीमध्ये भ्रष्टाचार झाला अशाप्रकारचे लोकसभेत आरोप करण्यात आले होते. त्यासंदर्भात सविस्तर चर्चा होऊन त्याची चौकशी झाली आहे, कालांतराने त्यामध्ये काही तथ्य आढळून आलेले नाही. कारगिल युध्दामध्ये तत्कालीन संरक्षण मंत्री कै.प्रमोद महाजन यांनी या बोफोर्स तोफांची तारीफ केली होती. कारगिलच्या युध्दामध्ये सर्वात जास्त जवानांना जी सपोर्ट सिस्टिम लागते ती सपोर्ट सिस्टिम बोफोर्स तोफांच्या मार्फत मिळाली हे त्यांनी वांद्रे येथे मिलिटरीचा एक कार्यक्रम घेऊन चित्रिकरणाच्या माध्यमातून दाखविले होते. त्यावेळी कॅप्टन कालिया कसे मरण पावले, सैनिक कसे वर चढत होते, त्यावेळी त्यांना कशा हालअपेष्टा सहन कराव्या लागत होत्या आणि त्या तोफा कशा वापरल्या गेल्या याचे चित्रिकरण तत्कालीन संरक्षण मंत्री कै.प्रमोद महाजन यांनी दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. बोफोर्स तोफांबाबत रेकॉर्डवर जे काही बोलले जात आहे त्या तोफांचा उल्लेख करीत असताना स्कॅण्डलचा उल्लेख केला जात आहे. तो चुकीचा आहे. असा उल्लेख केला जाऊ नये, कारण त्या बोफोर्स तोफांनी भारतीय सैन्याला फार मोलाची मदत केलेली आहे.

**तालिका सभापती ( ॲड.अनिल परब )** : यामध्ये पॉईन्ट ऑफ प्रोसिजर काय आहे ?

श्री.दिवाकर रावते : बोफोर्स तोफांच्या खरेदीत फार मोठी चूक झालेली आहे. त्यात फार मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. त्या बोफोर्स तोफांची कार्यक्षमता चांगलीच होती. पण त्या येथे आणण्याच्या वेळी भ्रष्टाचार झाला होता असा तो विषय आहे. त्या तोफा कितीही चांगल्या असल्या तरी त्यातील भ्रष्टाचार लपत नाही. हे सर्व चुकीचे रेकॉर्डवर आले आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : त्यावेळी झालेल्या चौकशीमध्ये काही सिध्द झालेले नाही.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे हया बोलण्याच्या ओघामध्ये असे म्हणाल्या की, समोरची माणसे नेहमी बडबडत असतात. माझी आपल्याला विनंती आहे की, 'बडबडत असतात' असा त्यांनी शब्दप्रयोग केला आहे तो कामकाजातून काढून टाकावा. त्यांच्याकडून असे होणार नाही असेच मी म्हटले आहे, पण बोलण्याच्या ओघात त्या असे बोलून गेल्या आहेत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी उपस्थित केलेला मुद्दा तपासून घेण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.मुझफ्फर हुसेन ( विधानसभेने निवडलेले ) सभापती महोदय, नियम 289 अन्वये दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबईमध्ये झालेल्या हल्ल्यावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आतंकवाद हा जागतिक स्तरावरील विषय असला तरी दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबईत झालेला हमला हा केवळ मुंबईवर नव्हता तर या देशाच्या लोकतंत्रावर, या देशाच्या स्वातंत्र्यावर झालेला हमला आहे असे मी म्हटले तर ते वावगे ठरु नये.

यानंतर श्री.शिगम....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ SBT/ 16:40

(श्री. मुझ्झफ्फर हुसेन पुढे सुरु

या उग्रवादाच्या विरोधात प्रशासनाने काय केले पाहिजे, राज्यकर्त्यांनी काय केले पाहिजे, त्याबाबतीत कसे डील करायला पाहिजे, कसा मार्ग काढायला पाहिजे याबाबतीत गांभीर्याने विचार करुन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. मुळात हा दहशतवाद कोठून सुरु झाला ? आपल्या देशावर आणि राज्यावर हे दहशतवादाचे सावट केव्हा पासून पडायला लागले आणि त्याची कारणे काय आहेत यासंबंधी चर्चा करण्याची गरज आहे असे मला वाटते. मी थोडक्यात यासंदर्भात बोलण्याचा प्रयत्न करणार आहे. खरे म्हणजे स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये दहशतवादाला सुरुवात झाली. प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे पाकिस्तान आणि चीन बरोबरचे युध्द असेल किंवा इल्फिल्ट्रेशन असेल या धटनानंतर दहशतवाद्यांचे हिन्दुस्थानामध्ये झालेले हल्ले यासंदर्भात केन्द्र सरकारने ग्लोबल प्लॅट फॉर्मवर मदत मागितली होती. मदतीसाठी वारंवार आवाज उठवून देखील मदत दिली गेली नाही. जगातील सुपर पॉवरने आमच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. परंतु ज्या वेळी अमेरिकेमध्ये 9/11चा हल्ला झाला त्यावेळी त्यांना या दहशतवादाची झळ पोहोचली. तोपर्यन्त ते लोक लॉजिस्टिक सपोर्ट, अम्युनिशन सपोर्ट, एफ-16 विमाने आणि अत्याधुनिक वेपन्सच्या माध्यमातून पाकिस्तानला मदत करीत होते. परंतु जेव्हा त्यांच्यावरच हल्ला झाला, लंडनमध्ये 7/11ला हल्ला झाला त्यावेळी त्याना या दहशतवादाची जाणीव झाली आणि त्यांना समजले की हा दहशतवाद आता जगामध्ये पसरलेला आहे, तो आपल्या हातामध्ये राहिलेला नाही. या दहशतवादाशी आता लढण्याची गरज आहे. या दहशतवादाची सुरुवात कोठून झाली ? तर ज्यावेळी रशियाने अफगणिस्तानमध्ये एण्ट्री केली आणि तेथील तालिबानी, अल-कायदा, ओसामा बिन लादेन यांना बाहेर काढण्याचे नाटक केले तेव्हा पासून म्हणजे 1978 - 1980 पासून या दहशतवादाला सुरुवात झाली. या तालिबान्यांच्या संदर्भात आणि त्यांचे पाकिस्तानशी असलेल्या संबंधाबाबत वृतपत्रातून लेख लिहिले जात होते. मिडल इस्ट ऑईल इकॉनॉमीमध्ये अमेरिकेची एण्ट्री झाल्यामुळे जगामध्ये दहशतवादाला सुरुवात झाली. अमेरिका आणि युरोप ही विकसित राष्ट्रे आहेत. त्यांच्या संरक्षणासाठी त्यांच्याकडे भरपूर पैसे, सामग्री, प्रशासन यंत्रणा आहे. स्वत:च्या संरक्षणासाठी ते कोणत्याही गोष्टी करु शकतात. आपला देश हा सॉफ्ट टारगेट आहे. 100 कोटीपेक्षा जास्त

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मुझ्झफ्फर हुसेन पुढे सुरु..

लोकवस्ती असलेला आपला देश आहे. कोणतीही ट्रेन थांबली तर त्यामधून 5 ते 10 हजार लोक उतरतात. एक नागपूरमधील गल्ली पाहिली तर तेथे 50 हजार लोक असतात. अशा परिस्थितीमध्ये आपल्याला कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची गरज असून त्यामधील प्रशासनामध्ये आपण निश्चितपणे कमी पडतो आहोत. आपल्या देशावर हे दहशतवादी हल्ल्याचे सावट आजपासून नाही तर ते आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्या पासून आहे. पाकिस्तान आणि चीन यांच्या बरोबरचे युध्द, गोरीला वॉर, इन्फिल्ट्रेशन या माध्यमातून दहशतवाद फोफावत गेला. 1984 मध्ये तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्यावर झालेला हल्ल हा त्यावेळचा सर्वात मोठा दहशतवादी हल्ला होता. तेव्हा पासून दहशतवाद्यांच्या कारवाया वाढत गेल्या. त्यावेळी देखील ग्लोबल मदत मागण्यात आली होती. परंतु ती मिळू शकली नाही. त्यानंतर एलटीटीईने राजीव गांधींची हत्या केली. तो देखील दहशतवादाचाच एक भाग होता. आपल्या देशाने प्रसिध्द केलेल्या यादीमध्ये 20 पेक्षा जास्त डोमेस्टिक ग्रुप्सवर बंदी आणलेली आहे. मग ते नॉर्थइस्टमधील ग्रुप असतील, सिमी असेल किंवा जम्मू-काश्मिरमधील ग्रुप्स असतील. नक्षलवादी धरुन 20 पेक्षा जास्त संघटनांवर बंदी घातलेली आहे.

.. नंतर श्री. गिते..

अस्सुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ABG/ KTG/ SBT/ प्रथम श्री. शिगम 16:45

श्री.मुझफ्फर हुसेन...

अशा वीस पेक्षा जास्त टेररिस्ट ग्रुप इन्क्ल्युडींग नक्षलाईट ग्रुप या देशात कार्यरत आहेत. हा टेररिस्टचा कॅम्प आहे. मधल्या काळामध्ये नक्षलाईटची मुव्हमेंट नक्षलवाद्यांकडून सुरु झाली. ती मुव्हमेंट आंध्र प्रदेशापर्यंत पोहोचली आहे. यात जवळपास सत्तावीस ते अठ्ठावीस राज्ये अफेक्टेड झालेली आहेत. टेररिस्टचा ग्रुप कशा पध्दतीने चळवळी ऑपरेट करीत आहे याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. आपण नेहमी म्हणतो की, दाऊद हा गुन्हेगार आहे. दाऊद हा दुबई आणि पाकिस्तानात असला तरी त्याच्या माणसांचा उपयोग टेररिस्ट ग्रुपने केला तर याचा अर्थ लोकल जे गुन्हेगार असतात, जे ॲन्टीसोशल एलिमेंट आहेत, त्यांचा उपयोग टेररिस्ट ग्रुप करीत असतात. अल-कायदा संघटना असेल, लष्कर-ए-तोयबा संघटना असेल, त्या संघटना भारत सरकारने ज्या ग्रुपवर बंदी आणली आहे त्यांचा उपयोग ते करुन घेत असतात ही गोष्ट अनेक वेळा सिध्द झालेली आहे. मॉओईस्ट ग्रुपने आणि नक्षलवाद्यांनी सीमी संघटनेला लॉजेस्टीक सपोर्ट दिलेला आहे असे वृत्त आपल्या सर्वांच्या वाचनात आले असेल. अशा परिस्थितीमध्ये आपल्याला नक्षलाईट मुव्हमेंटवरसुध्दा नियंत्रण आणण्याची गरज आहे. आपण स्टॅटिस्टीक रिपोर्ट बघितला तर सन 1998 पासून ते 2007 पर्यंत जेवढी माणसे टेररिस्टच्या ॲटॅकमध्ये मृत्यूमुखी पडली आहेत. त्यापेक्षा दुप्पट माणसे नक्षलाईटच्या मुव्हमेंटमध्ये मृत्यूमुखी पडलेली आहेत. 1957 पासून जम्मू काश्मिरमध्ये टेररिस्टची खूप मोठी वाटचाल सुरु झाली. जम्मू काश्मिरमध्ये आजच्या घडीला 60 हजारापेक्षा जास्त जनता हॅन्डीकॅप झालेली आहे. जे लोक हॅन्डीकॅप झाले आहेत, त्या लोकांवर मेंटली इफेक्ट झालेला आहे. त्या हॅन्डीकॅप लोकांची प्रकृती कधीही ठीक होऊ शकत नाही. एकटया जम्मू काश्मिरमध्ये 60 हजार लोकांना टेररिस्ट लोकांनी हॅन्डीकॅप केले आहे, त्यांच्या प्रकृतीत कधीही सुधारणा होऊ शकत नाही. नॉर्थ-इस्टमध्ये सुध्दा टेररिस्टचा प्रश्न निर्माण झाला आहे. टेररिस्टचा मुद्दा हा फक्त मुंबई हल्ल्यापूरता नाही. टेररिझम बेसीक कुठे आहे याचा शोध घेण्याची खूपच आवश्यकता आहे. आज नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर सत्ताधारी पक्षातील सदस्य आणि विरोधी पक्षातील सदस्य एकत्रितपणे चर्चा करीत आहे ही एक अतिशय चांगली गोष्ट आहे. अशा प्रकारची एकत्रितरित्या चर्चा होणे महाराष्ट्राच्या इतिहासातील पहिलीच वेळ आहे. नॉर्थ-इस्ट मध्ये सुध्दा मोठया प्रमाणात टेररिस्ट ग्रुप आहेत. त्यांच्या देखील लिंक या इंटरनॅशनल

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन...

टेरेरिझमशी जुळलेल्या असतील. अतिरेक्यांना उग्रवादी म्हणतात, टेरेरिस्ट म्हणतात, इस्लामिक टेरेरिस्ट म्हटले जाते, ते जिहादी आहेत असे म्हटले जाते. परंतु मी नम्रपणे या ठिकाणी सांगू इच्छितो की, इस्लाम धर्मामध्ये जिहादचा आणि टेरेरिझमचा कोणताही संबंध नाही. इस्लाममध्ये कोणत्याही प्रकारे मानवतेचे नुकसान करणे, जीवहानी करणे, लोकांना मृत्यूमुखी पाडणे, लोकांवर अशा प्रकारचा अन्याय करणे हे कुठेही सांगण्यात आलेले नाही. कुराणामध्ये यासंबंधीचा कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. जिहादच्या बाबतीत माननीय श्री.नवाब मलिक यांनी जिहादच्या बाबतीत खुलासा केलेला आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी सांगितले की, इन्फ्रास्ट्रकचरची आपल्याला गरज आहे. खरोखरच आपल्याला तशी गरज आहे. आपल्याला टेररिझमशी लढा द्यावयाचा असेल तर सर्वांनी एकत्र येऊनच तो दिला पाहिजे. टेरेरिझमचे सेंटर पाकिस्तानमध्ये असेल, अफगाणीस्तानमध्ये असेल, महाराष्ट्रातील सर्व पक्षीय सदस्यांनी केंद्र सरकारला सांगितले पाहिजे की, टेरेरिझमच्या सेंटर्सवर एकदाच हल्ला करा. अशा प्रकारचे सेंटर्स पाकिस्तानात असतील, त्यांच्यावर सुध्दा हल्ला करा. या ठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे उपस्थित नाहीत. परंतु मी या सभागृहाच्या माध्यमातून त्यांना सांगू इच्छितो की, या देशातील मुस्लिम बांधव या देशातीलच आहेत. ते बांधव पाकिस्तानातील नाहीत. त्यांनी कधीही पाकिस्तानची भूमिका घेतलेली नाही व या पुढेही पाकिस्तानची भूमिका ते घेणार नाहीत. टेरेरिझमचे ज्या ज्या देशात कॅम्पस् असतील, त्यांच्यावर हल्ले करुन ते उद्ध्वस्त केले पाहिजेत. मुंबई शहरात अतिरेक्यांनी ताज हॉटेल, ऑबेरॉय हॉटेल, नरीमन भवन, सी.एस.टी.रेल्वे स्टेशन येथे हल्ला केलेला आहे. या अतिरेक्यांचे खरे टारगेट ताज हॉटेल, ऑबेरॉय हॉटेल आणि नरीमन भवन होते. याचा अर्थ असा की, या अतिरेक्यांना इंटरनॅशनल मॅसेज पाठवावयाचा होता. या अतिरेक्यांना मुंबई शहरावर हल्ला करुन देशात टेरेरिझम क्रिएट करावयाचा होता.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन..........

आणि ज्याअर्थी 28 विदेशी नागरिक मृत्युमुखी पडले त्याअर्थी अमेरिका आणि इस्त्रायलचा दबाव पाकिस्तानवर वाढला. अन्यथा गेली 40 वर्षे भारत देश ओरडून जगाला सांगत आहे की, पाकिस्तानकडून आम्हाला त्रास होत आहे, त्या देशाकडून आमच्या भूमीवर अतिरेकी कारवाया घडविल्या जात आहेत तरी देखील कुणी दखल घेतली नाही. ज्याअर्थी युरोपियन, अमेरिकन आणि इस्त्रायली नागरिक मृत्युमुखी पडले त्यामुळे त्यांना जाग आली. श्रीमती राईस भारतात आल्या आणि त्यांनी पाकिस्तानवर दबाव टाकण्याचे काम केले. पाकिस्तानने त्यानुसार फक्त ड्रामा केला. त्यांनी अतिरेक्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले नाहीत, त्यांना अटक केली नाही, त्यांची बँक खाती गोठविली नाही. हा मुद्दा आंतरराष्ट्रीय स्तरावरचा असला तरी आपला देश, महाराष्ट्र आणि विशेषत: मुंबई सॉफ्ट टार्गेट आहे. 750 कि.मी.चा सागरी किनारा असून त्यावर देखरेख करण्यासाठी, सुरक्षा पुरविण्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही. निश्चितपणे आपल्याकडे सीबीआय, रॉसारख्या संस्था राज्यात अस्तित्वात आहेत. पण या संस्थांना बळकट करण्याची गरज आहे. या संस्थेमधील काही वरिष्ठ अधिकारी आपल्या कार्यालयात असतात, त्यांना पाहिजे तशी लॉजिस्टीक व्यवस्था, ॲम्युनेशन, मॅनपॉवर महाराष्ट्रात उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांना बळकटी आणण्याची गरज आहे. माननीय पंतप्रधानांनी एनएसजीच्या संदर्भात घोषणा केली. सर्वच महत्वाच्या शहरांमध्ये एनएसजी कॅम्प निर्माण केले जाणार आहेत. त्याचबरोबर सागरी आयुक्तालयाचा प्रस्ताव गेली 15 वर्षे प्रलंबित आहे, तो मार्गी लावण्याची आवश्यकता आहे. शासनावर कितीही टीका झाली तरी मी सभागृहाला हेच सांगू इच्छितो की, शासनाने आपली भूमिका पूर्ण क्षमतेने बजावली आहे. योग्य असे काम करण्याचा प्रयत्न केला आहे. या घटनेला वेगळे वळण दिले, राजकीय रंग देण्याचा प्रयत्न झाला तर ती गोष्ट वेगळी आहे. परंतु निश्चितपणे सर्वांनी इंट्रॉस्पेक्शन करण्याची गरज आहे. टेररिझम हा केवळ महाराष्ट्राचा किंवा देशाचा प्रश्न नसून तो आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रश्न बनला आहे. या टेररिझमविरुध्द लढण्यासाठी आपण सर्वजण एकदिलाने पुढे येऊन एकजूट कायम ठेवण्याची गरज आहे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

---------

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये 26 नोव्हेंबर, 2008 रोजी झालेल्या अतिरेकी हल्ल्यासंदर्भातील विषयावर सुरु असलेल्या चर्चेत भाग घेण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, जो अतिरेकी हल्ला झाला हा सर्वात मोठा हल्ला या देशावर आणि मुंबईवर झाला. ज्यामध्ये पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी, विविध दलाचे अधिकारी शहीद झाले. त्यांना मी महाराष्ट्राच्या 10 कोटी जनतेच्या वतीने सलाम करतो. याठिकाणी अत्यंत चांगल्या पध्दतीने चर्चा सुरु आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी निरनिराळे मुद्दे मांडले आहेत. उद्या या चर्चेला उत्तर दिले जाणार आहे. माझी शासनाला विनंती आहे की, नेहमीप्रमाणे चर्चा होते आणि सन्माननीय सदस्य जे मुद्दे मांडतात त्या मुद्यांचा काहीही उपयोग होत नाही. उत्तरामध्ये त्या मुद्यांच्या अनुषंगाने कोणतेही निर्णय घेतले जात नाहीत. त्यामुळे या महत्वाच्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांनी जे निरनिराळे मुद्दे मांडले आहेत त्या मुद्यांबाबत ठोस असे उत्तर दिले जावे.

सभापती महोदय, मी पाच-सहा महत्वाचे विषय मांडणार आहे. हा दहशतवाद गेल्या 15-16 वर्षापासून नैसर्गिक आपत्तीसारखे संकट असते त्या पध्दतीचे दहशतवादाचे संकट राज्यावर आणि देशावर आलेले आहे. देशात निरनिराळ्या ठिकाणी बॉम्बस्फोट झाले. अहमदाबाद, दिल्ली, जयपूर, बंगळुरु, आसाम आदी ठिकाणी बॉम्बस्फोट झाले. मुंबईवरील हल्ला हा या सर्वांचा कळस होता. याठिकाणी प्रत्यक्ष अतिरेकी आले, समुद्र किनाऱ्यावर उतरले आणि निरनिराळया ठिकाणी जाऊन त्यांनी संपूर्ण मुंबई शहराला आणि देशाला वेठीस धरले. मुंबईपासून कोकणपट्टीचा 750 कि.मी.चा सागरी किनारा आहे, ज्या मार्गाने 1993 च्या बॉम्बस्फोटातील आरडीएक्स उतरविण्यात आले.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .......

याच ठिकाणी निरनिराळ्या बंदरांवर आरडीएक्स उतरविण्यात आले होते. या बॉम्बस्फोटातील खटला 14 वर्षे चालला. त्यावेळेस निरनिराळया विभागाच्या अधिकाऱ्यांनी बेईमानी केली आणि हजारो निरपराध नागरिक मारले गेले. त्यानंतर सुध्दा आपण धडा घेतला नाही. त्यावेळेस सागरी आयुक्तालयाची केवळ घोषणाच करण्यात आली परंतु ते प्रत्यक्षात आले नाही. त्यामुळे आजही सागरी मार्गावर "आव जाव, घर तुम्हारा है" अशा प्रकारे धर्मशाळेचे वातावरण आहे. सन 1993 चा अनुभव आपल्या गाठीशी असताना सुध्दा आपण काहीच करु शकलो नाही. डहाणू आणि वसई बंदरात गस्तीसाठी असलेल्या नौका चार महिने बंद होत्या व त्यासंदर्भातील जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र माझ्याकडे आहे. आम्ही वेळोवेळी सांगितले की, किनाऱ्यावर गस्ती नौका असल्या पाहिजेत. परंतु या गस्ती नौका लावत असताना त्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला. त्या नौकांचे पठाण तुटलेले आहेत, अशा प्रकारे ही खरेदी करण्यात आली. ही खरेदी करताना संबंधित अधिकाऱ्यांनी सिंडीकेट पध्दतीने पैसे घेऊन या गस्ती नौका सिलेक्ट केल्या परंतु आज त्याही बंद आहेत, अशी परिस्थिती आहे. म्हणून माझी अशी मागणी आहे की, खरोखरच गस्ती नौका आहेत की नाही हे पाहण्याची गरज आहे, अन्यथा त्यांचा काहीच उपयोग होणार नाही. माझी दुसरी अशी मागणी आहे की, गस्ती नौका भाडयाने घेण्यापेक्षा शासनाने स्वत:च त्या खरेदी कराव्यात व किनारपट्टीवरील गस्ती वाढवावी, भाडयाच्या नौकांवर विसंबून राहू नये. सभागृहात विविध प्रकारच्या चर्चांच्या माध्यमातून आम्ही सातत्याने सांगत असतो की, सिमीचे कार्यकर्ते तसेच बांगला देशीयांवर कारवाई करा परंतु याच देशात लादेन जिंदाबाद आणि पाकिस्तान जिंदाबाद अशा घोषणा केल्या जातात, राजकारणी त्याचे सातत्याने राजकारण करतात परंतु वस्तुस्थिती मात्र कोणीच जाणून घेण्याचा प्रयत्न करीत नाही. कोकणात निरनिराळया वस्त्यांचे नाव घेऊन अनेक वेळेला निवेदने दिली व त्या माध्यमातून शासनाच्या लक्षात आणून दिले की, या वाड्या-वस्त्यांमध्ये बाहेरचे लोक राहतात, निरनिराळ्या प्रकारच्या कारवाया करतात परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले, त्यांच्याकडिल शस्त्रसाठा शोधला गेला नाही. याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. सन 1993 मध्ये ज्यांनी उत्तम कामगिरी केली त्यांचा योग्य सन्मान केला पाहिजे, त्यांच्या पाठिशी उभे राहिले पाहिजे पण ज्या पोलीस दलातील अनेक अधिकाऱ्यांनी बेईमानी केली, सन 1993 मध्ये

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर.......

गस्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांनी 10-10 आणि 25-25 हजार रुपये घेऊन स्वत:ला विकले अशा प्रकारच्या अधिकाऱ्यांना शोधून त्यांच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे. कारण यापुढेही असेच काम केले तर "सब चलता है" असे समजून या देशावरील पुढील घातपाती कारवाया कधीच थांबणार नाहीत. म्हणून ही जी "सब चलता है"ची भावना निर्माण झालेली आहे त्याला आळा घालण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे आपल्या कायद्यांमध्येही बदल होणे आवश्यक आहे. रेल्वे गाड्यांमधून तसेच मुंबईत बॉम्बस्फोट होऊन अनेक निरपराध लोक गेले आणि केंद्र व राज्यशासनाने त्यांना मदत जाहीर केली पण प्रत्यक्षात ही मदत त्यांना अद्यापही मिळाली नाही परंतु याबाबत ओरड केल्यानंतर मात्र ती मदत प्रत्यक्ष दिली जाते म्हणून जी मदत शासनाने जाहीर केली आहे ती ठराविक काळात मृतांच्या वारसांना सन्मानाने देण्यात यावी, त्यांना खेटे घालण्याची वेळ येऊ देऊ नका तरच ती त्यांच्यापर्यंत पोहचणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

सरकारने जी मदत जाहीर केलेली आहे ती संबधितांकडे वेळेवर गेली पाहिजे. मदत मिळण्याच्या संदर्भात कालमर्यादा ठेवणे आवश्यक आहे. संबंधितांना विनाकारण खेटे मारावयास लावू नका. या वीरांनी निधडया छातीने पुढे होऊन आतंकवाद्यांच्या गोळया झेलल्या आहेत त्यामुळे त्यांना सन्मानाने वागणूक द्या आणि वेळेत मदत द्या एवढेच मी निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, मुंबईवर झालेल्या हल्ल्याच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. ख-या अर्थाने हा देशावर हल्ला झाला असून त्याचा परिणाम पर्यटणावर झालेला आहे. गोव्यामध्ये अनेक विदेशी पर्यटक येत होते परंतु आता पर्यटकांच्या संख्येत फार मोठी घट झालेली आहे. या पर्यटकांनी हॉटेल्स आणि विमानांचे रिझर्व्हेशन कॅन्सल केलेले आहे. मुंबईवर झालेल्या हल्ल्यामुळे मुंबईचे आणि देशाचे एकूण 20 हजार कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. या हल्ल्यामुळे पर्यटनाचा व्यवसाय उध्वस्त झालेला आहे. पर्यटनाचा व्यवसाय उध्वस्त करण्याचा आतंकवाद्यांचा डाव होता. पर्यटनाचा व्यवसाय वाढावा यासाठी शासनाने जनतेमध्ये आणि पर्यटकांमध्ये एक प्रकारचा विश्वास आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याची आवश्यकता आहे. जनता आणि पर्यटक सुरक्षित आहेत असा विश्वास शासनाने देण्याची आवश्यकता आहे. असे जर झाले तरच पर्यटनाचा व्यवसाय सुरु राहील, पर्यटनाचा व्यवसाय वाढेल.

सभापती महोदय, पोलिसांना चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण मिळणे हा खरा सुरक्षेचा पाया आहे. शासनाने कमांडो पथक निर्माण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. पोलीस कमांडोंना प्रशिक्षण देण्याचा सुध्दा शासनाने निर्णय घेतलेला आहे. खरे म्हणजे सिव्हील आर्मी आपल्याला तयार करता आली तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल असे मला वाटते. गृहविभागाच्या खरेदीमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. खरे म्हणजे पोलिंसाना अत्याधुनिक शस्त्रे मिळाली पाहिजेत. तसेच पोलीस दलाची संख्या वाढवण्याची आवश्यकता आहे. पोलिसांना आधुनिक शस्त्रे तसेच वाहने उपलब्ध करुन दिली पाहिजेत. त्याच बरोबर नागरीकांमध्ये राष्ट्रीय भावना जागवण्याकरिता सिव्हील आर्मीची निर्मिती करणे आवश्यक आहे. 100 सिव्हील आर्मी 10 हजार लोकांकडे लक्ष देऊ शकेल. आपण ख-या अर्थाने सिव्हील आर्मी निर्माण करु शकता का याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

सभापती महोदय, आपण वर्तमान पत्रात वाचले की, आतंकवादी समुद्रमार्गे बोटीतून आले होते. हे आतंकवादी समुद्रमार्गे कसे आले, त्यांनी ताज हॉटेलमध्ये एवढा मोठा शस्त्र साठा कसा आणला याचा उल्लेख झालेला आहे. ज्यावेळेस हे अतिरेकी मुंबईच्या किनारपट्टीवर पोहचले त्यावेळी आमच्या मच्छिमारांनी हे लोक आमच्या ओळखीचे नाहीत, त्यांच्या खांद्यावर मोठया बॅगा होत्या, त्यांचे लक्षण ठीक नव्हते या संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये सांगितले होते परंतु त्या ठिकाणच्या पोलिसांनी या गोष्टीकडे लक्ष दिले नाही. त्या ठिकाणच्या पोलिसांनी जर यासंदर्भात वेळीच चौकशी केली असती तर पुढील नरसंहार टळला असता. ज्यांनी चांगले काम केले असेल त्यांचा सन्मान करा परंतु ज्यांनी काम चुकारपणा केला , आळस दाखवला, सबकुछ चलता है असे वागले त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. कोळीवाडयातील मच्छिमारांनी आंतकवाद्यांच्या संदर्भात संपूर्ण माहिती दिली असतांना ज्या पोलिसांनी त्यांचे काम केले नाही त्यांची चौकशी करुन त्यांना कडक शिक्षा द्या अशा प्रकारची भावना मी या निमित्ताने व्यक्त करतो. या घटनेमुळे सामान्य माणसाचा राजकारण्यांवरील विश्वास उडाला आहे. सामान्य माणसांमध्ये साशंकता निर्माण झालेली आहे. त्यांच्या मनात सुरक्षीततेचा विश्वास पुन्हा निर्माण करण्याचे काम तुम्हाला आम्हाला आता करावे लागणार आहे. ज्यानी चांगले काम केले आहे त्यांची प्रशंसा करा परंतु ज्यांनी आपल्या कर्तव्यात कामचुकारपणा केला आहे त्यांना कामावर ठेवू नका. कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता ज्यांनी चूक केली आहे त्यांना शिक्षा करा कारण हा राज्याच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. या विषयाच्या संदर्भात मला एक कविता आठवते ती अशी आहे.

माणसं विकली जाऊ लागली
माणसं विकत घेऊ लागली
बेईमानी वाढू लागली
राष्ट्राला तोडू लागली

आता तरी शहाणे व्हा
स्वत्वावर ठाम रहा
मातीवर प्रेम करा
राष्ट्राला समृध्द करा.

एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------- यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबई शहरावर जो हल्ला झाला त्याचा उल्लेख मी अतिरेकी किंवा दहशतवाद्यांचा हल्ला असा न करता त्यास युध्द म्हणेन. हे खऱ्या अर्थाने झालेले युध्द आहे. या संदर्भात गृह विभागाने कोणती कारवाई करावी याचा ऊहापोह सदनातील ज्येष्ठ सदस्यांनी केलेला आहे. त्याचा मी पुनरुच्चार करु इच्छित नाही. आपण याठिकाणी संवेदशनील चर्चा केल्यानंतर आपण तेवढे संवेदशनील आहोत काय असा प्रश्न निर्माण होतो. हा प्रश्न उपस्थित होण्याचे कारण म्हणजे इलेक्ट्रॉनिक्स मीडिया आहे. मीडियाने जी परिस्थिती निर्माण केली त्यामुळे असा परिणाम झाला की, जनतेमध्ये आमदार, खासदार यामध्ये दोन्ही बाजूच्या सदस्यांचा समावेश होतो. त्यांच्याबद्दल जनतेच्या मनात असंतोष निर्माण झाला. जनतेचा हा असंतोष दूर करावयाचा असेल आपणास प्रश्नाच्या मुळाशी जाणे आवश्यक आहे. ज्या बुलेटप्रुफ जॅकेटस्मुळे हेमंत करकरे,अशोक कामटे, विजय साळसकर यासारख्या चांगल्या पोलीस अधिकाऱ्यांना प्राण गमवावे लागले ती बुलेटप्रुफ जॅकेटस् घेतली त्यांच्यावर सरकार कोणती कारवाई करणार आहे ? सरकार नेहमी प्रमाणे उत्तर देईल. माझे असे म्हणणे आहे की, आता उद्भवलेल्या परिस्थितीतून काही धडा घेऊन भविष्यात असा प्रकार होणार नाही या पध्दतीने उपाययोजना करणे आवश्यक आहे आणि त्याप्रमाणे जनतेला आश्वासन द्यावे लागेल. पूर्वीच्या कॉंग्रेसने "जय जवान जय किसान " ही घोषणा दिली. आज अशी परिस्थिती आहे की, सर्व किसान आत्महत्या करीत आहेत. वीज नाही म्हणून शेतीला पाणी देता येत नाही आणि त्यामुळे पीक नाही. तर दुसरीकडे सावकऱ्यांचे डोक्यावर कर्ज वाढत आहे म्हणून तो आत्महत्या करीत आहे अशी किसानांची अवस्था आहे. तर जवानांची अवस्था याठिकाणी सकाळपासून अनेक सदस्यांनी व्यक्त केलेली आहे. माननीय शिवसेना प्रमुखांनी जय जवान जय किसान आणि जय कामगार अशी घोषणा केली होती आणि त्या कामगारांचा मी याठिकाणी उल्लेख करु इच्छितो. दिनांक 26 नोव्हेंबर रोजी मुंबई शहरावर हल्ला झाल्यानंतर मुंबईतील हॉटेल्स , मॉल्स आणि पंचतारांकित हॉटेल्समध्ये लोकांनी जाण्याचे बंद केलेले आहे. मुंबई शहरावर जो हल्ला झाला त्यामध्ये ओबेरॉय हॉटेलमधील 12 कामगार तर ताज हॉटेलमधील 26 कामगार मारले गेले. आतापर्यंत पंचतारांकित हॉटेल्स सुरक्षित जागा समजली जात होती. त्याठिकाणी आपण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर........

सुरक्षित आहोत अशी लोकांची भावना होती. परंतु आता लोकांच्या मनात भीती निर्माण झालेली आहे. डिसेंबर महिन्यात मुंबईतील सर्व हॉटेल्स बुक असतात, परंतु यावेळी मुंबईतील फक्त 20 टक्के हॉटेल्स बुक झालेली आहेत. या हॉटेल व्यवसायातील जवळपास 45 हजार कामगार काम करीत आहेत. परंतु हॉटेल्सची बुकींग कमी झाल्यामुळे या 45 हजार कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळणार आहे. याठिकाणी सांगण्यात आले की, अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्यात 183 जण मृत्युमुखी पावले तर 300 हून अधिक जण जखमी झाले. परंतु हॉटेल्स व्यवसायात काम करणाऱ्या 45 हजार कामगारांचा देखील आपणास विचार करावा लागणार आहे. मुंबई शहरातील हॉटेल्स पूर्ववत सुरु राहिली नाहीत तर या हॉटेल्समध्ये काम करणाऱ्या कामगारांवर आत्महत्या करण्याची पाळी येईल. तेव्हा आपणा सुरक्षा व्यवस्थेबरोबर या प्रश्नाचा देखील विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी जाता जाता एवढेन सांगेन की, आपणास हेमंत करकरे, अशोक कामटे, विजय साळसकर आणि इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी जे अतिरेक्यांशी लढताना शहीद झाले त्यांना श्रध्दांजली अर्पण करावयाची असेल तर झालेल्या प्रकारास जे कोणी दोषी असतील मग त्यामध्ये राजकारणी असो, वरिष्ठ पातळीवरील पोलीस अधिकारी असो वा अन्य कोणी असो त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. असे केले तरच आपण लोकांमध्ये विश्वास निर्माण करु शकू. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

------------

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ 17.10

श्री. हेमंत टकले ( विधान सभेनेनिवडलेले) सभापती महोदय, मुंबईमध्ये अतिरेक्यांनी कलेल्या हल्याच्या संदर्भात या ठिकाणी सकाळ पासून सुरु असलेल्या चर्चेत भाग घेण्याकरिता मी उभा आहे . या चर्चेच्या दरम्यान ज्या सन्माननीय सदस्यांनी मुद्दे मांडले होते त्या मुद्याची मी पुनरावृत्ती करणार नाही. ही चर्चा करीत असतांना मुंबईतील पोलीस अधिका-यामुळे पोलीस कर्मचा-यांमुळे वा शूर जवानामुळे आपण दहशतवाद्याशी लढण्यात यशस्वी झालो असे विचार व्यक्त केले परंतु येथेच थोडासा विरोधाभास आहे. मुंबई शहरावर हल्ला करण्यामागे अतिरेक्यांचा जो हेतू होता तो हेतू साध्य झाला आहे. अतिरेक्यांनी मुंबईवर केलेल्या हल्यात काही पोलीस अधिकारी त्यांच्याशी लढतांना शहीद झालेले आहेत तर काही अधिकारी जखमी झालेले आहेत. परतु त्यापेक्षासुध्दा करोडो भारतीयांच्या मनामध्ये भीती निर्माण करण्याचे काम या घटनेमुळे झालेले आहे. मुंबईत ज्या ठिकाणी ही घटना घडली आहे त्या घटनेपासून दूर अंतरावर राहणा-या असंख्य नागरिकांच्या मनात भीती निर्माण झालेली आहे. घटना स्थळापासून दूर अंतरावर राहणा-या सोसायटीतील वॉचमन तसेच लिफटमन आणि अन्य व्यक्ती देखील 60 तास ओलीस ठेवलेल्या नागारिकांप्रमाणे दहशतवादाच्या भीतीखाली जगत होत्या. उद्या आपले काय होणार आहे अशा प्रकारची चिंता असंख्य मुंबईकराना भेडसावत होती.

सभापती महोदय,मुंबई शहरावर अतिरेक्यांनी केलेल्या हल्याच्या निमित्ताने आपल्याकडे कोणती सुरक्षा व्यवस्था होती त्या सुरक्षा व्यवस्थेमध्ये काही त्रृटी होत्या काय त्यासंदर्भात कोणती उपाययोजना करावयास पाहिजे याबाबतीत अनेक सन्माननीय सदस्यानी आपले विचार येथे मांडलेले आहेत. त्यातील जो एक महत्वाचा आणि मुलभूत मुद्दा आहे. त्या संदर्भात मी या ठिकाणी एक उदाहरण देतो. जेव्हा आपली रोग प्रतिकारशक्ती कमी होते तेव्हा कोणत्याही जंतूचा प्रादूर्भाव होऊन आपल्याला तो रोग होऊ शकतो. सुरक्षेच्या दृष्टीने सरकारी यंत्रणा पूर्णपणे निरोगी म्हणजेच सक्षम आहे किंवा नाही याचा विचार करण्याची वेळ आता आली आहे. मुंबई शहरामध्ये दहा अतिरेक्यांनी येऊन बॉम्ब स्फोट घडविले होते. एक कोटी पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या या शहराला वेठीस धरु शकतो हे प्रसार माध्यमाच्या मार्फत अतिरेक्यांनी जगाला दाखवून दिले आहे. कोणाचाही विश्वास बसणार नाही अशा प्रकारच्या घटना त्या दिवशी मुंबई शहरात घडल्या होत्या हे कृत्य केवळ दहा अतिरेक्यांचे नसून त्यामागे त्यांना साथ देणारी आपल्यातीलही काही मंडळी असण्याची शक्यता आहे. त्या संदर्भात जोपर्यत चौकशी होत नाही तोपर्यत या प्रकरणामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/

श्री.हेमंत टकले...

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

नक्की किती अतिरेकी होते, त्यापैकी किती अतिरेकी परांगदा झालेले आहेत, किती अतिरेकी लपून बसलेले आहेत याचा शोध लागणार नाही आणि जो पर्यत याचा शोधं लागणार नाही तोपर्यत सामान्य माणसाच्य मनातील अस्वस्थता दूर होईल किंवा नाही याबद्दल शंका घेण्यास जागा आहे. ही लढाई पाकिस्तानातूनच सुरु आहे. अतिरेक्याना आश्रय देणारे पाकिस्तानच आहे हे अनेक घटनांतून सिध्द झालेले आहे. गेल्या आठवडयामध्ये एका इंग्रजी मासिकाच्या पहिल्या पानावर पाकिस्तानातील पंतप्रधानांचा वा अध्यक्षांचा` नव्हे तर लष्कर प्रमुखाचा फोटो छापून आला होता त्या मासिकातील एका लेखात त्यांनी असे म्हटले होते की, पाकिस्तानमध्ये कोणत्याही अर्थाने लोकशाही मार्गाने निवडून आलेले प्रतिनिधी राज्य करीत नाहीत तर लष्कर प्रमुखाच्या मार्फत तो कारभार केला जातो. त्यामुळे पाकिस्तानातून आपल्याकडे अतिरेकी येऊन हल्ले करतात ते एका अर्थाने प्रॉक्झी वॉरच आहे. पाकिस्तानातील लष्कराच्या सहाय्याने अतिरेकी गटाने भारताविरुध्द पुकारलेले हे युध्दच आहे अशा प्रकारे या हल्याची व्याख्या केल्याशिवाय गत्यंतर नाही. मुंबईत सी.एस.टी.वर या अतिरेक्यांनी हल्ला केला होता त्याचबरोबर ताज आणि ऑबेरॉय हॉटेलवर हल्ला केला होता तसेच कामा हॉस्पिटलमध्ये घुसून त्यांनी गोळीबार केला होता.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ...

याचा सगळा अभ्यास केला जाईल, याबद्दलच्या यंत्रणा किती आणि काय व कशा सुधारायला पाहिजे यासाठी समित्या नेमल्या जातील, तज्ज्ञांची मते मागविली जातील. परंतु हे लक्षात घेतले पाहिजे की, पुढील वेळेस जे कोणी अतिरेकी आपल्याकडे अतिरेकी कृत्ये करण्यासाठी आपल्याकडे येतील ते याच मार्गाने येऊन अशाच प्रकारे हल्ला करतील अशी गाफिलता बाळगून आपल्याला चालणार नाही. कारण जसा एखादा विद्यार्थी परीक्षेचा अभ्यास करतो तेव्हा मागील परीक्षेमध्ये काय प्रश्न आले होते हे पाहून आणि त्याची नोंद घेऊन त्याप्रमाणे अभ्यास करून मी आता मेरिटमध्य येईल अस म्हणता. त्याप्रमाणे आपण आता 26 नोव्हेंबरच्या घटनेचा अभ्यास करून आपली पुढील पावले टाकताना ज्या अभ्यासाची गरज आहे त्याकडे दुर्लक्ष केले तर या हल्ल्याची वेगवेगळी रूपे आपल्या डोळ्यासमोर येण्याची शक्यता आहे. त्याबाबत काय घडवायला पाहिजे याबद्दलची मानसिकता आपल्याला बदलावयाची गरज निश्चितपण आज निर्माण झालेली आहे असे मला येथे सांगावयाचे आहे. या मागे जसा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, या मुंबई शहराची जी आर्थिक परिस्थिती आहे, आज मुंबईमध्ये रोजगारासाठी लाखो लोक येत असतात आणि ते प्रामाणिकपणे काम करून 20 रूपयांपासून 100-150 रूपये रोज याप्रमाणे कमाई करीत असतात. अशा परिस्थितीत आपण घटकाभर अशी कल्पना करू या की, अशाच प्रकारे रोजगारासाठी आलेल्याला काणी सांगितले की, एवढी ही एक पिशवी या जागेवरून त्या जागेवर घेऊन जा आणि त्यासाठी तुला मी 5 हजार रूपये दतो तर ते आर्थिक प्रलोभन त्याच्या दृष्टीने मोलाच आहे आणि त्यामुळे अशा प्रकारे आर्थिक प्रलोभनाला बळी पडणाऱ्यांची संख्या या देशामध्ये मोठी आहे आणि तशी ती निर्माण झाली तर आपल्याला त्या एकूणच परिस्थितीचा विचार केल्याशिवाय स्वस्थ बसता येणार नाही. सभापती महोदय, एकूणच कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती विषयी काही मी बोलावयाचे म्हटले तर मला माहिती नाही की, समारची मंडळी माझ्याबद्दल वेगळ्या पद्धतीच्या भावना येथे व्यक्त करण्याची शक्यता आहे. सभापती महोदय, जो अतिरेकी पकडला गेला आहे त्याला वकील मिळू नये अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या आहेत. सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेरदेखील अशा भावना व्यक्त झालेल्या आहेत. काही वकिलांनीदेखील राष्ट्रप्रेमाने प्रेरित होऊन सांगितले की, आम्ही या घटनेतील अतिरेक्याचे वकीलपत्र घेणार नाही. परंतु तरीही कोणा एका वकिलाने सांगितले की, आपण त्याचे वकीलपत्र घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. तेव्हा त्याच्या घरावर हल्ला

..... 3एक्स 2 ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टकले ....

करण्यात आला. खरे तर लोकशाहीमध्ये आपली मते, आपली भूमिका मांडण्याचा निश्चितपणे प्रत्येकाला अधिकार असला तरी आपण आता अशा सगळ्या साधनांचा वापर करताना कोण संयम बाळगणार आहोत की नाही ? आपण आपल्या विराधाची बाजू मांडता आहात पण कायदा व सुव्यवस्था पाळणाऱ्या यंत्रणवर त्यामुळ जो काही ताण येणार आहे वा येतो आहे त्याचा आपण विचार करणार आहात की नाही ? तेव्हा या यंत्रणेवर ताण येणार नाही अशा पद्धतीन आपणकाम केले तर त्यातून देखील या यंत्रणांना एक प्रकारे मदतच होईल हेही प्रत्येकाने लक्षात घेतले पाहिजे. सभापती महोदय, आपण आता जे वगवेगळे प्रयोग सांगतो, परंतु ही काही प्रयोगशाळा नाही. त्यातही प्रयोगशाळेतील एक महत्त्वाच मुलभूत असे तत्त्व असते. तेथे उपलब्ध असणाऱ्या सर्व गोष्टी लक्षात घेऊन प्रयोग केला जातो आणि तो प्रयोगशाळेत यशस्वी होतो. आता ही काही प्रयोगशाळा राहिलेली नाही तर प्रत्यक्ष रणांगणासदृश्य चित्र निर्माण झालेले आहे. तेव्हा अशा परिस्थितीत सर्व नागरिकांना काही सांगावयाचे असेल तर आपल्या भावना योग्य पद्धतीने लोकां पर्यंत पोहोचविण्याचे काम आपण केले पाहजे. मला माहिती नाही की, आपण किंवा माझ्याबरोबर असलेल्या या सदनातील किती लोकांनी या घटनेपूर्वीच या शहरात लागलेला 'वेनस्डे' नावाचा इंग्रजी चित्रपट पाहिला आहे. मी हा चित्रपट पाहिला आहे आणि तो पाहताना पाहणाऱ्याच्या मनावर एक वेगळाच परिणाम करून जातो. चित्रपट संपतो तेव्हा आपण शेजारच्या माणसाशी बोलूसुद्धा शकत नाही. इतक्या प्रखरपणे मुंबईतील दहशतवादाचे चित्र त्यात रेखाटलेले आहे. या घटनेच्या दोन महिन्यापूर्वी रूपेरी पडद्यावर हे सारे पाहण्यास मिळाले होते. एका सामान्य माणसाची व्यथा, त्याची छोटीशी आशा पूर्ण होण्यासाठी रचलेले नाटक त्यात दाखविले आहे. त्यात त्याने शेवटी सांगितले की, मी तुमच्या शहरामध्ये कोठेही बॉम्ब ठेवला नव्हता. मला केवळ तुम्हाला हे दाखवून द्यायचे होते की, अशा दहशतीखाली वावरताना कसे होते ? मला सकाळी पत्नीने विचारले होते की, संध्याकाळी तुम्ही नक्की परत याल का ? येणार असाल तर घरासाठी भाजी घेऊन याल का ? ......

( यानंतर श्री. सरफरे .... 3वाय 1 ...

अध्यक्षीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

इतका साधा सोपा जगण्याचा मूलभूत प्रश्न या नागरिकांना पडलेला असतांना या समस्येकडे फार वेगळया पध्दतीने बघण्याची आणि त्यावर उपाय शोधण्याची आपणा सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. आणि त्यासाठी जनतेमध्ये जाऊन जनतेला विश्वास देण्याची काळाची गरज आहे. यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन शासनाला निश्चितपणे काहीतरी चांगले मार्ग सुचवावेत आणि या चर्चेला चांगले वळण देऊन मूर्त स्वरुप द्यावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: मुख्यमंत्र्यांचा परिचय

**उपसभापती** : आता माननीय मुख्यमंत्र्यांचे सभागृहामध्ये आगमन झाले आहे. सभागृहाच्या प्रथेप्रमाणे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. अशोक शंकरराव चव्हाण यांचा मी सभागृहाला परिचय करुन देत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, दिनांक 26 नोव्हेंबर 2008 रोजी अतिरेक्यांनी मुंबई शहरावर जो हल्ला केला, आणि त्या हल्ल्यामध्ये आपले पोलीस अधिकारी, जवान, कमांडोज, पोलीस कर्मचारी व निरपराध नागरिक शहीद झाले आहेत त्या सर्वांना अत्यंत व्यथित अंत:करणाने मी आदरांजली अर्पण करुन याठिकाणी माझे विचार मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, मी मुंबईची नागरिक असल्यामुळे आतंकवाद्यांनी मुंबई शहरावर केलेल्या हल्ल्यासंबंधी माझ्या नजरेस आलेल्या तीन गोष्टी याठिकाणी मांडणार आहे. त्यामधून काही तरी चांगले निष्पन्न होईल अशी मला अपेक्षा आहे. मुंबई शहरामध्ये ताज, नरिमन हाऊस आणि सी.एस.टी. येथे आतंकवादी गोळीबार करीत होते त्याचे वेगवेगळे चित्रण दूरदर्शनच्या वेगवेगळया चॅनेलव्दारे प्रसारीत करण्यात येत होते. त्यावेळी मी मुंबईच्या पोलीस आयुक्तांना पहिल्यांदा दूरध्वनी केला. कारण मुंबईकर म्हणून आम्हा मंडळींना या गोष्टी नवीन नाहीत. यामध्ये कामगारांचे लढे असू दे, किंवा 1993 साली झालेले बॉम्बस्फोट असू दे. त्यावेळी माझ्यासारख्या व्यक्तिंनी देखील त्यामध्ये सामाजिक काम केले होते. तो अनुभव माझ्याजवळ आहे. मी मुंबईच्या पोलीस आयुक्तांना दूरध्वनी करुन विचारले की, दूरदर्शनवर दाखविण्यात येत असलेली बातमी खरी आहे काय? त्यावेळी त्यांनी "होय खरी आहे" असे मला उत्तर दिले. त्यानंतर मी त्यांच्याशी जास्त संभाषण केले नाही. सभापती महोदय, मला याठिकाणी दोन-तीन गोष्टींचा उल्लेख करावासा वाटतो की, हेमंत करकरे हे कॉंग्रेस पक्षाच्या आझाद मैदान येथील कार्यालयाच्या बाहेरील फूटपाथवर डोक्यामध्ये लोखंडी हेल्मेट घालीत असल्याचे आणि अंगावर जॅकेट चढवीत असल्याचे दूरदर्शनवर वारंवार दाखविले जात होते. त्यावेळी माझ्यासारख्या व्यक्तिच्या मनामध्ये शंकेची पाल चुकचुकली. हेमंत करकरे यांना मिडियावाले सारखे सारखे कां दाखवीत आहेत? कारण त्यांच्याविषयी या राज्यामध्ये यापूर्वी वेगळया तऱ्हेने काहूर माजले होते. ते काय होते? कशासाठी होते आणि कुणासाठी होते? याबाबत मी याठिकाणी चर्चा करणार नाही. कारण "ज्याचे जळते त्याला कळते" अशाप्रकारची मराठीत म्हण आहे. त्यावेळीच माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली की, याठिकाणी काहीतरी काळेबेरे, वेगळे घडणार आहे. अशाप्रकारची माझ्या मनात आलेली शंका नियतीने खरी ठरविली हे माझ्यासारख्याचे दु:ख आहे. त्यावेळी मी दूरदर्शनच्या चॅनेलवरील वृत्त वारंवार वाचत होते.

(यानंतर श्री. बरवड)

16-12-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3Z-1

RDB/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. सरफरे 17:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई .....

मी सारखी वर्तमानपत्रे वाचत होते आणि त्याबद्दल आम्ही ग्रुपमध्ये चर्चा करीत होतो. मला या ठिकाणी खासकरुन तुकाराम ओंबळे यांचे कौतुक केले पाहिजे. त्याच्या पोटात गोळ्या लागल्या होत्या. सबंध जगासमोर आपण जे मांडू शकत आहोत त्यामध्ये तुकाराम ओंबळे यांचे मोठे साहस आहे. त्याने कोणत्याही गोष्टीची पर्वा न करता आतंकवाद्याला पकडून देण्यासाठी आपल्या प्राणाची बाजी लावली. मी पोलीस खात्यातील दोन अधिकाऱ्यांची नावे घेईन. एक म्हणजे पोलीस आयुक्त आणि दुसरे अधिकारी म्हणजे श्री. अनामी रॉय. सगळे अधिकारी रस्त्यावर येऊन काम करीत होते परंतु हे दोन अधिकारी आपल्याला कोठेही काम करताना दिसत नव्हते. कारण ते सगळे चित्र पेलण्यासाठी ते असमर्थ होते. म्हणूनच आपण या सगळ्या गोष्टींना तोंड देऊन संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आणि संपूर्ण देशामध्ये या मुंबई शहराची नाचक्की करुन घेतलेली आहे. या अधिकाऱ्यांविरुध्द आपण काय करणार आहोत हा देखील ऐरणीवरचा प्रश्न आहे. तो ऐरणीवरचा प्रश्न आपण सोडविला पाहिजे. स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या पासून आपण सगळ्या दृष्टीने हा महाराष्ट्र चालवित असताना आम्ही पाहिलेले आहे. या महाराष्ट्राला प्रगतीकडे घेऊन जाताना पाहिलेले आहे. महाराष्ट्राला प्रगतीकडे घेऊन जात असताना काही शक्ती प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कोठे तरी याला खतपाणी घालतात काय आणि त्या विचाराने या पोलीस अधिकाऱ्यांना मोठे करतात काय हे देखील बघण्याची वेळ आलेली आहे. मी धुळ्याला जाऊन आल्यानंतर त्याचा रिपोर्ट पक्षाला दिलेला आहे. मी आपल्याला धुळ्याचे वातावरण सांगेन. हे ठीक आहे असे माझ्या सारख्या कार्यकर्तीला वाटत नाही. महाराष्ट्राला स्वतःची एक परंपरा आहे. ज्या परंपरेतून महाराष्ट्र चालला आहे त्याच परंपरेतून तो चालला पाहिजे असे मला वाटते. त्याच्या प्रगतीच्या पाऊलखुणा आपल्याला दिसावयास पाहिजेत. 46 टक्के उद्योग मुंबई शहरातून केले जातात असे म्हटले जाते. हे शहर देशामध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे. हे शहर उद्ध्वस्त करण्यासाठी वेगवेगळ्या शक्ती आपल्या परीने कामाला लागलेल्या आहेत. मग आपण हे होऊ द्यावयाचे काय ? मघाशी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले ते ऐकून मला बरे वाटले. आपल्या पोलीस दलाने जरुर शौर्य दाखवले परंतु ताजमध्ये एवढे मटेरियल जात असताना तेथील ड्युटीवरचे लोक काय

...2...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP/

श्रीमती अलका देसाई ....

करीत होते ? त्याबद्दल शंकेची पाल चुकचुकते. बॉम्बे हॉस्पिटलमध्ये ज्यांना ॲडमिट केले होते त्यांची सेवा करण्यासाठी मी आणि माझ्या चार मैत्रिणी 10 दिवस त्या ठिकाणी होतो. आम्ही सांगितले की, आम्ही आमचे नाव सांगणार नाही. सकाळी 11.00 वाजेपासून सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत जखमी झालेल्यांची आणि त्यांच्या नातेवाईकांची सेवा आम्ही करीत होतो. त्या ठिकाणी त्यांच्याशी बोलत असताना किंवा ते दुसऱ्यांशी बोलत असताना आम्ही त्यांचे बोलणे ऐकत होतो. ते ऐकून भयावह वाटत होते. मृत्यू म्हणजे काय आणि मृत्यू कसे तांडव करतो याचे विदारक चित्र आपल्या आणि लोकांच्या समोर आल्याशिवाय राहात नाही. मी यासंदर्भात त्यांच्या नातेवाईकांबरोबर बोलत होते. दहशतवाद या देशाला कशा प्रकारे नाचवतो याबाबत सांगितले गेले. हे जरी खरे असले तरी ज्या दिवशी या देशाचे परराष्ट्र मंत्री कंधारला आतंकवाद्यांना सोडण्यासाठी गेले त्या दिवशी या देशामध्ये आतंकवाद्यांनी आपले बस्तान बसविण्यास सुरुवात केली हे देखील विसरुन चालणार नाही. त्याचा परामर्श आपल्याला कोठे तरी घेतल्याशिवाय चालणार नाही. आतंकवाद्यांना धर्म नसतो. आतंकवाद्यांना जात नसते. ते फक्त आतंकवादी असतात. त्याला कसे थांबवावयाचे हे देखील आपल्याला कळले पाहिजे. मला आपल्याला आणखी एक गोष्ट सांगावीशी वाटते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई......

सभापती महोदय, रंग दे बसंती म्हणणे सोपे आहे. परंतु रंग कोणता असावा, त्या रंगाने या देशाला मोठ करावे की लहान करावे याचाही विचार केला पाहिजे. रंग असा असावा की, जो रंग देशातील, महाराष्ट्रातील आणि मुंबई शहरातील जनतेला बरोबर घेऊन जाईल, रंग असा असावा की, मुंबई शहरातील लोकांना तो आपला वाटला पाहिजे, या मुंबई शहरातील जनतेवर प्रेम करील असा रंग असावा असे मला वाटते. ही चर्चा करीत असताना काही सन्माननीय सदस्यांनी असेही म्हटले आहे की, काही लोकांनी कमकुवतपणा दाखविला आहे. परंतु या हल्ल्यात सैन्याचा एक मोठा जवान मारला गेला आहे. अनेकजण शहीद झाले आहेत. कै.हेमंत करकरे, कै.विजय साळसकर हे शहीद झाले आहेत. कै.विजय साळसकर हे तर माझ्यासमोर लहानाचे मोठे झाले होते. मी कन्नमवार नगर येथील बिल्डिंग क्र.2 मध्ये राहते त्या इमारतीमध्ये ते रहात होते. त्यांच्या प्रमाणपत्रांच्या झेरॉक्स प्रतींवर सत्य प्रत म्हणून अलका देसाईने सहया केलेल्या आहेत. त्यामुळे मी त्यांना ओळखत होते किंवा नाही हे मला वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. ही घटना घडल्यावर मी त्यांच्या आईला भेटण्यासाठी गेले असता त्यांच्या आईने हंबरडा फोडला. तो हंबरडा ऐकल्यानंतर कै.विजय साळसकर यांच्याबद्दल जे काही उद्‌गार काढले गेले होते ते उद्‌गार त्यांनी काढले नसते. तो हंबरडा ऐकला असता तर त्यांच्या आईला प्रेम देण्याचे आणि धैर्य देण्याचेच काम तुम्हा आम्हाला करणे आवश्यक आहे. सभागृहात माननीय मुख्यमंत्री महोदय आहेत. त्यांनी यासंदर्भात कठोर कारवाई करावी. आम्ही आपल्याबरोबर असल्यामुळे आपण कठोर पावले उचलावीत. कोणी राजीनामा दिला, कोणी दिला नाही या चर्चेमध्ये न पडता महाराष्ट्राला पुढे कसे घेऊन जाणार आहोत हा तुमच्या आणि आमच्या समोरील प्रश्न आहे. हा प्रश्न सोडविताना कोणतीही जात, धर्म, पंथ न पाहता सगळयांनी एक दिलाने या घटनेचा धिक्कार केला पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण संपविते. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.सय्यद पाशा (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 289 अन्वये या सभागृहामध्ये दिवसभर महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु झालेली आहे. या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मी मुद्यांची द्विरुक्ती करणार नाही. कारण संपूर्ण महाराष्ट्रातील जनता ही चर्चा ऐकत आहे. उद्या सर्व पत्रकार ही चर्चा वर्तमानपत्रात छापणार आहेत. ही चर्चा लवकर संपवावयाची असेल तर संपवावी. सभागृहात कॅमेरे लावले असल्यामुळे या चर्चेचा स्तर चांगला राहिला पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, संपूर्ण देशाला हादरा देणारी ही घटना होती. मुंबईवर झालेला हा मोठा हल्ला होता. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी आतंकवादावर बोलत असताना यातील अनेक विषय वेगवेगळे करण्याची गरज व्यक्त केली होती. देश पातळीवरील आंतकवाद, जागतिक पातळीवरील आतंकवाद असे दोन वेगवेगळे विषय आहे. आजपर्यंत भारतामध्ये बॉम्बस्फोट करण्यासाठी कट रचले जात होते. तेथून मशीन येथे येत होत्या. आता थेट बॉम्ब घेऊनच माणसे येऊ लागली आहेत. म्हणजे आता त्यांना कशाचीही, कोणाचीही भीती वाटत नाही असा त्याचा अर्थ होतो. एक गोष्ट सूर्य प्रकाशाइतकी स्वच्छ आहे. या अतिरेक्यांपैकी एकमेव अतिरेकी जीवंत सापडला आहे, तो केवळ 1.5 लाख रुपयांच्या मोहापायी अतिरेक्यांना प्रशिक्षण देणा-या केंद्रात गेला. म्हणजे कोठे तरी प्रशिक्षण देणारे केंद्र सुरु आहे हे सिध्द होते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 17:35

(श्री. पाशा पटेल ..

एका विशिष्ट ठिकाणी हे प्रशिक्षण केंद्र चालू आहे आणि त्या केंद्रातून हत्यारे आणि बॉम्ब धेऊन माणसे पाठविली जातात असे ज्या क्षणी कळले त्याच क्षणी ते उद्ध्वस्त करायला पाहिजे होते. झोपेत असलेल्या माणसाच्या अंगावर चिलटे बसले तर त्याचा हात आपोआपच त्या चिलटावर जातो, या प्रमाणे या अड्ड्यांच्या संदर्भात आपली पहिली प्रतिक्रिया असायला पाहिजे होती. परंतु हे अड्डे उद्ध्वस्त न करता त्यांचे चर्चेचे गु-हाळ करण्यात आले आणि ती माझ्या दृष्टीने अत्यंत वाईट अशी गोष्ट झालेली आहे. एक गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी सत्य आहे की, या हल्ल्याची पूर्वकल्पना होती असे लोकसत्ता सारखे दैनिक सांगते. आपण राजकारणातील लोक जेवढे गंभीर असायला पाहिजे तेवढे ते नव्हतो. परंतु वेगवेगळया डिपार्टमेंटचे कार्यभार ज्यांच्यावर सोपविलेले आहेत ते अधिकारी देखील गंभीर नव्हते काय ? मी एकदा एका मोठ्या मंत्र्यांना सांगितले की, अशा अशा पध्दतीची सी.आय.डी. चौकशी लावा. त्यावेळी त्यांनी सांगितले की, जे अधिकारी कुचकामी असतात त्यांना सी.आय.डी.मध्ये पाठविले जाते. म्हणजे महत्वाच्या आणि लक्ष ठेवण्याच्या जागेवर अशी बेकार आणि अकार्यक्षम माणसे ठेवली गेली असतील आणि त्यांच्या हातून चुका झाल्या असतील तर त्यांना काय शिक्षा करायची ? आज पुढा-यांना शिक्षा झाली, केंद्रीय गृहमंत्री गेले, राज्याचे गृहमंत्री गेले त्याप्रमाणे जे कामचुकार अधिकारी असतील त्यांनाही शिक्षा झाली पाहिजे. त्यांना शिक्षा झाली तरच ते जागरुकतेने काम करतील. आता राज्याची विस्कटलेली धडी बसविण्यासाठी मंत्रिमंडळामध्ये बदल करण्यात आलेला आहे. ही गोष्ट केवळ येथे थांबणारी नाही. मी बजेटचे संपूर्ण पुस्तक वाचलेले आहे. महाराष्ट्रातील पोलीस खात्यावर केवळ 4टक्के खर्च झालेला आहे. एवढ्यावर या पोलीस खात्याचे भागणार आहे काय ? ही शेवटची धटना नाही. अशा प्रकारच्या धटना वारंवार होणार आहेत. माझ्याकडे 11व्या पंचवार्षिक योजनेचा कच्चा ड्राफ्ट आहे. त्याकडे सर्वांनी गंभीरपणे लक्ष देण्याची गरज आहे. केन्द्र सरकारच्या 11व्या पंचवार्षिक योजनेमध्ये केन्द्र सरकारने कबूल केलेले आहे की, अन्याय आणि नैराश्यातून केवळ अतिरेकाचा जन्म होतो. देशभरातल्या शंभरहून अधिक जिल्हयात नक्षलवाद्यांच्या संदर्भात धोक्याचा इशारा दिलेला आहे. कुठे जातीय संघर्षाच्या माध्यमातून जनतेमधील असंतोष बाहेर पडत आहे. अशा लोकांपर्यन्त विकासाचे लाभ पोहोचविण्यात शासन यंत्रणेला अपयश आलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत

..2..

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 17:35

(श्री. पाशा पटेल..)

टकले यांनी सांगितल्या प्रमाणे 5 हजार रुपये दिले की कोणीही इकडची पिशवी तिकडे नेणारे लोक आहेत. अशा प्रकारच्या विघातक घटना वारंवार होऊ नयेत म्हणून पोलीस खात्याचे 4 टक्क्याचे बजेट वाढवले पाहिजे. मी सहज एका अधिका-याकडे गेलो.

... नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 17:40

श्री.सय्यद पाशा....

त्यांनी मला सहज थट्टेने सांगितले की, वाह रे वाह पुढारी, पोलिसांना अशी चिलखत दिली की, रिव्हॉव्हरमधून मारलेली गोळी इकडून तिकडे गेली. अशी निकृष्ट चिलखते कोणी अधिका-यांनी खरेदी केली की पुढा-यांनी खरेदी केली यासंबंधीचा खुलासा सभागृहात होणे आवश्यक आहे. यापुढे तरी अशा प्रकारची खरेदी करताना कोणत्याही प्रकारची कुचराई होता कामा नये. मला अतिशय वाईट वाटते म्हणून मी या ठिकाणी एका गोष्टीचा उल्लेख करणार आहे. देशामध्ये अशा पध्दतीचे हल्ले झाले. हल्ल् करण्यासाठी येणा-या व्यक्ती मुस्लिम समाजातील असतील. त्या हल्लेखोराचे नाव आणि माझे नावा सारखे आहे. सारख्या नावाच्या व्यक्ती बाहेरच्या देशातून या देशात येऊ लागल्यामुळे मोठया अडचणी निर्माण झालेल्या आहेत. या देशात वारंवार मागणी केली जात आहे की, श्री.अफझल गुरु यास फाशी द्यावी. सूर्य प्रकाशाइतके स्वच्छ आहे की, अफझल गुरुला फाशी दिली नाही तर देशातील मुस्लिमांच्या मुलांना नोक-या मिळणार आहेत काय ? त्यांना पदोन्नती मिळणार आहे काय ? अफझल गुरु म्हणजे या देशातील मुस्लिमांचा गुरु आहे काय ? अतिरेकी हा अतिरेकी असतो, त्याला जात, धर्म नसतो. त्या अफझल गुरुला बाजूला ठेवण्याचे काम का केले जात आहे ही गोष्ट माझ्या लक्षात येत नाही. अशा गोष्टींमुळे समाजावर काय विपरीत परिणाम होणार आहे याचा विचार आपणा सर्वांना करावा लागणार आहे. श्री.इब्राहिम ताईत, हे एक मौलवी असून त्यांची "रजा अकादमी" नावाची मोठी संस्था स्थापन केली आहे. श्री. इब्राहिम ताईत यांनी सांगितले की, हे आतंकवादी मुसलमान जरी असले तरी त्यांचे शव मुंबईतील मुस्लिम दफनभूमीमध्ये करु दिले जाणार नाही. मुस्लिम समाजातील लोकांची गेल्या पंचवीस वर्षापूर्वीची मानसिकता आता राहिलेली नाही. ही गोष्ट या देशातील सर्व सामान्य माणसाच्या लक्षात येऊ लागली आहे. मी ज्या छताखाली बसलो आहे, ते छत जर कोसळले तर माझा जीव वाचणार नाही. हल्ला केला तर मी वाचणार नाही याची आतंकवाद्यांना कल्पना असते. एका भावाने दुस-या भावास मारले तर तो भाऊ त्या भावास मारतो, त्याच्या विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवितो. वेळ पडली तर मारणा-या भावास ठार करण्यासाठी सुपारी देतो. एकाच आईच्या पोटातून दोन जन्मलेली मुले असे वागत असतील तर ती गोष्ट कोणाच्याही हिताची नाही. कोणता पाकिस्तान, कोण मुसलमान, त्यांच्यांशी आमचे काही देणे घेणे नाही. या देशातून जे मुसलमान पाकिस्तानात गेले आहेत, त्यांना त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे अधिकार नाहीत. माझे

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा...

मामा पाकिस्तानामध्ये आहेत. दहा-पंधरा वर्षापूर्वी ते भारतात आले होते. त्यावेळी त्यांनी सांगितले की, भारतातून पाकिस्तानमध्ये गेलेल्या मुसलमानास पाकिस्तानी मुस्लिम वस्तीत जावयाचे असेल तर त्या व्यक्तीस सोबत पिस्तुल घेऊन जावे लागते. कारण त्या वस्तीमध्ये गेल्यानंतर त्या व्यक्तीच्या जीवाची गॅरंटी नाही. त्याने माझ्या आईस काही दिवसांपूर्वी विचारले की, तुझा मुलगा काय करतो ? माझ्या आईने त्यांना सांगितले की, तो शेतक-यांचा खूप मोठा नेता आहे. आईचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर त्यांनी असे शब्द वापरले की, हिंदुस्तानमध्ये मुसलमानोकों इतनी आझादी है क्या ? ही वस्तुस्थिती कोणी नाकारु शकत नाही.

सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. या विषयाची पाळेमुळे खूप खोलवर रुजलेली आहेत. या अनुषंगाने मी शेवटचे दोनच मुद्दे उपस्थित करणार आहे. पोलीस विभागासाठी फक्त 4 टक्के निधी उपलब्ध करुन दिला जातो त्यात मोठया प्रमाणात वाढ करण्यात येईल काय ? याबाबतची माहिती सभागृहाला दिली गेली पाहिजे.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी आहे की, आतंकवाद्याला माहिती असते की, मी हल्ला केला तर माझे मरण अटळ आहे. आपल्याकडे जे सिव्हील पोलीस आहेत, त्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे काय या गोष्टीकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. माझ्या घरात माझी पत्नी आजारी असेल तर सायंकाळी औषधे घेऊन जाण्यासाठी पैसे नसतील तर दोन पैसे कोठून मिळत असतील तर ते मी निश्चितपणे घेणार. पोलीस विभाग खूप मोठा आहे. त्यांना जे वेतन दिले जात आहे, त्या वेतनात त्याचे कुटुंब व्यवस्थितपणे चालते आहे काय या गोष्टीचा देखील शासनाने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, सगळयात महत्वाची गोष्ट अशी आहे की, नदीचे पात्रातून पाणी सातत्याने वहात असले तर त्या पाण्यास कधी शेवाळे लागत नाही, त्या पाण्यात किडे रहात नाही.आळया रहात नाहीत. परंतु वाहते पाणी थांबले तर तेथे डबके तयार होते. त्या डबक्यातील पाण्याला शेवाळे लागते, तसेच त्या पाण्यात किडे व आळया सुध्दा आढळून येतात. जसजसे डबक्यातील पाणी कमी कमी होत जाते, त्यावेळी डबक्यातील किडे आणि आळयामध्ये अन्नासाठी मारामारी सुरु होते.

यानंतर श्री. भोगले....





श्री.पाशा पटेल........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देशाचा विकास खुंटला की देशाचे डबके होते. एकदा डबके झाले की अन्नासाठी मारामार सुरु होते हे हमखास आहे. हे सूर्य प्रकाशाइतके स्वच्छ आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की, राजकीय क्षेत्रातील लोकशाही सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात विस्तारत गेली नाही तर याचे चटके ज्याला ज्याला बसतील ते ते लोक घटना जाळल्याशिवाय राहणार नाहीत. म्हणून मला एकच विनंती करावयाची आहे की, अकरावी पंचवार्षिक योजना हेतुपुरस्सर कोणी लिहिलेली नाही. या देशातील वरिष्ठ आय.ए.एस.अधिकाऱ्यांनी चिंतन, मनन करुन लिहिलेली आहे. हे शब्द फक्त पुस्तकात न राहता या शब्दांचा अर्थ सगळ्या राज्यकर्त्यांनी समजून घेऊन काय चालले आहे याचा विचार करावा लागणार आहे. याचा विचार केला नाही तर मला दु:ख एका गोष्टीचे होते ते म्हणजे आणखी एक नवीन वाद सुरु होणार आहे तो आपण कसा निपटून काढणार आहात?

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, हा देश शेतकऱ्यांचा आहे. मी जो विषय मांडतो आहे तो शेतकऱ्यांशी संबंधित आहे. आता सहावा वेतन आयोग लागू केला जाणार आहे. एका बाजूला रोज 2500 ते 3000 रुपये वेतन घेणारे आणि दुसऱ्या बाजूला 66 रुपये आणि 82 रुपये अशा दोन नमुन्यात मजुरी मिळणार आहे. हे बघून गावातील माणूस काय करील? माझ्याकडे एका आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे पत्र आहे. जळगाव जिल्हयातील किनगाव गावातील शेतकऱ्याने आत्महत्या केली. त्यापूर्वी त्याने तीन पानी पत्र लिहून ठेवले. त्याने लिहिले आहे की, राज्यकर्ते सुधारले नाही तर नांगर हातात धरणारे बळकट हात पुढाऱ्यांचे नरडे दाबल्याशिवाय राहणार नाहीत. या चर्चेमुळे होऊ घातलेल्या पुढच्या संकटाची चाहूल लागू लागली आहे. राजकीय खुर्ची मिळाली तरी ती उपभोग घेण्यासाठी नसून ती सेवेसाठी आहे आणि याच खुर्चीतून या देशाचे भविष्य घडणार आहे. या खुर्चीमध्ये मी बसलो आहे तोपर्यंत मला प्रत्येक विषय गांभीर्याने घ्यावा लागणार आहे. एखाद्या गोष्टीचे चिंतन करताना रात्र कशी गेली हे कळणार नाही अशा पध्दतीचे वागणे आपल्या सगळ्यांमध्ये आले तरच हे सगळे प्रश्न मिटतील. नाही तर मी खुर्चीत बसलो. किती दिवस बसतो तेवढे दिवस जमवून घेतो. खुर्ची गेली तर संपले असे करुन चालणार नाही. हा विषय गंभीर आहे. 5-10 मिनिटांच्या चर्चेमधून काही मार्ग सापडणार नाही एवढेच या प्रसंगी सांगून या सगळ्या विषयाचा गंभीरपणे विचार केला जावा एवढीच सभागृहाला विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

----------

..2..



श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, सकाळपासूनच्या चर्चेतून माझ्यासमोर आलेले विचार मी मांडणार आहे. तत्पूर्वी आम्हाला काय वाटते त्या मागण्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पहिल्यांदा मी मांडणार आहे.  या सर्व घटनेमधून जी परिस्थिती निर्माण झाली, त्यातून आमच्या अपेक्षा अशा आहेत ज्यांचा याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, या हल्ल्यामध्ये पोलिसांच्या कारवाईची जबाबदारी सचिव पातळीवरचे अधिकारी, हेमंत करकरे, विजय साळसकर, अशोक कामटे यांची घटनास्थळी घेतलेली धाव, त्यातून त्यांच्यासहित इतर जबाबदार पोलीस अधिकाऱ्यांचे म्हणजेच पोलीस आयुक्त कार्यालय, गुन्हे अन्वेषण विभाग, त्यांचे प्रमुख, ज्या विभागामध्ये घटना घडली त्या विभागाचे प्रमुख श्री.व्यंकटेश, मुंबईचा बाप काढणारे श्री.के.एल.प्रसाद, ज्यांच्याकडे हे महत्वाचे अधिकार होते यांचा या कार्यवाही काळातील सहभाग, आझाद मैदान पोलीस स्टेशनचे श्री.नांगरे पाटील आपल्या एकट्या सहकाऱ्यासहित ताज हॉटेलमध्ये अतिरेक्यांशी झुंज देत असताना इतर अधिकाऱ्यांचा नाकर्तेपणा आणि कारवाईस झालेला उशीर व त्यातून निर्माण झालेली परिस्थिती याची पहिल्यांदा तातडीने न्यायालयीन चौकशी करावी ही पहिली मागणी आहे.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. भोगले 17:50

श्री. दिवाकर रावते.....

आजच्या चर्चेनंतर उद्या जर शासनाने सांगितले की, अशा प्रकारे आम्हाला करता येणार नाही त्या अनुषंगाने मी अगोदरच काही मागण्या मांडत आहेत. जर शासनाने उद्या असे म्हटले तर या मुंबईचे पोलीस आयुक्त व श्री. अनामी रॉय यांना ताबडतोब निलंबित केले तर आम्हाला आनंदच आहे अन्यथा त्यांना तातडीच्या रजेवर पाठवावे असा निर्णय घेतला तरच या चर्चेला काही तरी अर्थ राहील. परंतु निलंबित करता येणार नाही, चौकशी चालू आहे असे शासनाने सांगितले तर माझी अशी मागणी आहे की, यासंबंधीची न्यायालयीन चौकशी करावी.

महोदय, देशाच्या सार्वभौम सत्तेवर हल्ला करुन राष्ट्राला आव्हान देणाऱ्या अफझलला फाशीची शिक्षा त्वरित अंमलात आणून यापुढे हा देश, या देशावर हमला करणाऱ्यांची गय करणार नाही हा इशारा देत असल्याचा ठराव महाराष्ट्र विधि मंडळाच्या दोन्ही सदनात शासनाकडून मांडावा आणि त्या ठरावाला दोन्ही बाजूच्या सदस्यांची संमती मिळवावी असा ठराव पास करावा, जेणे करुन यातून संदेश जाईल. आतंकवादास प्रतिबंध करणाऱ्या मोकासारखा कायदा केंद्राने त्वरित मंजूर करावा अशा प्रकारचा एक ठराव विधि मंडळाने मंजूर करुन केंद्राकडे शिफारस करावी. सर्वात महत्वाचे म्हणजे "आम्ही येथे काहीही केले तरी चालते, कारण आम्हाला या देशात शिक्षा मिळणार नाही" अशी जी अतिरेक्यांची भावना झाली त्याला आळा घातला पाहिजे. सन 1992-93 मधील बॉम्बस्फोटातील आरोपींना न्यायालयीन कामकाज संपवूलन शिक्षा होण्यास 15 वर्षे लागली. त्यात शिक्षा झालेले जन्मठेप आणि फाशीचे गुन्हेगार आहेत. परंतु सर्वोच्च न्यायालयात हा खटला प्रलंबित असल्यामुळे आज ते सर्व आरोपी मोकळे फिरत आहेत. हा देशद्रोहाचा खटला होता. सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रहित, आतंकवादासाठी वाढलेली हिंमत यासाठी न्यायालयाचे इतर सर्व कामकाज बाजूला सारुन कंटिन्युअस हिअरिंग घेऊन, सतत सुनावणी करीत निकाली काढावेत व या देशद्रोह्यांची शिक्षा त्वरित अंमलात आणावी असा आग्रही वकील नियुक्त करावा अशी विनंती महाराष्ट्र शासनाने सर्वोच्च न्यायालयाला करावी अशा प्रकारची मागणी मी करतो. तसेच माझ्या मागणीप्रित्यर्थ पुढील विचार व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

महोदय, सर्वप्रथम मी आपल्याला धन्यवाद देतो. कारण आतापर्यंत जी भाषणे झाली त्यात उल्लेख आलेला नसल्यामुळे मी मुद्दाम उल्लेख करणार आहे की, ज्या दिवशी म्हणजेच 26 नोव्हेंबर रोजी ही घटना घडली त्या दिवशी आपण देखील घटनास्थळी रात्रभर हजर होता. माझ्याकडे राज्याचे मुख्य सचिव श्री. जॉनी जोसेफ यांनी दि. 1 डिसेंबर, 2008 रोजी आपल्याला उद्देशून लिहिलेले पत्र आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यामुळे जे लोक धारातीर्थी पडले ज्या निरपराध नागरिकांचे मृत्यू झाले त्या धक्क्यातून आपण सगळे सावरले नसलो तरी दि. 26.11.2008 रोजी घटना घडली त्या दिवशी आपण स्वत: रात्रभर माझ्या कार्यालयात अधिकाऱ्यांसोबत राहून त्यांचे मनोधैर्य वाढविले व सर्व अधिकाऱ्यांची ज्या प्रकारे जातीने काळजी घेतली ती आम्ही कधीच विसरु शकत नाही, म्हणून आपल्याला पत्राच्या माध्यमातून माझ्या भावना कळवित आहे. शासनाने याबाबत आपले आभार मानलेले आहेत.

महोदय, त्यानंतर मी सलाम करणार आहे देशाच्या माननीय पंतप्रधानांना. कारण त्यांनी देशाची माफी मागितली म्हणून मी त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करणार आहे. कारण सर्व झाले तरी देशाची माफी मागितली. पाकिस्तानला दोषी धरल्याबद्दल केंद्रीय गृह मंत्रालयाला सुध्दा मी धन्यवाद देतो. वयम् पंचादिकम् शतम् ही भूमिका मांडणाऱ्या माननीय अडवाणीजींना माझा सलाम. जे शहीद झाले, जे लढले त्यांना विनम्र अभिवादन करतो व हल्ल्यात नाहक बळी गेलेल्या सर्व जीवांना भावपूर्ण आदरांजली वाहतो. सर्वात महत्वाचे म्हणजे अतिरेक्यांना भारताच्या भूमीत दफन करण्यासाठी विरोध करणाऱ्या भारतातील मुस्लीम संघटनेलाही मन:पूर्वक सलाम. त्यानंतर आझाद मैदान पोलीस स्टेशनचे इनचार्ज श्री. नांगरे पाटील व त्यांचे सहाय्यक हवालदार, लोकसत्ताचे छायाचित्रकार श्री. प्रभू यांच्या हिंमतीला मी दाद देतो. कारण त्यांनी रविवारच्या लोकसत्ताच्या अंकात घटना कशा कशा प्रकारे घडल्या यासंबंधीची संपूर्ण माहिती दिली होती. शेवटी भारताला विजयी करीत असताना सचिनने केलेले 41 वे शतक आतंकवादी हल्ल्यात झालेल्या शहीदांना समर्पित केले त्या क्रिकेटवीराला माझा सलाम. हे सर्व करीत असताना मी आणखी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना धन्यवाद देणार आहे...

यानंतर श्री. जुन्नरे .....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

आपले सरकार किती कुचकामी झालेले आहे, कायदा सुव्यवस्थेच्या बाबतीत शासन किती कुचकामी ठरले आहे, महाराष्ट्र राज्यात कायदा सुव्यवस्था अस्तित्वात नाही यासंदर्भात भावपूर्ण वृत्तांत सांगितला त्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री. टकले साहेबांना मी धन्यवाद देतो परंतु आपण भाषण पूर्ण करतांना शेवटी जे वाक्य वापरले की, पत्नी विचारते आपण संध्याकाळी घरी याल ना? आणि येतांना शेजारच्यांकडून भाजी घेऊन याल ना? एवढे कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंडवडे आपल्या सरकारने काढलेले आहेत हे उद्गार आपण अत्यंत भावपूर्ण मांडल्याबद्दल मी आपल्याला मन:पूर्वक धन्यवाद देतो. सर्वाना सलाम करीत असतांना या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. टकले साहेबांनी महाराष्ट्राच्या कायदा व सुरक्षिततेला मी कवी मंगेश पाडगावकरांचा सलाम सादर करतो.

"सलाम, सबको सलाम,  
ज्याच्या हातात दंडा त्याला सलाम,  
लाथेच्या भयाने डावा हात गांडेवर ठेवून उजव्या हाताने सलाम,  
बघणा-याला सलाम,न बघणा-याला सलाम,  
विकत घेणा-याला सलाम,  
विकत घेण्याचा इशारा करणा-याला सलाम,  
सलाम भाई सबको सलाम."

सभापती महोदय, मंगेश पाडगावकरांच्या कवितेला सलाम करीत असतांना मी काही गोष्टी या ठिकाणी उद्धृत करणार आहे त्या आकसाने नव्हे, व्यक्तिगत घाला म्हणून नव्हे तर विरोधी पक्ष म्हणून उणिवा दाखवत असतांना माझ्या पुढे जे आले ते सांगणे माझे कर्तव्य आहे या भावनेतून व्यक्त करणार आहे. मी या वेळेला आक्रमक स्थितीत बोलण्याच्या मन:स्थितीत नाही. हे सर्व घडत असतांना माझ्या वेदनामध्ये भावना व्यक्त होत होत्या. मध्यंतरी श्री. पद्माकर दुभाषे यांचे महाराष्ट्र टाईम्स या वर्तमानपत्रात एक स्फूट आले होते त्यामध्ये त्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या त्यामध्ये त्यांनी असे म्हटले होते की, "दहशतवादाच्या आक्रमणाबाबत मुंबई पोलीस,प्रशासन यंत्रणा इतकेच नव्हेतर कोस्ट गार्ड, नेव्ही हे देखील गाफील होते. एका बाजूला दहशतवादी समुद्र मार्गे मुंबईत घुसत होते तर दुसरीकडे अँटी टेरिरिस्ट स्कॉडचे सारे लक्ष मालेगावच्या स्फोटामध्ये केंद्रित झाले

....2...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती ॲड. अनिल परब)**

श्री. दिवाकर रावते..

होते. तुलनात्मक दृष्टया हा स्फोट अगदीच किरकोळ होता. त्या स्फोटामध्ये कर्नल पुरोहित व इतर हिंदुत्ववादी अडकले होते त्यामुळे हिंदु दहशतवाद हा नवा शोध लागत होता. मालेगावमध्ये स्फोट करणा-यांचा संबंध दोन वर्षापूर्वी समझोता एक्सप्रेसवर झालेल्या हल्ल्यात जोडण्यात आला त्यामुळे इस्लामिक दहशतवादी समुद्र मार्गे मुंबईत चाल करुन आले.

**(सभागृहाची वीज 5.57 वाजता काही सेकंदापुरती जाते.)**

त्याची एटीएस व मुंबई सरकारला गंधवार्ता देखील नव्हती. त्यामुळे जे घडले त्यासंदर्भातील मानसिकता श्री. पद्माकर दुभाषे यांच्या माध्यमातून या ठिकाणी व्यक्त झालेली आहे. आमचे करकरे डेव्हील डेथ पध्दतीने मृत्यूच्या सामोरे गेले. दैनिक सकाळच्या 30 नोव्हेंबरच्या लेखात असे म्हटले आहे की, "दैनिक हिंदूचे सहाय्यक संपादक श्री. प्रविण स्वामी हे दहशतवादाचे अभ्यासक आहेत. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार उत्तरप्रदेशात गेल्या वर्षी पकडलेल्या फहीम अफजल अन्सारी याने ओबेरॉय हॉटेलची लष्कर तपासणी सारखी माहिती गोळा केली होती. पोलिसांनी केलेल्या चौकशीत ही सर्व माहिती उघड झाली होती. दोन पाकिस्तांनी प्रशिक्षितांना घेऊन मुंबई शेअर बाजारावर हल्ला करण्याचा कट आखण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. प्रविण स्वामी यांनी दिलेल्या माहिती नुसार बिझनेस सेंटर, पंचतारांकित हॉटेल्स यांच्यावर हल्ला होईल अशी शंका कै. हेमंत करकरे यांना होती. त्यांनी यासंदर्भात काही व्यावसायिकांच्या भेटी घेतल्या होत्या, त्यांनी सुरक्षा यंत्रणा बळकट करण्याच्या सूचना देखील केल्या होत्या परंतु त्यांच्या सूचनेकडे कोणीही गंभीरतेने पाहिले नाही. दुर्दैवाने लष्करी पध्दतीचा हल्ला होईल याची कल्पना आली नाही व हेमंत करकरेंना अतिरेक्यांच्या अचूक मा-याला बळी पडावे लागले ही दुर्दैवी घटना महाराष्ट्रात एका अधिका-याच्या बाबतीत घडली.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, शासनाने सुरुवातीला हा भ्याड हल्ला असे म्हटले. त्यानंतर 59 तासात जे काही धडले त्यानंतरची परिस्थिती फार वेगळी होती. तर हा भ्याड हल्ला नसून तो पाशवी हल्ला होता. त्याबाबत सांगू इच्छितो की,

हा नव्हता भ्याड हल्ला, होता पाशवी हल्ला
तुझ्या व्यवस्थेला सोलून काढणारा.
ज्याच्या हल्ल्यात सरकारची विजार सुटली (पॅन्ट हा इंग्रजी शब्द आहे.)
त्या नग्नतेत आधुनिक चमकणारीच काठी उठून दिसली.
( कारण हल्ली आपल्याकडे पोलिसांकडे प्लास्टिक काठी आहे ती रात्रीची उठून दिसते.)
बुलेटप्रुफ मधून गोळी जाते..
ती फाटकी जॅकेट आमची,
स्वयंचलितांपुढे -बार भरणाऱ्या बंदुका आमच्या.
फाटके बूट-तेल नसलेली वाहने-सारेच जुनाट.

आबा यांनी राजीनामा दिल्यानंतर म्हणाले की, मंत्री पद गेल्यावरही मी आमदार म्हणून काम करीन कारण माझ्यातील कार्यकर्ता कायम जीवंत आहे.

आबा तुमची फक्त खुर्चीच गेली
तरीही कार्यकर्ता जागल्याची आवई उठवलीत.
त्यांचे तर प्राण गेले- मदत देत /नोकरी देत/पेट्रोल पंपही देत.
हे दिले तरी, ते नाहीतच त्यांची खंत त्यांच्या कुटुंबियांना आहे.
आपल्या कार्यकर्त्याला भावी खुर्चीची आर्तता आहे.

श्री.आर.आर.पाटील यांनी राजीनामा दिला म्हणून मला बिलकूल खंत वाटत नाही. किंबहुना आता मी जे वाचणार आहे ते ऐकल्यानंतर आबांवर हक्कभंग सूचना दाखल करण्याची मला परवानगी द्यावी अशी मी आपणास विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ KTG/ KGS/ SBT/ MMP/ 18:00

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, मुंबईत रेल्वेत बॉम्बस्फोट झाले त्यावेळी झालेल्या चर्चेच्या वेळी राज्याचे गृहमंत्री या नात्याने त्यांनी दिनांक 21 जुलै, 2007 रोजी सभागृहात जे भाषण केले ते मी वाचून दाखवितो. आबांना एकेक तास भाषण करायची सवय होती. आबांनी सभागृहात केलेले भाषण मी वाचून दाखवितो.

"सभापती महोदय, एकंदरीत देशाचा सागरी किनारा आपल्याला सुरक्षित करावा लागेल. त्यादृष्टीने केंद्र सरकारने आवश्यक पावले उचललेली आहेत. केंद्र सरकारच्या सूचनेप्रमाणे महाराष्ट्राच्या हद्दीमध्ये जो सागरी किनारा आहे तो सुरक्षित करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने महाराष्ट्र सरकारच्या काही प्रस्तावांना मान्यता दिलेली आहे. सागरी किनारा सुरक्षित करीत असताना डिसेंबर, 2005 मध्ये 40 कोटी 92 लाख रुपयांच्या सागरी किनारा सुरक्षा योजनेला केंद्र सरकारने मान्यता दिलेली आहे. त्याची लवकरच महाराष्ट्रामध्ये अंमलबजावणी होणार आहे. या योजने अंतर्गत नवीन 12 सागरी पोलीस ठाणे गठीत करणे, असलेल्या 24 चेकपोस्ट स्टेशनचे नुतनीकरण करणे, 32 नवीन चेकपोस्ट तयार करणे त्याचबरोबर 25 जीप्स आणि 28 स्पीड बोटी खरेदी करणे यासाठी हा निधी खर्च होणार आहे. या कामाला लवकर सुरुवात करण्यात येईल आणि आम्ही जे नियोजन केलेले आहे त्याप्रमाणे या वर्षी राहिलेल्या अर्ध्या वर्षामध्ये 2 कोटी 19 लाख रुपये खर्च होणार आहेत. समुद्राकडे सुध्दा केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारचे कटाक्षाने लक्ष आहे. या पध्दतीने कोणताही धोका होणार नाही यासाठी योग्य त्या उपाययोजना केलेल्या आहेत." माननीय आबांनी सागरी किनाऱ्यांचे संरक्षण करण्याबाबत सभागृहात दिलेले आश्वासन पाळले नाही. सदनामध्ये दिलेले आश्वासन पाळले नाही म्हणून आबांवर हक्कभंग सूचना दाखल करण्यास आपण मला परवानगी द्यावी. आबांचे जाणे आवश्यक होते. आबा, आपण बोलल्याप्रमाणे वागला नाहीत. आबांनी भाषण करताना पुढे असेही सांगितले की, रेल्वे वाहतूक सुरक्षित करण्याच्यादृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. आम्ही तशी सुरुवात केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी समुद्रमार्गे आरडीएक्स येण्याची शक्यता असल्यामुळे त्याठिकाणची सुरक्षा व्यवस्था ठेवण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला.

यानंतर श्री.गायकवाड..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

केवळ महाराष्ट्रातील समुद्र किनारा सुरक्षित ठेवला तरी समुद्र केवळ महाराष्ट्राच्या बॉर्डवरच आहे अशातला भाग नाही. दुस-या राज्यामध्ये ही समुद्र आहे. त्यामुळे सागरी किना-यावरील सुरक्षेची व्यवस्था करीत असतांना बाहेरच्या राज्याच्या ठिकाणी असलेल्या समुद्र किना-यावरुनही स्फोटके येऊ शकतात. मराठवाडयात जी शस्त्रे सापडली होती ती दक्षिणेकडील राज्यातून आली असल्याची माहिती मिळाली आहे. त्यावेळी माननीय श्री आर्.आर. पाटील यांनी सांगितले की आम्ही बरोबर आहोत. बाहेरच्या राज्यातून जर शस्त्रास्त्रे आली तर त्याला मी जबाबदार नाही. परंतु जी शस्त्रास्त्रे आली होती ती आपल्या हद्दीतूनच आली होती त्यामुळे 2006 साली या सदनामध्ये आपण शब्द दिल्यानंतर त्याप्रमाणे केलेले नाही म्हणून हा प्रकार घडला असून या पापाचे धनी आपणच आहात. या सदनामध्ये आपणाला जाणीव झाली होती तेथे सगळी चर्चा झाली होती त्यामुळे यासबंधी आपलीच सर्व जबाबदारी आहे. त्यानंतरही श्री.आर.आर.पाटील टी.व्ही.च्या चॅनल समोर आले होते त्यावेळी त्यांनी जबाबदारीने बोलावयास पाहिजे होते परंतु ते असे म्हणाले की, इतने बडे शहरमे एखाद हादसा हो जाता है." त्यानंतर ते इंग्रजीतून बोलले की," Intelligence totaly failed;" त्यानंतर ते हिंदीतून असे म्हणाले की, हुआ ऐसा नही है...डॉ.पतंगराव कदम यांना मी सांगू इच्छितो की, या हल्यामध्ये ब-याच जणांचे जीव गेले आहेत राज्यातील जनतेचे संरक्षण करण्याची जबाबदारी त्यांची नाही काय ?. त्यानी सांगितले की मी कार्य करीन आणि पुन्हा खुर्चीत बसेन. खालच्या सभागृहामध्ये त्यांनी काल भाषण केले होते.त्या पूर्वी त्यांनी असे सांगितले होते की, "इतने बडे शहरमे एखाद हादसा हो जाता है त्यानंतर इंग्रजीतून त्यांनी असे सांगितले की, Intelligent total fail; यानंतर पुढे असे वाक्य होते की हुआ ऐसा नही है. महाराष्ट्र टाईम्समध्ये श्री. प्रताब असाबे यांनी एक लेख लिहिता होता. त्यात आबांच्या बाबतीत त्यांनी असे लिहिले होते की खुजा व्यक्तीवर न पेलणारी जबाबदारी सोपवली की काय होते याचे ताजे उदाहरण म्हणजे आरआर पाटील. त्याच प्रमाणे केन्द्रीय गृह मंत्री श्री शिवराज पाटील यानी राजीनामा दिला होता त्यामुळे त्याच्या संदर्भात त्यांनी असे लिहिले होते की, " श्री.शिवराज पाटील यांच्या सारख्या व्दिधा मनस्थितीत असलेल्या गृह मंत्र्याच्या पदरी तर कमालीची नाराजी येणार. त्यात रुबाबदार राहणी, कपडे , भांगाची स्टाईल याने वादात आणखी भर टाकली आहे कै.करकरे यांच्या हौतात्म्याचे अवडंबर मानून सत्य दडवू नका .आतंकवादाचा आधार घेऊन कोणालाही पाठीशी घालू नका "





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

याच गोष्टी पुन्हा सांगण्यासाठी मी येथे उभा आहे. मुंबईत जो काही प्रकार घडला आहे तो दुर्देवी आहे. त्या लेखात पुढे असे म्हटले आहे की, आबा व शिवराज पाटील 59 तासनंतर शहीद झाले मुख्यमंत्री मात्र आचके देत कामी आले. देवकी नंदन म्हणजे गोपाळाचा घाव वर्मी बसला हे "राम" करण्यासाठी तो कामी आला म्हणजे राम गोपाळ वर्मामुळे त्यांना राजीनामा द्यावा लागला होता हा राजीनामा देत असताना त्यांनी असे सांगितले की, रामदास स्वामीची हाक कामी आली व जन सामान्याचा पार्श्वभागावर बसताच नैतिकतेची आठवण झाली आहे. "त्यांनी नैतिकतेची आठवण ठेवून राजीनामा दिला आहे. ते नेहमीच कौतूक करीत असतात. लोक मरत असतांना त्यांच्या कुटुबिंयाना मदत देण्याची घोषणा करण्यास घाई का केली जात आहे ? आठ पधरा दिवसासंनी ही घोषणा केली असती तरी [चालले असते परंतु शासनाला असा संदेश द्यावयाचा होता काय की, " तू मर त्यानंतर 25 लाख रुपये आम्ही तुझ्या कुटुबियासंना देतो .अशा प्रकारे मदत देण्याची घोषणा करण्यासाठी घाई करण्याचे कारण काय होते .आम्हाला असे सांगण्यात आले होते की या संदर्भात राजकारण करता कामा नये डॉ. पंतगराव कदम यांना मी सांगू इच्छितो की, आम्ही राजकारण करणार नाही परतु सरकारच्या उणिवा दाखविणार आहोत. 25 लाख रुपयांचा चेक देत असताना हे चेक शासनाचे असताना मुंबई प्रदेशं कॉग्रेस कमिटीचे अध्यक्षं म्हणून श्री.कृपाशंकर हे फोटोमध्ये बाजूला का उभे राहतात ? हे राजकारण नाही काय ? हा चेक शासनाचा होता की पक्षाचा होता. आम्ही राजकारण करीत नाही परंतु वर्तमानपत्रामध्ये फोटो छापून येतात आणि जे शहीद झाले आहेत त्यांच्या पत्नीला मदत करीत असताना फोटो काढले जातात तेव्हा असे न करता शांतपणें जाऊन त्यांना मदत केली पाहिजे. जे शहीद झाले होते त्यांचे कुटुंब उद्ध्वस्त झाले असून लाखो रुपये देऊन घरातील व्यक्ती परत येणार नाही. घरे देत असतासंना सुध्दा फोटो का काढतात व त्यांच्या जखमेवर मीठ का चोळले जाते. रेल्वे सुरक्षा दलातील हेड कॅान्स्टेबल श्री. जिंल्लू यादवच्या संदर्भात वर्तमानपत्रात लेख छापून आले होते त्याने एक गोळी झाडली होती असे सांगितले जाते. तो जर खरोखर बहादूर असेल तर त्याला शाबासकी द्यावी कारण तो मुंबईत जन्माला आला असून मुंबईत वाढला आहे व मुंबईत रेल्वे खात्यात नोकरीस लागला आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री. रावते ....

त्याने ते केले असेल तर नक्की त्याला शाबासकी द्या. पण त्याने गोळी झाडली हे जाहीर झाल्या बरोबर या घटनेतील शहीदांना लालू श्रद्धांजली देखील वाहत नाहीत मात्र या जिल्लू यादवला त्याने

केलेल्या बहादुरीबद्दल 10 लाख रूपये इनाम दिल्याचे जाहीर करतात. हा प्रांतवाद कशासाठी केला ? सभापती महोदय, त्यानंतर एनडीटीवीवरील श्री.राजदीप सरदेसाई यांनी जे काही नाटक या संबंधात केल तेही योग्य नव्हते. त्यांनी 'आम आदमी' मध्ये त्याची घेतलली मुलाखत मी पाहिली व ऐकली आहे. त्यात त्याने म्हटले "आव जिल्लू, आपको अब कैसे लगता है, आपने बहुत बहादुरी दिखाई. आप आम आदमी है. आपने इतने लोगों की जान बचाई. आपको सरकार ने 10 लाख रुपये दिए. अगर आपके पास अच्छी गन होती तो आप आतंकवादी को मार गिराते. आपने यह काम करके बड़े बड़े लोगों के मुँह पर तमाचा मारा."

सभापती महोदय, आम्हाला हे सगळे ऐकूनही वाईट वाटले. इतक्या नीच पद्धतीने ते सारे सादर होत होते. पण नंतर या जिल्लू यादवचे बेंड फुटले. त्याने त्यावेळेस एकही गोळी झाडली नव्हती हे सिद्ध झाले आहे आणि तो सारा प्रकार आता बाहेर आला आहे. ज्याची ती बंदूक होती त्या मराठी पोलीस शिपायाने सांगितले की, ती माझीच बंदूक होती पण तिच्यातून गोळी उडू शकली नाही. ती मध्येच अडकून पडली होती. ती बंदूक मी पोलीस ठाण्यामध्ये त्यासाठी जमा देखील केली. हा सारा प्रकार उजेडात आल्यानंतरही आपण त्या जिल्लू यादवला का गौरविता ? तसे करून तुम्ही माझ्या सगळ्या मराठी माणसांचा, जे यामध्य शहीद झाले आहेत त्यांचाही अपमान करीत आहात. मी याचा जाहीर निषेध करतो. तसेच त्या श्री.राजदीप सरदेसाईचा देखील निषेध करतो. त्यांनी हा प्रांतवाद आणून माझ्या सर्व मराठी शहीदांचा अपमान केला आहे. त्याला तसे करण्याचा कोणताही अधिकार नाही. तेव्हा आता तरी त्याने यातील खरे-खोटे सगळ्यांना दाखवून द्यावे.

सभापती महोदय, निवृत्त पोलीस महासंचालक श्री.अरविंद इनामदार या साऱ्या घटनेबद्दल काय म्हणतात ते मी ऐकले आहे, वाचले आहे. त्यांची मुलाखत मी ऐकली आहे. त्यातील एकच वाक्य मी आपल्याला सांगतो. 30 नोव्हेंबरच्या दैनिक सामनामध्ये श्री.अरविंद इनामदार "हा अफगाणिस्तान की हिंदुस्थान ?" या शीर्षकाखालील आपल्या लेखामध्ये म्हणतात की, मुंबईवरील हा हल्ला म्हणजे 'ग्रेटेस्ट पॉसिबल शेम' आहे. तर 30 नाव्हेंबरच्या दै.सामना मध्ये स्वप्ना पाटकर

...2



म्हणतात की, 'हे तर इस्लामच्या नावाखाली पिसाळलेल्या कुत्र्याचे चावणे आहे. प्रत्येकजण आज या वेड्या जिहादींना घाबरतोज. कारण ते पिसाळलेल्या कुत्र्यासारखे असतातृ त्यांना इस्लामच्या नावाखाली फक्त चावणे कळते. मध्यंतरी हिंदूंना अतिरेकी म्हणून मानहानी करायचा मोठा प्रयत्न झ ाला. प्रज्ञा, पुरोहित हे या कटाला बळी पडले. हिंदुस्थानातच हिंदूंची लाज काढण्याचे कारस्थान

कुणी घडवले याची चर्चा आता नको. पण अतिरक्यांनी खरं काय ते आपल्या समोर आणले आहे. ते म्हणजे आतंकवादाचा रंग आजही 'हिरवा'च आहे हे विसरून चालणार नाही.' सभापती महोदय, श्री.अरविंद इनामदार सारख्या माजी पोलीस अधिकाऱ्यांचे जे म्हणणे आहे त्याकडे आपण दुर्लक्ष करून चालणार नाही. याच संदर्भात श्री.राजीव काळे या एका सामान्य लेखकाने चांगला लेख लिहिला आहे. 10 डिसेंबरच्या एका अंकामध्य 'अक्षरसाक्ष' या सदरात त्यांनी हा लेख लिहिलेला आहे. त्यांनी आपल्या लेखामध्ये म्हटले आहे की, या घटनेनंतर काही लोक रस्त्यावर निषेधासाठी, कोणी मेणबत्त्या पेटवून श्रद्धांजली देण्यासाठी आले, त्यात विद्यार्थी होते, स्त्रिया होत्या, कलाकार होते. मात्र एकही साहित्यिकाने या घटनेबद्‌दल लिहिण्यासाठी आपले एक पेन देखील उचलले नाही. कोणाही साहित्यिकाने त्याबद्‌दलच्या आपल्या भावना व्यक्त केल्या नाहीत. अगदी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षापासून कोणीही काहीही बोलले नाही. साहित्यिकांच्यासमोर तर अशा छोट्या मोठ्या घटना नेहमीच घडत असतात आणि त्याबद्दल कोणी ना कोणी काही तरी बोलत वा लिहित असतो. पण या इतक्या मोठ्या भयंकर अशा घटनेबद्दल निषेधाचा साधा सूर देखील एकाही साहित्यिकाने काढलेला नाही. सभापती महोदय, राजीव काळे याने आपल्या लेखातून साहित्यिकांबद्दल असा उल्लेख केला आहे. मी हे येथे का सांगता आहे तर आपण साहित्यिकांना, त्यांच्या संमेलनांना भरपूर पैसे देतो. पण तरीही त्यांच्या संमेलनाच्या स्टेजवर 'आता आम्हाला कोणीही राजकारणी नको' म्हणून राजकारण्यांना, राज्यकर्त्यांना देखील नाकारले जाते. अनेकदा ते असे सांगतात पण तरीही आपण तेथे जाता, आणि स्टेजवर नाही तर खाली साध्या खुर्च्यांवर बसता. असे असले तरी या साहित्यिकांनी मुंबईत घडलेल्या एवढ्या मोठ्या घटनेची नोंद घेतली नाही त्याबद्दल श्री.राजीव काळे यांनी त्यांच्या लेखातून चांगल्या प्रकार लिहिले आहे. ते मला येथे आपल्याला आवर्जून सांगावयाचे आहे.

( यानंतर श्री. सरफरे ...... 4जे 1 ..



श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, यामध्ये काही पत्रकार इतके विक्षिप्त वागले. आज याठिकाणी कुणीही हिंदू-मुस्लिम हा विषय उपस्थित केलेला नाही. आतंकवाद्यांकडून झालेला हा हल्ला केवळ मुंबईवर नाही तर हिंदुस्थानवर झाला आहे. मा. श्री. आर.आर. पाटील यांनी सांगितले होते की, हा हल्ला मुंबईवर नाही तर हा हल्ला हिंदुस्थानवर झालेला आहे. त्याचवेळी श्री. युवराज मोहिते यांचा बेरीज-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वजाबाकीतला हा जो लेख प्रसिध्द झाला आहे तो मला खटकला आहे. त्याबाबत मी त्यांच्याशी फोनवर बोललो. त्यांनी 1 डिसेंबरच्या लेखामध्ये म्हटले आहे ते मनाला वाईट वाटणारे आहे. त्यांनी असे म्हटले आहे की,"मुळात हे तिन्ही बिन्नीचे अधिकारी एकत्र येणं..." हा विषय नंतर चौकशीमध्ये येणार आहे. याबाबत आपण चौकशी मागितली आहे. यामध्ये एक अधिकारी चेंबूरचा, एक अधिकारी श्री. हेमंत करकरे हे नागपाडयातले आणि एक अधिकारी पोलीस आयुक्तालयातील. हे तिन्ही अधिकारी एकत्र कसे आले? हा विषय सुध्दा चौकशीमध्ये आहे. "हे तिन्ही अधिकारी एकत्र येणं, अवघड असतांना कामगिरीवर निघणं आणि तिघांचंही एकाच वेळी शहीद होणं हा सारा घटनाक्रम अनाकलनीय आहे. ते कसं घडलं याबाबत अधिकाऱ्यांतच अजूनही एक वाक्यता नाही. याबाबतच्या अनेक चर्चा सुरु आहेत. त्यातील काही मतं ही स्फोटक आहेत. संघ आणि इस्त्रायलच्या इस्लामविरोधी "मोसाद" या संघटनांचा हा एक मोठा कट आहे" अशाप्रकारचा भलताच जावई शोध यांनी लावला. आणि म्हणून मला असे वाटून गेले की, "शोध पत्रकारितेचा "बाज" हा काही अजबच न्यारा आहे" "युवराज मोहितेंच्या प्रवृत्तींना आतातरी आवरा" ही आपली हाक आहे. "हिरव्या" आतंकी सरताज हमल्यामध्ये आजही त्यांना संघ-इस्त्रायल दिसते" आणि "भगव्याची काविळ या खरुजी पत्रकारितेला इस्लाम विरोधी "मोसादचा" कट दिसतो". या निमित्ताने माझ्या या भावना मी याठिकाणी व्यक्त करतो.

सभापती महोदय, या सुरक्षिततेची किती आबाळ झाली आहे? श्री. संजय राऊत यांनी दि. 30 नोव्हेंबरच्या महाराष्ट्र टाईम्समध्ये जो लेख लिहिला आहे, त्यातील काही वाक्ये याठिकाणी नमूद करावीशी वाटत आहेत. "संसद भवन हल्ला प्रकरणात सर्व आरोप सिध्द होऊन सुप्रीम कोर्टाने देहांन्ताची शिक्षा दिलेल्या अफझल गुरुला फासावर चढवण्याची हिंमत सर्व शक्तिमान केंद्र सरकारला होत नाही. या साऱ्याचा अर्थ इतकाच की, सीमांचे संरक्षण करण्यात सरकार यशस्वी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते....

झालेले असले तरी देशाच्या पोटात शिरुन कोथळा काढणाऱ्या अतिरेक्यांपुढे मात्र या यंत्रणेने गुडघे टेकले आहेत. जिथे सुरक्षा दलांनी प्राणाची पर्वा न करता अतिरेक्यांच्या मुसक्या बांधल्या. तिथे सरकारच्या नामर्दपणामुळे अपेक्षित परिणाम साधला गेला नाही, इतके हल्ले झाले. तरीही एकही अतिरेकी फासावर गेल्याची माहिती नाही." अजूनपर्यंत शासनाने एकालाही फासावर चढविले नाही. पुढे असे म्हटले आहे की, "अतिरेक्यांविरुध्द टोकाची कठोर कारवाई केली तर तथाकथित अल्पसंख्यांकांची व्होट बँक गमावावी लागेल. अशी स्वार्थी भीती सर्वच राज्यकर्त्यांना वाटते. राजकीय व वैयक्तिक स्वार्थासाठी राष्ट्रीय हिताला तिलांजली देण्यास ही मंडळी सदैव तयार असल्याने भारत "सॉफ्ट टार्गेट" बनला आहे. त्याचा हा परिणाम आहे". "यापूर्वी 1993 आणि त्यानंतर 2006 मध्ये मुंबईमध्ये मोठे दहशतवादी हल्ले झाले. या व याच्या आगेमागे देशात विविध ठिकाणी झालेल्या छोटया मोठया हल्ल्यानंतर एक दोन दिवसांतच जनजीवन सुरळीत झाले. याचा मोठा गवगवा झाला व राजकारण्यांनी भारतीयांच्या या "धैर्या"चे कौतुक केले. त्या संदर्भात याठिकाणी बोलत असतांना बुलेटप्रुफ जॅकेटच्या घोटाळयाचा विषय मघाशी कुणाला तरी लागला. आमचे मा. सदस्य श्री. मधु चव्हाण म्हणाले की,"जसा बोफोर्सचा घोटाळा चर्चेमध्ये होता त्याप्रमाणे याठिकाणी बुलेटप्रुफ जॅकेटचा घोटाळा झाला आहे" एवढाच उल्लेख त्यांनी केला. बोफोर्स घोटाळयासंबंधी या बाजूकडून कुणीही टिका टिप्पणी केली नव्हती. आणि म्हणून मला असे वाटले की, करकरे कसे गेले ते सर्व लोकांनी टी.व्ही.वर बघितले. याबाबत माननीय सदस्या श्रीमती अलकाताई देसाईंनी याठिकाणी सांगितले. करकरे आपण कसे गेलात? डोक्यावर हेल्मेट होते, अंगात बुलेटप्रुफ जाकीट होते तरीही गोळया घुसल्या. केव्हा? कुठे? व कशा? याचे उत्तर सापडेल काय? म्हणून मला असे वाटते की, त्यांच्या शरीरात घुसलेल्या गोळया नक्की कुणाच्या? हे आम्हाला समजलेच पाहिजे. आणि करकरे यांच्या हौतात्म्याचा जाब सरकारने दिलाच पाहिजे.

सभापती महोदय, या हल्ल्याचे दै. सकाळमध्ये वर्णन आले आहे. वेगवेगळया वर्तमानपत्रांनी वेगवेगळी वर्णने छापलेली आहेत. त्यामुळे आपला गोंधळ उडालेला आहे. नक्की हे तीन शिलेदार कसे गेले? कोण म्हणते गाडीत बसतांना ते गेले. सभापती महोदय, मघाशी याठिकाणी उल्लेख झ ाला की, श्री. विजय साळसकर हे संध्याकाळी साडे सात वाजता घरी जेवले.

(यानंतर श्री. बरवड)



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

आणि आपल्या पत्नीला म्हणाले की, गॅन्गवारचा संबंध असल्यामुळे ताबडतोब निघतो. असे ते सायंकाळी साडेसात वाजता म्हणाले. श्री. हेमंत करकरे हे मंत्रालयात बैठक आहे म्हणून आले पण मंत्रालयात नव्हते. कारण माननीय श्री. आर. आर. पाटील हे दौऱ्यावरुन आले होते आणि ते सव्वानऊ वाजता बंगल्यावर होते. श्री. कामटे या टीममध्ये कसे काय आले हे काही कळले नाही. कारण त्याबाबत कोणी काही सांगत नाही. दुर्दैवाने ते शहीद झालेले आहेत. अशा वेळेला "सकाळ" मध्ये श्रीमती मृणालिनी नानिवडेकर यांचा जो लेख आलेला आहे आणि त्यांनी जे लिहिलेले आहे ते मला जरा गूढ वाटते. यामध्ये असे लिहिले आहे की, "महिलांना सेवा पुरविणारे हे रुग्णालय रणभूमी झाले होते. हल्ल्याने हादरलेल्या पोलीस दलाला दहशतवाद विरोधी दलाचे प्रमुख हेमंत करकरे दिलासा देत होते. 'मी आहे, घाबरु नका'. साळसकर, कामटेंना बरोबर घेऊन उत्तराची आखणी करत तिघे अधिकारी आत शिरले." म्हणजे ते तयारीनेच आत शिरले असणार. ते त्या हॉस्पिटलच्या स्टाफला सांगत होते की, घाबरु नका, मी आहे. पुढे असे म्हटले आहे की, "...पण बाहेर आली ती दोघांची निष्प्राण कलेवरे. साळसकर मदतीसाठी तडफडत होते. पण अतिरेक्यांना कंठस्नान घालणारा हा अधिकारी अखेर इतिहासाचा भाग झाला." पुढे असे लिहिले आहे की, "करकरेंची मारेकरी हीच जोडगोळी होती का, ते अद्याप स्पष्ट व्हायचे आहे" अशा प्रकारे हा लेख लिहिला गेला होता. म्हणून मग कधी कधी मला हा प्रश्न पडला की, करकरे तुम्ही हेल्मेट घातले, सगळे घातले पण तुम्हाला कोणी मारले हे आम्हाला समजेल का ? फक्त आम्ही त्यांना आमचे म्हणावयाचे. हे इकडेचे जे घुसलेले आहेत त्यांना मदत करणार का ? मघाशी एक विषय मांडण्यात आला की, एकाने 80-80 किलो सामान आणले असले पाहिजे असे वाटते. एक माणूस 80 किलो सामान आणू शकत नाही. त्या बॅगचे वर्णन करताना सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले की, त्या बॅगमध्ये एवढे सामान राहू शकत नाही. म्हणजे कोणी तरी स्थानिक त्यांच्या मदतीला आला असला पाहिजे. म्हणून याच लेखामध्ये त्यांनी असे म्हटले होते की, हे जे हल्ले करणारे आहेत त्यांना कोणी स्थानिकांनी मदत केली का ? कुलाब्याच्या बाजूला असलेल्या झोपडपट्टीच्या संदर्भात वारंवार लिहून येते. म्हणून त्यांनी असे म्हटले आहे की, स्थानिकांनी जर



अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते ....

मदत केली असेल तर ....

फक्त आम्ही त्यांना आमचे म्हणावयाचे-

लोकशाहीच्या मतासाठी.

ते तर कायम त्यांचेच-आमच्यात राहूनही.

आम्ही मात्र गांधीजींची तीन माकडेच.

पाहूनही पाहात नाही. ऐकूनही बोलत नाही.

हाच तर 'राष्ट्रवादी' गुन्हा या देशात.

सगळीकडे बंगलादेशी घुसले आहेत. साडेपाच लाख बंगलादेशी घुसलेले आहेत. मुंबईकरांची तक्रार आहे की, "हे अतिरेकी शिरले कोठून या प्रश्नाचे उत्तर स्पष्ट होऊ लागले होते. कुलाब्याातल्या किनाऱ्यावर बोट येऊन दाखल झाली होती. सगळीच स्फोटके या बोटीने उतरवण्यात आल्याची शक्यता कमी. पूर्वीपासून तळ देऊन बसलेल्या अतिरेक्यांना पाठविण्यात आलेले ते मनुष्यबळ असावे. या किनाऱ्यावर झोपड्यांची अनियंत्रित वाढ होत असल्याच्या बातम्या वृत्तपत्रे सतत देत." म्हणून मग हे सुरुवातीला आलेले कोठे होते ? ते कसे राहिले ? मघाशी उल्लेख झाला. अगोदर ते त्या हॉटेलमध्ये येऊन राहिले का ? जर 100 किलो बिर्याणी आदल्या दिवशी त्या हाऊसमध्ये गेली असेल तर एवढी बिर्याणी खाणारे, एवढे चिकन खाणारे किती लोक असतील ? या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. तीन दिवस सगळे लोक टी.व्ही.वर पाहात होते. बातम्या येत होत्या. सुपरस्टार अमिताभ बच्चन उशाला पिस्तूल धेऊन झोपले. त्यांना कसली भीती वाटली हे माहीत नाही. आमच्या लतादीदींनी असे सांगितले आणि वर्तमानपत्रांनी ते छापले की, त्या तीनशे वेळा रडल्या. मला असे वाटले की 'ए मेरे वतन के लोगों' या आर्त स्वरांनी सन्मानित बलिदान खऱ्या भारतीयांच्या अश्रुंनी धुवून काढायला लावणाऱ्या त्या गानकोकिळा तीन दिवसात तीनशे वेळा रडल्या. ते कशासाठी ? ते वर्तमानपत्रात छापून आले. त्यांनी ते लिहिले होते की, तीनशे वेळा रडल्या. मला असे वाटले की, त्या कशासाठी रडल्या असतील ? झुंजतांना मृत्युला कवटाळणाऱ्या आमच्या त्या वीरांसाठी रडल्या का ? आतंकी लढ्यात मृत्युमुखी पडलेल्या त्या निरपराध नागरिकांसाठी रडल्या का ? कारण ताज, ओबेरॉयमध्ये आमचे शेकडो नागरिक

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते ....

मृत्युमुखी पडले. आमच्या छत्रपती शिवाजी टर्मिनसला अनेक लोक मृत्युमुखी पडले. सारी सुरक्षा वाऱ्यावर सोडून बळी घेणाऱ्या नामर्द सरकारच्या नाकर्तेपणासाठी रडल्या का ? दीदी तुम्ही कशासाठी रडल्या ते एकदा सांगितले तर बरे होईल. जनतेला तुमच्या रडण्याचे फार मोल आहे. आपण या सरकारच्या नाकर्तेपणासाठी रडलात हे जाहीर केले तर त्याचा जनतेवर फार परिणाम होईल. म्हणून दीदी तीनशे वेळा का रडल्या हा प्रश्न निर्माण होतो. मघाशी मी गांधीजींचा उल्लेख केला. मला बोलता येत नाही. बघून सुध्दा पाहता येत नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

मघाशी दोन गांधीजींचा याठिकाणी उल्लेख करण्यात आला. दोन पंतप्रधानांचा तो उल्लेख होता. सभापती महोदय, मी अत्यंत आदरपूर्वक सांगतो की, महात्मा गांधी हे देशाकरिता गेले, इंदिरा गांधी देशाकरिता गेल्या, राजीव गांधी सुध्दा देशाकरिता गेले. एकही गांधी अपने मौत से नही मरा. पहले गांधी एक गोली से मरा तो दूसरा गांधी सौ गोली से मरा और तिसरा गांधी गोली से नही मरा, सब गांधी अपनी मौत नहीं मरे, वे सब देश के लिए मरे. तिन्ही गांधी हे देशाकरिता गेले. हल्ला झाल्यानंतर 4 दिवसांनी सगळे शांत झाले. त्यानंतर 3 दिवस काय चालले होते हे पाहून मला दुःख झाले. त्या जागेवर मेणबत्या लावून अनेकजण फिरत होते. त्यामुळे मी माझ्या भावना तीव्र शब्दामध्ये मांडतो. " ताज काय, ओबेरॉय काय ? श्रीमंतीचा डोलारा हलला, व्हीस्कीचा ग्लास खडबडला, लिप्स्टीकचे ओठ थरथरले, श्रीमंतीने स्वातंत्र्याची धास्ती घेतली, तिजोरीची काळजी लागली, मतदानाची आठवण नसताना सुध्दा रस्त्यावर उतरले.राजकारण्यांना शिव्या घालत. ते लोक तुम्हाला आम्हाला शिव्या घालत बसले होते. हे लोक मतदानासाठी कधी बाहेर पडत नाहीत. पण आज बाहेर पडले. कारण सांडलेले रक्त श्रीमंतांचे होते. बॉम्बस्फोट रेल्वेतही झाले, गेट-वे येथे झाले, मुंबईच्या कानाकोप-यात झाले.त्यावेळी मरणारे सामान्य होते. श्रीमंतांच्या घरातील धुणीभांडी करणारे होते.त्यांच्यासाठी रडण्याची आठवण झाली नाही, रस्त्यावर उतरावयास फुरसत मिळाली नाही, स्वतंत्र हिंदुस्थानात राहतो याचे भानही ठेवले नाही. ते मात्र आक्रंदन आहे, गळा काढून राजकारण्यांच्या नावाने. कारण, ताज, ओबेरॉयचा मार्बल शिंपडला होता रक्ताच्या थारोळयात.छत्रपती शिवाजी स्थानकावरील मृतांसाठी मात्र आमच्या वृत्तपत्राच्या विक्रेत्यांनी जाऊन मेणबत्या लावल्या कारण ते होते सामान्यांच्या घरी वर्तमानपत्र टाकणारे." दोन विरोधाभास आहेत. त्याठिकाणी कोणी मेणबत्या लावल्या तर वृत्तपत्र विक्रेत्यांनी लावल्या. " घाटकोपरची बस फुटली, गेट-वे समोर टॅक्सी फुटली, मुंबादेवीलाही नैवेद्य चढला, कष्टकरी रक्तांचा." हयांना मात्र आठवण झाली नाही, कारण हे कोण होते. सभापती महोदय, राजकारणी दोषी आहेत. त्यामुळे श्री.आर.आर.पाटील यांना राजीनामा द्यावा लागला, मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला, श्री.शिवराज पाटील यांना राजीनामा द्यावा लागला, सर्व सरकार बदलले, त्यात 4 मंत्र्यांचा बळी

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.दिवाकर रावते....

गेला, नवीन मंत्री आले, नवीन सरकार आले. हे सर्व खरे असले तरी कालपासून या सभागृहामध्ये या घटनेसंबंधी अतिशय तीव्र शब्दामध्ये भावना व्यक्त करण्यात आल्या आहेत. मी माझ्या भावना तीव्र शब्दामध्ये लिहून ठेवल्या होत्या. पण आज सकाळी मी ऐकलेल्या बातमीने मला आनंद झाला. आदरणीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार हे महाराष्ट्रातील देश पातळीवरील नेते आहेत. त्यांनी कालच माननीय पंतप्रधानांकडे अधिका-यांवर कारवाई करण्याची मागणी केली. माननीय पंतप्रधानांनी सुध्दा त्वरीत मुख्य सचिवांना आदेश दिले आहेत. मी माननीय श्री.शरद पवार यांना धन्यवाद देतो. त्यांनी आता मर्मावर बोट ठेवलेले आहे. म्हणून राजकारणी दोषी ठरले आहेत, असे मी म्हणतो. मग ते तुम्ही असोत की आम्ही असोत. सभागृहामध्ये तर स्वीकारवेच लागते. म्हणून आपण येथे चर्चा करीत आहोत. अपात्र राजकीय इच्छाशक्तीसाठी बलिदान द्यावेच लागते. कारण राजकारणासहित नैतिकतेचा जीव मानेवर असतो. पण देशाचे नौदलप्रमुख म्हणाले की, आमची चूक झाली आहे. पत्रकार परिषद घेऊन टी.व्ही.च्या माध्यमाद्वारे त्यांनी देशातील नागरिकांना सांगावे म्हणजे किती शोकांतिका आहे ? तरीही गलेलठ्ठ पगारातून सचिवपद ते संरक्षण प्रमुखांपर्यंतचे सर्वजण जबाबदारी टाळतील. मात्र सुळावर चढलेल्या राजकारण्यांसाठी टाळया वाजविल्या जातील.

यानंतर श्री.शिगम....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते..

आणि पुढचा सुळावर चढवण्यासाठी हे अधिकारी सज्ज होतात आणि सहाव्या आणि सातव्या वेतन आयोगाची वाट पहात ते तुमची-आमची वाट लावतात. माझ्या भावना अतिशय तीव्र आहेत. मला या बाबतीत शासनाचा निर्णय अपेक्षित आहे. महाराष्ट्र राज्याच्या गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव श्रीमती चित्कला झुत्शी यांना 18.7.2006 रोजी टॉप सिक्रेट पत्र आले आणि त्यांनी पसरिचा साहेबांना आणि श्री. अनामी रॉय यांना पत्र लिहिले. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,

"Intelligence inputs reveals that Lashkar-E-Toiba may attack one of the following targets in the near future- B.A.R.C., Night clubs, religious places etc. I request you to take immediate steps to prevent it."

हे टॉप सिक्रेट पत्र अनामी रॉय आणि पसरिचा यांना गेले असेल तर कालच्या हल्ल्याची जबाबादाी श्री. रॉय यांनी स्वीकारायला नको काय ? पण तसे झाले नाही. माझे सरकार मात्र त्यांच्यासाठी कोर्टामध्ये केसेस लढवित आहेत. 16 नोव्हेंबर, 19 नोव्हेंबरला रॉकडून सरकारला सतत असा इशारा देण्यात आला की, समुद्र मार्गाने तुमच्यावर दहशतवादी हल्ले होणार आहेत. याबाबतीत शासनाने कोणती काळजी घेतली ? गृह खात्याच्या अपर मुख्य सचिव श्रीमती चित्कला झुत्शी यांना ताबडतोब रजेवर पाठवावे. कारण जेव्हा हल्ला झाला त्यावेळी त्या ताजमध्ये होत्या. रविवारच्या लोकसत्ता दैनिकामध्ये प्रभूंनी लिहिलेला लेख वाचल्यामुळे अनेक गोष्टी समजल्या. त्यावेळच्या तेथील पोलीस शिपायाला मी सलाम करतो. त्या ठिकाणी एका पोलीस शिपायाने एकट्याने पाच-सहा मजले अतिरेक्यांना अडवून ठेवले होते. हे युध्द वगैरे काही नाही. आपण याला युध्द का म्हणतो तर आमच्या पोलिसांच्या हातामध्ये केवळ दंडुके होते. त्यांच्याकडे शस्त्रे नव्हती म्हणून सैन्याला बोलवावे लागले. एकटा पोलीस शिपाई दहशतवाद्यांना पाच-सहा मजले रोखू शकतो तर मग शस्त्रे असती तर त्या अतिरेक्यांना आमच्या पोलिसांनी कधीच कंठस्नान धातले असते. हा हल्ला झाला त्यावेळी श्रीमती चित्कला झुत्शी तेथे होत्या. आणखी कोणी व्ही.आय.पी. तेथे होते. या सर्वांना तेथून बाहेर काढत असताना श्री. प्रभू हे देखील तेथे होते आणि त्यांनी मोठया मिनतवारीने प्रेस रिपोर्टर आहे असे सांगून तेही त्यांच्या बरोबर बाहेर पडले. या लोकांना जर बाहेर काढता आले तर मग इतरांना बाहेर का काढता आले नाही असा प्रश्न निर्माण होतो. राज्याच्या गृह अपर मुख्य सचिव श्रीमती चित्कला झुत्शी ह्या त्या ठिकाणी होत्या.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते..)

देशप्रेम आणि देशाच्या नागरिक आणि  कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांनी सांगायला पाहिजे होते की, जोपर्यन्त सर्वांना बाहेर काढले जात नाही तोपर्यन्त मी येथून हलणार नाही. पण नाही. त्या आपल्या कुटुंबियांसमवेत तेथून बाहेर पडल्या. तेव्हा लॅप्स ऑफ निग्लिजन्स ऑफ डयुटी म्हणून त्यांना घरी पाठवा. या हल्ल्याच्या संदर्भात अतिरिक्त आयुक्त श्री. राजीव यांनी "सवाल" नावाची कविता लिहिली. ती कविता पुढीलप्रमाणे आहे.

"अब बड़ा बनने का समय नहीं है,
समय है तगड़ा बनने का,
मैं पूछता हूं आपसे,
क्या चाहिए आपको ?
एक शांत, धैर्यवान, अविचलित चेहरा
या फिर,एक क्रोधित, तना हुआ, आक्रोश का चेहरा,
बारी आप सबकी है,यही तय करेगा की
हम रहेंगे सुरक्षित भविष्य में या फिर ...."

ही कविता वाचल्यानंतर मी त्यांना लगेच एसएमएस केला. "Thanks for the feeling for Mumbai and the Nation."

..नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

असे अधिकारी असतील तर त्यांना महत्वाच्या ठिकाणी नेमणूका द्याव्यात. त्यांच्यामध्ये खरोखरच राष्ट्रीयत्व भरलेले आहे. त्यांनी या घटनेच्या संदर्भात ताबडतोब एक कविता लिहिली आणि लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिध्द केली. अशी देखील मंडळी या जगाच्या पाठीवर आहेत.

सभापती महोदय, "मुडद्याच्या टाळुवरील लोणी खाणे" अशी मराठीत म्हण आहे. मुंबईत अतिरेक्यांनी हल्ला केली ती परिस्थिती सगळयांनी बघितली. त्यावेळी आपल्यातील बरीच मंडळी मुंबई येथेच होती. मुंबई कोठेही बंद नव्हती. सदर आतंकवादी हल्ला रात्री 9.15 वाजता करण्यात आला. त्यावेळी प्रत्येक घरातील व्यक्ती दूरदर्शनवरील कार्यक्रम पहात होते. मुंबईतील सिनेमागृहे चालू होती. मुंबईतील हॉटेल्स चालू होत्या. हा हल्ला झाल्याबरोबर दूरदर्शनच्या वाहिन्यांनी डायरेक्ट प्रक्षेपण दाखविण्यास सुरुवात केली. प्रत्येक गोष्टीचा घटनाक्रम राज्यातील जनतेला पहावयास मिळत होता. त्यामुळे त्याची इन्टेसिटी कमी झाली. यासंदर्भात एका तज्ज्ञांनी सांगितले की, वारंवार दूरदर्शनवर तीच तीच गोष्ट दाखविली तर लोकांच्या गंभीर भावना कमी होतात आणि मग ती गोष्ट लोक गंमत म्हणून त्या गोष्टीकडे पाहू लागतात. त्या तज्ञांचे विश्लेषण मी दूरदर्शनवर पाहिले. ताज ओबेरॉय आणि नरीमन भवनाच्या परिसरात कर्फ्यू होता. तरीही काही हौशी लोक आपले कुटुंब व मुले सोबत घेऊन गेट-वे ऑफ इंडिया जवळ जाऊन ताज हॉटेलचे दृश्य बघावयास जात होते. ही परिस्थिती सर्वांनी दूरदर्शनवर पाहिली असेल. त्या ठिकाणी तुमचे कायकर्ते होते किंवा नाही याची मला माहिती नाही. परंतु आमच्या शिवसैनिकांनी नरीमन हाऊसमधील लोकांना शिवसेनेच्या शाखेत आसरा देत होते. आमचे खासदार श्री. मोहन रावले हे तीन दिवस त्या ठिकाणी सातत्याने बसून होते. ते मदत करीत होते. सैनिकांसाठी जेवण देत होते.आपणही मदत केली असेल, पण मला त्याची कल्पना नाही त्यामुळे त्यावर मी काही भाष्य करु शकत नाही. आमचे काही शिवसेनेचे कायकर्ते रुग्णालयांमध्ये मदत कार्य करीत होते. रक्तदान कॅम्प आम्ही प्रत्येक रुग्णालयात सुरु केला होता. मी त्यावेळी विदर्भात होतो, त्यावेळी ताबडतोबीने रक्तदानाचा कॅम्प सुरु केला. वाशिम, वर्धा, अकोला येथे रक्तदानाचे कॅम्प सुरु केले. सर्व शहिदांना मी सायंकाळी श्रध्दांजली अर्पण केली. मी दूरदर्शन ही घटना पाहिल्या बरोबर तातडीने मुंबईत दाखल झालो. आम्हाला जे करणे शक्य होते, ते आम्ही करीत होतो. परंतु त्या गोष्टीची आम्ही जाहिरात केली नाही. हा काही जाहिरातीचा विषय नव्हता. हा विषय कर्तव्याचा होता.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्याचवेळेला

"लुटारुंसाठी वंदे मातरम् "
कोणाचे बलिदान- कोण शहीद
ते ( आतंकवादी ) होते मृत्यूंचे सौदागर,
हे आहेत " संधीचे " सौदागर."

संधीचे सौदागर उद्योगपती होते. उद्योगपतींचे उद्योग अश्रू ढाळण्यासाठी नाही तर नफा तोटा मोजण्यासाठी होते.

" ताज-ओबेरॉय परीसरात कर्फ्य होता,
मुंबई, महाराष्ट्रासह- भारत सुरुच होता,
नव्हता बंद, नव्हती निदर्शने, नव्हता मोर्चा,
होती फक्त सुप्त भिती, दैनंदिन परीक्रमतेचा.
उत्पादन चालू होते, मॉल सारे भरले होते,
सिनेमा थिएटर सहीत बारही भरले होते,
शेअर बाजार तर तेजीतच होता,
रोजचा उच्च्यांक देणारे उर्जीत होत होते,
तरीही उद्योग पतीनी पनवती सलावली,
50 हजार कोटीच्या नुकसानीची नोटीस दिली,
यालाच म्हणतात देशप्रेम."

सभापती महोदय, श्री. चैनी साहेब, इंडियन चेंबरचे अध्यक्ष या नात्याने दूरदर्शनवरुन लोकांना सांगत होते की, या आतंकवादी हल्ल्यामुळे 50 हजार कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. उद्योगपती कशी संधी घेतात हे एक ज्वलंत उदाहरण होऊ शकते. या हल्ल्यात ताज हॉटेलचे नुकसान झाले, ओबेरॉय हॉटेलचे नुकसान झाले. नुकसानीचा विषय वेगळा आहे. यामध्ये सामान्य माणसाला या गोष्टीची झळ पोहोचली नाही. या हल्ल्यात झालेल्या नुकसानीच्या बाबतीतही राजकारण आणले गेले ही दुर्देवी बाब आहे. या बाबतीत नंतर शहाणपण सुचले त्याप्रमाणे आपण आता करीत आहात. त्यावेळी तुमचे ते आणि आमचे हे असे वक्तव्ये करण्यात येत होती. त्यावेळी

3...



ABG/ SBT/ KTG/ प्रथम श्री. शिगम 18:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

माजी उप मुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील पटकन बोलले की, संसदेवर हल्ला झाला त्यावेळी कोणी राजीनामे दिले काय ? अक्षरधामवर हल्ला झाला त्यावेळी कोणी राजीनामे दिले आहेत काय ? या विषयावरुन कॉंग्रेस आणि भारतीय जनता पक्षामध्ये चिखलफेक सुरु झाली. मला खूप वाईट वाटले की, मरणारे मरतात आणि लढणारे लढतात. आम्ही मात्र संवेदना हरवून शब्दांनेच मारतो. अशा वेळी भारतीय जनतेला एक दिलाने आधार देण्याची गरज होती. तुमची जाहिरातबाजी पाप दाखविण्यासाठी होती. कंदहार, संसद भवन, भाजपचे तर रघुनाथ मंदीर, अमरनाथ कॉंग्रेसचे यावर राजकारण सुरु झाले. सारेच आपण आतंकवादी माळेत आहोत, प्रत्येक मात्र वळलेल्या चार बोटाचे स्वकर्तृत्व दाखवित आहेत. ही परिस्थिती त्यावेळी निर्माण झाली. एकमेकास दोष देण्याचे काम आम्ही करु लागलो. या ठिकाणी दूरदर्शन वाहिन्यांबद्दल खूप बोलले गेले.

वाहिनींची वाहवा तर केलीच पाहिजे,
"अतिरेकी" हिणव-यांना तर रोखलेच पाहिजे,

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

त्यांना अतिरेकी म्हणता येणार नाही.

त्यांनी दाखविले म्हणून जनसामान्यांनी पाहिले.
युध्दजन्य मानसिकतेत सारे भारुन गेले.

कमांडो उतरतात, सैन्य धावते ते पाहून लोक भारुन गेले.

युध्द काय असते ते साऱ्यांना कळले.
गेटवेचे प्रवेशद्वार सीमा झाली म्हणून भविष्यातील सीमेवरील
जवान युध्द, लढाई, शहीद सारेच भान भविष्यासाठी आहे.
याकरीता वाहिन्यांना मानावेच लागेल.
काही अतिरेक असला तर माफ करावेच लागेल.

युध्दाची जाणीव एका घटनेने साऱ्या देशाला झाली. सीमेवरील युध्द आपण प्रत्यक्ष जाऊन पहात नाही.

यापूर्वीही स्फोट झाले होते बॉम्बस्फोट, आतंकी हमले
दिल्ली, मुंबई, सुरत, जयपूर साराच आतंकवाद होता.
पण असे कधी झाले नव्हते हिंदू मुस्लिम फारच होते
या युध्द पिपासू आतंकीना धन्यवाद द्यावेत का?
हिंदू मुस्लिम सारेच एकत्र आणले म्हणून आभार मानावेत का?
सारा देश एक झाला, एकमुखाने बोलू लागला
आता बस झालं झेलणं
एकत्र येऊन राष्ट्र टिकवणं !

म्हणून मी सुरुवातीला श्री.मंगेश पाडगावकरांना सलाम ठोकला. आता मी कविवर्य तात्यासाहेब शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी लिहिलेल्या स्वातंत्र्य देवीची विनवणी या कवितेच्या काही ओळी वाचून दाखविणार आहे.

पन्नाशीची उमर गाठली अभिवादन मज करु नका
मीच विनविते हात जोडूनी वाट वाकडी करु नका





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

तरुणाईचे बळ देशाचे जपा वाढवा तरुपरी
सुजन असा पण कुजन मातता हत्यार हातामध्ये धरा
सौजन्याच्या बुरख्याखाली शेपूट घालून पळू नका
करा कायदे परंतु हटवा जहर जातिचे मनातुनी
एकपणाच्या मारुन बाता ऐन घडीला चळू नका.

हे तात्यासाहेबांनी सांगितले आहे.

तुझ्या हतबलतेत प्रजा हतबल झाली आहे
तुझ्यासहित प्रजा पोलादी पुरुषाच्या शोधात आहे
बलिदान तर झाले ते कधीच व्यर्थ नसते
सांडलेल्या आसवांचे राष्ट्रीयत्व मोल असते
तरीही आम्हाला आता ते बलिदान नको
अश्रुपाताचे राष्ट्रीयत्वही नको
राज्यकर्ते नादान आहेत का?
लोकशाहीत तेच असणार आहेत
फक्त नादानपणा हटवणार का? हे आता दाखवायचे आहे
पोलादी मनगट हे सुरक्षितते तुझ्यासाठी आणायचेच आहे
हाच या बलिदानाचा संवाद आहे
व्यर्थ न हो बोलण्याचा आलाप आहे!

धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र!

-------------

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माझे काही विचार याठिकाणी व्यक्त करण्यापूर्वी जे जवान शहीद झाले, ज्यांचा काहीही दोष नव्हता असेही जे नागरिक शहीद झाले या सर्वांना क्रांतीकारी अभिवादन करुन याठिकाणी मी माझ्या भावना व्यक्त करीत आहे. सभापती महोदय, एके ठिकाणी असे म्हटले आहे की,

Upside is that we are alive

Downside is that they are no more, we have lost them.

ते गेले म्हणून आपण जिवंत आहोत. जे जातात, ज्यांनी देशावर प्रेम केले, स्वत:पेक्षा देशावर जास्त प्रेम केले, जिवानीशी प्रेम केले यांच्यासाठी दोन ओळी याठिकाणी पहिल्यांदा मी बोलून मग पुढे माझे विचार मांडणार आहे. एके ठिकाणी अशा प्रकारच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

" मादरे हिंद के ख़ादिम थे, गुनहगार न थे
जुर्म इतना ही था कि फाँसी के सजावर न थे
मर गए, मर मिटे, अपने वतन के वास्ते
बुलबुले कुर्बान होते है, चमन के वास्ते "

ज्या माणसांनी अतिरेक्यांच्या हल्ल्यातून या देशातील लोकशाही, या देशाचा श्वास, या देशाची अखंडता, या देशाची राष्ट्रीय एकात्मता जगविण्याचा प्रयत्न केला, शेवटच्या क्षणापर्यंत त्या सर्व शहीदांविषयी कितीही आदरांजली, श्रध्दांजली वाहिली तरी ती अपुरी असेल. ती पूर्ण त्याच वेळेला होईल ज्यावेळी आम्ही या देशाची लोकशाही, या देशाची अखंडता, या देशाची राष्ट्रीय एकात्मता यावर आम्ही जितक्या जिवानीशी प्रेम करु, बोलून नव्हे तर कृतीने करु......

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे ....

खऱ्या अर्थाने ती आदरांजली आणि श्रध्दांजली असेल की या विषयाला हात घालत असताना ज्या विषयावर सभागृहात खूप चर्चा झाली. या ठिकाणी मिडियाच्या संदर्भात तीव्र भावना व्यक्त झाल्या, त्या भावनांशी मी सुध्दा सहमत आहे. जर आमचे सैनिक लढताना सर्व जग पाहत असेल आणि मनोरंजनासाठी सातत्याने त्यासंबंधीची माहिती मिडियासमोर जात असेल तर याचा मात्र गांभीर्याने विचार होण्याची गरज आहे. निश्चितच या मिडियासाठी आचारसंहितेची गरज आहे. ज्याप्रमाणे आपल्याला देशाबद्दल प्रेम आहे त्याप्रमाणे मिडियालाही प्रेम आहे, ते त्यांचे काम करीत असतात. परंतु हे काम करीत असताना त्याचे परिणाम काय होतील, इन अँड आऊट काय असतील याचाही गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. हा हल्ला सुरु असताना एका नागरिकाने मिडियाच्या माध्यमातून प्रश्न विचारला आणि त्याला माझ्या माहितीप्रमाणे श्री. देशमुख म्हणून जे गृहस्थ होते ते अतिशय चांगली उत्तरे देत होते. त्यावेळी मी देखील एक प्रश्न टाकला होता की, हा हल्ला सुरु असताना ओलिसांच्या सुटकेसंबंधीचा ड्राईव्ह सुरु असताना सैनिक जिवानिशी लढत असताना त्यांच्या पोझिशन्स काय आहेत, अतिरेक्यांकडे सॅटेलाईट मोबाईल्स सारखी साधने होती त्यामुळे अशा पोझिशन्स त्यांना समजण्यास उशिर लागत नाही व त्याचा फार मोठा धोका होऊ शकतो, पण ही बाब वारंवार सांगितली जात होती. अशा प्रकारे या बातम्या प्रसारित करण्यात येत होत्या. तसेच ज्या चॅनेल्सचे पत्रकार त्या घटनेच्या ठिकाणी गेले होते त्यांच्या जिविताची हमी कोणी घेतली होती. माणसाने कमर्शियल असावे, एखादे चॅनेल चालवावे पण काम करीत असताना त्या पत्रकाराला कुठल्या प्रकारचे जॅकेट दिले होते, अथवा स्वतःच्या रक्षणाची कोणती व्यवस्था केली, सुरक्षेसंबंधीचे कोणते प्रशिक्षण त्याला दिले होते, हेल्मेट तरी होते काय अशा बारिकसारिक प्रश्नांकडेही भविष्यात बारकाईने लक्ष द्यावे लागणार आहे. तसेच मिडियाच्या संदर्भात निश्चितपणे कमर्शियल भूमिका घ्यावयाची कारण मिडियाने लोकांना विश्वासात घेऊन चर्चा करावयाची असते, त्यातून काही दुष्परिणामांना सामोरे जाण्याची वेळ येणार नाही अथवा गेल्यामुळे दुष्परिणाम होणार नाही याचाही गंभीरतेने विचार करावा लागेल.......

श्री. नितीन गडकरी : महोदय, सन्माननीय सदस्या अभ्यासपूर्ण भाषण करीत आहेत परंतु त्यांच्या भाषणातील मुद्दे लिहून घेण्यासाठी कोणतेही संबंधित मंत्री उपस्थित नाहीत.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे : महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे यांच्या भाषणातील मुद्दे लिहून घेण्याची व्यवस्था केली आहे.

श्री. नितीन गडकरी : माननीय मंत्री महोदय ऑफिसर्स गॅलरीतील अधिकाऱ्यांना विचारात घेऊन हे बोलले असतील तर ते योग्य नाही. कारण ऑफिसर्स गॅलरीतील अधिकारी अदृश्य स्वरुपात असतात. They are not part of the House, म्हणून सभागृहाची बैठक दहा मिनिटांसाठी स्थगित करावी.

**तालिका सभापती** (ॲड. अनिल परब) : ठीक आहे, मी सभागृहाची बैठक दहा मिनिटांसाठी स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 6.49 वाजता, 10 मिनिटांसाठी स्थगित झाली.)

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती ॲड. अनिल परब)**

श्रीमती उषा दराडे ( पुढे सुरु...)

सभापती महोदय, हा जो हल्ला झाला त्या हल्ल्याच्या संदर्भात, हा हल्ला मुंबईवरच का झाला याचे आपल्याला सामाजिक आणि राजकीय ॲनालिसीस करावयास पाहिजे. मुंबई हे प्रमुख शहर असून आंतरराष्ट्रीय राजधानी आहे. मुंबईमध्ये मोठया प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असते. आपला देश जगाच्या पाठीवर महासत्ता होण्याचे स्वप्न बघत आहे व त्या दिशेने आपली घौडदौड सुरु आहे. अमेरिकेशी तसेच इतर राष्ट्राशी अणू करार होणे ही बाब पाकिस्तानला सहन होण्याचे काहीच कारण नाही. भारत हा महासत्ता होत असतांना भारताची आर्थिक परिस्थिती खिळखिळी करणे, भारतामध्ये अशा प्रकारचे छुपे हल्ले केले तर आपल्या देशातील जी जाती व्यवस्था आहे तीला काही खतपाणी घालता येते का या विषयीचा विचार त्यांच्या मनात असू शकतो. आज केंद्रसरकारने इंधन पुरवठयासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर इंधन विहिरी विकत घेतलेल्या आहेत, विकत घेण्याचे करार केले आहे आणि याचाही परिणाम या हल्ल्याच्या पाठीमागे असू शकतो व आपल्याला तो नाकरता येणार नाही. जागतिक आंतकवादाचा एक भाग म्हणून आपण या हल्ल्याकडे शांत चित्ताने पाहिले पाहिजे. हिंदुस्तानला महासत्तेपासून रोखण्यासाठी अशा प्रकारचा हल्ला यापुढे होणार नाही यासाठी आपल्याला कठोर पाऊले उचलावे लागतील. त्यामुळे आपण सर्वांनी केंद्रसरकारच्या पाठीमागे उभे राहिले पाहिजे. गुजरात,महाराष्ट्र आणि केंद्रसरकार या तिघांचे कोऑर्डीनेशन हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्वाचे आहे त्यामुळे आपण सर्वांनी या गोष्टीकडे पाहिले पाहिजे. पाकिस्ताननेच हा हल्ला केला आहे याबाबत कोणाच्याही मनात दुमत असण्याचे कारण नाही. केंद्रीय मंत्री माननीय प्रणव मुखर्जी तसेच केंद्र सरकार सांगते आहे की, मुंबईवरील हल्ला हा पाकिस्ताननेच केलेला आहे. या ठिकाणी मला एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो तो असा आहे की, आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानवर फार मोठे प्रेशर तयार झालेले आहे. अमेरिका, ब्रिटन किंवा इतर राष्ट्राने सुध्दा पाकिस्तानला असे सांगितले आहे की, तुमच्या देशात आतंकवादी लोक आहेत, त्यांना तुम्ही प्रशिक्षण देतात त्यामुळे या

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MMP/ SBT/ KGS/ KTG/

श्रीमती उषा दराडे ....

आतंकवाद्याविरुध्द तुम्हाला कठोर पाऊले उचलावी लागतील. अशा प्रकारचे प्रेशर आतंरराष्ट्रीय पातळीवर निर्माण करण्यामध्ये भारत यशस्वी झालेला आहे ही बाब मला या ठिकाणी जाणीवपूर्वक नमूद करावीशी वाटते. या हल्ल्याच्या संदर्भात आपल्याला फार कॉशीअसली स्टेटमेंटस् करावे लागणार आहेत. आतंकवाद्यांचे नाव काढले की, मुस्लीम अतिरेकी, हिंदू अतिरेकी म्हटले जाते. हिंदु अतिरेकी आणि मुस्लीम अतिरेकी काय आहेत ? उद्या प्रज्ञा ठाकूरला, पांडे यांना तुम्ही हिंदु अतिरेकी म्हणणार का? अतिरेकी हा गुनहेगार आहे. अतिरेकी हा कोणत्याही जातीचा,धर्माचा नसतो. अतिरेकी जिहाद हा शब्द वापरतात परंतु या शब्दाचे आपल्याला ज्ञान असावे की, नसावे याबद्दल आपल्याला काही देणे घेणे नाही. परंतु हिंदु आणि मुस्लिमांमध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण होणार नाही, हिंदु आणि मुस्लिमांमध्ये अधिक विश्वास कसा निर्माण होईल यादृष्टीने आपण शब्द प्रयोग केले पाहिजेत, वक्तव्ये केले पाहिजेत. हिंदुस्थानामध्ये जवळपास 14 कोटी मुस्लीम आहेत, ते सुध्दा या देशाचे नागरिक आहेत.

यानंतर श्री. अजित.....

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती ॲड. अनिल परब )**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

त्यांच्यामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होणार नाही. अल्पसंख्याकावर अप्रत्यक्षरित्या काही अन्यायाची भावना निर्माण होईल अशाप्रकारचे वक्तव्य न करणे हे आज देशाच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे.

सभापत महोदय, आपण एक फार मोठी गोष्ट हरविली आहे, ज्याची गांभीर्याने दखल धेणे गरजेचे आहे. सामान्य माणूर रस्त्यावर आला आणि त्यांनी राजकारण्यांविषयी कॉमन सूर लावला की राजकारणी चुकीचे आहेत. राजकारण देशाला आवश्यक बाब आहे. तेव्हा राजकारण सशक्त असले पाहिजे. त्यातील स्पर्धा सशक्त असली पाहिजे, ती विकासासाठी असली पाहिजे. धर्मनिरपेक्ष असली पाहिजे. अशाप्रकारचे चित्र लोकांमध्ये निर्माण करणे आवश्यक आहे. माझे असे स्पष्ट मत आहे की, आपण सर्वजण यामध्ये कुठेतरी कमी पडत आहोत. सत्ताधारी पक्षाने आम्ही कुठे कमी पडलो नाही असे विरोधी पक्षाला सांगणे हे या पार्श्वभूमीवर चुकीचे होईल. विरोधकांनीही सत्ताधारी पक्षाची चूक आहे असे म्हणणे देखील चुकीचे होईल. आपण सर्वांनी मिळून सामुदायिक जबाबदारी घेण्याची आवश्यकता आहे. सर्वसामान्य लोकांच्या मनात राजकारणाविषयी विश्वास निर्माण करण्याची आवश्यकता आहे. समाजकारणाची बाजू असलेले राजकारण आहे. एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. ही भावना दूर होत असेल तर सभागृहाने त्याची गांभीर्याने नोंद घ्यावी. राजकारण करीत असताना लोकांना राजकारणाविषयी प्रेम कसे वाटेल, राजकारणाविषयी लोकांच्या मनात एक नवी दिशा कशी निर्माण होईल यादृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. जो हल्ला झाला त्याचे परिणाम आपण सर्वजण पाहात आहोत. हा जो हल्ला झाला त्यास कोणी एकटे जबाबदार असू शकत नाही. केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार यांनी मागणी केलेली आहे की, ज्यांनी कर्तव्यात कसूर केलेली आहे त्यांच्यावर कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. मुंबई शहरावर हल्ला झाला त्याबाबत केंद्रीय गृहमंत्री श्री.शिवराज पाटील यांनी राजीनामा दिला, माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख तसेच माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी राजीनामा दिला. त्यांनी आपापल्या जबाबदाऱ्या पेलल्या. आपली नैतिक जबाबदारी समजून आपण राजीनामे दिले पाहिजेत अशी त्यांना जाणीव झाली. एवढी मोठी घटना घडून सुध्दा पोलीस अधिकारी स्वत: पुढे येऊन बाजूला सरकण्यास तयार नसतील तर त्याबाबत केंद्र आणि राज्य सरकारने कठोर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

पावले उचलून जे कोणी दोषी असतील त्यांना बाजूला सारणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, ही गोष्ट अतिशय स्पष्ट दिसत आहे की, आपण सागरी किनाऱ्याचे संरक्षण करु शकलो नाही. ज्या पध्दतीने आपले अधिकारी त्याठिकाणी काम करीत होते तेवढेच राजकारणी पुढारी सतर्कतेने काम करीत होते. राजीनामा देण्यापर्यंतच्या घटनेपर्यंत आपण पाहात होतो की, माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री या घटनेकडे डोळ्यात तेल घालून पाहत होते ही गोष्ट आपणास नाकारुन चालणार नाही. याठिकाणी माननीय उपसभापती श्री.वसंत डावखरे उपस्थित नाहीत. मला याठिकाणी त्यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. माननीय उपसभापतींनी राज्याचे मुख्य सचिव श्री.जॉनी जोसेफ यांच्या कार्यालयात जाऊन पोलिसांचे मनोधैर्य वाढविण्याचे काम केले. असे कितीतरी ज्ञात अज्ञात राजकीय पुढारी आहेत. राजकारण फारच वाईट नाही. परंतु चांगल्या गोष्टीसुध्दा समाजापुढे जाण्याची आवश्यकता आहे. हे सर्व करीत असताना मीडियाने नकारात्मक बातम्यांबरोबर सकारात्मक बातम्या देखील देणे गरजेचे आहे. याठिकाणी स्व.इंदिरा गांधी आणि स्व.राजीव गांधी यांचा उल्लेख झाला. महात्मा गांधीचा उल्लेख झाल्यानंतर काही चिलबिचल झाली आणि काही कॉमेन्टस झाल्या. देशाने हे नेते गमावलेले आहेत. कोणत्या कारणाने गमाविले याची कारणे वेगळी असतील. स्व.इंदिरा गांधी व स्व. राजीव गांधी यांच्यावर अतिरेक्यांनी हल्ला केला होता हे आपल्याला नाकारता येणार नाही. संसदेवरील हल्ला देखील अतिरेकी हल्ला होता हे आपणास नाकारता येणार नाही. महात्मा गांधी यांची हत्या माथेफिरुने केली होती. त्यामागे कुठेतरी हिंदू आणि मुस्लिम अशी भावना होती ही गोष्ट इतिहासात आलेली आहे, ती आपणास नाकारुन चालणार नाही. परंतु अतिरेक्यांच्या हल्ल्यामुळे आपणास हौतात्म्य मिळते हा इतिहास आहे असे फक्त बोलून चालणार नाही. असे पुन्हा होणार नाही यासाठी कठोर पावले उचलण्याची आवश्यकता आहे. अत्याधुनिक शस्त्रास्त्रांसाठी जास्तीत जास्त निधीची तरतूद करणे तसेच सामुदायिक जबाबदारी म्हणून आपण सर्वांनी लोकांसमोर जाण्याची आवश्यकता आहे. आपणास केंद्र सरकारच्या पाठिशी उभे राहून आणि दोन्ही राज्यांचा मेळ घालावा लागेल. मी जास्त वेळ घेणार नाही कारण मी प्रज्ञा ठाकूर यांच्या विषयात गेले तर सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

आव्हाड यांनी वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला असा समोरच्या बाकावरुन आरोप झाला त्याप्रमाणे माझ्यावर देखील आरोप होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

" मादरे हिंद पे हम, जां निसार करते हैं,
खुश रहो एहेले वतन, हम तो सफर करते हैं "

असे म्हणणारे शहीद झाले आणि आम्ही मात्र राजकीय भांडवलासाठी एकमेकांशी भांडत आहोत अशाप्रकारचा चुकीचा मेसेज लोकांसमोर गेला तर लोक आपल्याला माफ करणार नाहीत.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.अजित शिगम 19.10

श्रीमती उषा दराडे..

आमचे सुध्दा लोकशाही विषयीची काही देणी आहेत, आमचे सुध्दा राष्ट्राविषयी काही देणे आहे, `हिंदु मुस्लिमा विषयीची आमचे काही देणी आहेत. परंतु एक गोष्ट पॉझिटीव्ह अशी आहे की,या संदर्भात दोन तीन सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की या हल्यामध्ये जो कोणी मृत्यूमुखी पडलेला आहे तो हिंदू आहे की मुस्लिम आहे आणि जो कोण जगवतो आहे तो हिंदू आहे की मुसलमान आहे हा विचार बाजूला झाला आणि सामान्य माणसे रस्त्यावर आली .लोकशाही जीवंत असल्याचाच हा पुरावा आहे म्हणून कोणीही नाराज होण्याचे काही कारण नाही अतिरेकयांनी हल्ला केला तो केला. तो व्हावयास नको होता अशा प्रकारचा पुन्हा हल्ला होण्ंार नाही याची आपण भविष्यात दक्षता घ्ेंऊ या. मघाशी बोलत असतांना कोणी तरी असे म्हटले की अमेरिकेत लोक असे करतात, जपानमध्ये तसे करतात त्यांचे राष्ट्रप्रेम जास्त असते वगैरे वगैरे परंतु आपल्या देशातील लोकांचे राष्ट्रप्रेम काही कमी नाही. अतिरेक्यांचे हल्ले होत असतांना सामान्य माणूस कोणत्याही प्रकारची पर्वा न करता जखमी व्यक्तीला वाचवण्यासाठी रस्त्यावर येत होता. नरिमन हाऊनच्या बाजुला मदत करण्यासाठी गर्दी करीत होता अर्थात ही गर्दी करणे कदाचित चूक असू शकेल. जी यंत्रणा हॉटेलमध्ये अडकलेल्या लोकांची सुटका करीत होती व त्यांना मदत करीत होती त्यांच्या दृष्टीने या लोकांची गर्दी होणे ही अडचण आहे.परंतु तरी सुध्दा ही माणसे त्या ठिकाणच्या जवानांना राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यासाठी जात होती . आम्ही तुमच्या बरोबर आहोत हे दाखवून देत होती हे स्फूर्लिग मुंबईतील सामान्य नागरिकांनी दाखवलेले आहे ते जगात सर्वश्रेष्ठ आहे हे स्वाभिमानाने मला येथे सांगावेसे वाटते. अजूनही काही सन्माननीय सदस्याना बोलावयाचे आहे. बराच वेळ झालेला असल्यामुळे मी जास्त बोलणार नाही. या प्रस्तावा वर सकाळ पासून सन्माननीय सदस्यानी आपले विचार माडलेले आहेत. शेवटी मला इंग्रजीच्या चार ओळी सांगावयाच्या आहेत. विद्यार्थी संघटनेत असताना कोणत्याही कार्यक्रमाच्या शेवटी आम्ही या ओळी म्हणत असावयाचो त्यानंतरच तो कार्यक्रम संपावयाचा. त्या ओळी पुढीलप्रमाणे आहेत

We shall over-come,
We shall over-come, some day.
That deep in my heart,
I do believe,
That we shall over-come, some day."

त्या दिवशी जगातील आतंकवाद संपविण्यासाठी भारत देश हा जगाचे नेतृत्व करील अशा प्रकारचा आशावाद मी व्यक्त करते आणि माझे भाषण संपविते. धन्यवाद.

...2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त ) :सभापती महोदय, मुंबईत अतिरेक्यांनी केलेल्या हल्याच्या संदर्भात या ठिकाणी सकाळी अकरा वाजल्यापासून जवळजवळ साडेसहा तास चर्चा सुरु आहे. 26 नोव्हेंबर 2008 रोजी अतिरेक्यांनी मुंबईवर अतिशय आक्रमक हल्ला केला असून हा हल्ला केवळ मुंबईवरच नव्हता तर तो देशावरच होता. या हल्यासंबंधी सभागृहात बरीच चर्चा झाली आहे तरी सुध्दा दोन चार मुद्यांवर मी माझे विचार मांडणार आहे. मुंबईतील ताज हॉटेलवर अतिरेक्यांनी हल्ला केला होता. हे हॉटेल जरी मुंबई शहरात असले तरी त्याला 105 वर्षे पूर्ण झालेली आहेत. हे हॉटेल श्री. टाटांचे असले तरी पर्यटनाच्या दृष्टीने ताज हॉटेलला महत्व प्राप्त झालेले आहे. गेट वे ऑफ इंडिया कडे गेल्यानंतर या हॉटेलकडे आपण पहात असतो. मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्याच्या संदर्भातील कारणमिंमासा सांगत असतांना सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी चांगले विचार मांडले आहेत. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचे मी मनापासून आभार मानतो तसेच त्यांचे अभिनंदन करतो या घटनेच्या संदर्भात लोकसभेमध्ये चर्चा करण्याच्या वेळी जी लाईन ठरविण्यात आली होती तीच लाईन या ठिकाणी देखील निश्चित केली गेली. गडबड झाला किंवा गोधळ झाला तरी विचलित होता, गोंधळून न जाता सामोपचाराने एकत्र होऊन प्रत्येकाने काम करावयास पाहिजे. लोकसभेवर ज्यावेळी हल्ला झाला होता त्यावेळी युतीचे सरकार सत्तेवर होते त्यावेळी माननीय श्रीमती सोनिया गांधी श्री. वाजपेयी यांना म्हणाल्या होत्या की, "आम्ही सर्व जण आपल्या बरोबर आहोत., आम्ही खंबीरपणे आपल्या पाठीशी उभे आहोत " त्याच प्रमाणे मुंबईमध्ये अतिरेकी हल्ला झाल्यानंतर श्री.अडवाणी यांनी आणि इतर नेते मंडळीनी अशाच प्रकारचे विचार व्यक्त केले होते. बांगला देशच्या युध्दाच्या वेळी श्रीमती इदिरा गांधीबद्दल लोकसभेमध्ये स्वत: श्री. वाजपेयी यांनी त्यांचे कौतूकाने झाशीची राणी असा उल्लेख केला होता. अशा प्रकारची घटना घडल्यानंतर सर्वजण एकत्र आहोत हे दाखवून दिले पाहिजे अशा घटनाच्या संदर्भात एखादी त्रृटी दिसून आली तरी त्याबद्दल टीका न करता त्या गोष्टीला सामोरे गेले पाहिजे मुबईत अतिरेक्यांनी हल्ला केल्यानंतर काही राजकीय नेत्यांनी स्वत: होऊन हे राजीनामे दिले आहेत.

नंतर श्री.सुंबरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ....

दिल्लीच्या भारत सरकारच्या गृहमंत्रालयाच्या मंत्र्यांनी या घटनेनंतर स्वत:हून आपला राजीनामा दिलेला आहे. आमच्या राज्य सरकारच्या गृहमंत्र्यांनी आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील स्वत:हून आपल्या पदाचा राजीनामा दिलेला आहे. याची कारणमिमांसा सादर करताना सन्माननीय श्री.चिदंबरम्, केंद्रीय गृहमंत्री यांनी याबाबतची पार्श्वभूमी देशाला समजावून दिली. त्यांनी यातील प्रत्येक गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला. सुरक्षा व्यवस्था कशी असली पाहिजे हेही त्यांनी सांगितले. राज्याच्या पोलीस दलातील शहीद झालेल्या श्री.हेमंत करकरे, श्री.अशोक कामटे, श्री.विजय साळसकर आदी अधिकारी तसेच जवानांचा अगदी नावाने उल्लेख करून, विशेषत: श्री. हेमंत करकरे यांची मुलगी अमेरिकेतील केंब्रिज विद्यापीठामध्य शिक्षण घेत असल्याचाही त्यांनी उल्लेख केला. इतकेच नव्हे तर देशाच्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी देखील आवर्जून मुंबईत येऊन या शहीदांच्या घरी त्यांच्या कुटुंबियांच्या सांत्वनासाठी गेल्या, त्यांची विचारपूस केली आणि त्यांना धीर दिला. त्यांच्या या भेटीने जनतेमध्ये एक चांगला मेसेज गेला. सभापती महोदय, या ठिकाणी या संदर्भात निधीचा उल्लेख केला गेला. खर तर शासनाचा निधी म्हटल्यानंतर मला धडकीच भरते. तो केव्हा लॅप्स होतो, कित्येकदा तो देण्याचे विसरले जाते. पण आमच्या नवनिर्वाचित माननीय मुख्यमंत्र्यांनी अगदी सुस्पष्टपणे सांगितले की, पोलीस विभागाला सुरक्षा यंत्रणेसाठी राखून ठेवण्यात आलेला निधी पूर्णपणे वापरण्यात आलेला नाही. ही गोष्ट त्यांनी जाहीरपणे लक्षात आणून दिली. त्यामुळेच या घटनेच्या पूर्वी पोलीस दलाला आधुनिकीकरणासाठी जो खर्च करायला पाहिजे होता तो खर्च होऊ शकला नाही. खरे तर माननीय मुख्यमंत्र्यांनी यासाठी जे कोणी अधिकारी वा व्यक्ती कारणीभूत असतील त्यांच्यावर निलंबनासारखी कडक कारवाई करण आवश्यक आहे, ती त्यांनी केली पाहिजे.

सभापती महोदय, मला या वेळेस आनंदाने सांगावेसे वाटते की, यावेळेस आमच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी यांनी या राज्यामध्ये दलित समाजातील उमद्या कार्यकर्त्याला गृहराज्यमंत्री पद दिलेले आहे. गृहखात्याच्या किल्ल्या त्यांनी दलिताच्या हाती दिल्या आहेत. स्व. तिरपुडे साहेबांनंतर 30 वर्षांनी दलित समाजातील माणसाकडे हे पद दिले गेलेले आहे. मी तर असे सांगेन की, दलित कार्यकर्त्याला तुम्ही केव्हाही समाजकल्याण विभाग देऊ नका. आमच्या 2,500 कोटीचा फंड हा त्यामुळेच दुसऱ्या विभागाकडे वळविला गेला होता. तो विभाग तुम्ही उच्चवर्णीयांना, सवर्णांना द्या.

...... 4टी 2 ...

श्री. सुभाष चव्हाण......

तेव्हा आता आमच्या नेत्यांनी गृहखाते दलिताकडे दिलले आहे. ते अत्यंत कार्यक्षम, अभ्यासू आणि तरूण आहेत. मी दिल्लीमध्ये त्यांच्याबरोबर होतो, महाराष्ट्र सदनामध्ये आम्ही एकत्र रहात होतो. त्यावेळेस त्यांनी मला बरोबर घेऊन मार्केटमध्ये गेलो आणि तेथून त्यांनी या घटनेविषयीची माहिती आलेली अनेक वृत्तपत्रे घेतली, त्यांची कात्रणे काढली आणि रात्रभर बसून त्यांनी त्यांचा अभ्यास केला. असे हे अभ्यासू गृहराज्यमंत्री आपल्याला लाभले आहेत. त्यांनी आता ज्याप्रमाणे संरक्षणासाठी भरीव तरतूद केली आहे तशीच सुरक्षा निधीमध्ये देखील भरीव तरतूद करावी असे मला त्यांना येथे आवर्जून सांगावयाचे आहे. सभापती महोदय, मला येथे आणखी एक गोष्ट सांगावयाची आहे. आपल्याकडील जे हुशार आणि कर्तव्यदक्ष असे माजी पोलीस अधिकारी आहेत, उदा. सोमण, रिबेरो, इनामदार इ. त्यांच्या ज्ञानाचा देखील आपण आपल्या गृहखात्याचे आधुनिकीकरण करताना उपयोग करून घेतला पाहिजे. त्यांच्या त्या संबंधातील अनेक मुलाखती आलेल्या आहेत. त्या साऱ्या अभ्यासू स्वरूपाच्या आहेत. श्री. अरविंद इनामदार, माजी पोलीस महासंचालक यांनी तर आपल्या मुलाखतीमध्ये सांगितले आहे की, पोलीस खात्याचा प्रधान सचिव हा पोलीस खात्यातील माणूसच असला पाहिजे. मी जेव्हा राज्याचा डी.जी. होतो तेव्हा मला केवळ 150 रूपयापर्यंतच्या पॉवर्स होत्या. परंतु ज्याला बंदूक देखील हातात घेता येत नाही असा माणूस पोलीस खात्याच्या प्रधान सचिव पदी असतो त्याला मात्र लाखो रूपयांच्या पॉवर्स दिलेले असतात. ही गोष्ट सयुक्तिक नाही. पोलीस खात्यातील अनुभवी माणूसच गृहखात्याच्या प्रमुख पदी असला पाहिजे. त्यांच्या या सूचनेचा सरकारने अवश्य विचार करावा असे मला सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, या विषयावर बोलण्यासारखे खूप काही आहे. ही घटना सातत्याने टीव्हीच्या माध्यमातून आपण साऱ्यांनीच पाहिलेली आहे. तेयव्हा आपण सर्व मंडळींनी, विरोधीपक्षाच्या आणि सत्तारूढ पक्षाच्या मंडळींनी एकत्र बसून हा प्रश्न आवर्जून सोडविला पाहिजे.

( यानंतर श्री. सरफरे .... 4यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण...

शेवटी मी जास्त काही न बोलता आतंकवाद्यांच्या हल्ल्यामध्ये जे हुतात्मा झाले आहेत त्यांच्या कुटुंबियांसाठी शासनाने मदत केली पाहिजे अशी मागणी करतो. आपण पोलिसांसाठी भरपूर आर्थिक मदत देतो. परंतु या हल्ल्यामध्ये सामान्यातील सामान्य माणूस देखील मृत्युमुखी पडला आहे, त्याच्या कुटुंबियांना शासनाने नोकरी द्यावी. त्यांच्या उपजीविकेची शासनाने तजवीज करावी अशी विनंती करतो. या आतंकवाद्यांच्या हल्ल्यामध्ये जे पोलीस अधिकारी, कमांडो, जवान, पोलीस कर्मचारी, परदेशी पर्यटक आणि सर्वसामान्य नागरिक हुतात्मा झाले आहेत त्यांच्या आत्म्याला शांती लाभो, अशी इच्छा प्रदर्शित करुन मी माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सकाळी 11 वाजल्यापासून या सभागृहामध्ये सुरु असलेल्या दहशतवादी हल्ल्यासंदर्भातील चर्चेमध्ये अनेक माननीय सदस्यांनी मुद्दे मांडले आहेत. परंतु यामध्ये एक मुद्दा दुर्लक्षित राहिला आहे. तो म्हणजे इतक्या मोठया प्रमाणावर मुंबई शहरावर हल्ला झाला. आणि त्यामध्ये मोठया प्रमाणात शस्त्रसाठा हाती लागला. या हल्ल्यामध्ये स्थानिक लोकांच्या सहकार्याशिवाय हा हल्ला होणे शक्य नाही. म्हणून या विषयाकडे आपण गांभीर्याने पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, टाईम्स ऑफ इंडियाच्या 3 तारखेच्या अंकामध्ये "गॅगस्टर लिंक" या शीर्षकाखाली लेख प्रसिध्द झाला आहे. त्यामध्ये एक भीती व्यक्त करण्यात आली आहे ती खरी ठरली आहे. ज्या हसन अलीबद्दल माहिती लिहिण्यात आली आहे. तो स्मगलिंगमध्ये मोठा माहीर मानला जातो. त्याची दुबईला मोठी लिंक आहे. 3 डिसेंबरच्या अंकात त्याच्या बाबतीत लिहिण्यात आल्यानंतर काल त्याची पुण्यामध्ये अटक झाली. त्याला अटक करण्यापूर्वी आठवडयाभरापूर्वी कोल्हापूर शहरामध्ये एका आतंकवाद्याला अटक झाल्यानंतर दिवसभरामध्ये त्या आतंकवाद्याचे संपूर्ण कुटुंब सामानासहीत गायब झाले. कोल्हापूर शहरात उच्चभ्रू मंडळी ज्या भागात रहातात त्या ताराबाई पार्कमध्ये सहा महिन्यापूर्वी एक आतंकवादी सापडला. दोन महिन्यापूर्वी कोल्हापूर जिल्हयातील आजरा येथे एक आतंकवादी सापडला. मला या निमित्ताने एवढेच सांगावयाचे आहे की, स्थानिकांची मदत असल्याशिवाय इतक्या मोठया प्रमाणात या देशात शस्त्रे येत नाहीत. याठिकाणी अनेक माननीय सदस्यांनी सांगितले की, 9 अतिरेकी मारले गेले आणि 1 जीवंत सापडला. मला एवढेच सांगावयाचे आहे की, हा हल्ला करण्यापूर्वी अगोदरच या शहरामध्ये येऊन त्या अतिरेक्यांनी शस्त्रसाठा केला आहे. त्यामुळे इतक्या मोठया प्रमाणावर हल्ले करीत असतांना आपण ज्यांना गॅगस्टर म्हणतो, जे मोठया प्रमाणावर स्मगलिंगमध्ये अडकलेले असतात त्यांचा याबाबतीत काय रोल राहिला आहे याचा सुध्दा आपण विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, या चर्चेमधून अनेक मुद्दे उपस्थित करीत असतांना सामान्य माणसाला चिंतेचा वाटेल असा मुद्दा म्हणजे सामान्य माणसाच्या मनामध्ये सरकारने विश्वास वाढविला पाहिजे. त्यासाठी सरकारने एक श्वेतपत्रिका जाहीर केली पाहिजे. या ठिकाणी अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्यामध्ये कुणी म्हणते हे अतिरेकी 22 होते. त्यांनी अगोदरच शस्त्रसाठा आणून

DGS/ MMP/ KGS/

श्री. चंद्रकांत पाटील....

ठेवला होता काय? कुणी म्हणते ते कुलाब्याला उतरले तर कुणी म्हणते ते गेट वे ऑफ इंडियाला उतरले. याची पोलिसांना प्री इंटीमेशन होती काय? ही घटना घडत असतांना पोलीस आयुक्त ऑन साईट होते काय? ते गाडीमध्ये झोपले होते काय? अशाप्रकारचे अनेक प्रश्न सामान्य माणसाला सतावीत आहेत. यानिमित्ताने मला सरकारला विनंती करावीशी वाटते की, शासनाने लोकांना याबाबतीत विश्वास दिला पाहिजे. आणि श्वेतपत्रिकेमध्ये याबाबतच्या सर्व गोष्टी पुढे आल्या पाहिजेत. आपण माहितीचा अधिकार मान्य केला असल्यामुळे सामान्य माणसाला या सर्व गोष्टी समजल्या पाहिजेत. इतका मोठा हल्ला मुंबई शहरावर कसा झाला? त्यावेळी नेमके काय घडले? हे लोकांना कळले पाहिजे. कारण हा हल्ला लोकांच्या विस्मृतीत लवकर जाणार नाही, आणि तो जाऊ नये यासाठी आणि या देशामध्ये शासन व्यवस्था आहे असे जर त्याला वाटावयाचे असेल तर शासनाने श्वेतपत्रिका प्रकाशित केली पाहिजे. आणि यापुढे अशाप्रकारचे हल्ले होऊ नयेत यासाठी शासन कोणती उपाय योजना करणार आहे यासंबंधी देखील स्पष्टपणे आपले म्हणणे शासनाने मांडले पाहिजे. या सभागृहामध्ये सरकार चालविणारे सत्ताधारी आणि विरोधी पक्ष असे दोन पक्ष असून या दोघांचे एकमत झाले पाहिजे. आज पाकव्याप्त काश्मिरमध्ये अतिरेक्यांना मोठया प्रमाणावर प्रशिक्षण दिले जाते. हे जगजाहीर झाले आहे. यासंबंधीच्या मुद्यासंबंधी सभागृहात मोठया प्रमणावर चर्चा झाली आहे. त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधी पक्षांनी एकत्रितपणे यासंबंधी ठराव संमत केला पाहिजे. त्याकरिता ब्रिटीश संसदेमध्ये ठराव संमत होण्याची वाट न पहाता किंवा अमेरिका-इंग्लंडमधून कारवाई होण्याची वाट न पहाता महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने ठराव संमत करुन तो केंद्र सरकारकडे पाठविला पाहिजे. आणि पाकव्याप्त काश्मिरवर हल्ला करुन अतिरेक्यांची प्रशिक्षण केंद्रे उद्ध्वस्त केली पाहिजेत. याबाबत दोन्ही सभागृहातील माननीय सदस्यांमध्ये दुमत नसेल तर एका ओळीचा प्रस्ताव एकमताने संमत करुन आपण तो केंद्र सरकारकडे पाठविला पाहिजे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील .....

सभापती महोदय, अलीकडील आतंकवादी हल्ले अनेक प्रकाराने अद्ययावत होत चालले आहेत. आता पूर्वीसारखे तलवारीने हल्ले होत नाहीत. पूर्वी हिंदू-मुस्लीम दंगा झाला तर तो तलवारीच्या सहाय्याने व्हावयाचा. त्यानंतर सुतळी बॉम्ब वापरले गेले. असे करता करता आता जो हल्ला होतो तो फार हायटेक होत आहे. या हायटेक हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आपण मात्र पूर्वीच्याच मार्गाने लढत राहिलेलो आहोत. आपण पूर्वीच्याच मार्गाने लढत राहिलो तर अशा प्रकारचे अनेक हुतात्मे होण्याशिवाय आणि निराशा येण्याशिवाय आपल्या हाती काही उरणार नाही. सकाळी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी अनेक राजकीय नेत्यांना आवाहन केले. आपण एअरपोर्टवरुन जाताना आपली तपासणी करण्याच्या बाबतीत विरोध करतो की, आमचे चेकींग कशासाठी करता ? त्यांनी आवाहन केले की, जर सुरक्षा हवी असेल तर आपण यासाठी तयार राहावयास पाहिजे. पण याची आवश्यकताच नाही. असे एक अद्ययावत यंत्र आलेले आहे की, ज्या यंत्राच्या माध्यमातून पूर्वी सारखे चेक करण्याची आवश्यकताच नाही. आपण जात असताना आपली संपूर्ण बॉडी स्कॅन होते. आज जे चेकींग होते त्यातून आपण फक्त एक समाधान मिळवतो. खरे म्हणजे आपण डिटेलमध्ये चेक करत नाही. आपण नुसते जात असताना पूर्ण बॉडी स्कॅन होते अशा प्रकारचे अद्ययावत यंत्र उपलब्ध असताना ते आम्ही आणणार नाही. अतिरेकी अतिशय ॲडव्हान्स सिस्टीम, अतिशय कॉम्युटराईज्ड सिस्टीम वापरत आहेत. घरबसल्या रिमोटने कशा प्रकारे हल्ले करतात याची आम्ही फक्त चर्चा करणार आणि हुतात्म्यांना श्रध्दांजली वाहणार. मला असे वाटते की, ज्यावेळी गाडी नाक्यावरुन पास होते त्यावेळी काही सेकंद थांबल्यानंतर संपूर्ण गाडी स्कॅन होते अशा प्रकारची यंत्रणा असताना सुध्दा आम्ही पूर्वीच्या पध्दतीने तपासणी करतो. थांब रे, काय आहे रे, वाजवून बघणार आणि पुढे जा म्हणून सांगणार. अशा प्रकारच्या सगळ्या अद्ययावत गोष्टी आपण आणण्याची आवश्यकता आहे. हल्ला झाल्यानंतर ज्या प्रकारच्या एजन्सीज काम करीत होत्या त्या प्रत्येक एजन्सीकडे त्यांची वेगवेगळ्या प्रकारची कम्युनिकेशनची माध्यमे होती. फ्रॅक्शन ऑफ सेकंदमध्ये संपूर्ण गाडी स्कॅन होऊ शकते अशा प्रकारची अद्ययावत यंत्रणा असताना आजही आपण परंपरागत गोष्टी वापरत आहोत. फार महत्वाची गोष्ट म्हणजे ज्यावेळेला 60 तासाचा संघर्ष त्या

...2....

RDB/ KGS/ MMP/

श्री. चंद्रकांत पाटील ......

ठिकाणी चालला त्यावेळी वेगवेगळ्या एजन्सीज काम करीत होत्या. त्या प्रत्येक एजन्सीकडे प्रत्येकाचे एक कम्युनिकेशन माध्यम होते. तो वायरलेस सुध्दा सारखा नसतो. कोणाकडे व्हीएचएफ फ्रिक्वेंसी होती तर कोणाकडे एचएफ फ्रिक्वेंसी होती. काही लोकांकडे मोबाईल होते. त्यामुळे कोणाचे कोणाशी कोऑर्डिनेशन नव्हते. ज्याला इमरजंसी कम्युनिकेशन सिस्टिम म्हणतात असे एक अतिशय चांगले यंत्र आलेले आहे. त्यामध्ये एक हार्ट असते आणि ते हार्ट सगळ्या गोष्टींना सगळ्यांशी बोलावयास लावते. म्हणजे टेलिफोन लाईनवरुन आपण वायरलेसशी बोलू शकतो. वायरलेसवरुन आपण मोबाईलशी बोलू शकतो. ज्याला इमरजंसी कम्युनिकेशन सिस्टिम म्हणतात, जी सिस्टिम हेलिकॉप्टरमधून फेकता येते, अशा कितीतरी अद्ययावत गोष्टी आज उपलब्ध असताना सरकारकडे पैसे नाहीत का ? युध्दाच्या वेळी ज्या ज्या वेळेला लाल बहादूर शास्त्री यांच्या सारख्यांनी अपील केले की, तुम्ही तुमचे दागिने द्या, तुम्ही तुमचे पैसे द्या त्यावेळी आपण युध्दामध्ये कमी पडू नये म्हणून लोकांनी आपल्या घरातील दागिने दिले. एकवेळचे जेवण सोडले. मला असे वाटते की, आज त्याच्यापेक्षा लोकांच्या भावना किती तरी प्रगल्भित झालेल्या असल्यामुळे पैसे नसतील तर लोकांना अपील करा. पण अशा प्रकारच्या सगळ्या अद्ययावत गोष्टी उपलब्ध असताना आम्ही त्या वापरणार नाही आणि त्या न वापरल्यामुळे हल्ले झाल्यानंतर रडत बसणार याला काही अर्थ राहणार नाही. म्हणून मला असे वाटते की, या सगळ्या पार्श्वभूमीवर आपण दोन्ही सभागृहांनी एकमताने काही गोष्टींचा आग्रह धरला पाहिजे की, ज्यामध्ये अद्ययावत यंत्रणा वापरुन ठोशास ठोसा, जशास तसे उत्तर देण्याची सिध्दता आपण केली पाहिजे. या सगळ्या मागण्यांचा उल्लेख करुन उद्या संपूर्ण महाराष्ट्राच्या जनतेला अपील करणारे माननीय मुख्यमंत्र्यांचे भाषण व्हावे की, जे एका अर्थाने श्वेतपत्रिका असेल. असे आवाहन आपल्याला करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...3....

RDB/ KGS/ MMP/

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, 26 नोव्हेंबर, 2008 ला मुंबई येथे जो दहशतवादी हल्ला झाला याबद्दल आपण या ठिकाणी चर्चा करीत आहोत. अशी घटना यापुढे होऊ नये. तसेच ही घटना फक्त महाराष्ट्रापुरतीच मर्यादित नाही तर हा भारत देशावर हमला आहे. ही घटना इतकी गंभीर आहे की, पूर्ण देश आणि इतर अनेक देशांनी त्याबाबत निषेध नोंदविलेला आहे व अशी घटना होऊ नये याकरिता भारताला जी काही मदत अथवा कारवाई करावयाची असेल त्याला इंटरनॅशनल व युनोच्या घटनेनुसार पाठिंबा जाहीर केला आहे. दहशतवाद हा काही धर्माच्या नावाने हल्ला होऊ शकत नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी.....

विदेशी व भारतीय निरपराध माणसे शहीद झाले. या हल्ल्यामध्ये आपला जीव का गेला हेही त्यांना माहीत नव्हते. या हल्ल्यामध्ये 183 व्यक्ती मरण पावल्या आणि 300 व्यक्ती जखमी झाल्या आहेत, मरण पावलेल्या व्यक्तींमध्ये 48-50 मुस्लीम होते. हा हल्ला धर्माच्या नावाने झाला असे कोणी म्हणू शकत नाही. परंतु हा हल्ला का झाला त्याची कारणे शोधली पाहिजेत. या हल्ल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मिडिया आणि प्रेसने असे म्हटले आहे की, मुंबईमध्ये जे काही झाले आणि पुढे होण्याची शक्यता आहे त्याकडे राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष नाही. राजकीय लोकांचे त्यांच्या खुर्च्यांकडे किंवा आपल्या फायद्याकडे लक्ष असते. ही घटना घडली त्यावेळी मला एक फोन आला होता. फोन करणा-याने मला विचारले की, आपण टी.व्ही.बघत आहात काय, मुंबईत आतंकवाद्यांकडून झालेल्या हल्ल्याचे डायरेक्ट रिले सुरु आहे. आपण टी.व्ही.सुरु करावा. मी रात्री 10.15 ते 10.30 च्या दरम्यान चंद्रपूरपासून 10 कि.मी.अंतरावर असलेल्या तळोली येथे होतो. मी त्यांना सांगितले की, मी 10 मिनिटात घरी पोहोचणार आहे. त्यानंतर मी रात्री 10.45 वाजता टी.व्ही.सुरु केला त्यावेळी मला श्री.हेमंत करकरे दिसले. त्यावेळी श्री.करकरे यांच्यावर राजकीय पुढा-यांशी संबंध असल्याचे आरोप केले जात होते. सभापती महोदय, 1992-93 चा काळ मला आठवतो. त्यावेळी श्री.करकरे हे चंद्रपूर जिल्हयाचे पोलीस अधिक्षक होते. चंद्रपूरवासीयांमध्ये ते प्रख्यात झाले होते. त्यामुळे चंद्रपूरची जनता त्यांना विसरु शकत नाही. त्यावेळी खासदार, आमदार कॉंग्रेस पक्षाचेच होते. तसेच बल्लारपूर शहरापर्यंत येऊन नक्षलवादी हल्ले करीत असत. चंद्रपूर शहरामध्ये लालपेठ नावाचा भाग आहे. त्या भागात आलेल्या शेखर अण्णा नावाचा नक्षलवादी होता. आंध्र प्रदेश राज्याच्या सीमेला लागून राजूरा तालुका आहे. त्याठिकाणी अनेक पुढा-यांची शेती आहे, सर्व पक्षातील लोकांची शेती आहे. 92-93 च्या काळात त्यांनी आपल्या जीवाची पर्वा केली नाही. तुम्ही नक्षलवाद्यांना पोलिसांच्या ताब्यात घेण्यासाठी आम्हाला साथ द्यावी. सोंडू नावाचे नगरपरिषदेचे ते एक मोठे नेते होते. त्या पुढा-याला त्यांनी समजावून सांगितले. तुमच्याकडे नक्षलवादी येतात, तुमच्या घरी जेवण करतात अशी सीआयडीची माहिती आहे. त्यांनी श्री.करकरे यांना सांगितले की,माझ्या जीवाला धोका आहे, पण तुम्ही पोलीस

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

श्री.जैनुद्दीन जव्हेरी.....

पहारा ठेवावा, मी माझ्या वावरामध्ये जाणार नाही. असे सांगितल्यावर पोलिसांनी त्यांच्या वावरामध्ये दोन वेळा छापा घातला होता, परंतु त्यांना नक्षलवादी सापडले नाही. त्यामुळे ती व्यक्ती पोलिसांना मदत करीत नाही, असे श्री.करकरे यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी त्यांचे पूर्वीचे रेकॉर्ड मागवून त्यांनी कोणते कार्य केले आहे याची माहिती घेतली. त्यांच्यावर प्रेशर टाकण्याचा तो एक भाग होता.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जैनुद्दिन जव्हेरी..

त्यांना अशी माहिती मिळालेली होती की, त्या माणसाने बेकायदेशीर चाळी बांधलेल्या होत्या. त्याबाबतीत संपूर्ण माहिती धेऊन ते बांधकाम बेकायदेशीर आहे हे समजल्यानंतर हेमंत करकरे साहेबांनी पोलीस फोर्स घेऊन ते अनधिकृत बांधकाम पाडून टाकले. आणखी एक सट्टा खेळणारा माणूस त्या भागामध्ये होता. तो चिठ्ठया लिहून खिशात ठेवत असे. त्याला बोलावून सांगितले की, चंद्रपूरमध्ये दारु आणि सट्टा बंद असताना तू सट्टा कसा काय खेळतोस. त्याची संपूर्ण चौकशी करुन आणि त्याचे वर्तन पाहून करकरे साहेबांनी त्या इसमाला जेरबंद केले. करकरेसाहेब हे एक कर्तव्य दक्ष असे पोलीस अधिकारी होते. कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता ते नियमाच्या चौकटीतच काम करायचे. मला हे सांगावयाचे आहे की, ज्यावेळी अशा कर्तव्यदक्ष पोलीस अधिका-यावर टीका होत होती त्यावेळी मनाला खूप वेदना होत होत्या. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये पोलीस अधीक्षक म्हणून त्यांनी राजकीय भावनेतून कधी काम केले नाही. माझे हात कायद्याने बांधलेले आहेत आणि मी कायद्याप्रमाणेच काम करणार असे ते नेहमी सांगत असत. आज असे धडाडीचे आणि निष्ठावान पोलीस अधिकारी दहशतवाद्यांशी लढताना आपल्यातून निघून गेलेले आहे. मी माझ्या जिल्ह्याच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, काही वर्षापूर्वी शासनाचा एक जी.आर. प्रसिध्द झाला होता. त्यानुसार एखाद्या जिल्ह्यामध्ये जातीय दंगल अथवा कोणतीही दंगल धडली तर त्याबाबतीत जिल्हाधिकारी पोलीस अधिका-याला जबाबदार धरले जाते. या जी.आर.ची अमंलबजावणी करावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

...नंतर श्री. गिते..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी....

सभापती महोदय, या सभागृहात शासनाचे एक गोपनीय पत्र वाचून दाखविण्यात आले. मंत्रालयातील गृह विभागाच्या मुख्य सचिवांना तसेच मुंबईच्या पोलीस आयुक्तांना मुंबई शहरात अशा प्रकारची घटना होणार आहे याची कल्पना होती अशा प्रकारचा आशय त्या पत्रात नमूद केला आहे. परंतु मला या निमित्ताने असे सांगावयाचे आहे की, मंत्रालयात अथवा जिल्हा पातळीवर काम करणारे सर्वच अधिकारी वाईट काम करतात असे नाही. काही अधिकारी अतिशय चांगल्या प्रकारे शासकीय कामकाज करतात. काही शासकीय अधिकारी कधीच चांगले काम करीत नाहीत असेही अधिकारी लोकप्रतिनिधी म्हणून काम करताना मला आढळून आले आहेत. जिल्हयाच्या अथवा गाव पातळीवर एखादी लहान, मोठी घटना घडली तर त्यासंबंधीची तक्रार नोंदविण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनमध्ये जावे लागते. परंतु जिल्हयातील अथवा गाव पातळीवरील पोलीस अधिकारी सर्वसामान्य माणसांच्या तक्रारींची नोंद करुन घेत नाहीत. जिल्हयाच्या ठिकाणी एखादी घटना घडली अथवा अपघात झाला तर त्याची नोंद करण्यासाठी श्रीमंत व्यक्ती असो वा गरीब व्यक्ती असो त्याच्या तक्रारीची नोंद पोलीस स्टेशनच्या अधिका-यांनी नोंदवून घेतली पाहिजे. याबाबतीत शासनाने सर्व पोलीस स्टेशनमधील अधिका-यांना तशा सूचना तात्काळ दिल्या पाहिजेत. काही प्रसंगी दूरध्वनीवरुन पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्याची वेळ येते, तशा तक्रारींची नोंद देखील संबंधित पोलीस स्टेशनच्या अधिका-यांनी नोंदवून घेतली पाहिजे. त्याचप्रमाणे ब-याच वेळेला सर्व सामान्य व्यक्ती पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यासाठी गेली तर त्यांना पोलीस अधिका-याकडून सरळ सांगण्यात येते की, तक्रार नोंदवून घेण्याचे काम आमचे नाही. तक्रार नोंदवून घेण्याची जबाबदारी आमची नाही. याबाबतीतही माननीय उप मुख्यमंत्र्यांनी आणि माननीय गृह राज्यमंत्र्यांनी लक्ष घालणे गरजेचे आहे. मुंबई शहरात अतिरेक्यांनी हल्ला केला, सदर अतिरेकी मुंबईत आले, यासंबंधी एका सर्वसामान्य माणसाने पोलीस स्टेशनला कळविले होते. परंतु त्याची दखल पोलीस अधिका-यांनी घेतली नाही. त्यांनी वेळीच त्या व्यक्तीच्या तक्रारीची दखल घेतली असती तर हा अनर्थ टळला असता. म्हणून माझी पुन:श्च विनंती आहे की, पोलीस स्टेशनमध्ये कोणतीही व्यक्ती तक्रार नोंदविण्यास गेली तर त्याची तक्रार संबंधित पोलीस अधिका-यांनी नोंदवून घेतली पाहिजे. मुंबईमध्ये जो अतिरेकी हल्ला झाला, त्या घटनेची संपूर्ण जबाबदारी स्वीकारुन केंद्रीय गृहमंत्री

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी....

यांनी राजीनामा दिला. माननीय श्री. विलासराव देशमुख यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. माननीय श्री. आर.आर.पाटील यांनी देखील या घटनेची जबाबदारी स्वीकारुन उप मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला.( अडथळा )

सभापती महोदय, मला हिंदी भाषा अवगत आहे. परंतु या ठिकाणी मराठी भाषेचा आग्रह धरला जातो, त्यामुळे मी मोडक्या, तोडक्या शब्दात आपले मनोगत मराठीतून व्यक्त करीत आहे. सन्माननीय सदस्यांनी माझ्या बोलण्यात अडथळा आणू नये अशी माझी त्यांना विनंती आहे. मराठी,इंग्रजी आणि हिंदी भाषेमध्ये फरक आहे. श्री. आर.आर.पाटील यांनी हिंदीतून जे वक्तव्य केले त्या वक्तव्याचा अनर्थ काढला गेला त्यामुळे त्यांनी या घटनेची जबाबदारी स्वीकारुन आपल्या पदाचा राजीनामा दिला. आपल्या देशात प्रथमच रेल्वेचा अपघात झाला त्यावेळी लाल बहादूर शास्त्री यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. त्याप्रमाणे या घटनेची जबाबदारी स्वीकारुन केंद्रीय गृहमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. अतिरेक्यांनी संसदेवर हल्ला केला, अक्षरधामवर हल्ला केला. कारगिल येथे अनेक अतिरेकी घुसले होते, त्या घुसखोरांना परत पाठविण्याकामी आपले अनेक जवान मृत्यूमुखी पडले....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MMP/ 19:45

श्री.जैनुद्दीन जव्हेरी.....

हा हमला नव्हता. त्याचे पुरावे मिळाले नाही की, हा हमला पाकिस्तानने केला. घुसखोर होते त्यांना पळवून लावण्यात आले. पाकिस्तानचा हल्ला होता असा युनोने पुरावा दिला नाही. कारगिलमध्ये घुसखोर आले त्यांना बाहेर घालविण्यात आले. त्यात अनेक लोक ठार झाले. याची जबाबदारी कोणी स्वीकारली नाही. राजीनामा कोणी दिला नाही. जयजयकार झाला. आम्ही त्या होकाराला होकार दिला. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते श्री.शरद पवार, काँग्रेस पक्षाच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी यांनी असे म्हटले की जनता नाराज आहे, चूक झाली न झाली तरी राजीनामा तुम्हाला द्यावा लागेल. त्यानुसार मोठ्या मनाने श्री.विलासराव देशमुख यांनी राजीनामा दिला. पत्रकार परिषद घेऊन सांगितले, माझ्यावर कोणतेही आरोप झाले म्हणून मी राजीनामा दिलेला नाही. मी भ्रष्टाचार केला, पैसे घेतले म्हणून राजीनामा दिलेला नाही. त्यांचा राजीनामा स्वीकृत करण्यात आला. काही वेळेला टीका करण्यात आली. मुख्यमंत्री निवडण्यासाठी इतके दिवस लागले. राजकारणात असे होते. काँग्रेस हा मोठा पक्ष आहे. परंतु हा जो हल्ला झाला त्याचा विचार करीत असताना हा आंतरराष्ट्रीय दहशतवाद आहे, ज्यांनी दहशतवाद पसरविण्यासाठी मुंबईत व भारतात अतिरेकी पाठविले, दादागिरी करुन पैसे वसूल करायचे, मोठ्या व्यापाऱ्यांकडून पैसे वसूल करण्यासाठी हा हल्ला झाला नाही ना? मुंबईमध्ये कित्येक वर्षापासून चर्चा आहे की, दाऊद आणि त्याचे सहकारी मोठया लोकांकडून पैसे वसूल करीत असतात. हा हल्ला म्हणजे जेहादी आहे असे म्हटले जाते. परंतु जेहादी आहे की पैशासाठी हल्ला झाला? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, मी शहीद झालेल्यांना सलाम करतो. सलाम म्हणजे काय? सलाम म्हणजे देवाचे नाव घेऊन नमस्कार करणे. हा अरबी शब्द आहे. याचा खरा अर्थ असा की, ईश्वराचे नाव घेऊन तूला नमस्कार करतो. जेहादीबद्दल अनेकांनी वेगवेगळे अर्थ सांगितले. 26 नोव्हेंबरला हल्ला होऊन 20 दिवस उलटले. तीन मंत्र्यांनी राजीनामे दिले. परंतु या घटनेला कोणते अधिकारी जबाबदार होते, कोण लोक होते, बोट आली, अहवाल दिला, फोन आले याची चौकशी करुन प्रथम जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे. महाराष्ट्र शासनाला अधिकार नसेल तर केंद्र शासनाला दोन्ही सभागृहाचा ठराव करुन प्रस्ताव पाठवावा आणि असा कायदा करावा, ज्या कायद्याची अतिरेक्यांना भीती वाटली पाहिजे. फिदाईन म्हणजे मी गेलो तर माझ्या परिवाराची काळजी घेतली जाते. अरब देशात असे घडत नाही. मी गेलो तर माझा परिवार

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी.....

देखील संपतो. त्यामुळे कडक कायदा करण्यासाठी युनोला सांगावे, दिल्लीकरांना सांगावे. फिदाईन गेला तरी त्याच्या ब्लड रिलेशनमधील सर्व सदस्यांना कलम 302 लावला गेला पाहिजे, त्याची जितकी प्रॉपर्टी असेल ती जप्त झाली पाहिजे, म्हणजे कोणी फिदाईन उरणार नाही आणि यापुढे दहशतवादी हल्ला होणार नाही. मला याठिकाणी बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल धन्यवाद आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांना धन्यवाद देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

-------

(नंतर श्री.खर्चे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, सब से पहले मैं आपके सामने 2 पॉइंट ऑफ आर्डर पेश करना चाहता हूॅं. मेरा पहला पॉइंट ऑफ आर्डर यह है कि सभागृह के जो माननीय सदस्य बी.ए.सी. में हैं, उनको समय निश्चित करना चाहिए कि कितनी देर सत्ताधारी पक्ष के लोग बोलेंगे, कितनी देर विरोधी पक्ष के लोग बोलेंगे और कितनी देर माननीय विरोधी पक्ष नेता बोलेंगे. इस बारे में बी.ए.सी में परामर्श किया जाना चाहिए.

सभापति महोदय, मेरा दूसरा पॉइंट आपफ आर्डर यह है कि आज की इस चर्चा में बोलने के लिए सब से पहले हमने नाम दिया था और सब से आखिर में मेरा नम्बर आया है. प्रतोद ने मेरा नाम दिया है, लेकिन नाम में शायद उपर नीचे हो गया है. इसलिए जिन्होंने पहले नाम दिया है, उनको बोलने का मौका पहले मिलना चाहिए.

सभापति महोदय, सभागृह में वरिष्ठ सदस्य श्री. गडकरी जी ने 26 नवम्बर 2008 को मुंबई में हुए कांड के बारे में जो प्रस्ताव रखा है, उस पर बोलते हुए दोनों तरफ के माननीय वरिष्ठ सदस्यों ने जो संयम दिखाया है, उसके लिए मैं उनका स्वागत करना चाहता हूॅं. इस कांड के समय जिन बहादुर अफसरों, सिपाहियों और एन.एस.जी. के कमांडो ने जिस बहादुरी के साथ आतंकवादियों का सामना करते हुए अपनी जान दे दी, उनको मैं श्रद्धांजलि देता हूॅं और उनको सलाम करता हूॅं. मैं उन सारे लोगों का सम्मान करता हूॅं जिन लोगों ने बहादुरी के साथ 60 घंटे तक संघर्ष करते हुए आतंकवादियों को समाप्त किया और एक आतंकवादी को जिंदा पकड़ा.

सभापति महोदय, मैं अपने देश के संविधान को सलाम करता हूॅं. 60 साल की आजादी के बाद भी हमारे डेमोक्रेटिक सिस्टम ने हिन्दुस्तान को एक रखा है. हमारे देश में बहुत सारी घटनाएं होती है, कभी कानून और व्यवस्था की समस्या होती है, कभी कहीं हिंसा होती है और 26 नवम्बर को "इन्टरनेशनली स्पोन्सर्ड" आतंकवादी की घटना हुई और उसके बाद भी पूरे देश में शान्ति और एकता बनी रही. इसलिए हम अपने देश के संविधान को सलाम करते हैं. हमारे देश के बगल में पाकिस्तान है, बंगलादेश है और वहां पर एक ही धर्म और भाषा के लोगों का राज है, लेकिन वे अपने यहां प्रजातंत्र को बचा नहीं पाए. देश के संविधान को बनाने वाले डॉ. बाबासाहेब अंबेडकर को मैं सलाम करता हूॅं. हमारा देश मल्टी रिलीजियस, मल्टी कल्चरल होने के बाद भी हमारे देश में सरकार बॅलट से बदलती हैं, बुलट से नहीं बदलती है. हमारे यहां पर डेमोक्रेसी है.

. . . 5A 2

PFK/ KGS/ MMP/ 19:50

. . . . . श्री. सय्यद जामा

सभापति महोदय, मैं लोकसभा का भी अभिनन्दन करना चाहता हूँ. सभी पार्टी के नेताओं ने, सभी लोकसभा सदस्यों ने एक आवाज में प्रस्ताव पास करके इस घटना को कंडेम किया है. कम्युनल एवेन्जर्स के खिलाफ उन्होंने एक स्वर में अपनी आवाज बुलन्द की है. पूरी पार्लियामेंट का एकमत रहा और कहा कि प्रधानमंत्री जो एक्शन लेना चाहते हैं, सरकार जो एक्शन लेना चाहती है, उसमें सारी पालिर्यामेंट उनके साथ है. इसलिए मैं उनको और उनकी इस भावना को सलाम करता हूँ.

. . . . भाषण जारी 5 B- 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जामा जारी

सभापति महोदय, हमारे प्रधानमंत्री जी ने स्वीकार किया है कि हमारा कहीं न कहीं इन्सटिट्यूशनल फेल्युअर हुआ है. इसके लिए केन्द्रीय गृह मंत्री नें त्यागपत्र दिया है. हमारे राज्य के गृह मंत्री और मुख्य मंत्री ने भी त्यागपत्र दिया है. कहीं न कहीं हमारा फेल्युअर हुआ है इसलिए इस बात की जबाबदारी एस्टाब्लिश हुई है. जिन पुलिस अधिकारियों ने बहादुरी दिखाई उनकी सेन्स ऑफ ड्यूटी को मैं सलाम करता हूँ. लेकिन मेरा सवाल हमारी सरकार से यह है कि उस समय हमारी क्विक रेस्पोंस टीम कहां थी. ए.टी.एस. के चीफ और अन्य 2 अधिकारी एक ही गाड़ी में जा रहे थे और वहां पर उनको मौत का सामना करना पड़ा. हमारी क्विक रेस्पोंस टीम उस समय कहीं नहीं थी. इस आतंकवादी घटना के समय हमारे सिस्टम का फेल्युअर था और जिन अधिकारियों की वजह से यह हुआ, उन पर इस बात की जिम्मेदारी तय की जानी चाहिए.

सभापति महोदय, हमारे देश की जनता शान्ति और अमन चाहती है, हमारे देश की जनता आतंकवाद से छुटकारा चाहती है. इसके लिए हमारे देश की जनता एक है. मेरा इस सदन से निवेदन है कि जिस तरह से पार्लियामेंट में एकमत से प्रस्ताव पास हुआ है, उसी तरह से यह सदन एक आवाज से प्रस्ताव पास करे कि आतंकवाद से लड़ने के लिए पूरा महाराष्ट्र एक है.

सभापति महोदय, मैं आपके सामने 2-3 बातें कहना चाहता हूँ. 26 नवम्बर को मुंबई की घटना एक टेरिरिस्ट एक्शन है, यह ग्लोबल है और मिडिल ईस्ट के देशों तक फैला हुआ है. प्रिंट मीडिया और इलोक्ट्रोनिक मीडिया के माध्यम से इसको सारी दुनिया ने देखा है. इन सारी बातों को, इन सारी घटनाओं को हर पेपर, हर इलेक्ट्रोनिक मीडिया अपनी तरह से प्रोजक्ट कर रहा है और उसके उपर अगर हम जाएंगे तो बहुत सारे कॉन्ट्राडिक्शन होंगे. इन सारी बातों का निष्कर्ष यही है कि हमारे सिस्टम का फेल्युअर हुआ है और हमारी पॉलिटिकल लीडरशिप की इमेज जनता में खराब हुई है, उनकी विश्वसनीयता लूज हुई है. जिन लोगों ने गेट वे ऑफ इंडिया पर प्रदर्शन किया, मैं उनके साथ नहीं हूँ. जब हमारे देश में पार्लियामेंट्री डेमोक्रेसी है और बॅलट से सरकार बनती है, लोकसभा और विधान सभा के सदस्य चुनकर आते हैं, इसलिए उनको कंडेम करने का अधिकार किसी को नहीं है.

5B-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . .श्री. सय्यद जामा

सभापति महोदय, मैं एक बात यहां पर स्पष्ट कर देना चाहता हूँ कि आतंकवाद चाहे हमारे देश में हो या दूसरे देशों में हो, इसका डायरेक्टली या इनडायरेक्टली कोई भी जस्टीफिकेशन नहीं हो सकता है, चाहे वह सिविल लिबर्टी की बात हो, चाहे वह फंडामेंटल राइट्स की बात हो, चाहे इकॉनॉमिकल, पॉलिटिकल या सोशल प्रॉब्लम की बात हो, आतंकवादी घटनाओं का कोई भी जस्टीफिकेशन नहीं हो सकता है. इसलिए आतंकवाद से निपटने के लिए चाहे हमें विशेष कानून बनाने पड़े, चाहे संविधान में संशोधन करना पड़े, जो कुछ करना जरूरी हो, वह हमें करना चाहिए. आतंकवादी को मालूम है कि वह बेकसूर लोगों को मारने जा रहा है, उसको कौन से मानवाधिकार की परवाह है, उसे कौन से संविधान की चिन्ता है, वह खुद मरने के लिए निकला है, इसलिए आतंकवाद को डील करने के लिए और आतंकवाद को जड़ से खत्म करने के लिए अगर भारत के संविधान को सस्पेंड करना पड़े तो भी हमें यह कार्य करना चाहिए. भारतवासी होने के नाते हमारी यह भावना है.

. . . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आतंकवादियों ने निर्दोष लोगों को जान से मारा है. ऐसे आतंकवादियों के प्रति दया भावना दिखाने की जरुरत नहीं है. उन्हें कड़ी से कड़ी सजा होनी चाहिए. मानव अधिकार की बात इसमें पैदा ही नहीं हो सकती. आतंकवादी निर्दोष लोगों को मार रहे हैं. दो-तीन नेताओं को मारते तो मैं समझ सकता था. इसलिए हमें अब आतंकवाद से लड़ने के लिए कड़े कदम उठाने चाहिए. अब आतंकवाद से लड़ने के लिए जो भावना हम सब की बन गई है, उस दिशा में हम सब जनप्रनिधियों का यह धर्म है कि उसे टिका कर रखें. संसद पर हमला हुआ था, गुजरात में आतंकवादी हमला हुआ था, जम्मू-काश्मिर में आतंकवादी हमले हो रहे हैं. इस स्थिति में हम एक दूसरे पर आरोप लगाएंगे तो काम नहीं होगा. अब हमें अपनी सिस्टम को मजबूत करना है, हमें अपनी फौज को मजबूत करना है. कमांडो तैयार करने हैं. कम्युनिकेशन, इंटलीजंस को मजबूत करना है. महाराष्ट्र में जो 720 किलोमीटर लंबा समुद्र तट है और पूरे देश में जो 7500 किलोमीटर लंबा समुद्र तट है, उसे कैसे सुरक्षित बनाया जाए, इस बात पर चर्चा होनी चाहिए और कोई उपाय किए जाने चाहिए. एक दूसरे की आलोचना करने से बात नहीं बनेगी. हमारे देश की संवैधानिक व्यवस्था के अन्तर्गत राज्य में कानून और व्यवस्था बनाये रखने की जिम्मेदारी राज्य सरकार पर सौंपी गई है. उसी प्रकार से अंतर्राष्ट्रीय विषयों के संबंध में निर्णय लेने की जिम्मेदारी केन्द्रीय सरकार पर सौंपी गई है. अंतर्राष्ट्रीय आतंकवाद की समस्या हो, फर्जी नोट का मामला हो, ऐसे विषयों की जांच करने के लिए और फैसला करने के लिए कोई फास्ट ट्रेक सिस्टम होनी चाहिए. इस प्रकार का कानून बनाया जाए जिसके अन्तर्गत समयबध्द फैसला हो सके. फेडरल कानून की जरुरत महसूस हो रही है, तो उस पर भी विचार किया जाना चाहिए. संसद की सहमति से इस प्रकार का फेडरल कानून बनाया जा सकता है. आतंकवाद से संबंधी मामलों की जांच के लिए केन्द्रीय जांच एजेंसी बनाई जाए या फेडरल टीम, एजेंसी बनाई जाए. यह एजेंसी ऐसे मामलों की समयबध्द जांच करें. उसी प्रकार से ऐसी व्यवस्था होनी चाहिए कि जब कभी ऐसा संकट आए तो परिस्थिति को नियंत्रित करने के लिए, रिस्टोर करने के लिए वह एजेंसी तुरन्त हरकत में आ सके. कानून में संशोधन करके पुलिस, एटीएस को अपना काम अंजाम देने के लिए पूर्ण रुप से सुरक्षा प्रदान की जाए. यह बात कही जाती है कि राजनीतिक हस्तक्षेप के कारण पुलिस अपना काम ठीक से नहीं कर पाती. पुलिस विभाग के अन्तर्गत पोस्टिंग में, प्रमोशन में कर्मचारियों एवम् अधिकारियों पर अन्याय न हो. मेरिट के अनुसार काम होना चाहिए. इसलिए

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुलिस अपना काम कैसे ठीक प्रकार से कर सके, उन्हें पूरा प्रोटेक्शन देने के लिए व्यवस्था होनी चाहिए. इस संबंध में कानून में कोई प्रावधान कर सकते हैं तो सरकार को इस पर जरुर विचार करना चाहिए. दूसरी बात यह है कि हमारे देश में इलेक्ट्रानिक मीडिया और प्रिंट मीडिया को पूरी आजादी है. लेकिन इनको कितनी आजादी मिलनी चाहिए, इस बात पर भी विचार होना चाहिए. केन्द्रीय सरकार ने रेगूलेटरी अथॉरिटी बनाई है. अगर मीडिया की भूमिका से सिक्योरिटी को खतरा पैदा होता है तो उस संबंध में मीडिया पर क्या कोई प्रतिबंध लगाया जा सकता है, इस बात पर भी विचार होना चाहिए. मेरा विचार है कि ऐसी कोई रेगूलेटरी अथॉरिटी या कोड बनाया जाना चाहिए ताकि मीडिया अपनी लीमिट से बाहर न जाए. अगर सभी पक्ष के लोग सहमत है तो दूसरा मेरा यह सुझाव है कि महाराष्ट्र में सिक्योरिटी कौंसिल बनाई जानी चाहिए. इस सिक्योरिटी कौंसिल में राजनीतिज्ञ, अच्छे अधिकारी, अच्छे लोगों का समावेश किया जाए. हर तीन महीने में इस सिक्योरिटी कौंसिल की बैठक हो. यह सिक्योरिटी कौंसिल पब्लिक ओपीनियन का ख्याल रखें. यह सिक्योरिटी कौंसिल तुरंत हरकत में आए. मेरिट के आधार पर आतंकवाद विरोधी दस्ते में अधिकारियों का चयन किया जाए. इस काम के लिए अलग से बजट में प्रोवीजन की जाए. अगर विकास के कुछ काम रोक सके और इस काम के लिए बजट प्रोवीजन कर सकते हैं तो वह प्रोवीजन की जानी चाहिए. गृह विभाग के लिए 127 करोड़ रुपए का प्रावधान किया गया है. अगर इस धनराशि से काम नहीं चलेगा तो और ज्यादा धनराशि का प्रावधान किया जाना चाहिए, क्योंकि देश की सुरक्षा के साथ कोई समझौता नहीं हो सकता. यह सारे देशवासियों की भावना है.

सभापति महोदय, अन्त में मैं एक बार फिर से हमारे दोनों पक्ष के माननीय सदस्यों को धन्यवाद देना चाहता हूँ कि मिलकर काम करने की जो एक राष्ट्रीय भावना बनी है, उसका आपने साथ दिया है. आपने जो प्रस्ताव यहां पर पेश किया और उस पर विचार किया, उसके लिए मैं फिर से आपको धन्यवाद देता हूँ. जयहिंद .

..........

भाषण पूर्ण .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेते ) :सभापती महोदय, मुंबईत अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्याच्या संदर्भात सभागृहात सकाळ पासून जवळजवळ साडेसात तास चर्चा सुरु आहे. या विषयाच्या संदर्भात नियम 93 अन्वये प्रस्ताव मांडण्यात आला असून गट नेत्यांच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे काल मर्यादा ठरवून एका मर्यादित स्वरुपात सन्माननीय सदस्यांनी भाषणे केली व आपले विचार मांडले. त्याबद्दल मी सर्व सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो. या प्रस्तावावरील चर्चेतून कोठे गालबोट लागेल अशा प्रकारचे वक्तव्य कोणीही केलेले नाही...

**तालिका सभापती ( ॲड.अनिल परब )** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी विनंती करतो की, त्यांनी आपले भाषण आता थांबवावे आणि उद्या पुढे सुरु करावे. या प्रस्तावावरील चर्चा आता थांबविण्यात येत आहे. प्रस्तावावरील उर्वरित चर्चा उद्या घेण्यात येईल आणि माननीय गृह मंत्री उद्या दिनांक 17 डिसेंबर 2008 रोजी या चर्चेला उत्तर देतील.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 17 डिसेंबर 2008 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 6 मिनिटांनी बुधवार, दिनांक 17 डिसेंबर 2008 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली )

''''''''''

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही